Barcode : 2030020025912
Title - Aagarakar
Author - -
Language - marathi
Pages - 188
Publication Year - 1950
Barcode EAN.UCC-13
2030020025912

# THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY
OU_194220
UNIVERSAL LIBRARY

# आगरकर

## व्यक्ति आणि विचार

संपादक व प्रस्तावक

**वि. स. खांडेकर**

**किंमत ३॥ रुपये**

सोल एजंट
देशमुख आणि कंपनी
१९१ शनिवार, पुणें २.

( १ ) सर्व हक्क स्वाधीन.

( २ ) मुखपृष्ठावरील चित्र श्री. दीनानाथ दलाल
यांचें आहे.

( ३ ) पुस्तकांतील चित्र श्री. कुलकर्णी, व्यवस्थापक
आनंद प्रेस, सातारा, यांनीं दिलें, त्याबद्दल
कंपनी त्यांची आभारी आहे.

— प्रकाशक —
ज्ञा. पां हलदुले,
राजहंस प्रकाशन
५६४ शनवार, पुणें २.

— मुद्रक —
न. वि. सरदेशपांडे,
आदर्श मुद्रणालय,
३९५।५ सदाशिव पेठ, पुणें २

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

| | |
|---|---|
| फुलें आणि दगड (आ. दुसरी) | ३ |
| घरट्याबाहेर ( ,, ) | ३ |
| पहिली लाट ( ,, ) | ३ |
| स्त्री आणि पुरुष ( ,, ) | २ |
| सूर्यकमळें ( ,, ) | २॥ |
| कालचीं स्वप्नें | ३ |
| आजचीं स्वप्नें | ३ |
| कलिका | २। |
| मृगजळांतील कळ्या | २॥ |
| सुवर्ण-कण | २। |
| सायंकाल ( आ. दुसरी ) | २॥ |
| अविनाश | १॥। |
| मंदाकिनी | १॥। |
| मंजिऱ्या | २। |
| सहा भाषणें | २ |
| फुलें आणि कांटे | २। |
| हिरवा चांफा ( आ. तिसरी ) | ५ |
| दोन ध्रुव ( ,, ,, ) | ५ |
| पहिलें प्रेम ( आ. दुसरी ) | ३ |
| क्रौंचवध ( ,, ,, ) | ५ |
| पांढरे ढग ( ,, ,, ) | ४। |
| जळलेला मोहोर | ३ |
| मराठीचा नाट्य-संसार | ३ |

## ना. धों. ताम्हनकर

| | |
|---|---|
| ताल्या भाग १ ला (आ. दुसरी) | ४ |
| ताल्या भाग २ रा | ३ |
| निवाडे भाग १ ला | २॥ |
| निवाडे भाग २ रा | ४ |
| चकमकी | १॥ |
| बच्चा नवरा | १॥ |
| अनेक आशीर्वाद | ३॥ |
| दाजी भा. १ ला (आ. तिसरी) | ३॥ |

## ग. त्र्यं. माडखोलकर

| | |
|---|---|
| अवशेष | २ |
| व्यक्तिरेखा | २। |
| माझी नभोवाणी | २ |
| नवे संसार (जप्त) | ४ |
| चंदनवाडी | ६॥ |
| नागकन्या | २ |

## साने गुरुजी

| | |
|---|---|
| पुनर्जन्म ( आ. दुसरी ) | ३ |
| आस्तिक ( ,, ) | ३ |
| सोन्यामारुति! ( ,, ) | २ |
| गोड निबंध ( भा. १ ) | ३ |
| गोड निबंध ( भा. २ ) | ३ |
| गोड निबंध (भा. ३ रा) | ३ |

## चिं. वि. जोशी

| | |
|---|---|
| आणखी चिमणराव (आ. २री) | ४ |
| नवें भारूड | २ |
| स्टेशनमास्तर | २ |
| नटश्रेष्ठ | ॥। |

## दत्तु बांदेकर

| | |
|---|---|
| सख्याहरी ( आ. दुसरी ) | १॥ |
| नवी आघाडी | १॥ |
| तूं आणि मी | २। |
| नजरबंदी | २। |

**अनंत काणेकर**

धुक्यांतून लाल
  तान्याकडे (दु. आ.) ३
पिकलीं पानें ( ,, ) १॥
उघड्या खिडक्या १॥

**वा. म. जोशी**

स्मृति–लहरी २
विचार–लहरी २।
विचार–विहार ४।

**प्र. के. अत्रे**

साखरपुडा १॥
ललितवाङ्मय ३॥
दूर्वा आणि फुलें २।

**द. र. कवठेकर**

अपुरा डाव ३
रेशमाच्या गांठी ३
आभाळाची सावली ८

**ना. ह. आपटे**

फसगत १॥
साजणी ५

**ना. म. पटवर्धन**

हितपत्रें ३
वा. म. जोशी यांचें चरित्र ४।

**य. दि. पेण्ढरकर**

प्रापंचिक पत्रें ३
घायाळ २

**काकासाहेब कालेलकर**

ब्रह्मदेशचा प्रवास १॥
भक्तिकुसुमें ३

**वि. म. भुस्कुटे**

स्टॅलिन ३॥
आई (मॅक्झिम गार्की) ७

**पु. य. देशपांडे**

नवें जग! २॥

**भाई बेके**

रॉयचरित्र १॥

**वि. स. खांडेकर**(परिचय लेखक)

काव्यज्योति १

**आनंदीबाई जयवंत**

पारंब्या २

**लक्ष्मणराव सरदेसाई**

ढासळलेले बुरुज २

**प्रो. वि. ह. कुलकर्णी**

व्यक्तिचित्रें २॥

**क्षमाबाई राव**

देणगी २॥

**शकुंतला परांजपे**

भिल्लिणीचीं बोरें ३

**कृष्णाबाई मोटे**

मिनाक्षीचें जीवन २।

**र. गो. सरदेसाई**

चलतीं नाणीं २

**रा. श्री. जोग**

सौन्दर्यशोध आणि आनंदबोध ८

**वि. वि. बोकील**

बेबीची बहीण ३

**सत्याग्रही**

ग्रह आणि तारे ४॥

**कमलाबाई टिळक**

आकाशगंगा २॥

**रामतनय**

साखरगोटी ५

**ह. रा. महाजनी**

आपलें आर्थिक नियोजन ५

**आचार्य भागवत**

वर्धा-शिक्षण-योजना ४।

# खांडेकर–वाङ्मय

## कथा–संग्रह

१ पाकळ्या (तिसरी आवृत्ति)
२ नवचन्द्रिका (दुसरी ,, )
३ समाधीवरलीं फुलें ( ,, )
४ पूजन ( ,, )
५ पहिली लाट ( ,, )
६ नवा प्रातःकाल ( ,, )
७ घरट्याबाहेर ( ,, )
८ फुलें आणि दगड ( ,, )
९ नवमल्लिका
१० दत्तक व इतर गोष्टी
११ जीवन–कला
१२ ऊनपाऊस; १३ दंव-बिन्दु
१४ विद्युत्प्रकाश; १५ अबोली
१६ सूर्यकमळें
१७ कल्चर्ड मोती
१८ स्त्री आणि पुरुष
१९ पहिल्या वहिल्या
२० कलिका
२१ मृगजळांतील कळ्या
२२ कालचीं स्वप्नें
२३ आजचीं स्वप्नें

## लघु–निबंध

१ वायुलहरी (दुसरी आवृत्ति)
२ सायंकाल ( ,, )
३ चांदण्यांत
४ अविनाश; ५ मंदाकिनी
६ मंजिऱ्या

## कादंबऱ्या

१ दोन ध्रुव (तिसरी आवृत्ति)
२ हिरवा चांफा (तिसरी आ.)
३ उल्का (तिसरी आ.)
४ दोन मनें ( ,, )
५ पांढरे ढग ( ,, )
६ पहिलें प्रेम ( ,, )
७ कांचनमृग ( ,, )
८ हृदयाची हांक ( ,, )
९ क्रौंच वध ( ,, )
१० रिकामा देव्हारा ( ,, )
११ सुखाचा शोध ( ,, )
१२ जळलेला मोहोर

## विविध

१ रंकांचें राज्य (नाटक)
२ वनभोजन (टीका)
३ धुंधुर्मास ( ,, )
४ गडकरी (व्यक्ति आणि वाङ्मय)
५ आगरकर चरित्र
६ सहा भाषणें (अध्यक्षीय भाषणें)
७ फुलें आणि कांटे (लेखसंग्रह)
८ गोकर्णीचीं फुलें ( ,, )

## बोलपट

| | |
|---|---|
| छाया | धर्मपत्नी (तेलगू) |
| ज्वाला | अमृत |
| देवता | संगम |
| सुखाचा शोध | तुझाच |
| माझं बाळ | बडी मां |
| लग्न पहावं करून | मूळ कथानक |
| सरकारी पाहुणे | प्रो. विं. वि. जोशी |

# गोपाळ गणेश आगरकर

## १

१९१५–१६ सालची गोष्ट. मी इंटरच्या वर्गात होतों तेव्हां. डॉ. गुणे आम्हांला संस्कृत नाटक शिकवीत असत. उत्तररामचरिताच्या त्यांच्या तासाची मी नेहमीं मोठ्या उत्कंठेनें वाट पाहात राही. कॉलेजांतल्या पहिल्या वर्षी त्यांनीं आम्हांला शाकुंतल शिकविलें होतें. त्यांत मी रंगून गेलों नव्हतों असें नाहीं. पण उत्तररामात शाकुंतलापेक्षां कांहीं तरी निराळीच गोडी आहे असा मला त्यांच्या पहिल्या तासापासून अनुभव येऊं लागला. शब्दसौष्ठव, कलाचातुर्य, कल्पनाविलास, इत्यादि गुणांत कालिदास भवभूतीपेक्षां श्रेष्ठ आहे हें सहज सिद्ध होण्याजोगें होतें. सौंदर्य, माधुर्य, कोमलपणा इत्यादि वैशिष्ट्यांत भवभूतीला त्याच्याशीं स्पर्धा करणें शक्य नव्हतें हें माझ्यासारख्या विद्यार्थ्यांच्याहि चटकन् लक्षांत येत असे. पण उत्तररामाचा तास सुरू झाला, खेळकरपणानें शाकुंतल शिकविणाऱ्या डॉ. गुण्यांच्या मुद्रेवर आणि स्वरांत एक प्रकारचें गांभीर्य प्रचीत होऊं लागलें, ' यथा स्त्रीणां तथा वाचां साधुत्वे दुर्जनो जनः ', ' ते हि नो दिवसा गताः ' अशासारखीं मानवतेचीं चिरंतन दुःखें लीलेनें व्यक्त करणारी भवभूतीची वाणी कानांत घुमूं लागली, ज्या क्षणीं रामचंद्र आपल्या डाव्या बाहूची उशी करून तिच्यावर निद्रावश झालेल्या सीतेचें मस्तक मोठ्या प्रेमानें ठेवतो, त्याच क्षणीं तिच्याविषयीं लोक किती साशंकतेनें बोलत आहेत हें सांगणारा गुप्त हेर दुर्मुख प्रवेश करतो हें पाहून दैवाच्या विचित्र लीलेच्या चित्रणानें पापण्यांच्या कडा ओल्या होऊं लागल्या, म्हणजे माझ्या मनांत येई—कालिदासांत नाहीं असें कांही तरी भवभूतींत आहे. कालिदास मेघांच्या श्यामल पंखांवर बसवून रसिक मनाला आकाश आणि पृथ्वी यांची विलक्षण शोभा दाखवीत असेल, मानवी वनलता आणि उद्यानलता यांचें सात्विक आणि उन्मादक सौंदर्य

चित्रित करण्यांतही त्याची प्रतिभा चतुर असेल; पण जीवनाच्या गांभ्यार्शी, हृदयांत खोलखोल लपवून ठेवलेल्या मानवतेच्या मूक दुःखांशीं त्याच्यापेक्षां भवभूतीचाच अधिक परिचय आहे. कालिदास वाचकाला स्वर्गांत नेणारा महाकवि असला तर भवभूति त्याला पाताळांत नेणारा महाकवि आहे. या कल्पनेनें प्रेरित होऊन मी भवभूतीचा अभ्यास करूं लागलों तेव्हां त्याच्या बाह्यतः सामान्य भासणाऱ्या एकेका चरणांत किती उत्कट काव्य भरलें आहे याची मला जाणीव होऊं लागली. आदर्शाच्या मागें लागणाऱ्या ध्येयवादी महात्म्याचें दुःख हेंच मानवी जीवनांतलें सर्वांत मोठें दुःख आहे, हें सांगण्याकरितां रामचरित्राची निवड करणाऱ्या त्याच्या प्रतिभेचें तर मला पहिल्यापासूनच कौतुक वाटे. पण पुढें पुढें कालिदासाच्या कल्पनारम्य चरणांनीं होणाऱ्या गुदगुल्यांपेक्षांही अनुभूतीला जागृत करणाऱ्या आणि डोळ्यांपुढें रसपूर्ण करुणरम्य चित्रें उभीं करणाऱ्या भवभूतीच्या अनलंकृत ओळींनीं मनाला लागणारा चटका मला अधिक सजीव आणि अधिक सुखद वाटूं लागला. 'अविदितगतयामा रात्रिरेव व्यरंसीत्' हा चरण असलेल्या श्लोकाचें ज्या दिवशीं वर्गांत विवेचन झालें, त्या दिवशीं रात्रीं माझ्या डोळ्यांपुढें वनवासांतल्या राम आणि सीता यांच्या मूर्ती पुनःपुन्हा उभ्या राहूं लागल्या. माझ्या मनांत कितीतरी कल्पनातरंग उद्भवले—तारकांचे दीप आणि वृक्षांचे पंखे असलेल्या धरित्रीच्या उघडया महालांत त्या प्रेमळ दंपतीनें काय काय गोष्टी केल्या असतील? स्वयंवराच्या वेळीं रावण शिवधनुष्यभंग करण्याकरितां उठला, तेव्हां आपली छाती कशी धडधडूं लागली हें त्यावेळीं सीतेनें रामाला सांगितलें असेल काय? पितृवचन पाळण्याकरितां कैकयीच्या इच्छेप्रमाणें आपण चौदा वर्षांचा वनवास हंसतमुखानें स्वीकारला, पण तो स्वीकारतांना हें ऐकून सीतेला किती दुःख होईल या विचारानें मनांतल्या मनांत आपण अत्यंत अस्वस्थ झालों होतों हें रामचंद्रानें हंसत हंसत सीतेपाशीं कबूल केलें असेल काय? सूर्याच्या साक्षीनें माणसें मोठमोठ्या प्रतिज्ञा करतात. पण त्यांच्या अंतरंगांतल्या नाजुक सुखदुःखांच्या स्मृती तारकांच्या साक्षीनेंच प्रगट होत असतात.

'रात्र संपली; पण गोष्टी संपल्या नाहींत.' एक सहजसुंदर उद्गार! जितका साधा तितकाच रम्य आणि भावमधुर. जितका प्रसादपूर्ण तितकाच

मानवी हृदयाच्या आर्ततेचें प्रतिबिंब दर्शविणारा ! उत्तरराम शिकत असतांनाच मी वाचीत असलेल्या ' डोंगरीच्या तुरुंगांतील आमचे एकशें एक दिवस ' या आगरकरांच्या छोट्या पुस्तकांत हें प्रतिबिंब स्पष्टपणें मला दिसलें.

एक अरण्यांतली रात्र; दुसरी तुरुंगांतली रात्र. दोन्ही रात्रींत तीन चार हजार वर्षांचें अंतर. तिथें पति पत्नींच्या गोष्टी चालल्या होत्या; इथे बंधु-भावाचे मित्र बोलत होते ! त्या दुसऱ्या रात्रींच्या गोष्टींची अवीट गोडी आगरकरांच्या तोंडूनच ऐकली पाहिजे. ते म्हणतात, ' मी एम्. ए. करिता व टिळक एल्एल्. बी. करितां अभ्यास करण्यासाठीं कॉलेजांत राहिलों असतां सरकारी नोकरी न पतकरतां देशसेवेंत आयुष्य घालविण्याचा ज्या दिवशीं निश्चय केला त्या दिवसापासून आम्ही जें जें बोललों चाललों होतों त्याची पुनः पुनः आठवण होऊन अनेक वेळां पुनरावृत्ति होत असे. अमुक गृहस्थाला कँपमध्यें भेटायला गेलों असतां परत येतांना काळोखांत वाट चुकून बारावर दोन वाजण्याच्या सुमारास फिरतां फिरतां बंडावर कसे येऊन ठेपलों; शाळेच्या संबंधानें विष्णुशास्त्र्यांशीं बोलणें लावण्यास गांवांत गेलों असतां कॉलेजाला परत येताना थंडीनें किती कुडकुडलों; वचन दिलें असतां शाळा आणि छापखाना काढला त्यावेळेस कोणकोणत्या लोकांनीं मागें घेतलें; असल्या फंदांत न पडणारे कोणकोण मनुष्य त्यांस घेरतां आले; आपले मूळचे हेतु कोणते व ते कितपत सिद्धीस गेले आहेत; शास्त्रीबोवांच्या अकालीं मृत्यूनें आपल्या उद्योगांस केवढा धक्का बसला; **आम्हीं आरंभिलेलीं कामें आमच्या हयातींत व आमच्या पाठीमागें कित्येक वर्षें अप्रतिहत चाललीं तर आमच्या देशस्थितीवर त्यांचा काय परिणाम होईल**; या देशावर इंग्रजांचें राज्य झाल्यानें त्याचें कोणकोणत्या बाबतींत हित आणि अनहित होत आहे, लोकशिक्षण उत्तरोत्तर जारीनें पसरत गेलें तर हिंदुस्थानची भावी स्थिति काय होईल; नेटिव संस्थानांची सुधारणा होण्यास काय उपाय करावे; देशभाषा युनिव्हर्सिटींत आणण्याला कोणती युक्ति काढावी, शाळा आणि कॉलेज बांधण्यास पैसे कसे गोळा करावे; कोल्हापूर-प्रकरणात आपली चूक किती आणि आपणांस भोगावी लागत असलेली शिक्षा किती न्याय्य आहे; आपण या तऱ्हेनें येथें अडकून राहिल्यानें

लोकांच्या मनावर काय परिणाम होईल व आपल्या शाळेचें आणि छापखान्याचें किती नुकसान होईल; आणीबाणीच्या प्रसंगीं आपणांस कोणकोण मित्र उपयोगी पडले व पुढें कोणाकोणाच्या मदतीवर आणि शब्दावर अवलंबून राहातां येईल; आतांप्रमाणें फिरून तुरुंगांत न येण्यासाठीं कोणत्या गोष्टींची खबरदारी ठेवली पाहिजे; **फिरून तुरुंगांत यावें लागलें तरी ज्या गोष्टी केल्याच पाहिजेत अशा गोष्टी कोणत्या**; वगैरे, नाहीं नाहीं त्या विषयांवर आमचा एकेक वेळ एवढ्या जोरानें वाद चाले कीं—'

अरण्यांत राम आणि सीता यांच्या गोष्टी थांबत असतील त्या पहाटे जाग्या झालेल्या पांखरांच्या गोड किलबिलाटानें. टिळक–आगरकर तेवढे भाग्यवान् नव्हते! त्यांच्या गोष्टी जोरजोरानें सुरू झाल्या कीं आसपासचे शिपाई 'हळु बोला, हळु बोला' असा त्यांना इशारा करीत. तो इशारा त्यांना ऐकावाच लागे. पण इतकें झालें तरी बोलतां बोलतां रात्र संपून जाई!

## २

रामचंद्राच्या जीवनाशीं आगरकरांच्या आयुष्याचें असलेलें साम्य केवळ या क्षणिक भावपूर्ण अनुभूतीपुरतेंच मर्यादित नाहीं. एक प्राचीन काळीं स्वतंत्र आर्यावर्तात जन्मलेला युवराज होता. दुसरा एकोणिसाव्या शतकांत गुलाम झालेल्या हिंदुस्थानांत एका दरिद्री कुटुंबांत जन्म पावलेला मुलगा होता. पण या दोघांही लोकोत्तर पुरुषांच्या कपाळीं विधात्यानें वनवास लिहून ठेवला होता. एकानें लोकानुरंजनाकरितां प्रियपत्नीचा त्याग करून दुःखाला मिठी मारली, तर दुसऱ्यानें लोकजागृतीकरितां अंध समाजाचा रोष पत्करून आणि जीवश्चकंठश्च मित्राचा आमरण विरोध स्वीकारून या जगांत ध्येयवाद्याला दुःखाशिवाय दुसरा सोबती मिळत नाहीं हें पुन्हां सिद्ध करून दाखविलें. या दोघांच्या काळांत अनेक शतकांचें अंतर असलें तरी त्यांचा प्रकृतिधर्म एकच होता. दोघांचीही ध्येयनिष्ठा सारखीच उत्कट होती. दोघेही सत्याचे उपासक, दोघेही आदर्शाचे भक्त! दोघेही ध्येयाकरितां हंसतमुखानें स्वसुखाच्या आहुत्या देणारे! भवभूतीच्याच शब्दांत सांगायचें तर दोघांचींही मनें वज्रापेक्षां कठोर व फुलापेक्षां कोमल होतीं. असल्या उदात्त आणि उत्कट मनाची प्रवाहपतित जगाला आणि शेंकडों शृंखलांनीं

जखडलेल्या सामान्य मनुष्याच्या बुद्धीला कल्पनाच करतां येत नाहीं. आगरकरांची जिवंतपणीं प्रेतयात्रा निघाली ती याच कारणामुळें. आगरकरांचें विभूतिमत्त्व त्यांच्या हयातींत बहुजन समाजाला जाणवलें नाहीं त्याचेंही कारण हेंच.

२

आगरकरांना अवघें एकुणचाळीस वर्षांचें आयुष्य लाभलें. अलौकिक व्यक्तींना आयुष्य देतांना विधाता कृपण होतो हा जुना अनुभव दुर्दैवानें त्यांच्याही बाबतींत खरा ठरला. पण त्यांचा एकुणचाळीस वर्षांचा तोकडा जीवनपट कितीतरी करुणरम्य आणि धीरोदात्त घटनांनीं नटला आहे.

१८५६ साल. कऱ्हाडजवळचें टेंभू गांव. त्या गांवांतल्या गणेशपंत आगरकरांना एक मुलगा होतो. भोंवतालीं गोकुळ नसतें; सहारा असतो. पण बारशादिवशीं सरस्वतीबाई आवडीनें आपल्या मुलाचें गोपाळ असें नांव ठेवतात. चिमणा गोपाळ यथाकाल रांगूं लागतो, उभा राहूं लागतो, बोबडे बोल बोलूं लागतो. मुलाच्या या बाललीलांचें आईबाप कौतुक करतात. पण तो थोडासा मोठा होतांच त्यांच्या पोटांत गोळा उभा राहातो. आतां गोपाळाच्या शिक्षणाची कांहीं तरी व्यवस्था केली पाहिजे. खेडेगांवांतल्या दरिद्री कुटुंबानें ती कुठें आणि कशी करायची ?

छोटा गोपाळ तेथून कऱ्हाडला येतो. तिथें त्याचें आजोळ असतें. आजोळीं त्याची शिक्षणाची सोय होते. कऱ्हाडला या बालजीवाला आपल्या आईची आठवण होत नाहीं असें नाहीं. मधूनमधून स्वप्नांत तो टेंभूला जाऊन आईच्या गळयाला मिठी मारतो. प्रसंगीं तिच्या कुशींत डोकें खुपसून अश्रुही ढाळतो. पण जागृतींत त्याचें बालमन आपल्या निर्धारापासून क्षणभरसुद्धां विचलित होत नाहीं. दारिद्र्य आणि दमा यांच्याशिवाय आपल्याला देण्याजोगें आपल्या आईबापापाशीं कांहीं नाहीं हें जणुं कांहीं त्याला कळून चुकलेलें असतें !

कऱ्हाडला गोपाळ जसा पोहण्यांत पटाईत होतो तसा तो लिहिण्यांतही तरबेज होतो. बारा वर्षें पुरीं व्हायच्या आंतच तो निबंध लिहूं लागतो. पण या बुद्धिवान् आणि महत्त्वाकांक्षी मुलाच्या वाटेंत दुर्दैव पुन्हां दत्त

म्हणून उभें राहतें. कऱ्हाडला फक्त पहिल्या तीन इंग्रजी यत्ता असतात. गोपाळ तिसरी पास होतो. 'पुढें काय?' हा प्रश्न त्याला भेडसावूं लागतो. नाखुषीनें आणि नाइलाजानें तो मामलेदारकचेरींत उमेदवारी करूं लागतो. पण सरस्वतीच्या वीणेच्या मधुर झंकाराची कल्पना असलेलें त्याचें मन लेखणीच्या कारकुनी कुरकुरींत रमूं शकत नाहीं. तो उमेदवारी सोडून रत्नागिरीच्या आपल्या एका नातलगाकडे मोठ्या आशेनें जातो. त्या नातलगापाशीं पैशाची श्रीमंती असली तरी मनाची नाहीं, हा कटु अनुभव येतांच गोपाळ वार लावून शिकूं लागतो, प्रसंगीं धोतरें धुवून तो विद्यार्जनाला मदत मिळवितो. आधीं शागीर्द आणि मग शास्त्री हीं दृश्यें ज्याच्या आयुष्यांत दिसतात असा एखादुसरा रामशास्त्री दर पिढीला निर्माण होत असतो. गोपाळ त्यांपैकींच एक होता.

रत्नागिरीला आपला नीट जम बसत नाहीं असें पाहून तो कऱ्हाडला परत येतो. तिथें कांहीं दिवस तो कंपाउंडरचें काम करतो. इतक्यांत मामींच्या बरोबर सोबत म्हणून अकोल्याला जायची त्याला संधि मिळते.

तहानेनें व्याकुळ झालेल्या माणसाला गंगा दिसावी तशी गोपाळाची स्थिति होते. तो अकोल्याला जाऊन पुढचा अभ्यास सुरू करतो. योग्य वेळीं तो मॅट्रिक होतो. पुन्हां मागचाच भयंकर प्रश्न—'पुढें काय?'—त्याच्यापुढें भुताप्रमाणें उभा राहतो. कॉलेजांत जायची इच्छा अतिशय उत्कट. पण जायचें कसें? मदत कोण करणार? पर्वताचें उंच उंच शिखर गांठण्याची पांगळयाची महत्त्वाकांक्षा—ती सफल झालेली कधीं कुणीं पाहिली आहे काय?

× × ×

पण नेपोलियनप्रमाणें आगरकरांच्या कोशांतही अशक्य हा शब्द नव्हता. शिक्षकांनीं गोळा करून दिलेले साठ रुपये घेऊन गोपाळरावांनीं डेक्कन कॉलेजांत प्रवेश केला. शिष्यवृत्ति संपादन करून, वर्तमानपत्रांत लिखाण लिहून आणि वक्तृत्वसमारंभांत बक्षीस मिळवून त्यांनीं आपला कॉलेजचा खर्च कसाबसा चालविला. अशा तुटपुंज्या मिळकतींत विद्यार्थ्यांचे हाल हाल झाले नाहींत तरच नवल! कित्येक वेळां त्यांनीं एका सदऱ्यावर कॉलेजांतले दिवस काढले. तो दिवसा धुवून वाळत घातला तर अंगांत घालायला दुसरा सदरा नाहीं म्हणून रात्रीं जिकडे तिकडे सामसूम झाल्यावर

स्वारीनें अंगांतला सदरा धुवून वाळत घालावा आणि सकाळीं तो वाळला म्हणजे अंगांत घालावा !

अशा रीतीनें दारिद्य जणूं कांहीं आगरकरांच्या सत्त्वाची परीक्षाच घेत होतें ! जीवनांतल्या सर्व परीक्षांत सत्त्वपरीक्षा नेहमींच अतिशय अवघड असते. इतर परीक्षांत उपयोगीं पडणाऱ्या बुद्धीच्या बळावर ती कोणालाही उत्तीर्ण होतां येत नाहीं. तिच्यांतून पार पडायला असामान्य आत्मबळच अंगीं असावें लागतें. सुदैवानें आगरकरांच्यापाशीं तें भरपूर होतें. बी. ए. होईपर्यंतच्या तीन वर्षांत ते दारिद्र्याशीं अहोरात्र झुंजत राहिले. पण या झुंजीला कंटाळून त्यांनीं आपला शिक्षणक्रम सोडला नाहीं; किंवा पदवीधर होतांच एखादी लठ्ठ पगाराची नोकरी मिळवून आतांपर्यंतच्या हालअपेष्टांचा वचपा भरून काढावा असा विचारही त्यांच्या मनाला शिवला नाहीं. कॉलेजांतल्या तीन वर्षांत त्यांच्या बुद्धीचा वेगानें विकास होत चालला होता. मिल्ल आणि स्पेन्सर त्यांनीं नुसते वाचले नव्हते; ते पचविले होते. आपला देश राजकीय गुलामगिरींत पिचत आहे, आपला समाज सामाजिक गुलामगिरींत कुजत आहे, हें ते हरघडी उघड्या डोळ्यांनीं पहात होते आणि त्याच्या उद्धाराची तळमळ त्यांना अस्वस्थ करून सोडीत होती. टिळकांसारखा त्यांच्याइतकाच निग्रही आणि देशप्रेमी मित्र त्यांना लाभला होता. या दोघा मित्रांनीं कॉलेजांत असतांनाच एके दिवशीं निश्चय केला—सरकारी नोकरी न पत्करतां देशसेवेंत आयुष्य घालवायचें. आगरकरांनीं आईला पत्र लिहिलें, ‘ आपल्या मुलाच्या मोठाल्या परीक्षा होत आहेत, आतां त्याला मोठ्या पगाराची चाकरी लागेल व आपले पांग फिटतील, असे मोठाले मनोरथ, आई, तूं करीत असशील. पण मी आतांच तुला सांगून टाकतों कीं विशेष संपत्तीची, विशेष सुखाची हांव न धरतां मी फक्त पोटापुरत्या पैशांवर संतोष मानून सर्व वेळ परहितार्थ खर्च करणार. ’

१८७९ च्या सप्टेंबर महिन्यांतल्या एका रात्रीं नारायण पेठेंतल्या विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या घरीं नर-नारायणाची ही आधुनिक जोडी विचार-विनिमयाकरितां आली. विष्णुशास्त्र्यांचा भाषाभिमान आणि देशाभिमान जाज्वल्य होता. निबंधमालेच्या पानापानांतून या अभिमानाचे स्फुलिंग उठत होते. सरकारी नोकरीच्या पाशांतून ते नुकतेच मोकळे झाले होते.

तीन नद्यांच्या संगमाप्रमाणें तीन गुणी व्यक्तींचा संगमही दुर्मिळ असतो. महाराष्ट्राच्या सुदैवानें यावेळीं हा अपूर्व त्रिवेणीसंगम घडून आला. टिळक, आगरकर आणि चिपळूणकर या तिघांच्या देशसेवेच्या संकल्पांतून 'न्यू इंग्लिश स्कूल' ही शाळा, व 'केसरी' आणि 'मराठा' हीं वृत्तपत्रें जन्माला आलीं. लोकजागृतीच्या ध्येयानें प्रेरित झालेले हे तीन तेजस्वी देशभक्त नव्या महाराष्ट्राच्या क्षितिजावर चमकूं लागले. पण दैवाला हा अपूर्व योग पाहवला नाहीं. दुर्दैवानें दोन वर्षांनीं विष्णुशास्त्री वारले.

पण विष्णुशास्त्र्यांच्या मृत्यूमुळें त्यांनीं सुरू केलेल्या कुठल्याही कार्याला खंड पडला नाहीं. केसरीची गर्जना महाराष्ट्रांतल्या कानाकोपऱ्यांतून निनादूं लागली. 'न्यू इंग्लिश स्कूल'ची विलक्षण भरभराट झाली. टिळक-आगरकरांना बुद्धिमान् सहकारी लाभल्यामुळें लवकरच फर्ग्युसन कॉलेज जन्माला आलें. कॉलेजांत असतांना या जोडीनें देशसेवेचीं जीं उज्ज्वल स्वप्नें पाहिलीं होतीं, त्यांतलें एक एक सत्यसृष्टींत उतरूं लागलें.

पण सत्यसृष्टि ही स्वप्नसृष्टीपेक्षां निराळी आहे. भावनेच्या भरांत आणि ध्येयवादाच्या धुंदींत या जोडीला आपण एकजीव आहों असें नेहमींच वाटत आलें होतें. आपल्या विचारांतल्या विरोधाची आणि स्वभावांतल्या भेदांची त्यांना कल्पनाच नव्हती. भरतीच्या पाण्याखालीं लपलेले खडक तें पाणी ओसरूं लागतांच जसें वर डोकें करतात त्याप्रमाणें शाळा, कॉलेज, व वर्तमानपत्रें थोडींफार सुस्थिर होतांच ते सारे भेद आणि विरोध जाणवूं लागले. 'केसरी' निघाल्यापासून त्याच्या लेखनाचा भार मुख्यतः आगरकरांनींच वाहिला होता. पण आतां सामाजिक विषयावर स्वतःच्या मनाप्रमाणें स्पष्टपणें 'केसरींत' लिहिणें त्यांना कठिण होऊन बसलें. तत्त्वनिष्ठ आगरकरांची कुचंबणा होऊं लागली. सामाजिक सुधारणेच्या बाबतींत रूढिग्रस्त समाजाला चुचकारून भागणार नाहीं, प्रसंगीं त्याच्यावर चाबकाचाही प्रयोग केला पाहिजे अशी त्यांची श्रद्धा होती. टिळकांना ही श्रद्धा मान्य नव्हती. आगरकरांनीं 'केसरी' सोडून दिला आणि 'सुधारकाची' स्थापना केली.

'केसरी' सोडतांना आगरकरांना किती दुःख झालें असेल याची कुणालाही सहज कल्पना करतां येईल. टिळकांच्यासारख्या जिवश्चकंठश्च मित्राशीं अटीतटीचें विचारयुद्ध करतांनाही त्यांचें मन मागच्या

दहा वर्षांतल्या अनेक प्रेमळ आठवणींनीं व्याकुळ होऊन जात असेल. कितीतरी अविस्मरणीय रात्री त्यांच्या डोळ्यांपुढें पुन:पुन्हा उभ्या राहत असतील. सरकारी नोकरी न पत्करतां देशसेवेला वाहून घ्यायचें असा दोघांनींहि डेक्कन कॉलेजांत एका रात्रीं निश्चय केला होता. विष्णुशास्त्र्यांशीं विचारविनिमय करण्याकरितां दोघेही पावसाळ्यांतल्या एका रात्रीं कॉलेजांतून गांवांत आले होते आणि थंडीनें कुडकुडत कॉलेजवर परत गेले होते. डोंगरीच्या तुरुंगांतल्या अनेक रात्री या दोघांनीं फिरून तुरुंगांत यावें लागलें तरी ज्या गोष्टी केल्याच पाहिजेत अशा गोष्टी कोणत्या हें निश्चित करण्यांत घालविल्या होत्या. आपणा दोघांची एकरूपता अभंग आहे असेंच ते मानीत आले होते. पण—

तत्त्वनिष्ठा ही एक अत्यंत कठोर देवता आहे.

जीवनांतल्या अनेक नाजुक भावनांचा बळी घेतल्याशिवाय ती प्रसन्न होत नाहीं, हा अनुभव आगरकरांनाही यायचा होता. 'सुधारक' काढल्यापासून आगरकरांना टिळकांशीं अखंड झुंज घ्यावी लागली, त्यांचे कठोर वाक्प्रहार पदोपदीं सहन करावे लागले, आपल्या कार्यासाठीं त्यांच्यावर लेखणीनें धाव घालावे लागले. हें करतांना त्यांच्या भावनाप्रधान मनाला क्लेश झाले नसतील असें कसें म्हणतां येईल? पण त्यांच्या भावनाशीलतेनें त्यांच्या ध्येयनिष्ठेला कधींही दगा दिला नाहीं. मध्यरात्रीं कोंडाण्यावर चढणाऱ्या आणि प्राणांची पर्वा न करितां लढणाऱ्या तानाजीच्या वीरश्रीनें त्यांनीं आमरण 'सुधारक' चालविला. तो चालवितांना त्यांनीं पैशाकडे पाहिलें नाहीं, कीं कीर्तीकडे लक्ष दिलें नाहीं. त्यांची नजर एका ध्रुवताऱ्यावर खिळली होती. तो तारा म्हणजे लोकजागृति हा. आपल्या समाजांत जो जो लहान मोठा दोष त्यांना दिसला, त्याच्यात्याच्यावर शस्त्रवैद्याच्या कुशलतेनें आणि त्याच्या हातांतल्या शस्त्रांना जी धार असते ती आपल्या लेखणीला देऊन त्यांनीं सदैव निर्भय टीका केली. राघोबादादाला देहांत प्रायश्चित्त सांगण्याचें अलौकिक नीतिधैर्य रामशास्त्र्याला आयुष्यांत एकदांच दाखवावें लागलें. पण जुन्याच्या भजनीं लागून गुलाम झालेल्या, परंपरा पवित्र असलीच पाहिजे या कल्पनेनें अंध होऊन पदोपदीं चांचपडत राहणाऱ्या आणि मंद बुद्धीनें व बधिर भावनांनीं जीवन कंठीत राहिल्यामुळें

आपली प्रगति कुंठित करून घेतलेल्या हिंदु समाजाच्या गळीं अनेक कटु सत्यें उतरविण्याचें कार्य आगरकरांनीं 'सुधारक' काढल्या दिवसापासून निष्ठेनें आणि धैर्यानें केलें. हिंदु समाजाला अधोगतीला नेणाऱ्या राक्षसी रुढीविरुद्ध त्यांनीं 'न भूतो न भविष्यति' असें युद्ध पुकारलें. या लोक-विलक्षण लढाईत त्यांना सत्याशिवाय दुसरा कुणी सोबती नव्हता आणि लेखणीशिवाय त्यांच्या हातांत दुसरें कुठलेंही शस्त्र नव्हतें. कर्तव्य केल्याच्या समाधानाशिवाय दुसऱ्या कुठल्याही सुखाची त्यांना आशा नव्हती. पण ते अखंड लढत राहिले. जखमांची पर्वा न करतां, अंगांतून वाहणाऱ्या रक्ताच्या धारांकडे लक्ष न देतां ते आमरण झुंजत राहिले. त्यांच्या मृत्यूच्या वेळीं महाराष्ट्र हळहळत उद्गारला असेल, 'एक सत्पुरुष गेला.' पुढल्या पन्नास वर्षांनीं महाराष्ट्राची खात्री करून दिली कीं आगरकर नुसते सत्पुरुष नव्हते; ते महापुरुष होते.

## ४

आगरकरांच्या ज्या विशिष्ट गुणांनीं त्यांना महापुरुष केलें, त्यांपैकीं कांहींचीं बीजें त्यांच्या स्वभावांत लहानपणासूनच दृग्गोचर होत होतीं. ते अकोलें हायस्कुलांत शिकत असतांना विष्णु मोरेश्वर महाजनी त्यांचे शिक्षक होते. त्यांनीं आगरकरांचें वर्णन पुढें दिल्याप्रमाणें केले आहे : 'अंगयष्टि उंच, सडपातळ व काटक होती. डोळे पाणीदार होते. **भाषण ठसक्याचें व आत्मप्रत्ययानें मुसमुसलेलें असें होतें. स्वभाव मनमिळाऊ, लोकांच्या उपयोगी पडणारा असा होता.** बुद्धि चपल व ग्राहक होती, स्मृति मध्यमावर. **शब्दापेक्षां अर्थाकडे लक्ष फार.** वेळ फुकट दवडायचा नाहीं असा निश्चय.'

आगरकरांच्या या आत्मप्रत्ययाची त्या वेळची एक आख्यायिका प्रसिद्धच आहे. त्यांना शाळेंत यायला उशीर झालेला पाहून त्यांचे एक शिक्षक म्हणाले, 'तुम्ही असेच मागें पडणार! तुमच्या हातून काय होणार आहे?' आगरकरांनीं लगेच शिक्षकांना उत्तर दिलें, 'आपल्यासारखा एम्. ए. होईन तरच नांवाचा आगरकर.'

आगरकरांनीं या अभिमानाला अहंकाराचें स्वरूप मात्र कधींच येऊं

दिलें नाहीं. (आत्मविश्वास हा व्यक्तिविकासाचा पाया असतो,) ही त्यांच्या विद्यार्थीजीवनाची शिकवण आहे. पण (व्यक्तीपुढें जर उच्च सामाजिक ध्येय नसलें तर आत्मविश्वासाचें रूपांतर बहुधा अहंकारांत होतें.) आगरकरांचें सामाजिक मन इतक्या लहानपणीं जागृत झालें होतें आणि त्याची जागृति इतकी परमावधीला पोंचली होती कीं अहंकार त्यांच्या वाऱ्याला सुद्धां कधीं उभा राहिला नाहीं. याविषयीं आगरकरांच्या पत्नी यशोदाबाई यांची एक आठवण ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. त्या म्हणतात, ' रानड्यांच्याबद्दल ते नेहमीं माझ्यापाशीं मोठ्या आदरानें बोलत व म्हणत— पुण्यांत काय किंवा सबंध महाराष्ट्रांत काय पुष्कळ लोक शिकून मानाच्या व अधिकाराच्या जागांवर चढलेले आहेत. ते सर्व कोणी आपली संपत्ति वाढविण्याच्या खटपटींत आहेत, तर कोणी बायकामुलांत गुंग आहेत. पण रानड्यांच्या घरीं आपलें केव्हांही या; देशोन्नतीचे विचार, चर्चा आणि तळमळ याविषयीं त्यांच्या आपल्या कांहीं तरी योजना सुरूच आहेत.' रानड्यांचा हा आयुष्यक्रम पाहून आजार व प्रापंचिक गोष्टी यांत आपला फार वेळ जातो म्हणून त्यांना अतिशय वाईट वाटे.

आपला आजार आपल्या देशसेवेच्या आड येत आहे म्हणून आगरकरांना वाईट वाटणें स्वाभाविक होतें. पण या आजाराची खंत करीत मात्र ते बसले नाहींत. त्यांचें लेखन गांभीर्य, आवेश आणि तळमळ यांनीं भरलेलें असलें तरी ते विनोदाला पारखे नव्हते. किंबहुना मोठमोठ्या माणसांमध्यें सहसा न आढळणारी विनोददृष्टीची देणगी त्यांना लाभली होती. दम्यावर अनेक औषधें घेऊनही त्यांना मुळींच गुण आला नाहीं. दुसऱ्या कुणीही हा निराशाजनक अनुभव कडवट शब्दांनीं व्यक्त केला असता. पण आगरकर नेहमीं म्हणायचे ' माझा कोठा म्हणजे जगांतील सर्व वनस्पतींची एक मात्राच बनली आहे. माझ्या मरणानंतर जर कोणी तो कोठा सांभाळून वाळवून ठेवला तर कदाचित् हेमगर्भाच्या मात्रेप्रमाणें जगाला या मात्रेचाही उपयोग होईल !' (विनोद आणि सहृदयता हीं तत्त्वतः सख्खीं भावंडें असलीं तरी व्यवहारांत त्यांचें नेहमीं पटतेंच असें नाहीं.) विनोदाला सहृदयतेचा पाठिंबा नसेल तर तो घटिंगणाप्रमाणें वागूं लागतो. आणि सहृदयतेला विनोदाची जोड नसेल तर ती एखाद्या वेड्या बाईप्रमाणें एकच छंद घेऊन

बसते, हा जगाचा नित्याचा अनुभव आहे. पण आगरकरांच्या स्वभावांत या दोन दुर्मिळ वृत्तींचा मधुर संगम झाला होता. मुलानें घोडा घोडा करण्याचा हट्ट धरला तर तो पुरवायला स्वारी एका पायावर तयार व्हायची. इतकेंच नाहीं, तर खेळतां खेळतां मुलानें पाठीवर कोरडा उठविला म्हणजे 'सामाजिक सुधारणा घोड्याच्या धावेप्रमाणें लवकर अंमलांत याव्या म्हणून मी लोकांना शब्दांचे चाबूक मारतों. त्याची प्रतिकृतीच यशवंत माझ्या पाठीवर करीत आहे !' असें त्याच्यावर भाष्यही व्हायचें. याच यशवंताचें गणित कच्चें होतें. मधून मधून आगरकर स्वतः त्याला उदाहरणें सांगत, तीं समजावूनही देत; पण कांहीं केल्या त्याची समजूत पटत नसे. अशा वेळीं रागावून ते एकाद दुसरी चपराक त्याला देत. पण मग दिवसभर ही गोष्ट त्यांच्या मनाला लागत असे. अशा वेळीं ते यशोदाबाईंना म्हणत, 'त्याला समजलं नाहीं यांत त्याचा काय दोष ? उगीच मारायला नको होतें मी !'

आगरकरांच्या आयुष्यांत अपत्यवात्सल्यापासून समाजसुधारणेच्या तळमळीपर्यंत या सहृदयतेचा आविष्कार सदैव उत्कटत्वानें होत गेला. 'केसरी' आणि 'सुधारक' यांच्यांतलें भांडण हा सामाजिक दृष्ट्या आवश्यक असा एक विचारकलह होता. त्यांत आवेशाला जागा होती; अपशब्दांना नव्हती. तें वाग्बाणांचें युद्ध असलें तरी वैयक्तिक कुचेष्टेला त्यांत वाव नव्हता. पण प्रत्येक युद्ध आरंभीं धर्मयुद्ध असलें तरी लढतां लढतां त्यांत अधर्माचा प्रवेश होऊं लागतो. टिळक–आगरकरांच्या वाग्युद्धांतही हेंच घडलें. 'असलें विसंगत वर्तन, कायद्याचा हिशेब चोख रीतीनें करतां येणाऱ्या गणित्याला साधण्यासारखें आहे; व त्याच्या या शास्त्रांतील पांडित्याला जर कायद्याची थोडीशी फोडणी दिलेली असेल तर त्याला त्या वर्तनाची कुरूपता सामान्य लोक चकतील अशा रीतीनें छपवितां येणार आहे हें आम्ही कबूल करतों.' असा आगरकरांनीं टिळकांना टोमणा मारला. टिळक त्यांच्याप्रमाणें भावनाशील नव्हते. त्यांनीं 'गंजीवरला कुत्रा' असा अहेर करून या टोमण्याची परतफेड केली. इतकेंच नव्हे, तर आगरकरांना 'स्वार्थसाधु' हा किताब बहाल केल्यावर तो आरोप कमी तिखटपणाचा वाटूनच कीं काय, 'माळावरला महारोगी' म्हणूनही त्यांनीं एकदां त्यांचा उल्लेख केला!

एका काळच्या जिवलग मित्राकडून होणारा आपल्या हेतूंचा विपर्यास आणि आपल्या व्यक्तित्वाचें विडंबन पाहून आगरकरांना दुःख होणें आणि राग येणें स्वाभाविक होतें. पण त्यांच्या ह्या दुःखांतून आणि रागांतून द्वेष कधींच निर्माण झाला नाहीं. अशा द्वेषाचा आरोप आपल्यावर होत आहे असें वाटतांच त्यांनीं लिहिलें, 'टिळक आणि आगरकर यांचा खाजगी द्वेष ! आणि तो कशासाठीं ? टिळक आगरकरांचे किंवा आगरकर टिळकांचे कांहीं एक लागत नाहींत, आणि म्हणून एकाला दुसऱ्याचा खाजगी द्वेष करण्याचें कारण आजपर्यंत झालेलें नाहीं. इतकेंच नाहीं, **त्यांपैकीं निदान एकाच्या मतानें तरी तें केव्हांच होण्याचा संभव नाहीं.........**खुद्द आगरकरांच्या किंवा आगरकरांच्या निकट आप्तांच्या डोळ्यांस पाणी येण्यासारखी कांहीं अनिष्ट गोष्ट घडेल तेव्हां इतरांपेक्षां टिळकांस व जेव्हां टिळकांचे घरीं तसा अनिष्ट प्रकार घडेल, तेव्हां आगरकरांस, विशेष वाईट वाटून डोळ्यांस पाणी येईल, व मतभेदांमुळें उत्पन्न झालेल्या वैराचा एका क्षणांत विसर पडून एक दुसऱ्याला मदत करण्यास सहज प्रवृत्त होईल !'

केवळ लिहिण्याच्या ओघांत आगरकरांनीं हीं वाक्यें लिहिलीं नव्हतीं. त्यांच्या हळुवार हृदयाचे आर्त उद्गार होते ते. त्यांमुळें आपला अंतकाळ जवळ आला असें वाटतांच केवळ कर्तव्यासाठीं टिळकांना करावा लागलेला विरोध विसरून जाऊन डेक्कन कॉलेजांत किंवा डोंगरीच्या तुरुंगांत ज्या जिव्हाळ्यानें आपण आपल्या या जिवलग मित्राशीं तास न् तास बोलत होतों तो एकदांच—शेवटचा गोड घांस म्हणून—अनुभवावा अशी तीव्र इच्छा त्यांच्या मनांत उत्पन्न झाली. ही हृदयस्पर्शी हकीकत सांगतांना यशोदाबाई म्हणतात, 'मरणसमयीं सुखानें मरण यावें यासाठीं त्यांनीं एकच इच्छा ठेवली होती, आणि ती म्हणजे टिळकांशीं झालेलें वितुष्ट नाहींसें करणें. ते सारखे म्हणत, टिळकांशीं वांकुडपणा ठेवून मला शांतपणें मरण यायचें नाहीं. ह्यांच्या मृत्यूच्या आधीं टिळक आमच्याकडे आले, भेटले, बसले, कितीतरी बोलले आणि मग हे गेले.'

आगरकरांच्या ह्या असामान्य सहृदयतेचा वाङ्मयीन आविष्कार म्हणजे त्यांची सर्वस्पर्शी रसिकता. 'व्यापाराखेरीज आपला तरणोपाय नाहीं' हें

समाजाला समजावून सांगत असतांनाही त्यांचें काव्यप्रेम कधीं कमी झालें नाहीं. 'कवि, काव्य, आणि काव्यरति' या विषयावरला त्यांचा लेख त्यांच्या रसिक व मर्मज्ञ वृत्तीचा द्योतक आहे. अर्थशास्त्रदृष्ट्या बालविवाहाचा विचार करीत असतांनाच शेक्सपीयरच्या हॅम्लेटचा सुरस अनुवादही ते करीत होते. इतकें कशाला, गांवांत चांगला हरिदास आल्याची बातमी लागली कीं आगरकरांची स्वारी हटकून त्याच्या कीर्तनाला हजर व्हायचीच !

ज्यांच्या अंगीं रसिकता असते अशा अनेक बुद्धिमान् लोकांना रसिकता आणि रंगेलपणा यांतलें अंतर प्रथम कळत असलें तरी तें पुढें पुढें जाणवेनासें होतें. या दोन्ही प्रवृत्तींत एक अतिशय सूक्ष्म सीमारेषा आहे. प्रवाहपतिताप्रमाणें जीवन कंठणाऱ्यांना किंवा शरीरसुखाच्या मोहाला बळी पडणारांना ती सहसा दिसत नाहीं. ज्यांनीं जीवनाचा व्यापक दृष्टीनें विचार केला आहे, आत्म्याचें स्वातंत्र्य म्हणजे शरीराचा स्वैराचार नव्हे हें ज्यांना पुरेपूर उमजलें आहे, त्यांच्याच लक्षांत ती येते. रसिकता व अंतर्मुख वृत्ति यांचें मोठें मनोहर मिश्रण आगरकरांत झालें होतें. त्यामुळें कुठल्याहि बाह्य सौंदर्याला त्यांनीं कधींच भलती किंमत दिली नाहीं. सामाजिक क्रांतीचा पुरस्कार हिरीरीनें करीत असूनही त्यांचा पोषाख अत्यंत साधा राहिला याचें मर्म हेंच होतें. ते एकदां मुंबईला गेले असतांना सुधारक म्हणून जिकडे तिकडे गाजलेले आगरकर कसे दिसतात हें पहाण्याकरितां जमलेल्या तमासगीरांची त्यांच्या मूर्तीच्या दर्शनानें मोठीच निराशा झाली. 'हेच का ते सुधारक ? त्यांच्या तर पागोट्याचे बंद गळ्याला लोंबताहेत !' असें म्हणत त्या बिचाऱ्यांना आपला रस्ता सुधारावा लागला.

दुसऱ्या एका गृहस्थाची अशीच गंमत सांगतात. 'स्त्रियांनीं जाकिटें घातलीं पाहिजेत' हा आगरकरांचा लेख त्यानें वाचला होता. स्त्रियांच्या जाकिटांबद्दल इतका अट्टाहास करणारा हा पुरोगामी गृहस्थ घरीं सुटाबुटांत वावरत असेल आणि त्याच्या तोंडांत अहोरात्र चिरूटाशिवाय दुसरें अग्निहोत्र दिसत नसेल अशी स्वाभाविकच त्यानें आपली कल्पना करून घेतली. आगरकरांना भेटण्याकरितां तो मुद्दाम त्यांच्या घरीं आला. आगरकर घरीं आहेत कीं नाहींत याची चौकशी करण्याकरितां तो त्यांच्या घराजवळच असलेल्या एका स्वतंत्र खोलीकडे वळला. त्या खोलींत भाबळीची बारावंदी

अंगांत घातली आहे, एक पंचा नेसून दुसरा डोक्याला गुंडाळलेला आहे आणि हातांतल्या चिलमीचें मनसोक्त सेवन चाललें आहे, अशा थाटांत बसलेली एक मूर्ति त्यानें पाहिली. आगरकरांकडे आलेला हा कोणीतरी कोंकणांतला भिक्षुक असावा असें वाटून त्या गृहस्थानें ऐटींत प्रश्न केला, 'आगरकर कुठें आहेत?' चिलीम ओढणाऱ्या गृहस्थांनीं शान्तपणानें प्रतिप्रश्न केला, 'त्यांच्याशीं आपलं काय काम आहे?' तो गृहस्थ उत्तरला, 'त्यांची कीर्ति ऐकून त्यांना भेटण्याकरितां मी आलों आहे.' पंचा नेसलेल्या आणि चिलीम ओढीत बसलेल्या त्या गृहस्थांनीं त्याला उत्तर दिलें, 'आगरकर म्हणतात तो मीच!'

आगरकरांच्या साधेपणाच्या मुळाशीं जें संयमाचें आणि सामाजिक जबाबदारीचें तत्त्वज्ञान होतें तेंच त्यांच्या आचारविचारात आणि उच्चारांत सदैव दिसून येत असे. ते स्वतः नाट्यकलेचे मोठे भोक्ते होते. पण त्यांचे सहकारी प्रो. वासुदेवराव केळकर हे महिना न् महिना जेव्हां एका नाटक मंडळींत मुक्काम टोकूं लागले तेव्हां त्यांचें हें वर्तन आगरकरांना मुळींच आवडलें नाहीं. त्या वेळच्या नाटक मंडळ्यांत व्यसनी माणसांचा भरणा फार असे; त्यामुळें केळकरांसारख्या प्रोफेसरांनीं एखाद्या नाटकमंडळींत महिना न् महिना पडून राहणें अनेक दृष्टींनीं अनिष्ट होतें. या बाबतींतले आगरकरांचे खालील उद्गार अत्यंत मननीय आहेत. ते वरचेवर म्हणत, 'आम्ही विद्यार्थ्यांना शिकविणार, तयार करणार, आमचें आचरण पाहून विद्यार्थी तयार होणार, आम्हीच जर नाटकी आणि व्यसनी लोकांत राहूं लागलों, त्यांच्यासारखेच झालों, तर आमच्यापासून आमचे विद्यार्थी शिकणार तरी काय? हेंच का?' समाजाचें नेतृत्व स्विकारणाऱ्या मनुष्यानें—मग त्याचा पेशा शिक्षकाचा असो वा लेखकाचा असो, समाजसेवकाचा असो अथवा राजकारणी पुरुषाचा असो—शुद्ध चारित्र्याची चाड बाळगली पाहिजे या गोष्टीविषयीं त्यांचा केवढा कटाक्ष होता व तो किती यथार्थ होता हें या उद्गारांवरून दिसून येईल.

आगरकरांच्या विशुद्ध, उदात्त आणि प्रेरक व्यक्तित्वाचे असे किती तरी लहान मोठे आकर्षक पैलू दाखवितां येतील. विद्यार्थी, शिक्षक, लेखक, संपादक, आणि समाजसुधारक यांपैकीं कोणत्याहि दृष्टीनें त्यांच्याकडे पाहिलें तरी

ते आदर्शच वाटतात. त्यांचे हे सर्व वैयक्तिक गुण त्यांच्या लेखनांत आणि शिकवणींत उत्कटत्वानें प्रतिबिंबित झाले आहेत. त्यामुळें त्यांच्या निबंधांत विशाल दृष्टि, सत्यप्रीति, जिव्हाळा, आवेश आणि तळमळ यांचा अपूर्व संगम झालेला आढळतो. मराठी भाषेला भूषणभूत झालेल्या निबंधकारांत त्यांचें स्थान अत्यंत उच्च आहे. पण, साहित्यकार म्हणून त्यांनीं मिळविलेलें पहिल्या प्रतीचें यश हें कांहीं कलेचें यश नाहीं; तें विचारशक्तीचें यश आहे. तें समाजाविषयीं त्यांना वाटणाऱ्या अलौकिक आपुलकीचें यश आहे. आपल्या भोंवतालचें जग सुखी व्हावें म्हणून प्रामाणिकपणानें तळमळणाऱ्या एका महान् आत्म्याचें तें यश आहे. निबंधाचें तंत्र काय असतें, किंवा काय असावें याचा आगरकरांनीं फारसा अभ्यास किंवा विचार केला नसावा पण सर्व प्रकारच्या गुलामगिरींत खितपत पडलेल्या स्वतःच्या समाजाच्या अधोगतीच्या कारणांचा मात्र त्यांनीं कसून अगदीं मूलगामी पद्धतीनें वर्षानुवर्षें विचार केला. या विलक्षण विचारप्रक्षोभांतच त्यांच्या हृदयंगम निबंधलेखनाचा उगम आहे.

## ५

आगरकरांनीं लोकजागृतीच्या एकमेव हेतूनें आपलें सारें निबंधलेखन केलें असलें तरी त्यांच्या अनेक स्वाभाविक वाङ्मयगुणांचा विलासहि त्यांच्या ठिकाणीं आढळतो. लेखणी हें त्यांच्या दृष्टीनें खड्ग होतें, कुंचला नव्हता. पण त्यांच्या या खड्गाची मूठ रत्नजडित होती. या कुंचल्याच्या मोहक पण कृत्रिम रंगांना ज्यांची सर कधींच येणार नाहीं असें विलक्षण पाणी त्या खड्गाच्या तळपत्या धारेंतून चमकत होतें.

बुद्धिवाद हाच उद्यांच्या सुखी मानवतेच्या जीवनाचा पाया झाला पाहिजे हें प्रतिपादन करितांना ते म्हणतात, 'विचारी पुरुषांनीं ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं जे आचार चमत्कारिक धर्मकल्पनांवर बसवलेले असतात, ते विवेकाच्या कसाला लावून पाहण्यांत कांहीं अर्थ नाहीं. जे लोक तसल्या आचारांचें अनुकरण करीत असतात त्यांच्या मनांत त्यांच्या औचित्याचा विचार कधींच येत नाहीं. पूर्वापार चालत आलेल्या गाढ विश्वास-शृंखलांनीं निगडित होऊन गेल्यामुळें मागून आलेलें लोण डोळे

मिटवून पुढल्यांस नेऊन पोंचविणें एवढेंच ते आपलें कर्तव्य समजतात. धर्म-मंदिराची रचाई श्रद्धेच्या किंवा विश्वासाच्या पायावर झालेली आहे असें हिंदु धार्मिकांचेंच म्हणणें आहे असें नाहीं.

**पृथ्वीवरील कोणत्याही प्रकारच्या धार्मिकांस विश्वासाशिवाय त्राता नाहीं व थारा नाहीं. यासंबंधानें बुद्धिवादाचें नांव काढलें कीं त्यांच्या अंगावर कांटा उभा राहतो. एकाद्या दिवाळखोर कर्जबाजाऱ्यास ज्याप्रमाणें आपल्या प्राप्तीचा आकडा आपल्या खर्चाच्या आंकड्याशीं ताडून पाहण्याचें धैर्य होत नाहीं, किंवा ज्यांची जीविताशा फार प्रबळ झाली आहे, त्यांना आपल्या रोगाची चिकित्सा सुप्रसिद्ध भिषग्वर्याकडून करवत नाहीं, त्या-प्रमाणें श्रद्धाळु धार्मिकांस आपल्या धर्मसमजुती व त्यांवर अवलंबणारे आचार यांस बुद्धिवादाच्या प्रखर मुशींत घालण्याची छाती होत नाहीं.**

त्यांना अशी भीति वाटते कीं, ते हिणकस ठरल्यास, पुढें काय करावें ? आम्हांला असें वाटतें कीं, असलें भित्रेपण फार दिवस चालावयाचें नाहीं. **विवेक पूर्ण जागृत झाला नव्हता तोंपर्यंत विश्वासानें किंवा श्रद्धेनें प्रत्येक गोष्टींत आपला अंमल चालविला यांत कांहीं वावगें झालें नाहीं. जसा लोकांस तसा मनास कोणीतरी शास्ता पाहिजे. व ज्याप्रमाणें मुळींच राजा नसण्यापेक्षां कसला तरी राजा असणें बरें, त्याप्रमाणें वर्तनाचें नियमन करणारें असें कोणतेंच तत्त्व नसण्यापेक्षां 'विश्वासासारखें एखादें स्खलनशील तत्त्व असणें देखील इष्ट आहे.** पण हें कोठपर्यंत ? अधिक चांगलें तत्त्व अस्तित्वांत आलें नाहीं तोंपर्यंत. तें आलें कीं, जुन्या प्रमादी तत्त्वानें आपलीं राजचिन्हें श्रेष्ठ तत्त्वाच्या स्वाधीन केलीं पाहिजेत. **हें सरळ अधिकारांतर येथून पुढें विश्वास आणि विवेक यांच्या दरम्यान होणार आहे.'**

तर्कशुद्ध व स्पष्टोक्तिपूर्ण प्रतिपादनाच्या या सुंदर पण छोट्या नमुन्यां-तही निबंधकार या नात्यानें आगरकरांच्या अंगीं वसत असलेल्या एका दुर्मिळ गुणाचा प्रत्यय होतो. तो गुण म्हणजे त्यांची कविप्रकृति. आगर-करांनीं उभ्या जन्मांत काव्याची एकही ओळ लिहिली नसेल. पण त्यांच्या

व्यक्तित्वाचें आणि म्हणूनच लेखनाचें आकर्षकत्व त्यांच्यामध्यें सदैव जागृत असलेल्या कल्पक आणि भावनाशील कवीमुळें वाढलें आहे यांत मुळींच शंका नाहीं. प्रतिभेच्या या प्रकृतिधर्मामुळेंच ‘ वृद्ध हे समाजनौकेचें भरताड होत; तरुण शिडें होत ! पाहिल्याशिवाय समाजांत स्थिरता रहाणार नाहीं, आणि दुसऱ्याशिवाय त्याला गति येणार नाहीं ’, ‘ आरामवाटिका हीं मोठ्या शहरांचीं फुप्फुसें होत, ’, ‘ दहा बारा किंवा पंधरा सोळा वर्षांच्या पोरांस संसाराचे विंचू लावण्यांत, ज्या कन्यांना ऋतु देखील प्राप्त झाला नाहीं अशांस वैधव्याग्नीनें पोळण्यांत, अथवा एकादी जाईची कळी निवडुंगावर किंवा सोनचाफ्याचें फूल कोरांटीवर आणून टाकण्यांत काय शहाणपणा वा भूषण असेल तें असो ! ’, ‘ भास्कराचार्यांचें भास्कराचार्यत्व वेधशाळेंत ’ असलीं लहानमोठीं मनोज्ञ आणि मार्मिक वाक्यें ते सहज लिहून जातात.

मात्र तर्कशुद्ध पण प्रखर अशी सामाजिक टीका हा त्यांच्या निबंधाचा आत्मा असल्यामुळें त्यांच्या प्रतिभेचा प्रकृतिधर्म कवीचा असूनही कल्पनाविलासांत ते कधींही रममाण झालेले आढळणार नाहींत. पण कविप्रकृतीमुळें कुठलेंही दृश्य आपल्या डोळ्यांपुढें घडत आहे असा भास वाचकांना व्हावा इतक्या परिणामकारक रीतीनें तें चित्रमालिकांच्या साहाय्यानें रेखाटण्याची हातोटी त्यांना साधली आहे. बालविवाह आणि प्रेमविवाह यांतील विरोधाचें हें चित्र पहा.

‘ ज्यांच्या अवयवांची पूर्ण वाढ झाली आहे, ज्यांच्या शरीराच्या प्रत्येक भागावर तारुण्याचें तेज चकाकत आहे, विषयवासना जागृत झाल्यामुळें उल्हासानें, उत्कंठेनें, अननुभूत सुखास्वादाच्या अहर्निश चिंतनानें ज्यांच्या अंगव्यापारांत, दृष्टींत व चर्येत लज्जा, अधीरता, साशंकपणा वगैरे परस्पर-विरोधी अनेक मनोविकार वारंवार प्रतिबिंबित होऊं लागले आहेत; एकमेकांस प्रिय होण्याविषयीं ज्यांचे हरएक प्रयत्न चालले आहेत; विद्या, वित्त, सौंदर्य वगैरे गुणांनीं आपणांस होईल तितकें अलंकृत करून मोह पाडण्या-विषयीं जे अहोरात्र झटत आहेत, ज्यांना आपण रतिमन्मथाचे पुतळे आहों, व विधात्यानें आपली विवाहमैत्री व्हावी असें योजूनच आपणांस निर्माण केलें आणि आपल्याहून अधिक सुखी असें दांपत्य कोठेंही असूं शकण्याचा संभव नाहीं असें वाटूं लागलें आहे; अन्योन्य-समागम दुरावणारा प्रत्येक क्षण ज्यांस युगतुल्य झाला असून जे सूर्याच्या अश्वास मंदगतित्वाबद्दल

निंदूं लागले आहेत, व यामिनीस आपली समागमकारिणी मैत्रीण मानून तिच्या वाटेकडे जे डोळे लावून बसले आहेत अशा स्त्रीपुरुषांच्या प्राथमिक रतिसुखाची बहार कोणीकडे आणि पंतोजींचा मार खाणाऱ्या व अभ्यासाखालीं अर्धमेल्या झालेल्या दुर्बल, भेकड आणि लुस्कान अशा आमच्या १६–१७ वर्षांच्या बहुतेक पोरांच्या आणि बाहुलाबाहुलीचा व भातुकलीचा ज्यांचा खेळ नुकताच सुटला आहे व नवरा म्हणून ज्याच्याशीं आपला एकप्रकारें विशेष संबंध आला आहे, असा पुरुषजातीपैकीं कोणी एक इसम आहे, असें ज्यांना नुकतेंच कोठें समजूं लागलें आहे, अशा आमच्या १२-१३ वर्षांच्या निस्तेज, लाजाळु व अज्ञान पोरींच्या बळजोरीच्या महालाची बहार कोणिकडे ?'

× × ×

आधुनिक मराठी गद्याचा जन्म स. का. छत्रे यांच्या 'बाळमित्रा'च्या रूपानें १८२८ मध्यें झाला. पुढें १२ वर्षांनीं लोकहितवादींचीं 'शतपत्रें' प्रसिद्ध होऊं लागलीं. १८५९ मध्यें विष्णुबुवा ब्रह्मचारी यांचा 'वेदोक्त-धर्मप्रकाश' झळकला. १८६०–१८७० च्या दरम्यान मराठी कादंबरीचा जन्म झाला. कृष्णशास्त्री चिपळूणकरांचा, अरबी भाषेतील गोष्टींचा सुरस अनुवादही याच काळांत निर्माण झाला. या सर्व लेखकांत रसिकता होती, ज्ञानप्रसाराची तळमळ होती आणि मातृभाषेची सेवा करण्याची उत्कट इच्छाही होती. पण प्रतिभागुणांच्या अभावामुळें या अर्धशतकांत (१८१८–१८७४) बहुतेक मराठी लेखक बालबोध लेखनापलीकडे फारसें पाऊल टाकूं शकले नाहींत. त्यांच्यापैकीं लोकहितवादी आणि विष्णुबुवा ब्रह्मचारी यांच्यामध्यें विलक्षण सामाजिक तळमळ होती. पण त्या तळमळीला अनुरूप असा वाणीचा विलास त्यांना साध्य झाला नाहीं. सुंदर व ओघवती भाषा हा कृष्णशास्त्री चिपळुणकरांचा विशेष होता. पण ज्या राजकीय किंवा सामाजिक जिव्हाळ्यांतून स्वतंत्र विचारसरणी आणि तिला अनुरूप अशी ओजस्वी भाषाशैली निर्माण होते, तो जिव्हाळा त्यांच्यापाशीं नव्हता. त्यामुळें १८७४ सालीं निबंधमालेचा जन्म होईपर्यंत मराठी भाषेची स्थिति एखाद्या बाहुलीसारखी होती. ती दिसायला नीटनेटकी असली तरी निरखून पहाणाराला तिचा निर्जीवपणा चटकन् जाणवे. तिच्यावर वस्त्राभरणें झळ-

कत असली तरी सुंदर चिंध्या आणि खोटे मणी यांच्यापेक्षां त्यांची किंमत अधिक नाहीं हैंही पहाणाऱ्यांच्या लगेच लक्षांत येई.

ही स्थिति विष्णुशास्त्र्यांनीं आपल्या निबंधमालेनें पालटून टाकली. बाहुलीची हां हां म्हणतां अल्लड बालिका झाली. जॉन्सन आणि मेकॉले यांच्यासारख्या इंग्लिश पंडितांच्या लेखनाशीं स्पर्धा करणारे आकर्षक निबंध निबंधमालेंतून भराभर प्रगट होऊं लागले. भाषा आणि देश यांच्या अभिमानानें स्फुरलेले विचार विद्युल्लतेप्रमाणें या निबंधांतून चमकूं लागले. अवघ्या सात वर्षांत मराठी गद्याचा कायापालट झाला.

निबंधमालेचा आगरकरांच्या उमलत्या प्रतिभेवर किती परिणाम झाला असेल, याची सहज कल्पना करतां येईल. निबंधमाला १८७४ मध्यें निघाली. आगरकर १८७५ मध्यें मॅट्रिक झाले. अत्यंत संस्कारक्षम अशा या वयांत आतांपर्यंत कोणीही लिहिलें नव्हतें असें प्रभावी मराठी गद्य त्यांना प्रत्येक महिन्याला वाचायला मिळूं लागलें. लेखणी तलवारीपेक्षां श्रेष्ठ आहे हें एक नुसतें सुंदर सुभाषितच नाहीं, तर तें शृंखलांनीं जखडलेल्या राष्ट्रांतसुद्धां अनुभवायला येणारें ओजस्वी सत्य आहे हें विष्णुशास्त्र्यांच्या उदाहरणावरून त्यांना दिसून आलें. लहानपणापासूनच त्यांची प्रतिभा आत्मविकासाची धडपड करीत होती; तिला निबंधमालेनें मार्ग दाखविला.

आगरकरांच्या शैलीवर विष्णुशास्त्र्यांची छाया असल्याचा मधूनच जो भास होतो त्याचा उगम या परिस्थितींत आहे. मात्र निबंधकार या दृष्टीनें ते विष्णुशास्त्र्यांहून अत्यंत भिन्न आहेत. दोघेहि पंडित, दोघेहि देशभक्त, दोघेही भाषाप्रभु! पण दोघांच्या मनाच्या बैठकींत मात्र दोन ध्रुवांचें अंतर. विष्णुशास्त्री पांडित्यांत रमून जातात; आगरकर विषयाचें तर्कशुद्ध व मूलगामी विवेचन करण्याचें साधन म्हणून पांडित्याचा उपयोग करतात. दोघांची देशभक्ति सारखीच उत्कट! पण विष्णुशास्त्र्यांची दृष्टि देशाच्या दिव्य अशा भूतकालाकडे अधिक वळलेली; आगरकरांची दृष्टि मुख्यतः त्याच्या उज्ज्वल भविष्याकडे लागलेली. विष्णुशास्त्र्यांनीं लोकांचा भाषाभिमान व देशाभिमान जागृत केला हें खरें; पण त्यांच्या निबंधाचे विषय, प्रतिपादनाची पद्धत, भाषेचा विलास, या सर्वांचें स्वरूप मुख्यतः वाङ्मयीन आहे. आगरकरांचे निबंध तसे नाहींत. ते अंतर्बाह्य सामाजिक आहेत. विष्णुशास्त्र्यांनीं हीन-

गंडानें पछाडलेल्या समाजाचा राष्ट्राभिमान जागृत केला. आगरकरांनीं आपली संस्कृति श्रेष्ठ आहे, या खोट्या अभिमानाच्या धुंदींत कुंभकर्णाप्रमाणें झोंपलेल्या समाजाच्या डोळयांत अंजन घालून त्याला विचारप्रवृत्त केलें. आत्मविश्वासाशिवाय कुठलाहि समाज जगूं शकत नाहीं. पण आत्मपरीक्षणाशिवाय त्याची कधींहि प्रगति होऊं शकत नाहीं. १९ व्या शतकांत महाराष्ट्रीय समाजाचीं हीं दोन्हीं अंगें विकल झालीं होतीं. विष्णुशास्त्र्यांनीं पहिल्याला संजीवनी दिली. दुसऱ्याच्या बाबतींत आगरकर धन्वंतरी ठरले.

मराठीचे हे पहिले दोन श्रेष्ठ निबंधकार अनेक दृष्टींनीं एकमेकांचे पूरक होते. विष्णुशास्त्र्यांच्या राष्ट्राभिमानाचा वारसा लोकमान्य टिळकांकडे आला. टिळक, परांजपे, खाडिलकर, केळकर, अच्युतराव कोल्हटकर, सावरकर प्रभृतींच्या निबंधांनीं ही परंपरा दोन पिढ्या अखंड चालविली. या निबंधकारांपैकीं, शिवरामपंत, अच्युतराव व सावरकर हे कविप्रकृतीचे असल्यामुळें विषयाची निवड करण्यापासून ते भाषाशैलीपर्यंत सर्वत्र हें वैशिष्ट्य त्यांच्या निबंधांत आढळून येतें. या दृष्टीनें त्यांचें आगरकरांशीं थोडें साम्य आहे. पण आगरकरांच्या लेखनाचा जो चिरकालीन परिणाम झाला तो मराठी निबंधावर नाहीं; तर काव्य, विनोद व कथा या ललित वाङ्मयाच्या तीन प्रमुख विभागांवर.

केशवसुत हे आधुनिक मराठी कवितेचे जनक गणले जातात. त्यांच्या अनेक तेजस्वी कवनांना आगरकरांच्या लिखाणापासूनच स्फूर्ति मिळाली. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे मराठी विनोदाचे निर्माते. त्यांच्या विनोदी बुद्धीचें पोषण आगरकरांनीं केलें नसलें तरी तिच्या विलासाला वळण लावण्याचें श्रेय त्यांनाच द्यावें लागेल. या दृष्टीनें ‘ सुदाम्याच्या पोह्यां ’तला ‘ शिमगा ’ हा विनोदी लेख आगरकरांच्या ‘ पांचजन्याचा हंगाम ’ या निबंधाशीं ताडून पहाण्याजोगा आहे. आगरकरांनीं ‘ सुधारक ’ काढला तेव्हां ‘ महात्म्याला शोभण्याजोगें कृत्य ’ असा त्यांचा हरिभाऊ आपट्यांनीं जो गौरव केला त्याचा उगम नुसत्या कौतुकयुक्त आदरांत नव्हता. हरिभाऊंचें कादंबरीलेखन ‘ सुधारक ’ निघण्यापूर्वीं सुरू झालेलें असलें तरी ज्या विशाल व भावपूर्ण दृष्टीनें त्यांनीं पुढें आयुष्यभर सामाजिक कथालेखन केलें, तिचा सुंदर आविष्कार प्रथमतः

'पण लक्षांत कोण घेतो' या कादंबरींतच झाला. 'सुधारक' १८८८ त निघाला आणि हरिभाऊंनीं या कादंबरीचें लेखन १८८९ त सुरू केलें. पुढें दोन पिढ्या मराठी ललित वाङ्मयांतल्या सर्व प्रतिभावान् लेखकांनीं सामाजिक सुधारणेचा कैवार घेतला ही कांहीं योगायोगाची गोष्ट नाहीं. आगरकरांच्या भावनायुक्त निबंधांचे संस्कारच या परिवर्तनाच्या मुळाशीं होते. १९२० पर्यंत वाङ्मयीन टीका आणि राजकीय निबंध. या दोन क्षेत्रांवर निबंधमालेची जशी छाया होती, त्याप्रमाणें काव्य, कथा, विनोद व नाट्य या क्षेत्रांवर आगरकर वर्चस्व गाजवीत होते. ही शक्ति वाङ्मय-विलासाची नव्हती, ती क्रांतिकारक विचारांची होती. आगरकरांच्या सामाजिक निबंधांची परंपरा जरी पुढें चालली नाहीं, तरी त्यांचें वाङ्मय ही सुगंधानें दरवळणारी फुलबाग नसून तें अग्निज्वाळांनीं रसरसलेलें यज्ञकुंड आहे, ही जाणीव महाराष्ट्रांतला सुबुद्ध समाज कधींच विसरला नाहीं.

६

आज अर्धशतकाचा अवधि लोटल्यानंतर आगरकरांचे निबंध वाचणारा मनुष्य त्यांच्या वाङ्मयाला क्रांतिकारक हें विशेषण लावायला फारसा तयार होणार नाहीं. त्यांनीं ज्या सामाजिक क्रांतीकरतां जिवाचें रान केलें तिचें बाह्यस्वरूप आपल्या अंगवळणीं पडल्याला एक पिढी होऊन गेली आहे. मानवी जीवन गतिमय असल्यामुळें कालचा क्रांतिकारक हा आजचा सुधारक ठरतो व आजचा सुधारक हा उद्यांचा सनातनी होण्याचा संभव असतो! हें लक्षांत घेऊन ऐतिहासिक दृष्टीनें आगरकरांच्या वाङ्मयाकडे आपण पाहूं लागलों तर असामान्य ओज, अलौकिक तळमळ, भविष्यकाळांत डोकावून पाहण्याची शक्ति, आणि विचारप्रवर्तनाचें विलक्षण सामर्थ्य हीं क्रांतिकारक वाङ्मयाचीं प्रमुख लक्षणें त्यांच्या लेखनांत स्पष्टपणें प्रचीत होतात.

दारिद्र्य मनुष्याला अकालीं प्रौढ करतें. आगरकर तरी या नियमाला कुठून अपवाद होणार? आपल्या विद्यासंपादनाच्या उत्कट इच्छेला पदोपदीं येणारे अडथळे पाहून अगदीं लहानपणींच त्यांना सामाजिक विषमतेची तीव्रतेनें जाणीव झाली असावी. स्वभावतःच सहृदय असलेल्या या दरिद्री पण बुद्धिमान् तरुणानें शिकतां शिकतां भोंवतालच्या हरतऱ्हेच्या

विषमतेविषयीं सतत विचार केला असावा. कॉलेजमध्यें मोठया आवडीनें केलेल्या इतिहासाच्या अभ्यासानें आणि मिल-स्पेन्सर इत्यादींच्या तत्त्वज्ञानाच्या परिचयानें त्यांच्या विचारांतलें धुकें साहजिकच नाहींसें झालें. आपली मातृभूमि ही एके काळीं सुवर्णभूमि होती; पण आज ही सुवर्णभूमि धुळीला मिळाली आहे, हें आगरकरांना उघडउघड दिसत होतें. या अधःपाताची मीमांसा त्यांची बुद्धि करूं लागली. रोग्याच्या विकाराचें निदान करतांना आंधळया जिव्हाळयाचा कांहीं उपयोग नसतो, तिथें वैद्यक शास्त्राचें ज्ञानच हवें हें लक्षांत ठेवून त्यांनीं दलित आणि गलित अशा आपल्या समाजपुरुषाची कसून परीक्षा केली. त्यांची खात्री होऊन चुकली कीं, आपल्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक गुलामगिरीचें मूळ एकाच दीर्घकालीन हटवादी रोगांत आहे. तो रोग म्हणजे पुराणप्रियता-अंधश्रद्धा—मुलामा उडून गेलेल्या जुन्या पितळेलाही सोनें मानून कवटाळून बसण्याची वेडी प्रवृत्ति ! आमचा धर्म श्रेष्ठ, आमचा देश श्रेष्ठ, आमची संस्कृति श्रेष्ठ, असे ढोल बडवीत आणि त्या ढोलांच्या ढुमढुमाटांत स्वतःला बधिर करून घेऊन काळाच्या हांकेकडे दुर्लक्ष करीत हिंदुसमाज शतकानुशतकें जीवन कंठीत आला आहे. डोळे असून आंधळा, कान असून बहिरा आणि पाय असून पांगळा झाला आहे तो ! अशा समाजाच्या कपाळीं लाजिरवाण्या गुलामगिरीशिवाय दुसरें काय लिहिलेलें असणार ?

× × ×

उज्ज्वल भूतकालाचे पोवाडे गाऊन कांहीं कुणी वर्तमानकाळावर आधिराज्य गाजवूं शकत नाहीं. व्यक्तीला काय किंवा राष्ट्राला काय आपलें भाग्यमंदिर घडवावें लागतें! तें घडवितांना आपल्या रक्त-मांसाचा चिखल करावा लागतो, प्रसंगीं पोटचे गोळे बळी द्यावे लागतात.

आगरकरांच्या पूर्वीं अनेक लहान मोठे समाज-सुधारक महाराष्ट्रांत आणि महाराष्ट्राबाहेर होऊन गेले असले तरी आपलें जीवन आंधळेपणानें जुन्या चाकोरींतून चालविण्याचा अट्टाहास करणें अत्यंत आत्मघातकीपणाचें आहे, हें त्यांच्या इतकें पूर्णतेनें कुणीच जाणलें नव्हतें आणि क्वचित् कुणी जाणलें असलें तरी त्यांच्या इतक्या परिणामकारकतेनें तें समाजाला कुणीही समजावून दिलें नव्हतें. रस्त्यांत भीक मागून पोट भरणाऱ्या भिकाऱ्यानें आपला बाप

नवकोटनारायण होता हें पुनःपुन्हां सांगितल्यानें त्याचें केविलवाणें दैन्य अधिकच उघडें पडतें. आपला समाज या भिकाऱ्यासारखेंच लाचारीचें वर्तन करीत आहे अशी आगरकरांची खात्री होऊन चुकली होती. म्हणे प्राचीन काळीं आमच्यामध्यें गार्गी-मैत्रेयी सारख्या विदुषी निर्माण होत असत आणि त्या मोठमोठ्या महर्षींशीं तत्त्वज्ञानासारख्या गहन विषयांवर-सुद्धां वादविवाद करीत असत. स्त्रीला चूल आणि मूल यापलीकडे दुसरें कांहींही कर्तव्य नाहीं असें समजणाऱ्या आणि साध्या अक्षरओळखीला तिला पारखें करणाऱ्या समाजानें ही जुनीपुराणी बढाई मारण्यांत काय अर्थ होता ? म्हणे चंद्रगुप्त, विक्रम, शालिवाहन, प्रताप आणि शिवाजी असे वीरपुरुष आमच्यांत होऊन गेले, त्यांनीं बलाढ्य शत्रूंना धूळ चारून आर्यांचा स्वातंत्र्यध्वज या सस्यश्यामल भूमींत डौलानें फडकत ठेवला. कंबरेशीं काटकोन करून युनियन जॅकपुढें माना लवविणाऱ्या प्रौढांनीं आणि अदबीनें जोडलेल्या हातांत पदवीची सुरळी घेऊन 'युअर मोस्ट ओबिडियंट सर्व्हंट' हा मंत्र जपत सरकारी नोकरीकरितां कलेक्टरच्या नाहीं तर मामलेदाराच्या कचेरींत हेलपाटे घालणाऱ्यांनीं त्या स्वातंत्र्यध्वजाचें स्मरण करावें हें एक प्रकारचें विडं-बनच नव्हतें काय ? ज्या देशांतल्या दर्यावर्दी लोकांना मासे मारण्याशिवाय दुसरा धंदा उरलेला नाहीं तो देश एके काळीं साऱ्या जगाशीं व्यापार करीत होता, किंवा ज्या देशांतल्या कोट्यवधि लोकांना धड लाज राखण्यापुरतें सुद्धां वस्त्र मिळत नाहीं, त्या देशांत आंब्याच्या कोयींत मावणारी तलम धोतरजोडी तयार होत होती, ही फुशारकी आपल्या अधोगतीची आणि कर्तव्यशून्यतेची द्योतक आहे, हें आगरकरांनीं पूर्णपणें ओळखलें. जगाच्या मागें पडलेले लोकच जुन्याची पूजा करण्यांत दंग होऊन जातात. शर्यतींत ईर्ष्येनें धांवणारांची नजर नेहमीं पुढें पाहत असते. या हतभागी हिंददेशाला पुन्हां वैभवाच्या शिखरावर चढायचें असेल, या दुर्दैवी हिंदु समाजाला माणुसकीला शोभणाऱ्या सुखाचा आणि स्वातंत्र्याचा पुनः अनुभव घ्यायचा असेल, तर ज्या अनेक जुनाट गंजलेल्या शृंखलांनीं त्याचें जीवन जखडून टाकलें आहे, ज्या शृंखला नसून फुलांचे हार आहेत असें मानण्यापर्यंत त्याच्या अंधत्वाची मजल गेली आहे, त्या शृंखलांचें सत्यस्वरूप त्याला पट-विलें पाहिजे, तीक्ष्ण शस्त्रांनीं त्या तटातट तोडून टाकल्या पाहिजेत, आणि

त्या तोडतांना कुठें जखम झाली किंवा प्रसंगीं रक्त वाहूं लागलें तर त्याची पर्वा करतां कामा नये असें मनाशीं ठरवूनच आगरकरांनीं लेखणी हातांत घेतली.

× × ×

या लेखणीनें पहिला हल्ला चढविला तो हिंदु समाजाच्या अत्यंत जीर्ण झालेल्या धर्मकल्पनांवर. पांच हजार वर्षांपूर्वीं या धर्मानें तेतीस कोटि देव जन्माला घातले, आकाशाच्या पलीकडे स्वर्ग-नरकाच्या वसाहती स्थापल्या आणि त्यांतल्या एका वसाहतींत अप्सरा आणि अमृत व दुसऱ्या वसाहतींत यमदूत आणि तप्त लोहरस असलीं बक्षिसें व शिक्षा ठेवून पाप-पुण्यांच्या हजारों भ्रामक कल्पना समाजांत प्रसृत केल्या.

अस्तित्वांत नसलेल्या परलोकावर दृष्टि ठेवून इहलोकींचें जीवन माणसानें जगावें असल्या खोट्या तत्त्वज्ञानाची निर्मिति करून या धर्मानें खऱ्याखुऱ्या जीवनमूल्यांचा सामान्य मनुष्याला फारसा विचारच करूं दिला नाहीं. परिस्थिती पासून पोशाखापर्यंत याहिंदुसमाजांत सदैव बदल होत गेले. पण त्याच्या आरंभींच्या धर्मकल्पना मात्र जशाच्या तशाच राहिल्या. या विसंगतीचे परिणाम आगरकरांना सभोंवार सर्वत्र दिसत होते. कॉलेजांत व्हॉल्टेअर वाचणारे घरीं गरुडपुराण प्रमाण मानून मृतात्म्यांची उत्तरक्रिया करीत होते! शेक्सपीअरच्या ‘ रोमिओ अॅण्ड ज्यूलिएट ’ या प्रेमकथेमध्यें रंगून जाणारे लोक आपल्या परकऱ्या पोरींचीं लग्नें लावीत होते आणि त्या बालवधूंपैकीं जिला दुर्दैवानें वैधव्य येईल तिला न्हाव्यापुढें बसवून तिचें मुंडन करण्यांत धर्मपालनाचें समाधान मिळवीत होते. धर्म, देवता, परलोक, पुनर्जन्म यांच्याविषयींच्या जुन्या कल्पना जोंपर्यंत समाजाच्या मनावर ताबा गाजवीत आहेत तोंपर्यंत हीं विपरीत दृश्यें समाजांत दिसत राहणारच हें जाणून आगरकरांनीं निर्भयपणें सर्वांना बजावलें, ‘ आकाशांतून देव येथें कधीं आले नाहींत व येथून ते परत आकाशांत कधीं गेलेही नाहींत. आम्हीच त्यांना येथल्या येथें निर्माण करतों, त्यांच्या गुणांचे पोवाडे गातों आणि चाहील तेव्हां त्यांस नाहींसें करतों. जों जों बुद्धीचा विकास होत जाऊन कार्यकारणांचा संबंध चांगला कळूं लागतो तों तों प्राथमिक वा पौराणिक कल्पना मिथ्या भासूं लागून भूत, पिशाच्च, देव, दानव वगैरे शुद्ध कल्पनेनें उत्पन्न केलेल्या

शक्तींची असत्यता प्रत्ययास येते, पूजेस व प्रार्थनेस ओहोटी लागते, आणि कांहीं वेळ सर्व ब्रम्हांडास उत्पन्न करून त्याचें पालन व नाश करणाऱ्या अशा एका परमात्म्याच्या कल्पनेचा उदय होतो. पण पुढें वेदांत विचारांच्या कुंडांत पेटलेल्या अग्नींत हें द्वैतहि खाक होऊन जातें आणि 'अहं ब्रम्हास्मि' एवढा अनिर्वचनीय विचार मागें रहातो. व्यक्तींच्या वा राष्ट्रांच्या धर्म-विचारांचा हा कळस आहे. येथपर्यंत ज्याची मजल आली त्याला सर्व 'धर्म तुच्छ आहेत.'

७

मानवतेच्या विकासाच्या इतिहासांत धर्माचें स्थान उपेक्षणीय नाहीं आगरकरांना मान्य आहे. पण धर्म ही सुद्धां एक सामाजिक संस्था आहे, काळाबरोबर तिचें स्वरूप बदललें नाहीं तर ती प्रगतीला प्रेरक न होतां उलट मारक होते हें ते कटाक्षानें प्रतिपादन करतात. अन्यायी राजापेक्षां त्याचे जुलमी अधिकारीच जसे प्रजेला अधिक संत्रस्त करून सोडतात, त्याप्रमाणें चुकीच्या धर्मकल्पनांपेक्षांहि रूढींच्या रूपानें होणारी त्यांची अम्मलबजावणी मानवतेच्या दुःखाला अधिक कारणीभूत होते हें ओळखून त्यांनीं हिंदु समाजांत सर्रास प्रचलित असलेल्या अनेक हास्यास्पद आणि अमानुष रूढींवर पुनःपुन्हां हल्ले चढविले आहेत. शेंकडों वर्षांच्या वचनांचा आणि हजारों वर्षांच्या परंपरांचा आधार असल्यामुळें या राक्षसी रूढी प्रबळ होऊन बसलेल्या असतात. शंकराच्या वरदानानें उन्मत्त झालेल्या भस्मासुराप्रमाणें धर्माच्या आधारावर त्यांचा नंगानाच समाजांत सुरू राहतो. सामान्य व्यक्तीच्या अंगीं त्यांच्या विरुद्ध बंड पुकारण्याचें धैर्य सहसा नसतें. प्राचीन काळच्या मोठमोठ्या ऋषींपेक्षां कांहीं आपण शहाणे नाहीं अशी समजूत करून घेऊन हीं सारीं दुबळीं माणसें आपणांवर होणारे अन्याय मुकाट्यानें सोशीत राहतात. सामान्य मनुष्याचा हा मानसिक दुबळेपणा आधीं नाहींसा झाला पाहिजे या जाणीवेनें आगरकर म्हणतात, "कोणतेही आचार घालण्यास पूर्वीच्या ऋषींस जितका अधिकार होता तितकाच आम्हांसही आहे. पूर्वकालीन आचार्यांवर ईश्वराची जितकी कृपा होती तितकीच आम्हांवरही आहे. बऱ्यावाइटाची निवडानिवड करण्याची बुद्धि त्यांना होती तितकी

किंवा तीहून अधिक आम्हांसही आहे, अनुजांसाठीं त्यांचें अंतःकरण जितकें कळवळत होतें, तितकें किंवा त्याहून अधिक आमचें कळवळत आहे, सृष्टिविषयक व तत्कर्तृविषयक ज्ञान जितकें त्यांस होतें तितकें किंबहुना त्याहून बरेंच अधिक आम्हांस आहे. **सबब त्यांनीं घालून दिलेल्या नियमांपैकीं जेवढे हितकारक असतील तेवढ्यांचेच आम्ही पालन करणार.व जे अपायकारक असतील ते टाकून देऊन त्यांचे जागीं आम्हांस निर्दोष वाटतील असे नवे घालणार.** एका ऋषीविरुद्ध दुसरा ऋषि हुडकीत बसण्याचा व सार्‍यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न करण्यांत अर्थ नाहीं.'

कुठल्याही क्रांतिकारकाच्या आत्मविश्वासाचा स्वार्थलोलुप सत्ताधीशांकडून आणि स्थिरताप्रिय समाजाकडून नेहमींच अधिक्षेप व उपहास केला जातो. या विरोधकांची भिस्त आपल्या संख्याबळावर असते. पण क्रांतिकारकाच्या अंगांत शालिवाहनाची दिव्यशक्ति संचार करीत असते, ती मातीच्या बाहुल्यांतून शूर शिपाई निर्माण करूं शकते, हें या विरोधकांच्या लक्षांतच येऊं शकत नाहीं. सत्य हें संख्याबळावर अवलंबून नसतें याचा त्यांना विसर पडलेला असतो. सत्याची मूर्ति कितीहि लहान असली तरी स्वभावतःच बटु वामनाचें बळ त्याच्या अंगीं निर्माण होत असतें..तें बळ कुठल्याही बळीला लीलेनें पाताळांत घालूं शकतें. सत्याच्या सामर्थ्यावरल्या या गाढ श्रद्धेमुळेंच येऊं घातलेल्या सामाजिक क्रांतीकडे तुच्छतेनें पाहणार्‍या सनातनी वृत्तीच्या लोकांना आगरकर बजावून सांगतात, '**हिंदुधर्म-विचारांत आणि सामाजिक आचारांत जेवढें कांहीं निर्दोष व हितावह आहे, त्याला कशाचीहि भीति नाहीं. मनु आणि पाराशर ह्यांच्या आधाराशिवाय तें अढळ राहणार आहे.** पण जें अहितकारक व सदोष आहे, निदान सध्यांच्या स्थितींत ज्याच्या अपायकारित्वाबद्दल संशय नाहीं तें सारें पाश्चिमात्य ज्ञानकुंडांत जळून खाक होणार. एखाद्या दुसर्‍या मनूची आणि पाराशराची कथा काय ? आमच्या अर्वाचीन विचारास ज्या धार्मिक व सामाजिक गोष्टी अप्रशस्त वाटूं लागल्या आहेत, त्यांस शेंकडों मनूंचे आणि सहस्रावधी पाराशरांचे आधार दाखविलेत व त्या विचारांचा प्रसार

न व्हावा म्हणून त्यांच्या मार्गांत कोट्यवधि लोकांचा मूर्खपणा, वृथा धर्माभिमान आणि उठावणीचे आरडे यांचे अडथळे आणून घातलेत तरी ज्याप्रमाणें पर्वतांच्या माथ्यावरील सरोवराच्या भिंती फोडून तुफान वेगानें कड्यावरून पडूं लागलेल्या वारिवाहाची गति कुंठित करण्यास कोणीही धजत नाहीं, त्याप्रमाणें आमच्या मूर्खपणाच्या सामाजिक व धार्मिक समजुतींस लागलेला वणवा कोट्यवधि अजागळ कीटकांच्या क्षुद्र पक्षवातानें किंवा मोठ्या किड्यांच्या शुष्क श्वासवातानें विझण्याचा मुळींच संभव नाहीं. उलट हेच त्यांत होरपळले जाण्याचा संभव आहे.'

## ८

आगरकरांनीं पुरस्कारिलेल्या या बुद्धिवादी तत्त्वज्ञानामुळें ज्यांची अंध-श्रद्धा डिंवचली जात होती, ज्यांच्या मानीव मोठेपणाला धक्का पोंचत होता, किंवा ज्यांच्या स्वार्थाचा पाया समूळ उखडला जाण्याचा संभव होता, ते सारे वर्ग त्यांच्या विरोधकांत सामील झाले यांत नवल नव्हतें. आश्चर्याची गोष्ट ही कीं ज्यांचीं सर्वसामान्य मतें आगरकरांच्या विचारांहून फारशीं भिन्न नव्हतीं, अशा सुबुद्ध सुशिक्षितांच्या एका मोठ्या वर्गानें या विरोधकांचें पुढारी-पण पत्करलें. आधीं आपल्या पायांतल्या राजकीय शृंखला तोडूं या, सामा-जिक शृंखलांचा पुढें सावकाश विचार करतां येईल, असा या विरोधकांचा मुख्य सूर होता. आगरकरांना तो मान्य होणें शक्य नव्हतें. राजकीय पार-तंत्र्याची त्यांनाहि मनस्वी चीड येत होती. इंग्लिश राज्यांत पोटभर अन्न मिळत नाहीं, हें भीषण दृश्य त्यांनाहि पदोपदीं दिसत होतें. पण सामाजिक गुलामगिरीची उपेक्षा करून राजकीय गुलामगिरी नाहींशी होईल या गोष्टीवर त्यांचा काडीचाहि विश्वास नव्हता. एखादा किल्ला लढवितांना सेनापतीनें तटबंदी आणि तोफखाना यांची जितकी काळजी घेतली पाहिजे तितकीच किल्ल्यांत भरपूर अन्नसामग्री आहे कीं नाहीं, आणि त्यांतल्या विहिरींचें पाणी दूषित झालें आहे किंवा काय याविषयींही त्यानें चिंता वाहिली पाहिजे असें त्यांना वाटे. ते म्हणतात, 'आठदहा वर्षांच्या पोरीस साठसत्तर वर्षांच्या थेरड्याच्या कबजांत देणाऱ्या किंवा जिला बारावें वर्ष देखील लागलेलें नाहीं अशा मुलीच्या आपत्तीचा विचार न करतां तिच्याशीं

संभोग करण्याचा हक्क नवऱ्यास आहे असें प्रतिपादन करणाऱ्या, अथवा नवऱ्याच्या प्रेताबरोबर त्याच्या बायकोचे केस जाळले तरच त्यास सद्गति मिळते अशी बडबड करणाऱ्या अमानुष लोकांनीं आम्हांस राजकीय हक्क द्या म्हणून तोंडें वेंगाडणें हें अत्यंत विसंगत व अस्वाभाविक आहे. **बाहेरची गुलामगिरी नको असेल तर अगोदर घरची गुलामगिरी नाहींशी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.** गृहसुधारणेस प्रतिकूल असणाऱ्या लोकांनीं केवढीही हुल्लड करून दिली तरी अखेरीस ते मागें पडल्याशिवाय राहत नाहींत, हें इजिप्शियन, पर्शियन, मुसलमान वगैरे लोकांच्या इतिहासापासून समजण्यासारखें आहे. ज्या देशांतील **गृहें पारतंत्र्याच्या आणि जुलमाच्या शाळा आहेत, त्या देशांत महापुरुषांची परंपरा निर्माण कशी व्हावी, आणि ज्ञान, कला, संपत्ति व स्वातंत्र्य वगैरे इष्ट वस्तूंची त्यांस प्राप्ति होऊन त्यांचा उपभोग त्यांना चिरकाल कसा मिळावा, हें आम्हांस समजत नाहीं.'**

× × ×

'बाहेरची गुलामगिरी नको असेल तर अगोदर घरची गुलामगिरी नाहींशी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे' ही आगरकरांची शिकवण किती यथार्थ होती हें गेल्या पन्नास वर्षांतल्या हिंदी राजकारणाच्या इतिहासानें सिद्ध केलें आहे. गांधीजींना आगरकरांचें नांव कदाचित् ऐकूनहि ठाऊक नसेल! पण काळानें लोकमान्यांच्या क्रांतिकारक राजकारणाचा वारसा जसा त्यांच्याकडे दिला, तसा आगरकरांच्या सामाजिक क्रांतीचा ध्वजही त्यांनाच आपल्या हातांत घ्यावा लागला. राजकीय स्वातंत्र्य व समाजसुधारणा हीं क्षेत्रें एकमेकांपासून अलग ठेवण्याची अनिष्ट प्रथा गांधीजींनीं नाहींशी केली यांतच त्यांचें पुढारी या नात्यानें खरें मोठेंपण आहे. हें हीं एकाच रथाचीं दोन चाकें आहेत, किंबहुना हे एकाच धनुर्धराचे दोन हात आहेत ही गोष्ट अखंड आणि अविश्रांत प्रचार करून त्यांनीं बहुजन समाजाच्या गळीं उतरविली. हिंदभूमीच्या स्वातंत्र्याप्रमाणें बालविधवेच्या सौभाग्याचीहि चर्चा महात्माजींच्या लेखांत आढळते आणि हिंदी शेतकऱ्यांच्या भीषण दारिद्र्याप्रमाणें हिंदी स्त्रीवर लादलेल्या विचित्र दास्याचाही ते अत्यंत आपुलकीनें विचार करूं शकतात, याचें कारण प्रगति सर्वांगीण असते या त्यांच्या

दृढ श्रद्धेत आहे. आगरकरांनीं आयुष्यभर तर्कशुद्ध पद्धतीनें याच विचारसरणीचा पुरस्कार केला.

९

'आधीं घरची गुलामगिरी नाहींशी झाली पाहिजे' असें प्रतिपादन करणाऱ्या आगरकरांनीं निकटवर्ती मध्यम वर्गाच्या संसाराकडे जेव्हां दृष्टि वळविली, ज्या गृहिणीमुळें घराला नंदनवनाचें स्वरूप येतें तिचें अंतरंग जेव्हां त्यांनीं न्याहाळून पाहिलें, तेव्हां भवभूतीनें 'करुणस्य मूर्तिः' म्हणून उल्लेखिलेली अभागिनी सीताच या नाहीं त्या रूपानें पिढ्यान् पिढ्या हिंदुसमाजांत घरोघर वावरत आली आहे अशी त्यांची खात्री होऊन चुकली. तिच्यावर होणारा जुलूम केवळ अमानुष होता! भातुकली खेळण्याच्या वयांत तिच्यावर अक्षता टाकल्या जात होत्या, अल्लडपणानें खेळण्याच्या वयांत तिला मातृपदाचा भार वाहावा लागत होता, वैधव्य येतांच धर्माच्या नांवाखालीं तिचें विद्रूप विडंबन केलें जात होतें, मुलांना जन्म देणें व त्यांच्या खस्ता काढणें यांच्या पलीकडे तिच्या आयुष्याला दुसरें कुठलेंहि ध्येय उरलें नव्हतें, आणि पति व्यसनी असला, निर्दय असला, अगदीं पशु असला, तरी दरवर्षी वटपौर्णिमेला आणि हरताळकेला 'देवा, जन्मोजन्मीं हाच पति मला दे' अशी परमेश्वराकडे तिला प्रार्थना करावी लागत होती. स्वातंत्र्य हा शब्दच तिला अपरिचित होता! स्त्री ही निसर्गतः पुरुषाची प्रभावी जीवनस्फूर्ति असायची! पण हिंदु रूढीनें तिला अगतिक कारुण्यमूर्ति करून ठेवलें होतें!

सामाजिक गुलामगिरीची मूर्तिमंत प्रतिमा असलेल्या मध्यम वर्गातल्या स्त्रीला बंधमुक्त करण्याकरितां आगरकरांनीं केलेलें लिखाण वाचतांना डोळ्यांसमोर जें चित्र उभें राहतें तें खोलींत बसून शांतपणें लिहिणाऱ्या पांढरपेशा विद्वानाचें नव्हे, तर धर्मयुद्धाच्या भावनेनें प्रेरित झाल्यामुळें रणांगणावर ज्याची तरवार सारखी तळपत आहे अशा योद्धयाचें! स्त्रीस्वातंत्र्याचा तर्कशुद्ध रीतीनें पुरस्कार करतांना आगरकर कुठल्याही नाजुक प्रश्नापाशीं थबकले नाहींत किंवा कुठलीही समस्या अर्धवट सोडून सुवर्णमध्याचें मृगजळ शोधण्याचा त्यांनीं कधीं प्रयत्न केला नाहीं. स्त्रियांना

पुरुषांच्या बरोबरीनें शिक्षण दिलें पाहिजे, एक सामाजिक घटक या नात्यानेंच समाजानें स्त्रीच्या हक्कांचा आणि कर्तव्यांचा विचार केला पाहिजे, विवाहाच्या बाबतींत पुरुषांपेक्षा तिचें स्वातंत्र्य रतिमात्रही कमी असतां कामा नये, या गोष्टी तर त्यांनीं प्रतिपादन केल्याच ! पण मुलांमागून मुलें होऊं लागल्यामुळें स्त्री न कळत सर्वस्वीं संसारांत गुरफटली जाऊं लागते आणि यौवनांत पदार्पण करतांना तिच्या मनांत उद्भवलेले आकांक्षाचे अंकुर जागच्या जागीं जळून जातात हें लक्षांत घेऊन त्यांनीं मांडलेले विचार आजच्या काळांतही अनेकांना अस्वस्थ करून सोडतील. आगरकर म्हणतात, 'सध्यां स्त्रियांना जीं इतकीं मुलें होतात तीं त्यांच्या संतोषानें होतात असें आम्हांस वाटत नाहीं. या संबंधानें पुरुषांकडून स्त्रियांवर जुलूम होतो असा आमचा समज आहे; बाळंतपणाच्या क्लेशाची यत्किंचित् झळ पुरुषांच्या प्रत्ययास येण्यासारखी असती तर त्यांनीं आपल्या मनोविकारांना इतकें सैल सोडलें नसतें. 'परदुःख शीतळ' या तत्त्वावर सध्यां त्यांचें वर्तन चाललें आहे. स्त्रियांप्रमाणेंच त्यांनाहि कधीं कधीं प्रसूतिवैराग्य येण्याचा प्रसंग असता, तर उभयतांच्या संमतीनें बराच भूमार कमी होता. तथापि हा सांप्रतचा अन्याय फार दिवस चालेल असें दिसत नाहीं. जसजसा पुरुषांत विद्येचा अधिकाधिक प्रसार होईल तसतसा स्त्रियांतहि त्याचा उपक्रम होऊन तो वाढत जाणार. तो वाढत गेला म्हणजे स्त्रियांना आपलें खरें हित कशांत आहे आणि तें साधावें कसें हें समजूं लागणार, आणि तें समजूं लागलें कीं पुरुषांना हा आपला सांप्रतचा जुलूम सोडून द्यावा लागणार. **विवाहाच्या कामीं स्त्री-पुरुषांची संमति जितकी अवश्य आहे तितकीच संमति विवाहाच्या अंमलांतहि दृष्टीस पडूं लागली पाहिजे. तसें होऊं लागेल तेव्हांच स्त्रियांची पुष्कळ विपत्ति टळेल.**'

स्त्री आणि पुरुष यांच्या चारित्र्याकडे पाहतांना समाज जीं भिन्न नीतिमूल्यें वापरतो त्यांचाही त्यांनीं एके ठिकाणीं असाच अत्यंत स्पष्ट रीतीनें निषेध केला आहे. ते म्हणतात, 'स्त्रीच्या अनीतीपासून उत्पन्न होणारे अवांतर दुष्परिणाम कितीहि वाईट असले तरी ही गोष्ट निर्विवाद आहे कीं स्त्रीच्या अनीतीबरोबर पुरुषालाही अनीतिमान व्हावें लागतें. पुरुष आपली नीति भ्रष्ट होऊं देणार नाहींत तर स्त्रियांच्या हातून अनीति घडणें

अशक्य होणार आहे. (जाति-विशिष्ट अनीतींत स्त्री व पुरुष या उभयतांकडून सारखा दोष घडत असून आमच्या नीतिकर्त्यांनीं स्त्रियांचें वर्तनच इतकें दंड्य व दूष्य कां मानलें आहे हें समजत नाहीं.) आम्हांस तर असें वाटतें कीं पुरुषांचा स्वार्थ, पुरुषांचा मत्सर व पुरुषांचें अधिक बल हें या पक्षपाताचें, या विषमतेचें, या गर्हणीय अन्यायाचें कारण होय. या निर्दय मात्सर्यामुळें वन्यपशूंहून आम्ही क्रूर झालों आहों.'

## १०

बालविवाह, स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह, स्त्रीस्वातंत्र्य, सोंवळें-ओंवळें, स्त्री-पुरुषांचे पेहेराव, प्रेत-संस्कार, इत्यादि मध्यम वर्गालाच मुख्यतः महत्त्वाच्या वाटणाऱ्या विषयांवर आगरकरांना बरेंचसें लिखाण करावें लागलें. हा दोष तत्कालीन परिस्थितीचा होता. आगरकरांचा दृष्टिकोन कधींच आपल्या वर्गापुरता संकुचित नव्हता. समाजाचे सर्व थर व जीवनाचीं सर्व अंगें त्यांना सारखींच प्रिय होतीं. समाजाच्या सर्व थरांचा व त्यांच्या सर्व अंगांचा समतेच्या तत्त्वज्ञानानुसार होणारा विकास हाच त्यांच्या दृष्टीनें सुधारणेचा खराखुरा अर्थ होता. पण परिस्थितीमुळें त्यांच्या लेखनांत मध्यमवर्गाच्या अनेक प्रश्नांना अवास्तव महत्त्व प्राप्त झालें. आणि त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची परंपरा चालविण्याचें काम लौकिक दृष्टीनें ज्यांच्याकडे गेलें त्या राजकारणांत मवाळ व आर्थिक-दृष्ट्या सुखवस्तु असलेल्या सुधारकांनीं आपल्या बंगल्यापलीकडे फार दूरवर सहसा दृष्टि फेंकली नाहीं. अशा स्थितींत आगरकरांच्या विचारांना अत्यंत व्यापक असें अधिष्ठान आहे हें बहुजनसमाजाच्या लक्षांत कसें यावें ? पण आज त्यांचें लिखाण सहज चाळलें तरी समाजाच्या सर्व थरांविषयीं त्यांना सारखाच जिव्हाळा वाटत होता आणि त्यांच्या सर्व अंगांचा सतत विकास व्हावा याविषयीं ते सारखेच दक्ष होते, याचीं हवीं तेवढीं प्रत्यंतरें मिळतील. रेल्वेच्या नोकरांवर होणाऱ्या आर्थिक अन्यायाविषयीं ते कळवळून लिहितात, 'रेल्वेची नोकरी म्हणजे शुद्ध गुलामगिरी होऊन बसली आहे! अगदीं हलक्या स्टेशनावरील स्टेशनमास्तराच्या किंवा तारमास्तराच्या कर्तव्य-तत्परतेवर शेंकडों लोकांचे प्राण अवलंबून असतात. असल्या गरीब लोकांच्या शिरावर येवढी जबाबदारी टाकली असून त्यांना पोटभर अन्न मिळूं नये,

आठवड्यांतून दोन पैसे मागें टाकतां येऊं नयेत, वर्षांतून महिनाभर हक्काची रजा मिळूं नये, एक दिवस विश्रांति मिळूं नये, वीस पंचवीस वर्षें इमानें इतबारें नोकरी केल्यावर लहानशा पेन्शनची आशा असूं नये व हातपाय लुला झाला असतां कसलाही आधार असूं नये ही किती कष्टावह व किती निर्दयपणाची सेवा आहे बरें!.........असली नोकरी करणारांचीं शरीरें ओतीव लोखंडाचीं केलीं असलीं तरी तीं सुद्धां चारसहा महिन्यांत झिजून जाऊन मोडकळीस येतील असें वाटतें. मग हाडामांसाच्या माणसांची कथा काय? पण या गोष्टीकडे आमच्या कांडर साहेबांचें कधीं लक्ष गेलें आहे काय? कशाला जाईल? हवे तितके नेटिव लोक पैदा होत आहेत तोंपर्यंत ते या हृदयभेदक स्थितीकडे कशाला पाहतील?'

अर्धपोटीं राहणाऱ्या श्रमिकांची आर्थिक दुःस्थिति सुधारण्याची त्यांना जेवढी आवश्यकता वाटते, तेवढीच वाङ्मयांतही आपल्या समाजाची अकुंठित प्रगति व्हावी अशी उत्कट इच्छा त्यांच्या मनांत वास करीत आहे. विकारविलसिताच्या प्रस्तावनेंत ते लिहितात, 'रोमिओ, लीअर, ऑथेल्लो, सीझर आणि हॅम्लेट हे नायक एकाच कवीनें निर्माण केले असावेत किंवा ज्यूलिएट, रीगन, कार्डीलिया, डेस्डेमोना आणि ऑफिलिया या तरुणांगना एकाच कल्पनेंतून निघाल्या असाव्यात ही परम आश्चर्याची गोष्ट नाहीं का? **आमच्या इकडील कवि दशरसांच्या पाशांत अगदीं जखडून गेल्यामुळें स्वभाववैचित्र्यवर्णन हा गुण त्यांच्यांत दुर्मिळ झाला आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.** चारुदत्त व वसंतसेना, दुष्यंत व शकुंतला, राम व सीता, माधव व मालती या नायक-नायिकांच्या युगुलांत म्हणण्यासारखें प्रकृतिवैचित्र्य काय आहे?'

कविकल्पनांच्या उंच उड्डाणांकडे इतक्या बारकाईनें पाहणारी त्यांची दृष्टि खालीं मैदानांकडे वळती तरी तिथेंही आपल्यांत काय कमी आहे आणि तें वैगुण्य कसें भरून काढलें पाहिजे हें चटकन् तिला दिसून येतें. 'सणांचा व खेळांचा ऱ्हास' या लेखांत आगरकर म्हणतात, 'कोणत्याही देशांतील लोकांत नाना प्रकारचे व्यायामशील खेळ खेळण्याची हौस असणें व तसले खेळ खेळणाऱ्या लोकांची मोठी संख्या त्यांत दृष्टीस पडणें हें त्या देशाच्या सुस्थितीचें मोठें व्यंजक आहे.........सध्यां जो तो 'अभ्यास'—'अभ्यास'

'बुक'–'बुक', व 'काम'–'काम' करूं लागला आहे. असली अपायकारक श्रमव्यग्रता कांहीं कामाची नाहीं. तिच्या योगानें नानाप्रकारचे क्लेश सोसावे लागून आयुष्य क्षीण होतें. कधीं कधीं पूर्ण अनध्याय करून मनाला व शरीराला नित्य श्रमाच्या जुंवापासून खुलें केलें पाहिजे व जेणेंकरून सारी वृत्ति अत्यंत उल्हासमय व कार्यक्षम होईल अशा प्रकारचें आचरण केलें पाहिजे. अशा प्रकारचें आचरण हातून घडण्याला प्रत्येकास नाना प्रकारचे खेळ खेळण्याची व सण करण्याची हौस पाहिजे.

व्यक्तिजीवनाकडे सूक्ष्मतेनें पाहणाऱ्या आगरकरांची राष्ट्रीय दृष्टि किती विशाल होती हें पुढील उताऱ्यावरून दिसून येईल. 'ब्रिटिश मालाचा पाय आमच्या घरांत घुसल्यापासून काय विपरीत स्थिति झाली आहे पहा; कापसाचीं बोंडें गोळा झालीं न झालीं तोंच गठ्ठे बांधून ते इंग्लंडला रवाना करण्याविषयीं इंग्रज व्यापारीकंपन्यांचे एजंट तक्षकासारखे दक्ष! हा कापूस इंग्लंडला जाऊन पोंचल्यावर तेथें त्यांचीं ठाणें व्हावयाचीं आणि तीं फिरून आमचीं ढुंगणें झांकण्यासाठीं व आम्हांपासून मूळ कापसाच्या किंमतीच्या दसपट किंमत काढण्यासाठीं परत यावयाचीं! इंग्रजी कपड्याची काय गोष्ट सांगावी? किती मऊ, किती स्वच्छ, किती स्वस्त, किती बारीक व किती हलका!... ...रावापासून रंकापर्यंत लागणारा पाहिजे तो जिन्नस–मग तो एका दमडीचा असो किंवा एका लाखाचा असो–इंग्लंडच्या कृपेमुळें त्याची आम्हांला धाण पडेनाशी झाली आहे. पण दुर्दैवामुळें एकच अडचण आम्हांला पडते. ती ही कीं, या सर्व वस्तूंबद्दल आम्हाला किंमत द्यावी लागते! त्या फुकट मिळत नाहींत! तेव्हां आतां ही किंमत कोठून द्यावी ही पंचाईत आहे! कोठून द्यावी म्हणजे नोकरी करून–सरकारच्या पदरीं सेवा करून! ठीक आहे, पण सरकार तरी सेवेबद्दल वेतन कोठून देणार? कोठून म्हणजे? करातून! कर कोणापासून घेणार? देशातील लोकांपासून! देशांतील लोक हे कर कशापासून देणार! आपल्या उत्पन्नांतून! त्यांचें उत्पन्न कोठें आहे? तें उत्पन्न म्हणजे येथील कच्चा माल! म्हणजे काय झालें कीं, हिंदुस्थानांतल्या बहुतेक लोकांनीं कुणबट व्हावें आणि कच्चा माल तयार करून तो इंग्लिश व्यापाऱ्यांच्या अडत्यांना ते मागतील त्या दरानें विकावा, आणि जी किंमत येईल तींतून सरकारला

लागेल तेवढा कर देऊन बाकीच्यांत येथील वहुतेक प्रजेनें हवा तसा आपला गुजारा करावा!'

× × ×

११

देशाच्या राजकीय आणि आर्थिक गुलामगिरीविषयीं आगरकरांनीं असले तिखट उद्गार वारंवार काढले आहेत. पारतंत्र्याची इतकी चीड असणाऱ्या लेखकाची देशभक्त म्हणून पूजा व्हायची तो काळ होता. पण आगरकराच्या वाट्याला मात्र गेंदेदार गुलाबांऐवजीं अणकुचीदार दगडधोंडे आले. देशाचें रक्तशोषण करणाऱ्या परकीय राज्ययंत्रावर तुटून पडणाऱ्या इतर नेत्यांच्या मिरवणुकी निघत असतांना आगरकरांना फक्त आपली प्रेतयात्राच पहायला मिळाली. ज्या रूढिग्रस्त समाजाचे डोळे उघडावेत म्हणून त्यांनीं हंसतमुखानें आपल्या आयुष्याचा होम केला, त्याच समाजानें त्याना आमरण शत्रुवत् लेखलें. त्यांच्या त्यागाविषयीं, विद्वत्तेविषयीं आणि चारित्र्याविषयीं समाज निःशंक होता. आगरकर देवमाणूस आहेत हें त्यालाही नाकबूल करतां येत नव्हतें. त्यांचा गुन्हा फक्त एकच होता—तो म्हणजे ते देव न मानणारे देवमाणूस होते!

आगरकरांच्या काळच्या सुशिक्षितांपैकीं ज्यांना देवाधर्माच्या परंपरागत वेडगळ कल्पना पटणें शक्य नव्हतें, त्यानीं आपल्या मनाचें समाधान करण्याकरतां आर्यसमाज, ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज वगैरे अधिक समंजस अशा पंथांचा आश्रय केला. या सर्व पंथांनीं हिंदुधर्मांतल्या अनेक भोळ्या आणि खुळ्या धार्मिक समजुतींचा त्याग करण्याचें धैर्य दाखविलें होतें हें खरें! पण या सर्वांना ईश्वराचें अस्तित्व मान्य होतें. देवाच्या अस्तित्वाविषयीं साशंक असलेल्या गौतम बुद्धालाच देव करून सोडणाऱ्या हिंदुसमाजाची मर्माची जागा त्यांनीं ओळखली होती. तिथें घाव घालून त्याला चिडविण्याचें धाडस या पंथांच्या संस्थापकांत किंवा अनुयायांत नव्हतें. आगरकरांनीं मात्र अज्ञेयवादाचा पुरस्कार करून तें साहस केलें.

आगरकरांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानांत देवाला थारा नाहीं, देवाला जागा नाहीं, परलोक आणि पुनर्जन्म यांना अद्भुतरम्य कविकल्पनांपली-

कडे अस्तित्व नाहीं. ते सात्त्विक ऐहिक जीवनाचे उपासक आहेत. प्रवृत्ति आणि निवृत्ति यांचा कलह फार प्राचीन असला तरी या कलहांत प्रवृत्ति विजयी होत आलेली आहे आणि पुढेंही तिचेंच स्वामित्व मानवी जीवनावर चालणार आहे हें सत्य ते क्षणभर सुद्धां डोळ्यांआड करीत नाहींत ! 'फलमूलाशन करून रहावें, पूर्ण वैराग्याचें अवलंबन करावें, पर्वताच्या गुहांत वास करावा आणि संसाराच्या भानगडींत पडूं नये असें निवृत्ति पंथाचे प्रचारक शेंकडों वर्षे सांगत असतां व बऱ्याच अंशीं वागून दाखवीत असतां, प्रवृत्तिमार्गाकडे जग अधिक अधिक चाललें आहे,' असें सांगून ते म्हणतात, 'अनेक उपभोगांची वांछा करावी, ते प्राप्त होण्यासाठीं रात्रंदिवस झटावें आणि त्यांपासून होईल तितकें सुख करून घ्यावें असा मनुष्यांचा सामान्य स्वभाव आहे !'

ऐहिक सुखोपभोग हा मानवी जीवनांतला सर्वांत प्रमुख असा रस आहे. तो तुच्छ मानून मनुष्याला पारलौकिक सुखाच्या मृगजळामागें धांवायला लावणें हा आगरकरांच्या दृष्टीनें निव्वळ वेडेपणा आहे. भोगवृत्तीची वेळीं अवेळीं निंदा आणि विरक्तीची स्थानीं अस्थानीं स्तुति करणाऱ्या आपल्या साधुसंतांना सामान्य मनुष्याचें मन आणि राष्ट्राच्या प्रगतीचें मर्म यांचें सर्वांगीण आकलनच झालें नव्हतें. संयम म्हणजे संन्यास नव्हे हें साधें सत्य ते अनेकदां विसरले. त्यामुळें विरक्तिपर उपदेशाचा मारा आणि नैसर्गिक उपभोगेच्छेची ओढ यांच्या कात्रींत सांपडलेला हिंदुसमाज परवांपरवांपर्यंत दुटप्पी जिवन कंठीत होता. या दुटप्पीपणामुळें झालेल्या कोंडमाऱ्यानें त्याला दुबळें करून सोडलें होतें ! 'यमनियम, व्रतवैकल्यें आणि पापपुण्याच्या भ्रामक कल्पना यांच्या शृंखलांनीं जखडलेला सामान्य हिंदु मनुष्य शतकानुशतकें एखाद्या कैद्याप्रमाणें जगत आला होता.) अशा सामान्य मनुष्याला दीर्घकाळाच्या तुरुंगवासांतून मुक्त करण्याचा आगरकरांनीं निकराचा प्रयत्न केला. तुरुंगाची संवय झालेल्या कैद्यांना बाहेर करमेनासें होतें म्हणे ! इथेंही तेंच घडलें. रूढीच्या अंधारकोठडींत कोंडलीं गेलेलीं माणसें बुद्धिवादाच्या सूर्यप्रकाशांत येतांच त्याच्या तेजानें दिपून गेलीं, त्या तेजांत कांहीं तरी विचित्र दाहकता आहे असें त्यांना वाटूं लागलें, परत अंधारकोठडींत जाण्याकरतां तीं धडपडूं लागलीं आणि आपल्याला या भयंकर प्रकाशाचें

दर्शन करून देणारी व्यक्ति देवदूत नसून सैतान असली पाहिजे असा तर्क करून त्यांनीं तिला शिव्याशाप द्यायला सुरुवात केली !

आगरकरांनीं आयुष्यभर हे शिव्याशाप फुलांप्रमाणें मानले आणि झेलले, देव आणि दैव या दोन कुबड्यांच्या आधारावर आजपर्यंत आपला समाज रखडत चालत आला आहे, बुद्धि आणि यत्न या दोन पायांचा उपयोग करून आपण धांवूं शकूं याचा त्याला पुरापुरा विसर पडला आहे, त्याला स्वतःच्या पायांवर उभें करण्याकरतां कुणी त्याच्या कुबड्या काढून घेतल्या कीं आतां आपण जमिनीवर कोसळतों असें वाटून तो त्याच्यावर संतापल्या-शिवाय राहणार नाहीं, हें सारें ते पूर्णपणें जाणून होते ! पण स्वतःचा छळ करणाऱ्या मूर्ख किंवा दुष्ट लोकांना सहानुभूतीनें वागविणाऱ्या संतांचें औदार्य आगरकरांच्याही अंगीं भरपूर होतें. त्यांनीं आपल्याला शिव्याशाप देणाऱ्या अंध जनतेचा कधींही तिरस्कार केला नाहीं. खरा सुधारक हा जितका सत्या-ग्रही तितकाच समाजप्रेमी असला पाहिजे अशी त्यांची निष्ठा होती. ही निष्ठा त्यांनीं आमरण आचरून दाखविली.

समाजक्रांतीकरतां आवश्यक असलेली विचारक्रांति करायला प्रवृत्त झालेल्या आगरकरांनीं स्त्रीपुरुषांच्या पेहरावापासून त्यांच्या विवाहापर्यंत प्रत्येक गोष्टींत आपलें काय चुकत आहे आणि तें कसें सुधारावें याची न कंटाळतां सात वर्षें सांगोपांग चर्चा केली. गांवाला जायला निघालेल्या अल्प-वयस्क मुलाच्या सामानाची बांधाबांध करतांना प्रेमळ आई जेवढी काळजी घेते, तेवढ्या वात्सल्यानें त्यांनीं सामान्य माणसांचे संसार सुखाचे कसे होतील हें पाहिलें. हें पाहतांना त्यांनीं देवाधर्माच्या आणि पापापुण्याच्या प्रगति खुंटवणाऱ्या सर्व कल्पना झुगारून दिल्या. मात्र त्या झुगारून देतांना, व्यक्ति-स्वातंत्र्याचा जोरदार पुरस्कार करतांना आणि प्रत्येकास शक्य तितके ऐहिक सुखोपभोग मिळाले पाहिजेत असें प्रतिपादन करतांना, आपल्या तत्त्वज्ञानाच्या विशाल सामाजिक बैठकीचा त्यांनीं वाचकाला कुठेंही विसर पडूं दिला नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्याचे ते कट्टे पुरस्कर्ते होते. पण स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार किंवा स्वच्छंदीपणा नव्हे, आणि दुसऱ्याच्या दुःखावर उभारलेलें सुख हें मनुष्यानें उपभोगण्याच्या लायकीचें सुख नव्हे हें त्यांनीं पुनःपुन्हा कटाक्षानें सांगितलें आहे. ' The only freedom which deserves the name is that of

pursuing our own in our own way, so long as we do not attempt to deprive others of theirs or their efforts to obtain it.' (दुसऱ्याच्या स्वातंत्र्याच्या आड जें येत नाहीं तेंच खरें स्वातंत्र्य) या मिल्लच्या उक्तींतलें मर्म त्यांच्या प्रतिपादनांत पूर्णपणें बिंबित झालेलें आहे. म्हणून मानवजातीच्या बाल्यावस्थेंत स्थापन झालेले, परलोकाकडे फाजील लक्ष लावून बसलेले आणि अनेक कारणांनीं खऱ्याखुऱ्या जीवनमूल्यांना विसरून गेलेले पृथ्वीच्या पाठीवरले सर्व धर्म यापुढें निस्तेज होत जाणार हें भविष्य वर्तवितांना नव्या सार्वत्रिक भावी धर्माचें स्वरूप निश्चित करायला ते विसरले नाहींत, 'मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन' हाच त्यांनीं घोषित केलेला सार्वत्रिक भावी धर्म आहे. मानवी जीवन संकुचित करणाऱ्या जातींच्या आणि धर्मांच्या भिंती यापुढें जमीनदोस्त केल्या पाहिजेत, एवढेंच नव्हे तर राष्ट्राराष्ट्रामधल्या दुर्लंघ्य गगनचुंबी भिंतीसुद्धां शक्य तितक्या लवकर कोसळून पाडल्या पाहिजेत, असें आगरकरांना वाटत होतें यांत मुळींच शंका नाहीं. महाराष्ट्रातल्या पांढरपेशा वर्गाच्या सामाजिक दुःखांविषयींच त्यांनीं मुख्यतः लिहिलें असलें तरी 'मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन' हाच उद्यांच्या जगाचा धर्म होणार आहे हें आपलें सुंदर स्वप्न बोलून दाखविल्यावांचून त्यांना राहवलें नाहीं.

एखाद्यानें ईश्वराचें अस्तित्व अमान्य केलें, मनुष्यांच्या पापापुण्यांचा हिशोब लिहिणारा चित्रगुप्त ही एक अद्भुतरम्य कल्पना आहे असें म्हटलें, किंवा दुनियेच्या या दोन घटकेच्या वस्तीकरतां येणाऱ्या प्राण्याचें भूतभविष्य कुणालाही कळणें शक्य नाहीं असें प्रतिपादन केलें, म्हणून कांहीं त्याला कुठलींच नीतिमूल्यें संमत नाहींत असें होत नाहीं. उलट काल्पनिक गोष्टींवर अंधश्रद्धा ठेवून निर्माण केलेल्या आणि केवळ रूढीमुळें पवित्र ठरलेल्या नीतिमूल्यांपेक्षां मानवी जीवनाचा सहानुभूतीनें आणि शास्त्रीय दृष्टीनें विचार करून निश्चित केलेलीं नीतिमूल्येंच अधिक सुखसंवर्धक ठरतील अशी खात्री वाटत असल्यामुळेंच तो 'जुनें जाउं द्या मरणालागुनि, जाळुनि किंवा पुरूनि टाका' असें तडफेनें म्हणत असतो.

आगरकरांसारखे क्रांतिकारक जुन्या नीतीचा तीव्र निषेध करतात याचें कारण ते मानवी नीतीचे खरेखुरे कैवारी असतात हेंच आहे. खरे सुधारक

जीवनाचे भक्त असतात. ते शब्दांचे अथवा संकेतांचे दास होत नाहींत. आणि म्हणूनच मानवी जीवनाला खुरटवून टाकणाऱ्या जुन्या सांकेतिक नीतिविरुद्ध ते हत्यार उपसतात. नीतिमूल्यें हीं केवळ परंपरापुनीत असतां उपयोगी नाहींत, तीं बुद्धिगम्य असलीं पाहिजेत, एवढेंच काय तें त्यांचें म्हणणें असतें. जुनीं धर्मनिष्ठ नीतिमूल्यें काय किंवा नवीं अर्थनिष्ठ नीतिमूल्यें काय, दोन्हींही विषमता निर्माण करणारीं असल्यामुळें आणि ती विषमता सामान्य मनुष्याचा विकास कुंठित करून त्याच्या कपाळीं पिढ्यान् पिढ्या गुलामगिरी लादीत असल्यामुळें, खऱ्या सुधारकाला समाजांत चाललेला या मूल्यांचा उदोउदो कधींही सहन होत नाहीं. नीतिमूल्यें हीं मुख्यतः दया आणि न्याय यांच्यावर उभारलीं गेलीं पाहिजेत, परलोक आणि पैसा यांच्यावर आधारलेल्या मूल्यांच्या चौकटींत जीवनाचें चित्र कापून वेडेंवांकडें करून बसविण्याचा प्रयत्न करणें हा नुसता मूर्खपणा नाहीं, तो अखिल मानव जातीविरुद्ध केलेला अक्षम्य गुन्हा आहे, असें त्याला मनःपूर्वक वाटत असतें.

'समाजाच्या सर्व प्रकारच्या कल्पना आणि आचार यात कालानुरूप फेरबदल होत गेल्याखेरीज त्याची प्रकृति निरोगी राहणार नाहीं, जे लोक अशा प्रकारच्या दशांतरास विरोध करतात ते त्याचे हितशत्रु होत' असें प्रतिपादन करून आगरकरांनीं जुन्या धर्मनिष्ठ नीतिमूल्यांचा जसा धिक्कार केला आहे, त्याप्रमाणें इंग्रजासारख्या साम्राज्यवादी राज्यकर्त्यांना 'हिंदुस्थानचें राज्य तुम्हांस कष्टावह झालें असलें तर तें तुम्ही सोडून का देत नाहीं?' असा खोंचक प्रश्न विचारून नव्या अर्थनिष्ठ नीतिमूल्यांचा घातकपणाही त्यांनीं सूचित केला आहे.

नीतिमूल्यें हीं धर्मनिष्ठ किंवा अर्थनिष्ठ असू नयेत, तीं जीवननिष्ठच असलीं पाहिजेत, जीवन जसजसें बदलत जाईल तसतसा त्या मुल्यांतही फरक होणें अपरिहार्य आहे, ही आगरकरांची भूमिका जो ध्यानांत घेईल त्याला निरनिराळ्या ठिकाणीं विषयानुरोधानें त्यांनीं जे बहुमोल विचार प्रदर्शित केले आहेत ते सुसंगत रीतीनें एकत्र करून त्यांच्या तत्त्वज्ञानाची ओळख करून घेणें कठिण जाणार नाहीं. हें तत्त्वज्ञान महाराष्ट्रांतल्या मध्यम वर्गापुरतें मर्यादित होतें असें खालीं दिलेलीं त्यांचीं पांच सूत्रें वाचल्यावर कोण म्हणूं शकेल?

( १ ) विचार करणारे, उपभोग घेणारे व काम करणारे असे जे सांप्रत-काली प्रत्येक देशांत तीन ठळक वर्ग दृष्टीला पडतात ते कायमचे नव्हत. **हळु हळु प्रत्येक व्यक्तीस विचार, उपभोग, आणि काम हीं सम-प्रमाणांत करावीं लागून, साऱ्यांच्या सुखानुभवाची इयत्ता सारखी होत जाणार आहे, व जों जों ती तशी होईल तों तों मनुष्याची खरी उन्नति होऊं लागली असें म्हणतां येईल.**

( २ ) मनुष्यतेचें ऐहिक सुखवर्धन या सार्वत्रिक भावी धर्माची ज्यांनीं दीक्षा घेतली असेल **त्यांनीं कोणास न भितां आपल्या मनास जें शुद्ध, प्रशस्त व कल्याणप्रद वाटत असेल तें दुसऱ्यास सांगावें आणि तदनुसार होईल तेवढें आचरण करावें.**

( ३ ) कोटिक्रमाचीं अस्त्रें पडताळून जो वादाला बसला तो आपल्या खऱ्या मतांची दाद सहसा लागूं द्यायचा नाहीं. आळस, निरुद्योगीपणा, धनातितृष्णा, परस्त्री–किंवा परपुरुष–चिंतन या गोष्टी अत्यंत त्याज्य आहेत हें कोणत्या सुशिक्षित स्त्रीस किंवा पुरुषास कळत नाहीं ? किंवा त्या तशा आहेत असें बोलण्यांत किंवा लिहिण्यांत कोण नाहीं म्हणत नाहीं ? तथापि या अमंगळ गोष्टींचा आपणांस कधींही विटाळ झाला नाहीं असें किती स्त्रिया व पुरुष छातीला हात लावून म्हणूं शकणार आहेत ? तात्पर्य, **मनुष्याच्या वास्तविक स्थितींत व जाणून बुजून दुसऱ्यापुढें यांचें जें बोलणें चालणें होत असतें त्यांत बरेंच अंतर असतें. हें अंतर नाहींसें होत जाणें व सर्व काळीं त्यांचें एकच स्वरूप दिसूं लागणें हें एक त्यांच्या सुधारणेचें व्यंजक होय.**

( ४ ) सध्यां अगदीं भिन्न अशा दोन सुधारणांचें आमच्या देशांत संघटन झालें असल्यामुळें उभयतांचा मोठा संग्राम माजून राहिला आहे. हिंदु सुधारणेंत जेवढा चांगला भाग आहे तेवढा गमावण्याची कोणा-सही भीति नको. जें चांगलें आहे तें कोणीही टाकीत नाहीं....**फार थोडक्या काळांत पूर्वपश्चिम सुधारणेंतील अत्यंत हितकारक भाग जींत सामील झाले आहेत अशा एका नामी सुधारणेची येथें स्थापना होऊन भारतीय आर्य अननुभूतपूर्व अशा आधिभौतिक व आध्यात्मिक सुखाचा उपभोग घेऊं लागतील.**

(५) हा अज्ञानरोग सर्व शारीरिक रोगांच्या मुळाशीं आहे. इतकेंच नाहीं तर झाडून साऱ्या मानुषीय विपत्तींचें हाच बीज आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. **मनुष्याचा व्यवहार सुरळीत चालण्यास व उत्तरोत्तर त्याचें पाऊल पुढें पडत जाण्यास ज्ञानवृद्धि व ज्ञानप्रसार यांसारखें साधन नाहीं.**

## १२

आगरकरांच्या लिखाणांत विखुरलेलीं असलीं विचारसंपन्न सूत्रें वाचलीं म्हणजे त्यांचा द्रष्टेपणा मनाला पुरेपूर पटतो. त्यांनीं मार्क्स वाचला नसेल. पण समतावादाचे महाराष्ट्रांतले ते पहिले बुद्धिवादी पुरस्कर्ते आहेत. एका हातांत समतेचा ध्वज आणि दुसऱ्या हातांत बुद्धिवादाचें खड्ग घेऊन आयुष्यभर एकाकी लढत असतांनाही त्यांनीं कधीं कच खाल्ली नाहीं, माघार घेतली नाहीं, निराशेची पुसट छाया सुद्धां आपल्या मनावर पडूं दिली नाहीं. न्यायमूर्ति रानड्यांची अष्टपैलु बुद्धिमत्ता त्यांच्यापाशीं नव्हती. पण रानड्यांच्या अंगीं नसलेलें वीरत्व आगरकरांमध्यें विपुलतेनें वास करीत होतें. लोकहितवादी व जोतीराव फुले यांची समाजसुधारणेची तळमळ आगरकरांच्यापेक्षां कमी तीव्र होती असें म्हणतां येणार नाहीं. पण सामाजिक तत्त्वज्ञानाची बैठक आणि वाङ्मयीन प्रतिभेची झळाळी या दोन्ही गुणांत ते आगरकरांच्या मानानें फिक्के वाटतात. लोकमान्य टिळकांनीं आगरकरांच्या मृत्यूनंतर पाव शतक हिंदी राजकारणाचें तेजस्वी नेतृत्व केलें. असामान्य पांडित्य आणि अलौकिक वीरत्व यांचा संगम त्यांच्या ठिकाणीं झाला होता. पण राष्ट्रपुरुष या नात्यानें टिळक कितीही मोठे असले तरी त्यांच्या स्वातंत्र्यवादांत सर्वस्पर्शी सामाजिक क्रांतीला अतिशय गौण स्थान होतें. नव्या जगाचीं, नव्या समाजरचनेचीं, सामान्य मनुष्याच्या संपूर्ण विकासाचीं आणि त्याच्या उद्यांच्या सुखी संसाराचीं स्वप्नें टिळकांना सहसा पडत नसत. तीं पाहण्याकडे त्यांची प्रवृत्तीच नव्हती. त्यांची प्रतिभा पंडिताची होती, ती महाकवीची नव्हती! त्यांचें वीरत्व लढवय्याचें होतें; तें संतांचें वीरत्व नव्हतें!

सात्त्विक वीरत्व, व्यापक तत्त्वज्ञान, विशाल दृष्टिकोन आणि सामान्य मनुष्याच्या लहानसहान सुखदुःखाविषयीं वाटणारा विलक्षण जिव्हाळा इत्यादि दृष्टींनीं आगरकर आणि गांधीजी यांच्यांत फार साम्य आहे. एकीकडे कायदेभंग करणारे महात्माजी दुसरीकडे शेळीच्या दुधांत कोणकोणते गुणधर्म आहेत याची चिकित्सा करीत बसलेले जसे आढळतात, त्याप्रमाणें एका लेखांत सामाजिक क्रांतीचा संदेश हिरीरीनें देणारे आगरकर दुसऱ्या लेखांत पुणेरी जोड्यांच्या गुणावगुणांची मीमांसा करून जो 'कोणी वर सांगितलेल्या अडचणी व सोई मनांत आणून, आम्हांस मानवेल असा जोड्याचा नवीन नमुना तयार करून देईल त्याला आम्ही दहापासून पंधरा रुपये बक्षीस देऊं' असें बक्षीस जाहीर करीत असलेले दिसतात. मनमोकळा विनोद हाही आगरकर आणि गांधीजी या दोघांचा एक आकर्षक विशेष आहे. वाढदिवसाच्या निमित्तानें 'आपणांला शंभर वर्षे आयुष्य लाभो' असा संदेश पाठविणाऱ्या मालवीयांना 'तुम्ही माझ्या आयुष्यांतलीं पंचवीस वर्षे कां कमी केलींत? मी सव्वाशें वर्षे जगणार आहें' असें उत्तर पाठविणारे गांधीजी आणि 'माझ्या पावशेर मिशांचा फिल्टर म्हणून मला चांगलाच उपयोग होतो' असें म्हणणारे आगरकर फार मोठे असूनहि सामान्य मनुष्याला जवळचे वाटतात याचें कारण त्यांची विनोदबुद्धि हेंच आहे.

मात्र आगरकर आणि गांधीजी यांच्या अंतिम ध्येयांत आणि व्यक्तित्वाच्या अनेक पैलूंत जरी थोडेंफार साम्य असलें तरी ध्येयसिद्धीचे त्यांचे मार्ग अत्यंत भिन्न आहेत. उकाड्यानें दूध नासावें त्याप्रमाणें मनुष्यस्वभावामुळें श्रद्धेचें रूपांतर हां हां म्हणतां अंधश्रद्धेंत होत जातें, आणि ती अंधश्रद्धा समाजाच्या अधःपाताला कारणीभूत होते, हा इतिहासानें पुनःपुन्हां शिकवलेला धडा आगरकर क्षणभरहि विसरूं शकत नाहींत. मानवतेच्या दृष्टीनें चांगलें आणि वाईट, मंगल आणि अमंगल, इष्ट आणि अनिष्ट यांचा निर्णय करण्याचा अधिकार बुद्धीकडेच दिला पाहिजे असें ते आग्रहानें प्रतिपादन करतात. त्यांचा मनुष्याच्या आंतल्या आवाजावर भरंवसा नाहीं. मानवजातीच्या अनुभव–दुंदुभीचा गगनभेदी निनाद एकसारखा त्यांच्या कानांत घुमत आहे. त्यामुळें भावनाप्रधान व्यक्तीच्या आत्म-

प्रामाण्यापेक्षां ते विचारवंताच्या बुद्धिप्रामाण्यालाच अधिक महत्त्व देतात. उलट, गांधीजी बुद्धिप्रामाण्याकडे अनेकदां साशंकतेनें पाहत असलेले दिसतात.

बुद्धिवाद आणि श्रद्धावाद असें या भेदाचें स्थूल वर्णन होऊं शकलें तरी तें फार अपुरें आणि असमाधानकारक वाटतें. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाची परिणति न कळत निवृत्तिमार्गाच्या पुरस्कारांत होते. सामाजिक जीवनांत संन्यस्त वृत्तीला असें भलतें महत्त्व द्यायला आगरकर कधींच तयार झाले नसते. भोग भोगल्यानें मनुष्याची तृप्ति होत नाहीं, म्हणून त्याच्यापुढें सर्वांगीण संयमाचें ध्येय सदैव ठेवलें पाहिजे असें गांधीजींना वाटतें. सर्व समाज सुखी व्हावा म्हणून व्यक्तीला जो संयम पाळावा लागेल किंवा जो त्याग करावा लागेल तेवढाच आगरकरांना मान्य होता. संयमाकरतां संयम हें तत्त्व त्यांना कधींच संमत झालें नसतें. प्रवृत्ति हा मानवी जीवनाचा आत्मा आहे, सुखोपभोग हा प्रत्येक मनुष्याचा हक्क आहे या हक्कावर आवश्यक तेवढेंच सामाजिक नियंत्रण असावें, असें त्यांनीं पुन:पुन्हां प्रतिपादन केलें आहे.

नवें जग हवें तर त्याकरतां नवा मनुष्य निर्माण व्हायला हवा. आजचा सर्वसामान्य मनुष्य अधिक अंतर्मुख, अधिक तत्त्वनिष्ठ आणि अधिक त्यागप्रवृत्त झाल्याशिवाय नवें जग निर्माण होऊं शकणार नाहीं, या श्रद्धेवर गांधीजींनीं आपल्या सर्व तत्त्वज्ञानाची उभारणी केली आहे. पण सामान्य मनुष्याविषयीं आगरकरांना त्यांच्याइतकाच जिव्हाळा वाटत असला तरी त्याच्या विकासाला आणि कर्तृत्वाला अनेक नैसर्गिक व स्वाभाविक मर्यादा आहेत हें ते सहसा विसरत नाहींत. सामाजिक क्रांतीची त्यांची तळमळ गांधीजींच्या इतकीच उत्कट आहे. पण ही क्रांती सर्वसामान्य मनुष्यस्वभाव बदलून घडवून आणतां येईल असें त्यांना स्वप्नांतसुद्धां खरें वाटलें नसतें. क्रांति नेहमींच असामान्य व्यक्तींच्या बुद्धींतून, त्यागांतून आणि कर्तृत्वांतून जन्म पावते. सामान्य माणसें या कामाला अपुरीं पडतात. त्यांच्याविषयीं आगरकरांनीं एके ठिकाणीं अत्यंत मार्मिक उद्गार काढले आहेत. ते म्हणतात, ‘ भाविक व अभाविक, सुधारक व दुर्धारक, धर्मनिष्ठ व पाखंड, यांपैकीं नऊशें नव्याण्णव लोक ईझिगोइंग म्हणजे खुशालचेंडू

असतात. कोणत्याही गोष्टीकरतां मानेवर खडा ठेवून घेऊन किंवा भूकतहान वगैरे पडतील ते हाल सोसून श्रम करण्याचा त्यांचा मगदूर नसतो. व्याख्यानास जावें, गोड गोड बोलावें, पांचचार वर्तमानपत्रांस किंवा एखादद्दुसऱ्या पुस्तकास उदार आश्रय द्यावा; मनाची फारच प्रसन्नता असल्यास एखादें छोटेखानी व्याख्यान झोडावें किंवा लहान आर्टिकल खरडावें; आणि फारच झालें तर प्रसंगविशेषीं ज्यानें त्यानें पवित्र मानलेल्या कामाकरतां रुपया दोन रुपये वर्गणी द्यावी, इतकें केलें म्हणजे बहुतेकांची शिकस्त होते.'

सामान्य मनुष्य असा असतो हें गांधीजीही नाकबूल करणार नाहींत. पण तो तसा राहिला आहे म्हणूनच बुद्ध–ख्रिस्तांना पूज्य मानणारीं राष्ट्रें आज राक्षसी संहारांत आनंद मानीत आहेत आणि एकीकडे वैभवाचीं गगनचुंबी शिखरें व दुसरीकडे दारिद्र्याच्या खोल खोल दऱ्या असलीं भीषण दृश्यें जगांत दृष्टीला पडत आहेत, असें ते म्हणतात. निसर्ग, समाज आणि आत्मा हे मनुष्याचे जेवढे मोठे मित्र तेवढेच मोठे शत्रु आहेत. या तीन शत्रूंपैकीं निसर्ग आणि समाज यांच्याशीं लढण्याचें शिक्षण सामान्य मनुष्याला आतांपर्यंत थोडें फार मिळालें आहे. पण तो स्वतःशीं लढायला मात्र अद्यापि शिकलेला नाहीं. सामाजिक हिताच्या दृष्टीनें या तिन्ही शत्रूंशीं लढण्याइतकी त्याची तयारी झाली तरच यापुढें मानवता सुखी होऊं शकेल असा गांधीजींच्या तत्त्वज्ञानाचा रोख आहे. आज आगरकर असते तर त्यांनीं गांधींच्या कर्तृत्वाचें आणि आशावादाचें कौतुक केलें असतें. पण क्रांतीच्या शिखराकडे जाणारा सरळ व बुद्धिग्राह्य मार्ग म्हणून रशियांतल्या समाजवादाचें अभिनंदन करण्याला ते मुळींच चुकले नसते.

## १३

आज आगरकर असते तर! किती विचित्र कल्पना वाटते ही! आगरकरांच्या बरोबरीचे लोकमान्य टिळक! जवळ जवळ पंचवीस वर्षे अभूतपूर्व राजकीय कर्तृत्व गाजवून ते गेले. ते गेल्याला सुद्धां पंचवीस वर्षे झालीं. एक पिढी मागें पडली. अशा स्थितींत 'आगरकर असते तर' या कल्पनेशीं चाळा करीत बसण्यांत काय अर्थ आहे?

अगदीं अपवादात्मक अशी आयुर्मर्यादा आगरकरांच्या वांट्याला आली असती तर आयुष्याच्या नव्वदींत त्यांनीं काय काय उद्गार काढले असते याचें कल्पनाचित्र मोठें मनोरंजक होईल यांत मात्र मुळींच संशय नाहीं. आगरकर आज असते तर बोलपटाच्या कलेचें त्यांनीं मोठ्या उत्साहानें स्वागत केलें असतें. मात्र या कलेचा उपयोग चमत्कारांनीं भरलेलीं संतचित्रें काढून अडाणी बहुजनसमाजाची अंधश्रद्धा वाढविण्याकडे होत आहे हें पाहून त्यांना फार वाईट वाटलें असतें. दम्यावर पेनिसिलीन या नव्या औषधाचा चांगला उपयोग होतो हें ऐकून त्यांना शास्त्राच्या प्रगतीचें कौतुक वाटलें असतें. पण ज्यांना धड अन्नसुद्धां खायला नाहीं अशा हजारों दमेकऱ्यांना हें औषध मिळण्याची व्यवस्था व्हायला नको काय असा प्रश्न विचारल्याशिवाय ते राहिले नसते. अमेरिकेंतली विजयालक्ष्मी पंडितांची कामगिरी पाहून आपलें एक सामाजिक सुखस्वप्न खरें झालें म्हणून ते हर्षभरित झाले असते; पण त्याबरोबरच भोंवतालच्या असंख्य सुशिक्षित स्त्रियांच्या वेषभूषेच्या वेडाचा त्यांनीं खरपूस समाचार घेतला असता. बंगालमधल्या भयंकर दुष्काळाच्या बातम्या ऐकून त्यांनीं आपल्या तेजस्वी लेखणीनें जसा सरकारवर अग्निवर्षाव केला असता, तसेंच या चीड आणणाऱ्या गुलामगिरींत डोळे पुसत खितपत पडणाऱ्या भेकडांनाही त्यांनीं आपल्या वाग्बाणांनीं जर्जर करून सोडलें असतें.

आगरकर असते तर त्यांनीं जें जें केलें असतें तें तें करण्याची जबाबदारी आजच्या महाराष्ट्राच्या तरुण पिढीवर आहे. कुठलीही क्रांति केवळ इच्छा करून होत नाहीं; ती घडवून आणावी लागते. क्रांति ही स्वप्नाळु रसिकांच्या सुगंधी फुलांना भाळणारी देवता नाहीं; त्यागी भक्तांच्या सर्वस्वदानानें उफाळणाऱ्या अग्निज्वाळाच तिला प्रसन्न करूं शकतात!

‘समाज ही कांहीं स्वतंत्र मूर्तिमंत वस्तु नाहीं. समाजांतील घटक हलले तर समाज हलतो, ते मंदावले तर तो मंदावतो आणि ते मागें हटूं लागले तर तो मागें हटूं लागतो’ असें आगरकर म्हणतात याचें रहस्य हेंच आहे. हें हलण्याचें—पुढें जाण्याचें—सर्व प्रकारच्या शृंखला तोडून स्वतंत्र होण्याचें कार्य म्हणजेच क्रांति! हें कार्य कुठल्याही पिढींतल्या वृद्धांकडून होणें शक्य

नसतें. समाजनौकेला गति आणणारीं शिडें असें आगरकरांनींच तरुणांचें वर्णन केलें आहे. महाराष्ट्राच्या आजच्या तरुण पिढीनें तें वर्णन सार्थ करून दाखविलें पाहिजे.

आगरकरांचें चरित्र आणि वाङ्मय हीं दोन्हीं अशा तरुणांचें उत्कृष्ट मार्गदर्शन करतील. रफू करून अगर ठिगळें लावून जुन्या फाटक्या तुटक्या गोष्टी वापरीत बसणें असा आगरकरांनीं सुधारणेचा कधींच अर्थ केलेला नाहीं. जें जें जीर्णतेमुळें निरुपयोगी होतें तें तें माणसानें फेंकून दिलें पाहिजे, अशीच त्यांची तेजस्वी शिकवण आहे. मग ती जीर्ण वस्तु राज्यपद्धति असो, समाजरचना असो, अथवा जीवनमूल्यें असोत. जुनें फेंकून द्यायला जें धैर्य लागतें तें बुद्धिवादाशिवाय सामान्य मनुष्याच्या अंगीं येणें शक्य नसतें. म्हणून बुद्धिवादाच्या पायावरच आजच्या महाराष्ट्रीय तरुणांनीं आपलें विचारमंदिर उभारलें पाहिजे.

मात्र आगरकरांचा बुद्धिवाद म्हणजे खा पी मजा कर असें प्रतिपादन करणारा आधुनिक सुखवाद नव्हे. मोठीं मोठीं सुबुद्ध व सुशिक्षित माणसें बुद्धिवादाच्या बुरख्याखालीं भोगवादी आयुष्य घालवून तरुणांची दिशाभूल करीत असतात. सामाजिक जीवनांतली ही आत्मवंचनेची जागा तरुण पिढीनें आरंभींच हेरून ती कटाक्षानें टाळली पाहिजे. बुद्धिवादाचा ध्वज तरुण पिढीनें अवश्यमेव हातांत घ्यायला हवा. पण त्याग हीच त्या निशाणाची काठी आहे आणि मनुष्यतेचें ऐहिक सुखसंवर्धन हेच तीन शब्द त्या निशाणावर कोरलेले आहेत याचा तिनें स्वतःला विसर पडूं देतां कामा नये. या शब्दांना बाध येईल असा कुठलाही विचार आपल्या मनांत येऊं नये अथवा त्या उदात्त शब्दांचें पावित्र्य दूषित होईल असा कुठलाही आचार आपल्या हातून घडूं नये, याबद्दल तिनें डोळयांत तेल घालून जपलें पाहिजे. प्रत्येक खरा सुधारक जसा मूर्तिभंजक तसाच मूर्तिपूजकही असतो. तो आचारांच्या आणि आदर्शांच्या जुन्या फुटक्या तुटक्या मूर्ती फेंकून देतो त्या कांहीं त्यांच्या जागीं बसून स्वतःची पूजा करून घेण्याकरतां नव्हे; तर त्या रिकाम्या जागीं नव्या अधिक सुंदर आचारांची आणि अधिक उदात्त आदर्शांची प्रतिष्ठापना करण्याकरतां. हा विवेक लक्षांत ठेवून महाराष्ट्राच्या

आजच्या तरुण पिढीनें गरिबी व गुलामगिरी यांची वाढ करणाऱ्या जुनीं जीवनमूल्यें आणि जुनी समाजरचना ह्यांच्याविरुद्ध बंड पुकारलें तर गेलें अर्धें शतक शब्दसृष्टींत तरंगत राहिलेलीं आगरकरांचीं अनेक सामाजिक सुखस्वप्नें सत्यसृष्टींत आणणारी शूर पिढी म्हणून इतिहास आदरानें तिचा उल्लेख करील.

महाराष्ट्र दारिद्र्याबद्दल जितका प्रसिद्ध आहे तितकीच बंडखोरपणाबद्दलहि त्याची प्रख्याति आहे. या भूमींत सोनें पिकत नसलें तरी स्वातंत्र्यलालसेचा दुष्काळ कधींहि पडलेला नाहीं. या भूमींत हिऱ्यांच्या खाणी नसल्या तरी मानवी रत्नें दुर्मिळ नाहींत. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत या भूमीच्या सुपुत्रांनीं वेळोवेळीं बंडाचें निशाण उभारून बहुजनसमाजाच्या प्रगतीचा मार्ग मोकळा केला आहे. समाजाला समजणाऱ्या भाषेमध्येंच त्याचें वाङ्मय निर्माण झालें पाहिजे, असें अट्टाहासानें सांगणारा एक संन्याशाचा मुलगा या भूमींत संतपदाला पोंचला आहे. आपला पिता एका मुसलमानी राज्यांतला श्रेष्ठ अधिकारी आहे याची जाणीव असूनही स्वातंत्र्याचें तोरण बांधणारा एक मिसरूड न फुटलेला क्षत्रिय युवक या भूमींत स्वराज्य–संस्थापक म्हणून गाजून गेला आहे. १८५७ सालीं याच भूमीचा अभिमान बाळगणाऱ्या एका महाराष्ट्रीय अबलेनें प्रबल इंग्रजांना धूळ चारण्याचा चमत्कार करून दाखविला. महाराष्ट्राची ही बंडखोरपणाची परंपरा आगरकरांनीं वैचारिक क्षेत्रापर्यंत आणून पोंचविली. तिची ज्योत अखंड तेवत ठेवून तिच्या प्रकाशांत प्रगतीचा मार्ग आक्रमण्यानेंच महाराष्ट्राचें उद्यांचें जीवन सुखी आणि सफल होईल.

१७–६–४५
कोल्हापूर.

वि. स. खांडेकर

# सुधारक काढण्याचा हेतु



पर्वत, नद्या, सरोवरें, झाडें, पाणी, रानें, समुद्रकिनारे, हवा, खाणी, फुलें व जनावरें ज्यांत स्पष्टपणें दाखविलीं आहेत असा एक, व ज्यांत पारधी व पारधीचीं हत्यारें, शेतकरी व शेतकीचीं अवजारें, बाजार व त्यांतील कोटय-वधि कृत्रिम जिन्नस, न्यायसभा व त्यांत येणारे शेंकडों लोक, राजसभा व त्यांत बसणारे-उठणारे सचिव, मंत्री वगैरे प्रमुख पुरुष, भव्य मंदिरें व उत्तुंग देवालयें, बागा व शेतें, झोंपड्या व गोठे, अनेक पदवींचे व अनेक धंदे करणारे पुरुष व स्त्रिया आणि त्यांचीं अर्भकें, हीं ज्यांत व्यवस्थित रीतीनें काढिलीं आहेत असा एक, मिळून प्रत्येक खंडांतील ठळक देशाचे दोन दोन चित्रपट तयार करवून ते पुढें ठेवले, आणि त्यांकडे निःपक्षपात बुद्धीनें कांहीं वेळ पहात बसलें, तर विचारी पुरुषाच्या मनावर काय परि-णाम होतील बरें ? प्रथम सृष्ट पदार्थांच्या चित्रपटांचें अवलोकन केलें तर, त्यावरून असें दिसून येईल कीं, विस्तृतता, बहुविधता, मनोरमता, अद्भु-तता, उपयुक्तता व विपुलता यांपैकीं, कोणत्याहि गुणांत या भरतखंडाचा त्रिकोणाकृति पट ग्रीस, इटली, ऐर्लंड, युनायटेड स्टेट्स्, ऑस्ट्रेलिया यांपैकीं पाहिजे त्या रमणीय देशाच्या चित्रपटापाशीं तुलना करण्याच्या हेतूनें मांडला तर असें म्हणावें लागेल कीं, आमच्या वांट्यास सर्वोत्तम न म्हटला तरी उत्तमांपैकीं एक देश आला आहे. सह्य, विंध्य व कैलास यांसारख्या प्रचंड पर्वतांनीं ज्याची तटबंदी झाली आहे; सिंधु, भागिरथी, नर्मदा, तापी, कृष्णा इत्यादि नदांनीं व नद्यांनीं ज्यांतील क्षेत्रें सिंचण्याचें व उतारूंचीं व व्यापा-राचीं गलबतें व् आगबोटी वाहण्याचें काम पत्करलें आहे; हिंदीमहासागरानें ज्याला रशना होऊन शेंकडों बंदरें करून दिलीं आहेत; गुजराथ, माळवा, बंगाल, वऱ्हाड, खानदेश इत्यादि सुपीक प्रांतांनीं ज्यास हवें इतकें अन्नवस्त्र पुरविण्याची जबाबदारी घेतली आहे; ज्याच्या उदरांत कोठें ना कोठें तरी हवा तो खनिज पदार्थ पाहिजे तितका सांपडण्यास पंचाईत पडत नाहीं; ज्याच्या रानांत पृथ्वीवरील सर्व प्रकारच्या वनस्पति वाढत आहेत, व सर्व

प्रकारचे पशुपक्षी संचार करीत आहेत; ज्यांत कोठें उष्ण कटिबंधांतली,कोठें शीत कटिबंधांतली व कोठें समशीतोष्ण कटिबंधांतली हवा खेळत आहे; सारांश, ज्यांतील कित्येक अत्यंत रमणीय प्रदेशांस 'अमरभूमि,' 'नंदनवन,' 'इंद्रभुवन,' 'जगदुद्यान' अशा संज्ञा प्राप्त झाल्या आहेत, असा हा आमचा हिंदुस्थान देश आधिभौतिक संपत्तींत कोणत्याही देशास हार जाईल, किंवा यांतील सृष्ट पदार्थांचा चित्रपट दुसऱ्या कोणत्याही देशाच्या चित्रपटापेक्षां कमी मनोरम ठरेल असें वाटत नाहीं.

याप्रमाणें सृष्ट पदार्थांच्या चित्रपटांचें अवलोकन करून पूर्ण समाधान पावल्यावर, दुसऱ्या पटाकडे वळल्याबरोबर चित्तवृत्तींत केवढा बदल होतो पहा ! या दुसऱ्या ऐतिहासिक चित्रपटाच्या केवळ लांबीचाच विचार केला, तर कदाचित् आमच्या पटाची लांबी सर्वांत अधिक भरण्याचा संभव आहे. वैदिक कालापासून आजतागायतपर्यंत आम्हांस जितकीं शतकें मोजतां येणार आहेत, तितकीं बहुशः दुसऱ्या कोणत्याही देशास मोजतां येणार नाहींत. या विस्तीर्ण कालावधींत अनेक राष्ट्रांची उत्पत्ति, अभिवृद्धि व लय होऊन तीं प्रस्तुत नामशेष मात्र राहिलीं आहेत; कांहींचा मुळींच मागमूस नाहींसा झाला आहे; व कांहींचा ऱ्हास झाला तरी त्यांनीं संपादिलेल्या विद्यांचीं व कलांचीं रूपांतरें कोटकोठें अद्यापि दृष्टीस पडत असल्यामुळें, तीं त्यांच्या गतवैभवाची साक्ष देत आहेत. ज्याप्रमाणें कांहीं वनस्पति व कीटक परिणतावस्था प्राप्त झाली असतां, आपलें तेज नूतनोत्पन्न अंकुरांत ठेवून आपण पंचत्वाप्रत पावतात, त्याप्रमाणें अमेरिकेंतील व आशियांतील आणि विशेषतः युरोपांतील पुष्कळ राष्ट्रांची स्थिति झाली. ग्रीक विद्या आणि कला रोमन लोकांच्या हातीं पडून ग्रीस देशाचा अंत झाला. रोमन लोकांची सुधारणा अर्वाचीन युरोपीय राष्ट्रांकडे येऊन रोमन लोक नष्ट झाले. आशिया व अमेरिका यांतील जुन्या राष्ट्रांचीही कांहीं अंशीं अशीच स्थिति झाली, व त्यांच्या सुधारणेच्या कांहीं खुणा अद्यापि कोठेंकोठें दृष्टीस पडतात. चीन व हिंदुस्थान हे दोन देश मात्र खूप जुने असून काळाच्या जबड्यांतून वांचले आहेत, व कदाचित् आणखीही अनेक शतकें वांचण्याचा संभव आहे. पण अशा प्रकारच्या वांचण्यांत विशेष पुरुषार्थ आहे कीं काय हा मोठा विचारणीय प्रश्न आहे. अशा प्रकारचें केवळ वांचणें म्हणजे बऱ्याच अंशीं

योगनिद्रेंत प्राण धरून राहिलेल्या योग्याच्या जगण्यासारखें होय. हिंदुस्थानच्या अस्तित्वाशीं तोलून पाहतां जुन्या ग्रीक व रोमन लोकांचें अस्तित्व कांहींच नाहीं असें म्हणतां येईल. पण तेवढ्या स्वल्प काळांत त्यांनीं केवढाले पराक्रम केले व केवढी अमर कीर्ति संपादिली ! भाषापरिज्ञानप्रवीणांनीं अलीकडे असा सिद्धांत केला आहे कीं, हिंदु लोक, ग्रिक लोक व रोमन लोक, जर्मन शाखेपासून निघालेले अर्वाचीन युरोपांतील इंग्लिश, डच वगैरे लोक एकाच पूर्वजापासून झालेले असावे. या सर्वांस ते आर्यकुलोद्भव राष्ट्रें म्हणतात. हें खरें असेल तर काय सिद्ध होतें कीं, एकाच झाडाचें बीं चार प्रकारच्या जमिनींत पडून त्यापासून चार प्रकारच्या वृक्षांचा उद्भव व्हावा, व प्रत्येकाला निराळ्या तऱ्हेची वाढ लागून त्यांचा शेवटही निराळ्या तऱ्हेचा व्हावा, त्याप्रमाणें एकाच आर्य कुलापासून उत्पन्न झालेले आम्ही सर्व खरे, पण स्थानांतराप्रमाणें आम्हा सर्वांचा इतिहास निराळ्या प्रकारचा झाला ! आर्य लोकांची युरोपांत जी शाखा गेली, तीपासून ग्रीस देशांत एक उत्तम राष्ट्र उद्भवलें. त्याचीच एक मुळी इताली देशांत जाऊन तीपासून जो नवीन अंकुर उत्पन्न झाला, त्यानें मातृवृक्षास नाहींसें करून आपला विस्तार बराच दूरवर नेला. पुढें त्यालाहि वार्धक्यावस्था येऊन, त्याचा ऱ्हास होण्याच्या सुमारास त्यापासून बरींच नवीन रोपें अस्तित्वांत आलीं. तीं हीं अर्वाचीन युरोपांतील राष्ट्रें होत.

इकडे हिंदुस्थानांत आर्यलोकांची जी शाखा आली, तिचा निराळयाच तऱ्हेचा इतिहास झाला. तिकडे जुन्या वृक्षानें नव्या अंकुरांत आपले गुण ठेवून आपण नाहींसें व्हावें, पुनः त्या नवीन अंकुरानें तसेंच करावें व प्रत्येक नवीन राष्ट्रोद्भव पहिल्यापेक्षां बहुतेक गुणांत वरिष्ठ व्हावा, असा प्रकार झाला. इकडे अशा प्रकारची राष्ट्रोद्भवपरंपरा अस्तित्वांत आली नाहीं. मूळ आर्यशाखा येथें येऊन तिच्यापासून जें झाड येथें लागलें तेंच आजमित्तीपर्यंत अस्तित्वांत आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ग्रीक, रोमन, सिथियन, तार्तर, मोगल, अफगाण वगैरे लोकांच्या ज्या वावटळी त्यावर आल्या, त्यामुळें त्याला बराच त्रास झाला. कधीं त्याच्या कांहीं फांद्या मोडून पडल्या; कधीं तें मुळापासून उपटून पडत आहे कीं काय असें वाटलें; पण कर्मधर्मसंयोगानें युरोपांतील ग्रीक व रोमन शाखांवर आणि इकडील इराणी शाखेवर जो

प्रसंग गुदरला, तो या भारतीय आर्यशाखेवर गुदरला नाहीं! यामुळें हें जरठ झाड कसें तरी अजून उभें आहे! पण त्यांत कांहीं त्राण उरलेलें नाहीं! तें आंतून अगदीं शुष्क होत आलें आहे, व त्याचें खोड व फांद्या डळमळूं लागल्या आहेत. याला आतां असेंच उभें ठेवण्यास व यापासून नविन शाखांचा उद्भव होऊन यास फिरून नविनावस्था आणण्यास एकच उपाय आहे. तो कोणता म्हणाल तर त्याची खूप खच्ची करून त्यास अर्वाचीन कल्पनांचें भरपूर पाणी द्यावयाचें! असें केलें तरच त्याचें पूर्वस्वरूप पूर्ण नष्ट न होतां, त्यापासून नूतन शाखावृत्त वृक्ष अस्तित्वांत येईल; पण तसें न केलें तर त्यावर प्रस्तुतकालीं चोहोंकडून जे तीव्र आघात होत आहेत, त्यां-खालीं तें अगदीं जेर होऊन, अखेरीस जमिनीवर उलथून पडेल.

हिंदुस्थानचा पूर्व इतिहास व सांप्रत स्थिति 'सुधारकाच्या वाचकांच्या लक्षांत थोडक्यांत यावी, यासाठीं वर ज्या रूपकाचें साहाय्य घेतलें आहे, त्यापासून लेखकाचा भाव त्यांच्या मनांत उतरला असेल अशी त्याची आशा आहे. त्याचें स्पष्ट म्हणणें असें आहे कीं, हिंदू लोक रानटी अवस्थे-तून निघाल्यावर कांहीं शतकेंपर्यंत राज्य, धर्म, नीति वगैरे कांहीं शास्त्रें, वेदांत, न्याय, गणितादि कांहीं विद्या; व काव्य, गीत, नर्तन, वादनादि कांहीं कला यांत त्यांचें पाऊल बरेंच पुढें पडल्यावर त्यांच्या सुधारणेची वाढ खुंटली, व तेव्हांपासून इंग्रजी होईपर्यंत ते कसें तरी राष्ट्रत्व संभाळून राहिले! यामुळें त्यांचा इतिहासपट इतर देशांच्या इतिहासपटांहून फारच कमी मनोवेधक झाला आहे. आमची गृहपद्धति, आमची राज्यपद्धति, आमचीं शास्त्रें, आमच्या कला, आमचे वर्णसंबंध, आमच्या राहण्याच्या चाली, आमच्या वागण्याच्या रीति—सारांश इंग्रजी होईपर्यंत आमचें सारें व्यक्तिजीवित्व व राष्ट्रजीवित्व ठशांत घालून ओतलेल्या पोलादासारखें किंवा निबिड शृंखलाबद्ध बंदिवानासारखें, अथवा उदकाच्या नित्य आघातानें दगडाप्रमाणें कठिण झालेल्या लांकडांसारखें किंवा हाडकासारखें शेंकडों वर्षें होऊन राहिलें, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

ही आमची शिलावस्था आम्हांस पाश्चिमात्य शिक्षण मिळूं लागल्यापासून बदलूं लागली आहे. आजमित्तीस या शिक्षणाच्या टांकीचे आघात फारच थोड्यांवर घडत आहेत. पण दिवसेंदिवस ते अधिकाधिकावर घडूं लागतील

असा अजमास दिसत आहे. ज्यांना या टांकीपासून बराच संस्कार झाला आहे, ते समुदायापासून अगदीं विभक्त झाल्यासारखे होऊन, उभयतांत सांप्रतकालीं एका प्रकारचें वैषम्य उत्पन्न झालें आहे. या वैषम्यास विशेष कारण कोण होत आहेत हें येथें सांगण्याची गरज नाहीं. येथें एवढेंच सांगितलें पाहिजे कीं मूळ प्रकृति म्हणजे भारतीय आर्यत्व न सोडतां, या पाश्चिमात्य नवीन शिक्षणाचा, व त्याबरोबर ज्या नवीन कल्पना येत आहेत त्यांचा आम्ही योग्य रीतीनें अंगीकार करीत गेलों, तरच आमचा निभाव लागणार आहे. या कल्पना आमच्या राज्यकर्त्यांकडून येत आहेत; म्हणून त्या आम्हीं स्वीकाराव्या असें आमचें म्हणणें नाहीं. त्यांचें अभिनंदन करून त्यांचा आपण अंगीकार केला पाहिजे, असें जें आम्ही म्हणतों, तें अशासाठीं कीं, त्या शिक्षणांत व त्या कल्पनांत मनुष्यसुधारणेच्या अत्यवश्य तत्त्वांचा समावेश झाला आहे. म्हणून ज्या लोकांस लयास जावयाचें नसेल त्यांनीं त्यांचें अवलंबन केलेंच पाहिजे; त्याशिवाय गत्यंतर नाहीं. समाजाचें कुशल राहून त्यास अधिकाधिक उन्नतावस्था येण्यास, जेवढीं बंधनें अपरिहार्य आहेत, तेवढीं कायम ठेवून बाकी सर्व गोष्टींत व्यक्तिमात्रास (पुरुषास व स्त्रीस) जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येईल तितका घ्यावयाचा, हें अर्वाचीन पाश्चिमात्य सुधारणेचें मुख्य तत्त्व आहे, व हें ज्यांच्या अंतःकरणांत बिंबलें असेल त्यांना आमच्या समाजव्यवस्थेंत अनेक दोषस्थलें दिसणार आहेत, हें उघड आहे. हीं दोषस्थलें वारंवार लोकांच्या नजरेस आणावीं, तीं दूर करण्याचे उपाय सुचवावे, आणि युरोपीय सुधारणेंत अनुकरण करण्यासारखें काय आहे, तें पुनःपुन्हां दाखवावें, यास्तव हें सुधारक पत्र काढलें आहे. कोणत्याहि वादग्रस्त प्रश्नाविषयीं जें लोकमत असेल, तें पुढें आणणें हेंच काय तें पत्रकर्त्यांचें कर्तव्य असें जे मानीत असतील, ते तसें खुशाल मानोत. लोकमत अमुक टप्प्यापर्यंत येऊन पोंचलें आहे. सबब कोणत्याही व्यक्तीनें किंवा सरकारनें त्यापुढें जाऊं नये, असें म्हणणें म्हणजे झाली आहे तेवढी सुधारणा बस आहे, पुढें जाण्याची गरज नाहीं; असेंच म्हणण्यासारखें होय. व्यक्तीनें किंवा सरकारनें साधारणपणें लोकमतास धरून वर्तन करणें किंवा कायदे करणें हें सामान्य गोष्टींत ठीक आहे; पण कांहीं प्रसंगीं लोकांच्या गाढ अज्ञानामुळें किंवा दुराग्रहामुळें,

व्यक्तीस लोकांची पर्वा न करितां स्वतंत्रपणें वर्तावें लागतें व सरकारास लोकमताविरुद्ध कायदे करावे लागतात. बारकाईचा विचार केला तर असें दिसून येईल कीं, प्रजासत्ताक राज्यांत सुद्धां अनेकदां बहुमताविरुद्ध अधिकृत लोकांचें म्हणजे सरकारचें वर्तन होत असतें. तथापि सामान्यतः सरकाराचें वर्तन लोकमतास धरून असेल तितकें बरें. पण जे लोक हा सिद्धान्त कबूल करतात ते, लोकमत दिवसोंदिवस सुधारत चाललें आहे, असें समजतात. तेव्हां आतां असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, लोकमताची सुधारणा व्हावी तरी कशी ? जो तो अस्तित्वांत असलेल्या लोकमतापुढें जाण्यास भिईल तर त्यांत बदल व्हावा कसा ? लोकाग्रणींनीं हें काम पत्करलें नाहीं तर तें कोणी पतकरावयाचें ? जो तो या लोकमताच्या बागुलबोवाला भिऊन दडून बसेल तर कोणत्याही समाजाला उन्नतावस्था येणार नाहीं; इतकेंच नाहीं, तर त्याची चालू स्थितीसुद्धां कायम न राहतां उलट त्यास उतरती कळा लागून अखेर त्याचा ऱ्हास होईल. म्हणून कोणी तरी अस्तित्वांत असलेल्या लोकमतांतील दोषस्थलें दाखविण्याचें, व समाजांतील बहुतेक लोकांस अप्रिय परंतु पथ्यकारक असे विचार त्यांच्यापुढें आणण्याचें, अनभिमत काम करण्यास तयार झालेंच पाहिजे. असें करण्यास लागणारें धैर्य ज्या समाजांतील कांहीं व्यक्तींच्या सुद्धां आंगीं नसेल त्या समाजांनीं वर डोकें काढण्याची आशा कधींही करूं नये.

हे विचार बरोबर असतील तर त्यांवरून हें दिसून येईल कीं, जे कोणी कोणत्याही मिषानें किंवा रूपानें लोकांपुढें लोकाग्रणी म्हणून मिरवूं लागले असतील, त्यांनीं लोकांची मर्जी संपादण्यासाठीं, अथवा त्यांजकडून आपली पाठ थोपटून घेण्यासाठीं, किंवा परोपकाराचें ढोंग करून स्वहित साधण्यासाठीं त्यांच्या दोषांचें किंवा दुराग्रहांचें संवरण किंवा मंडन करणें अत्यंत लज्जास्पद होय. असे लोकाग्रणी त्यांस सुमार्ग न दाखवितां केव्हां एखाद्या खड्ड्यांत नेऊन घालतील हें सांगवत नाहीं. प्रस्तुत स्थितींत अशा लोकाग्रणींचें वर्तन आमच्या देशास फारच विघातक होणार आहे. ज्यांना समाजाच्या घटनेचीं, अभिवृद्धीचीं व लयाचीं कारणें ठाऊक नाहींत; कदाचित् पितृतर्पणापुढें ज्यांचें ज्ञान गेलेलें नाहीं; विषयोपभोगाशिवाय अन्य व्यवसाय ज्यांना अवगत नाहीं; वरिष्ठाची प्रशंसा आणि कनिष्ठाशीं गर्वोक्ति

यांहून अन्य प्रकारचें भाषण ज्यांस फारसें माहीत नाहीं; अनेक देशांतील उद्योगी पुरुषांनीं अहर्निश परिश्रम करून, पदार्थधर्मांचें केवढें ज्ञान संपादिलें आहे, विपद्विनाशक व सुखवर्धक किती साधनें शोधून काढिलीं आहेत, व राज्य, धर्म, नीति वगैरे विषयांतील विचार किती प्रगल्भ झाले आहेत हें ज्यांना ऐकून सुद्धां ठाऊक नाहीं, अशा गृहस्थांनीं आम्ही हिंदु लोक नेहमीं परतंत्रच असलों पाहिजे; कांहीं केलें तरी अधिक राज्याधिकार उपभोगण्याची पात्रता आमच्या अंगीं यावयाची नाहीं; राष्ट्रीय स्वातंत्र्याचा विचार आम्हीं कधीं स्वप्नांतसुद्धां आणूं नये; स्थानिक स्वराज्य, राष्ट्रीय परिषद, कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त सभासद, स्वसंतोषानें शिपाईगिरी करण्याची इच्छा धरणें—या व या तऱ्हेच्या दुसऱ्या उठाठेवींत आम्हीं पडणें हें शुद्ध मूर्खपण होय, असें म्हणावें यांत नवल नाहीं. अशा प्रकारचें प्रतिपादन करणाऱ्या लोकांस लोकाग्रणी न म्हणतां, लोकशत्रु म्हटलें असतां वावगें होणार नाहीं. तसेंच जेवढीं जुनीं शास्त्रें तेवढीं सारीं ईश्वरप्रणीत, त्यांना हात लावणें हें घोर पातक, अशी ज्यांची समजूत; जगत्कारणाच्या तोंडांतून, हातांतून, मांडींतून व पायांतून एकेक वर्ण निघाला अशी ज्यांची वर्णोत्पत्तीविषयीं कल्पना; पंचामृतानें व धूपदीपानें केलेली पूजा मात्र ईश्वरास मान्य, याहून ईशपूजेचा विशेष प्रशस्त मार्ग नाहीं, असे ज्यांचे धर्मविचार; आहे ही सामाजिक स्थिति अत्युत्तम, हींत फिरवाफिरव करण्यास कोठेंही अवकाश नाहीं; सध्यां येथें स्त्रियांचे पुरुषांशीं, मुलांचे आईबापांशीं, जे संबंध चालत आहेत तेच उत्तम आहेत व अनंतकाल तेच चालले पाहिजेत; ज्ञान संपादणें हें पुरुषांचें कर्तव्य, शिशुसंगोपन हें स्त्रियांचें कर्तव्य; पुरुष स्वामी, स्त्री दासी; स्वातंत्र्य पुरुषांकडे, पारतंत्र्य स्त्रियांकडे; विवाहाशिवाय स्त्रीस गति नाहीं, व गृहाशिवाय तिला विश्व नाहीं; वैधव्य हें तिचें महाव्रत व ज्ञानसंपादन हा तिचा मोठा दुर्गुण; अशा प्रकारच्या ज्यांच्या धर्मविषयक व समाजविषयक कल्पना, असे लोकाग्रणी काय कामाचे? अशांच्या उपदेशानें व उदाहरणानें आम्हांस चांगलें वळण कसें लागणार व इतर सुधारलेल्या राष्ट्रांस होत असणाऱ्या सुखाचा लाभ आम्हांस कशानें होणार? निदान **सुधारकास** तरी असले लोकाग्रणी व त्यांचें वर्तन मान्य नाहीं. ज्या तत्त्वाचें अवलंबन केल्यामुळें इतर राष्ट्रें अधिकाधिक सुधारत चाललीं आहेत, त्या

तत्त्वांचा स्वीकार करण्यास आम्हीं आनंदानें तयार झालें पाहिजे. तीं तत्त्वें हा **सुधारक** महाराष्ट्र लोकांपुढें वारंवार आणील. असें करण्यांत त्यास, आज ज्याचा जारीनें अंमल चालत आहे, त्या लोकमताविरुद्ध बरेंच जावें लागणार असल्यामुळें, फार त्रास पडणार आहे. पण त्याची तो पर्वा करीत नाहीं; कारण ज्या लोकमताचा पुष्कळांस बाऊ वाटतो, त्याचा सूक्ष्म दृष्टीनें विचार केला असतां असें दिसून येईल कीं, बऱ्याच बाबतींत त्याचा आदर करण्यापेक्षां अनादर करणें हाच श्लाघ्यतर मार्ग होय. कोट्यवधि अक्षरशत्रु व विचारशून्य मनुष्यांनीं आपल्या अडाणी समजुतीप्रमाणें चांगलें म्हटलें किंवा वाईट म्हटलें; अज्ञान व धर्मभोळ्या लोकांच्या आचरट धर्मकल्पनांची व वेडसर सामाजिक विचारांची प्रशंसा करून; त्यापासून निघेल तेंवढी माया काढणाऱ्या स्वार्थपरायण उदरंभरू हजारों टवाळांनीं शिव्यांचा वर्षाव केला किंवा छीः—थूः करण्याचा प्रयत्न केला; शेंकडों अविचारी व इकट लोकांनीं नाकें मुरडलीं किंवा तिरस्कार केला, सारांश ज्यांना मनुष्याच्या पूर्णावस्थेचें रूप बिलकूल समजलेलें नाहीं किंवा ती घडून येण्यास काय केलें पाहिजे हें ठाऊक नाहीं, अशांच्या पर्वतप्राय झुंडीच्या झुंडी तुटून पडल्या तरी, जो खरा विचारी आहे, ज्याला लोककल्याणाची खरी कळकळ आहे, सत्य बोलणें व सत्यास धरून चालणें यांतच ज्याचें समाधान आहे, अशानें वरच्यासारख्या क्षुद्र लोकांच्या अवकृपेला, रागाला किंवा उपहास्यतेला यत्किंचित् न भितां आपल्या मनास योग्य वाटेल तें लिहावें; बोलावें व सांगावें हें त्यास उचित होय. त्याच्या अशा वर्तनांतच जगाचें हित आणि त्याच्या जन्माची सार्थकता आहे.

# आमचे दोष आम्हांस कधीं दिसूं लागतील? २

अलीकडे देशाभिमान्यांची जी एक जात निघाली आहे, तिच्यापुढें इंग्रजांची किंवा दुसऱ्या कोणत्याही अर्वाचीन, युरोपिअन लोकांची उद्योगाबद्दल, ज्ञानाबद्दल, किंवा राज्यव्यवस्थेबद्दल प्रशंसा केली कीं, तिचें पित्त खवळून जातें! या जातवाल्यांना दुसऱ्याचा उत्कर्ष किंवा त्याची स्तुति साहण्याचें बिलकूल सामर्थ्य नाहीं! पण करतात काय बिचारे! सूर्याला सूर्य म्हटल्याखेरीज जसें गत्यंतर नाहीं, तसें युरोपिअन लोकांचें श्रेष्ठत्व या घटकेस तरी नाकबूल केल्यास आपलें हंसें झाल्यावांचून राहणार नाहीं, हें त्यांना पक्कें ठाऊक आहे! तेव्हां ते काय हिकमत करितात कीं नेटिव युरोपियनांची तुलना करण्याची वेळ आली कीं, ते आपल्या गतवैभवाचें गाणें गाऊं लागतात! इंग्रज लोक अंगाला रंग चोपडीत होते; इंग्रज लोक कच्चें मांस खात होते; इंग्रज लोक कातडी पांघरीत होते; इंग्रज लोकांस लिहिण्याची कला ठाऊक नव्हती त्या वेळेस आम्ही मोठमोठाल्या हवेल्या बांधून रहात होतों; कापसाच्या किंवा लोकरीच्या धाग्यापासून मोठ्या परिश्रमानें विणून तयार केलेलीं वस्त्रें वापरीत होतों; बैलांकडून जमीन नांगरून तींत नानाप्रकारचीं धान्यें, कंदमुळें, व फळें उत्पन्न करीत होतों; आणि रानटी लोकांप्रमाणें मांसावर अवलंबून न राहतां आपला बराच चरितार्थ वनस्पत्यांवर चालवीत होतों. यावरून मांसाहार आम्ही अगदींच टाकला होता असें मात्र कोणी समजूं नये. ज्या गाईच्या संरक्षणासाठीं सांप्रत काळीं जिकडे तिकडे ओरड होऊन राहिली आहे, व जें संरक्षण कित्येकांच्या मतें हिंदुमुसलमानांचा बेबनाव होण्यास बऱ्याच अंशीं कारण होत आहे, त्या गाईचा देखील आम्ही प्रसंगविशेषीं समाचार घेण्यास मागेंपुढें पहात नव्हतों! कोणी विशेष सलगीचा मित्र किंवा आप्त पाहुणा आला आणि बाजारांत हवा तसा जिन्नस न मिळाला म्हणजे लहानपणापासून चारा घालून व पाणी पाजून वाढविलेल्या गोऱ्याच्या अथवा कालवडीच्या मानेवर सुरी ठेवण्यास आम्हांस भीति वाटत नव्हती! आतां येवढें खरें आहे कीं

हें गोमांस रानटी लोकांप्रमाणें आम्ही हिरवें कच्चें खात नव्हतों! तर सुधारलेल्या लोकांप्रमाणें त्यांत निरनिराळया तऱ्हेचे मसाले घालून त्याला नाना प्रकारच्या फोडण्या देऊन तें अत्यंत स्वादिष्ट करून खात होतों! मत्स्याशनही आम्हांस ठाऊक नव्हतें असें नाहीं! कोणत्या माशाची रसई कोणत्या रीतीनें करावी याबद्दल आम्हांपाशीं फार पुरातन नियम सांपडतात! मांसभक्षणानंतर उत्तम मद्यप्राशन केल्यास फार मौज होते म्हणून सांगतात! आमच्या पूर्वजांस ही मौजही ठाऊक नव्हती असें नाहीं! सोमरस हा मादक पेय असो अथवा नसो; त्याशिवाय दुसरीं कसलीं तरी मादक पेयें येथें वहिवाटींत होतीं अशाबद्दल जुन्या ग्रंथांत भरपूर आधार सांपडतो. याप्रमाणें आम्ही खाण्यापिण्याच्या कामांत अगदीं पुरातन कालीं सुद्धां पुरे पटाईत होऊन गेलों होतों. लिहिण्यापुसण्यांत व कुटुंबव्यवस्थेंत आणि ग्रामव्यवस्थेंतही आम्ही अगदीं अनभिज्ञ होतों असें नाहीं. लेखनकला आम्हांस केव्हां आली हें जरी खात्रीनें सांगतां येत नाहीं तरी ती इतिहासकालापूर्वींच आम्हांस प्राप्त झाली होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. लेखनकला अभ्युदयास आणून नीति, न्याय, नाटक, अलंकार, व्याकरण, गणित व वैद्यक इत्यादि शास्त्रांतही आमची बरीच गति झाली होती. आम्हांमध्यें उत्तम प्रकारची कुटुंबव्यवस्था व ग्रामव्यवस्था स्थापण्यांत आली असून राष्ट्र म्हणजे काय हें आम्हांस कळूं लागलें होतें. आमच्यांत स्वतंत्र व मांडलिक राजे असून त्यांच्या पदरीं चतुरंग सेना असत. मोठमोठे दुर्ग बांधण्याची कला त्यांस अवगत होती. साम, दाम, दंड, भेद इत्यादि शत्रूस वळणीस आणण्याचीं साधनें ते वारंवार उपयोगांत आणीत असत. यावरून काय दिसतें कीं, अलीकडल्या इंग्रज लोकांनीं किंवा युरोपांतील दुसऱ्या कोणत्याही लोकांनीं कितीही शेखी मिरविली तरी ज्या आम्हीं इतक्या पुरातन कालीं येवढी मोठी सुधारणा करून बसलों त्या आमच्यापुढें त्यांची मात्रा बिलकुल चालावयाची नाहीं!

न चालो बिचारी! पण या एककल्ली देशाभिमान्यांना आम्ही असें विचारितों कीं, बाबांनों, तुम्ही अशा प्रकारें गतवैभवाचें गाणें गाऊं लागलां म्हणजे तुमच्या पक्षाचें मंडन न होतां उलट मुंडण होतें! इंग्रज लोक रानटी होते, त्या वेळेस जर तुम्ही इतके सुधारलेले होतां, तर आतांही

तुम्ही त्यांच्यापेक्षां अधिक सुधारलेले असायला पाहिजे होतां. पण तसे तर तुम्ही खचित नाहीं ! तेव्हां हें सिद्ध आहे कीं केव्हां तरी तुमच्या सुधारणेस खळ पडला असावा; किंबहुना ती मागेंच हटूं लागली असावी; कारण सुधारणा ही स्थिर वस्तु नाहीं; ती पुढें चालेल किंवा मागें सरेल ! आमची सुधारणा क्षणैक निश्चल होऊन मग तिची पीछेहाट होऊं लागली असावी असें मानिल्याखेरीज ज्यांस आम्ही रानटी म्हणत होतों तीं राष्ट्रं दोन हजार वर्षांच्या अवकाशांत आम्हांपुढें इतकीं कशीं गेलीं याचा उलगडा होत नाहीं. सुधारणेच्या शर्यतींत जे एकदां आमच्या फार पाठीमागें होते, त्यांनीं आम्हांस गांठलें इतकेंच नाहीं, तर पाठीमागें टाकलें, असें आपल्या स्थिती-वरून कबूल करावें लागलें यांत आमच्या मतें प्रतिष्ठा मारण्यासारखें कांहीं नाहीं. म्हणे ' दुसरे लोक रानटी होते तेव्हां आम्ही फार सुधारलेले होतों !' असाल कदाचित्. पुनः पुनः गत गोष्टीबद्दल मिटक्या मारीत बसण्यांत काय अर्थ आहे ? आम्हांस तर असल्या निरुपयोगी प्रतिष्ठेचा मनापासून कंटाळा येतो. असल्या प्रतिष्ठेमुळें स्वदोष दिसेनासे होतात इतकेंच नाहीं, तर आपण सर्वगुणसंपन्न आहों, आपणांस कशाचीही उणीव नाहीं, असें वाटूं लागून उद्योग करण्याची हौस नाहींशी होते, मानसिक व शारीरिक श्रमाचा तिर-स्कार येऊं लागतो, नुसत्या बढाईखोर गप्पा मारीत बसण्यांत मोठा आनंद वाटतो, आणि दिवसेंदिवस वाढत चाललेल्या दारिद्र्याचा व आपत्तीचा परिहार करण्याचा विचार देखील मनांत येईनासा होतो ! पण या आत्म-वंचक व परवंचक देशाभिमान्यांचा आम्हांस जो विशेष राग येतो तो यासाठीं कीं, आपल्या जुन्या सुधारणेची तुलना न करितां ते आपलीच सुधारणा सर्वांत श्रेष्ठ होती असें घेऊन चालून तिचे पवाडे गात सुटतात ! लिहिता वाचतां येणाऱ्या लोकांत ज्यांना दुसऱ्या देशाविषयीं कमींत कमी माहिती आहे असे कोणी लोक असतील तर ते हिंदुलोक होत. यांना स्वतःस इतिहास लिहिण्याची आवश्यकता कधींही वाटली नाहीं, व लिहि-ण्याची अक्कल आली नाहीं. इतकेंच नाहीं, तर दुसऱ्यांचे इतिहास अव-लोकन करून त्यापासून आपली सुधारणा करण्याची पर्वाही त्यांनीं कधीं केली नाहीं. एकंदरींत यांना इतिहासाचें माहात्म्यच समजलें नाहीं असें तरी कां म्हणूं नये ? अथवा त्यांना तें समजलें नाहीं यांत त्यांच्याकडे

फारसा दोष नाहीं. इतिहास म्हणजे व्यक्तींनीं किंवा राष्ट्रांनीं केलेल्या मोठमोठ्या पराक्रमांचें वर्णन. आतां ज्या देशांतील व्यक्तींनीं किंवा व्यक्तिसमुदायांनीं केव्हांही मोठमोठे पराक्रम केलेले नाहींत, ते इतिहास लिहिणार कशाविषयीं आणि वाचणार काय? पौराणिक कालांत भारतीय आर्यांनीं जे पराक्रम केले त्यांची गाथा भारत–रामायणरूपानें व्यासवाल्मीकांनीं करून ठेविली आहे. अशाच प्रकारची ग्रीक आर्यांची गाथा होमर कवीनें रचिली आहे. पण या गाथ्यांत काव्य आणि इतिहास यांचें इतकें संमिश्रण झालें आहे कीं, यांना काव्य अथवा इतिहास यांपैकीं कोणती संज्ञा द्यावी याचा संशय पडतो. शिवाय आमच्या पुराणांत धर्म व वेदांत यांचा प्रवेश होऊन यांचें एक विलक्षण पढम झालें आहे. तें तो पाहिजे त्या कामाला वापरतो. तथापि असल्या पुराणांचीं पारायणें करून अर्वाचीन विचारपद्धतीप्रमाणें त्यांपासून निघण्यासारखीं असतील तितकीं सारीं अनुमानें काढलीं आणि तीं एकवट केलीं तरी त्यांपासून आम्हीं अगदीं सुधारणाचलाच्या शिखरास पोंचलों होतों आणि त्यापुढें जाण्यास आम्हास अवकाश राहिला नव्हता, असें सिद्ध होण्याचा कांहीं संभव नाहीं. आमच्या आणि ग्रीक लोकांच्या पौराणिक स्थितींत विशेष अंतर नव्हतें असें आम्हांस आमच्या पुराणांची आणि होमरच्या काव्याची जी जुजबी माहिती आहे तीवरून वाटतें. पण पौराणिक काल उलटून गेल्यावर, ग्रीक लोकांनीं सुधारणेचे कामांत जो झपाटा मारिला त्याच्या एक चतुर्थांश झपाटाही आमच्यानें मारवला नाहीं. जुन्या ग्रीक व रोमन लोकांच्या राज्यविषयक कल्पना अद्यापि आम्हांस आल्या नाहींत व आम्हांस कळूं लागल्या नाहींत; तेव्हां तीन हजार वर्षांपूर्वीं त्या आमच्या स्वप्नांतही आल्या नसतील असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण इतर गोष्टींत तरी आम्ही ग्रीक लोकांहून श्रेष्ठ किंवा त्यांच्या बरोबरीचे होतों का? आमच्या मतें क्वचित नाहीं. त्या कालीं ठाउक असलेल्या बहुतेक कलांत व शास्त्रांत ग्रीक लोकच सर्वांत श्रेष्ठ होते असा आमचा ग्रह झाला आहे. आणि तो साधारण बरोबर असेल तर जुन्याचें वृथा प्रस्थ माजविणाऱ्यांचा आम्हांस तिरस्कार येणें स्वाभाविक नाहीं काय?

पौराणिक कालांत आमची व ग्रीक लोकांची स्थिति सारखीच होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं. वर्तमानपत्रांत अशा विषयांचा यथास्थितपणें

ऊहापोह करतां येत नाहीं एवढीच नड आहे. नाहीं तर ग्रीक पुराणांतल्या आणि भारतीय पुराणांतल्या अनेक कथा घेऊन त्यांचें साम्य दाखविलें असतें; व त्यावरून त्या लोकांचे आणि आमचे आचार व विचार किती एकसारखे होते हें वाचकांच्या डोळ्यांपुढें उभें केलें असतें. तथापि **होमरच्या** महाकाव्याचा आणि **वाल्मीकीं**च्या रामायणाचा येथें उल्लेख करण्यास हरकत दिसत नाहीं. या दोन महाकवींच्या मुख्य कथानकांत इतकें साम्य आहे कीं, युरोपियन कवींचा स्वाभाविकपणें पक्षपात करूं इच्छिणाऱ्या कित्येक अर्वाचीन युरोपिअन पंडितांनीं अशी शंका प्रदर्शित केली आहे कीं रामायणाचें कथानक भारतीय कवीनें बहुधा ग्रीक कवीच्या **इलिअड**पासून घेतलें असावें. **रामायणां**त ज्याप्रमाणें रामाची सीता रावणानें हरण करून नेली, व ती लंकेहून परत आणण्यासाठीं रामानें राक्षसांशीं तुंबळ युद्ध केलें; त्याप्रमाणेंच **इलिअड**मध्येंही एका राजानें दुसऱ्या राजाची सुंदर स्त्री पळवून नेली, व ती फिरून काबीज करण्यासाठीं त्या चंचल वनितेच्या नवऱ्यानें घनघोर युद्ध केलें, अशी मुख्य गोष्ट आहे. प्रधान कथानकांत एवढें साम्य दिसून आल्यावर तें एकानें दुसऱ्यापासून उचललें असावें, अशी शंका येणें स्वाभाविक आहे; आणि त्याप्रमाणें ती एका प्रसिद्ध जर्मन पंडिताला आली यांत कांहीं नवल नाहीं. पण अशा प्रकारच्या वादांत मूळ रचना कोणाची असावी; आणि तिचें अनुकरण करणारा कोण असावा याचा निर्णय करण्याची मोठी मारामार पडते. कथानकाच्या साम्यावांचून दुसरा पुरावा नसेल तर वाचकांच्या किंवा टीकाकारांच्या तब्यतीप्रमाणें पाहिजे त्याकडे आद्यत्व देतां येतें ! ज्या वेळेस जर्मन पंडितानें रामायण होमरपासून उतरलें असावें असें आपलें मत दिलें त्या वेळेस वाल्मीकीपासून **इलिअड** उतरलें असावें असें मत देणेंही तितकेंच योग्य होणार आहे, असा विचार त्यांच्या मनांत कसा नाहीं आला कोण जाणे ! कै. आ. मि. जस्टिस **तेलंग** यांनीं आपल्या मनाला हाच प्रश्न घातला; आणि पुष्कळ शोध करून असें सिद्ध करून दाखविलें कीं होमर व वाल्मीकी यांपैकीं एकानें दुसऱ्याची प्रत किंवा नक्कल केली असें म्हणणें शक्य असेल तर ती होमरनें म्हणजे ग्रीक कवीनें केली असावी, हें विशेष संभवनीय आहे ! ज्यांना या वादाविषयीं विशेष माहिती हवी असेल, व तो करण्यांत मि. तेलंग यांनीं बुद्धीचें

किती कुशाग्रत्व दाखविलें आहे हें पहाण्याची इच्छा असेल त्यांनीं त्यांचा "Is Ramayana copied from Homer?" (रामायण होमरवरून उतरलें आहे काय?) या नांवाचा निबंध वाचावा.

असो; प्रस्तुत विषयाच्या संबंधानें ह्या गोष्टीचा आम्हीं येथें एवढ्यासाठींच उल्लेख केला आहे कीं, पौराणिक कालांत आमचें ग्रीक लोकांशीं इतकें साम्य असतां पुढें आम्हां उभयतांत जें अंतर पडत गेलें त्यामुळें त्यांच्या व आमच्या इतिहासास पराकाष्ठेची विभिन्नता आली. कांहीं कलांत व विद्यांत अजरामर कीर्ति संपादून व त्या कलांचें आणि विद्यांचें बीं नवीन लोकांत लावून, जुने ग्रीक लोक अंतर्धान पावले! आम्ही आमची जी थोडीबहुत पुंजी होती तिला घट्ट मिठी मारून काळाच्या तीव्र प्रहारांस न जुमानतां आजपर्यंत कशी तरी प्राणयात्रा करीत आलों! अशा रीतीनें युगेंच्या युगें जगणें हें चांगलें, किंवा थोडींच शतकें का होईना, पण स्वतःचें नांव अमर करून व जगाच्या इतिहासाला चांगलेपणाचें वळण लावून नाहींसें होणें चांगलें, याचा निश्चय करणें फार कठीण आहे! तथापि येवढें खास म्हणतां येईल कीं, आमच्या सुधारणेस खळ पडल्यापासून ज्या स्थितींत आम्ही कुजत पडलों आहों त्याच स्थितींत आम्हांस युगेंच्या युगें लोटावयाचीं असतील तर आम्हीं एकदम नाहींसें व्हावें हें इष्ट आहे! ज्यांना कधींही चांगला दिवस बिलकुल येण्याची आशा नाहीं, त्यांनीं चैतन्याला बिलगून रहाणें हें शुद्ध पिसेपण नव्हे काय? आम्हांस अशी दशा येऊन ठेपली आहे असें आम्ही पाहिजे तर म्हणत नाहीं, पण गेल्या दोन हजार वर्षांचा आमचा जो इतिहास आहे त्यावरून पहातां केवळ जीवरक्षणापलीकडे आम्हीं कांहींएक केलें नाहीं, असें म्हणणें भाग पडेल! आणि पुढेंही जर अशाच रीतीनें वागण्याचा आमचा विचार असेल तर आम्ही मोठे अद्वितीय जंतु आहों असें मानिलें पाहिजे!

पुष्कळ देशाभिमान्यांस अशा प्रकारचें लिहिणें आवडत नाहीं! पण आम्हीं त्याला काय करावें? जी गोष्ट उघडपणें बोलून न दाखविणें म्हणजे आजमितीस मोठा अपराध करणें असें आम्हांस वाटतें, ती बोलून टाकल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं, याला आमचा काय इलाज आहे? ज्या लोकांना आमची ही आत्मनिंदा रुचत नाहीं, त्यांनीं आम्हांस आत्मस्तुति

करण्यासारखें आम्हीं गेल्या दोन हजार वर्षांत काय केलें आहे हें दाखविण्याची कृपा करावी. ज्या देशांत प्रतिवर्षीं कोट्यवधि मनुष्यप्राणी जन्मास येत आहेत व परलोकास जात आहेत, त्या देशाच्या एखाद्या कोंपऱ्यांत एखाद्या शतकांत एखाद्या व्यक्तीनें किंवा लहानशा व्यक्तिसमुदायानें थोडीशी चळवळ केली तर तेवढीवरून येवढें विस्तीर्ण राष्ट्र वास्तविकपणें सचेतन असून त्याची प्रगति होत आहे असें म्हणतां येत नाहीं. चंद्रगुप्तापासून रावबाजीपर्यंत जो आमचा लांबच्या लांब इतिहास आहे किंवा जो आम्ही लांबच्यालांब काळ घालविला त्यांत तोडरमल, पूर्णय्या किंवा भवभूति यांसारखे कांहीं पुरुष होऊन गेले, अथवा राजपुतान्यांतील रजपुतांसारखे किंवा महाराष्ट्रदेशांतील मराठ्यांसारखे कांहीं लढवय्ये होऊन गेले, असें सांगितल्यानें आमच्या ऐतिहासिक शून्यतेस विशेष बाध येतो असें आम्हांस वाटत नाहीं. खरें म्हटलें तर चंद्रगुप्तापूर्वींच आमचा राष्ट्रचंद्र मावळला होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. दोन किंवा अडीच हजार वर्षांपूर्वीं ज्या प्रकारच्या राज्यविचारांनीं, धर्मविचारांनीं व सामाजिक विचारांनीं आम्ही निगडित झालों होतों, व त्या वेळीं ज्या आचारांचे आम्ही गुलाम होतों तेच आचार व तेच विचार अद्यापि आम्हांस बहुधा आपल्या कह्यांत ठेवीत नाहींत काय? कोणतीही अचेतन वस्तु बहुधा दोन हजार वर्षें टिकत नाहीं. पण टिकलीच तर तींत जमीनअस्मानाचें अंतर झाल्याखेरीज रहावयाचें नाहीं. पण आम्ही पहा कसे आकाशासारखे अथवा समुद्रासारखे जसेच्या तसे! बिचाऱ्या आकाशाच्या किंवा समुद्राच्या स्थितींत देखील येवढ्या कालांतरानें शास्त्रज्ञ प्रेक्षकांच्या नजरेस येण्यासारखा फेरफार होत असेल किंवा झाला असेल. पण आमच्या शोचनीय राष्ट्रस्थितींत गेल्या दोन हजार वर्षांत म्हणण्यासारखा फेरफार झाला आहे, असें बहुधा कोणाही विचारी पुरुषास म्हणतां येणार नाहीं! येथें राहणाऱ्या पांच कोटी लोकांच्या जागीं दहा कोटी लोक झाले असतील, किंवा दहांचे जागीं वीस कोटी झाले असतील; सिथियन लोकांनीं आमची मानगुटी सोडली असेल तर ती मुसलमानांनीं धरली असेल, व मुसलमानांनीं ती सोडली असेल, तर ती इंग्रजांनीं धरली असेल; जेथें पूर्वीं जमिनीचा एक विघा लागवडींत होता तेथें आतां तीन असतील; व जेथें पूर्वीं दहा खोपटीं होतीं

तेथें आतां कदाचित् शंभर असतील; कधीं मुसलमानांपुढें घट्ट तुमान व लांब आंगरखा घालून कोंपरापासून सलाम करीत पळावें लागत असेल, तर कधीं पाटलून व बूट चढवून आणि कोट घालून विलायतेच्या गोऱ्यांपुढें धांवावें लागत असेल; पूर्वी मर्जीविरुद्ध कर द्यावे लागत असले, तर आतां कदाचित् ते कायद्यानें द्यावे लागत असतील; पूर्वींचे राज्यकर्ते उघड उघड पक्ष-पात करीत असले, तर आतांचे कदाचित् न्यायाच्या पांघरुणाआड करीत असतील–पण असल्या स्थित्यंतरास स्थित्यंतर म्हणावें किंवा नाहीं याचा आम्हांस बराच संशय आहे. अगदीं अलीकडे लाखपन्नास हजार लोकांच्या आचार-विचारांत जें अंतर पडलें आहे तें सोडून द्या. तें पडूं लागेतोंपर्यंत आमचा म्हणण्यासारखा काय फेरफार झाला होता, व या घटकेस देखील सामान्य लोकांच्या स्थितींत म्हणण्यासारखा काय फरक पडला आहे हें आम्हांस कोणी समजावून सांगेल तर आम्ही त्याचे मोठे आभारी होऊं. 'राजा कालस्य कारणम्' राजा आई, राजा बाप, राजा करील ती पूर्वदिशा, लोक राजाचे गुलाम–ह्या ज्या आमच्या नीच राजकीय कल्पना त्या जशा रामराज्यांत तशा अजूनही कायम आहेत, ज्याला ह्याचें प्रत्यंतर पाहिजे असेल त्यानें बडोदें, लष्कर, हैदराबाद, म्हैसूर वगैरे पाहिजे त्या लहान मोठ्या नेटिव संस्थानाची फेरी करून तेथील जुन्या पद्धतीच्या लोकांचे विचार व आचार कसे आहेत याची बारकाईनें चौकशी करावी. या संस्थानच्या शास्त्यांपैकीं एखाद्यानें आपल्या प्रजेपैकीं एखाद्याला केवळ चैनीखातर चावकाचा खरपूस मार दिला, अथवा राखेचा तोबरा चढवून पाठीवर भला मोठा दगड दिला, किंवा प्रसंगविशेषीं एखाद्याचे नाहीं तसले हाल करून खूनही केला तरी देखील भोगणाऱ्याचे आप्त किंवा इतर लोक आपल्या स्वामीविरुद्ध उठावयाचे नाहींत! ही आमची राजभक्ति आणि राजनिष्ठा! धिक्कार असो आम्हांला, आमच्या राजभक्तीला आणि आमच्या शास्त्यांना! सारेच एका माळेचे मणि! आजमित्तीस कोणत्यादि नेटिव संस्थानांत ब्रिटिश पोलिटिकल एजंटच्या सान्निध्यांत असा प्रकार घडत असेल असें आम्ही म्हणत नाहीं. पण घडल्यास निदान आमचे लोक तरी आपण होऊन त्याबद्दल बोभाटा करणार नाहींत अशी आमची पक्की खातरी आहे. अशा राजभक्तांनीं परक्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी आपल्या

देशांत येऊं दिल्या आणि एकाच्या जुलमाचें जूं निघालें नाहीं तोंच दुसऱ्याच्या जुलमाचें जूं मानेवर घेतलें आणि आपल्या बायकांपोरांसह शतकेंच्या शतकें, हवे तसले हाल सोशीत हीन दास्यावस्थेंत काढलीं यांत नवल तें काय ? ग्रीक लोकांना अशा स्थितींत एक वर्ष देखील काढवलें नसतें, मग शतकांची काय कथा ?

अलीकडे आम्हांस जी कारुण्यावस्था प्राप्त झाली आहे, व इंग्लिश लोकांसारख्या बलाढ्य लोकांपुढें आमची जी तेजोहीनता दृष्टीस पडूं लागली आहे, तीमुळें आम्ही पूर्वींपासूनच सर्व बाबतींत असेच गचाळ होतों कीं काय, असें परकीयांसच नव्हे तर आमचें आम्हांस देखील वाटूं लागलें आहे. असें सांगतात कीं इंग्लंडचा प्रसिद्ध बृहस्पति एडमंड बर्क जेव्हां वॉरेन हेस्टिंग्जविरुद्ध पार्लमेंट सभेंत गर्जूं लागला तेव्हां त्याच्या वाग्वज्रानें पार्लमेंटच्या सामान्य सभासदांचीं अंतःकरणें रागानें व शोकानें विदारून गेलीं येवढेंच नाहीं, तर ज्या हतभाग्य हेस्टिंग्सवर त्याच्या वाणीचे आघात होत होते, त्या खुद्द हेस्टिंग्ससाहेबांचें पाषाणहृदय देखील उकलून जाऊन क्षणभर त्यांस असें वाटलें कीं, "मी मोठा कर्मचांडाळ दुरात्मा असलों पाहिजे!" बर्कच्या वाक्प्रभवामुळें हेस्टिंग्सची जशी दशा झाली तशीच आमचीहि अलीकडे होऊं लागली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. व्यापार, विद्या, कला, युद्धकौशल्य, धाडस, शरीरसामर्थ्य, मानसिक शक्ति वगैरे कोणत्याही गोष्टींत आम्ही आपली युरोपीअन लोकांशीं, मुख्यत्वेंकरून इंग्लिश लोकांशीं तुलना करूं लागलों कीं त्यांच्या आमच्यांत जमीन-अस्मानाचें अंतर स्पष्टपणें निदर्शनास येऊन, त्यांचें पारडें पृथ्वीवर बसल्यासारखें व आमचें आकाशांत लोंबत असल्यासारखें दिसतें! इंग्लिश लोकांत व आम्हांत खरोखरीच एवढें अंतर असतें, तर आमच्या मनाची जी सध्यां स्थिति झाली आहे, व तीविषयीं दुसऱ्यांस जें वाटत आहे त्याबद्दल इतका खेद करण्याची गरज नव्हती. अनेक गोष्टींत आम्ही आजमित्तीस इंग्लिश लोकांच्या मागें शेंकडों योजनें आहों, व आम्ही त्यांपासून शिकण्यासारख्या अनेक वस्तू आहेत, हें निर्विवाद आहे. पण येवढ्यावरून असें सिद्ध होत नाहीं कीं, ज्याचा आम्ही अभिमान मानावा, किंवा ज्याच्या विचारानें पुढील वर्तन करतांना उत्साहावलंबन करावें असें आमच्या इतिहासांत कांहींच नाहीं. जुन्या ग्रीक किंवा रोमन लोकांच्या इतिहासाइतका

आमचा इतिहास आनंदजनक किंवा उत्साहजनक नाहीं, हे प्रत्येक निःपक्षपाती हिंदूस कबूल केलें पाहिजे. पण यहुदी, मिसर, पारसीक किंवा मुसलमान या लोकांच्या इतिहासापेक्षां आमचा इतिहास कमी मनोहर किंवा उपयुक्त आहे, असें मानण्याची गरज नाहीं, असें दाखविणें कठिण पडणार नाहीं. महंमदीय लढवय्यांप्रमाणेंच धर्मवेडानें युरोप व आशिया खंडांतील मोठमोठाले देश आम्ही उध्वस्त केले नाहींत, व राज्यलोभानें लाखों लोकांचा प्राणसंहार करून आपली रुधिरभक्ति व क्रूर निष्ठुरता जगाच्या इतिहासांत अमर केली नाहीं ही गोष्ट खरी आहे. पण नीति, औदार्य, अनुकंपा, आप्तमित्रांचा परामर्ष वगैरे मानसिक गुणाचा; किंवा काव्य, चित्र, गायन, वादन इत्यादि ललित कलाचा; अथवा दुर्गरचना, गृहरचना, मूर्तिघटना पाषाणखनन इत्यादि शिल्पकलांचा येथें अभ्युदय होऊन त्याची इतकी अभिवृद्धि झाली होती कीं त्यासंबंधानें आजमित्तीस सुद्धां आम्हांस कोणापुढेंही खालीं पाहण्याची आवश्यकता नाहीं. शिल्पकलेकडे वाफेच्या शक्तीचा उपयोग करण्याची युक्ति सांपडल्यापासून, त्या कलेंत प्रचंड क्रांति झाली आहे, व बाष्पप्रचोदित राक्षसी लोहयंत्रापुढें दीड फूट लांबीच्या हाडामांसाच्या हाताचें कांहीं एक चालेनासें झालें आहे, हें खरें आहे. पण यंत्रानें केवढींही अचाट कामें केलीं तरी यंत्रें हातांनींच करावीं लागतात; व यंत्राना जी करामत करावयाची ती प्रथम हातानें साधण्यासारखी लागते. यंत्रांत नाना प्रकारच्या वेलबुट्यांचें काम निघतें; पण जर हातानें वेलबुट्या काढतां येत नसल्या व नकाशे तयार करतां येत नसले तर वेलबुट्यांचें काम यंत्रावर काढतां येणार आहे काय? ज्याप्रमाणें दुर्बिणीनें डोळसाच्या दर्शनशक्तीस साह्याय्य होतें, पण आंधळ्यास तिचा कांहीं एक उपयोग नाहीं, त्याप्रमाणें जे हस्तकलेंत प्रवीण असतील त्यांसच यंत्रकला साधणार आहे; ज्यांचे हात थोटे आहेत त्यांना यंत्रापासून म्हणण्यासारखा फायदा होण्याचा संभव नाहीं. आतां येवढें खरें आहे कीं, यंत्रावर काम करणारीं बहुतेक मनुष्यें यंत्रासारखींच असतात; नवीन यंत्रें तयार करण्याची किंवा तीं बिघडलीं तर दुरुस्त करण्याची कला फार थोड्यांसच साधलेली असते; हा विचार हस्तकलेसही तितकाच लागू आहे. चांगल्या कारागिरानें एखादा सुरेख नमुना घालून दिला म्हणजे त्याचें अनुकरण करणारेच शेंकडा नव्याण्णव लोक असावयाचे. विशाल कल्पकता

ही नैसर्गिक देणगी फार थोड्यांसच प्राप्त झालेली असते. बहुतेक जनता तेल्याच्या घाण्याभोंवती डोळे बांधलेल्या बैलाप्रमाणें श्रेष्ठ लोकांनीं घालून दिलेल्या वाटांनीं भ्रमण करीत असते; आणि असें तिनें करणें हेंच फायदेशीर आहे. ज्यांना स्वतःची अक्कल नाहीं त्यांनीं अक्कलवंतांची कास धरून चालावें हेंच नीट आहे. तात्पर्य, अर्वाचीन विस्तृत यंत्रकला युरोपीअन लोकांप्रमाणें आम्हांस अवगत नाहीं, व ती त्यांपासूनच आम्हीं शिकली पाहिजे, हें जरी आम्ही प्रांजलपणें कबूल करतों तरी ती साध्य होण्यास ज्यों हस्तकलाप्राविण्याची आवश्यकता असते, ती हस्तकलाही आम्हीं सर्वांशीं युरोपीअन लोकांपासून उचलली पाहिजे हें मत आम्हांस मान्य नाहीं. तथापि आम्ही लौकर जागे झालों नाहीं, तर युरोपीय यंत्रकला आम्हांस साध्य होणार नाहीं इतकेंच नाहीं तर सुमारें तीन हजार वर्षांच्या परिश्रमानें येथें भव्य उदयास आलेली जी आमची हस्तकला तिचाही लोप होईल, व एकदां तिचा लोप झाला म्हणजे अर्वाचीन यंत्रकलाही आम्हांस संपादितां येणार नाहीं हें कबूल करणें भाग आहे. तेव्हां जे कोणी या देशांत यंत्रकलाप्रसार करण्याविषयीं झटत असतील त्यांनीं लाखों रुपयांचीं यंत्रें परक्या देशांत खरेदी करून, तीं येथें आणून मांडिलीं आणि त्यांवर माल काढण्यास सुरुवात केली, म्हणजे त्यांच्या श्रमास पूर्ण यश आलें असें आम्हांस वाटत नाहीं. यंत्रांचे कारखाने स्थापणें तर जरूर आहेच. पण त्यांबरोबरच त्यांनीं दुसऱ्या दोन गोष्टी केल्या पाहिजेत त्या ह्या. आपली जुनी हस्तकला टाकाऊ नाहीं तर अत्यंत रक्षणीय आहे, अशी लोकांची खातरी केली पाहिजे, व जे त्या कलेंत निष्णात आहेत त्यांच्याकडून अर्वाचीन यंत्रकलेचें ज्ञान संपादवून, तें त्या हस्तकलेच्या विस्तृत उपयुक्ततत्वाला कारणीभूत होईल, अशा उपायांची योजना केली पाहिजे. तात्पर्य, ज्या वेळेस आमच्या जुन्या हस्तकलेस नवीन यंत्रकलेचें साहाय्य होऊं लागेल, व पूर्वीं जीं चतुरस्रपणाचीं कामें नामांकित कारागीर दीर्घ आयासानें, खर्चानें व काळानें थोड्या श्रीमंतांच्या सुखासाठीं व ऐषआरामासाठीं करीत तींच कामें यंत्राच्या साहाय्यानें स्वल्प आयासानें, खर्चानें व काळानें होऊं लागून अनेक गरीबांस जेव्हां त्यांपासून सुख व ऐषआराम प्राप्त होऊं लागेल तेव्हांच आमच्या

जुन्या हस्तकलेचें रक्षण झालें, व पाश्चिमात्य यंत्रकलेनें या भूमींत बळकट मूळ धरलें असें म्हणतां येणार आहे.

आमच्या शोचनीय स्थितीमुळें, रामायण व महाभारत या महापुराणांचा अभ्यास आमच्या हातून जसा व्हावा तसा मुळींच होत नाहीं. पूर्वपद्धतीचे कांहीं लोक तीं पोथीपुढील तांदुळासाठीं, व्यासपूजेच्या प्राप्तीसाठीं, सताहाच्या फायद्यासाठीं, किंवा बिदागीसाठीं वाचतात! अलीकडील तरुण लोक तीं परीक्षा पास होण्यासाठीं वाचतात! इतिहासदृष्टीनें त्यांच्याकडे अवलोकन करून ज्यानें त्यांच्या वाचनास आरंभ केला आहे, व तें तडीस नेलें आहे, असा बहुधा एकही अर्वाचीन विद्वान् सांपडणार नाहीं. एखादा बुद्धिवान् व कल्पक विद्वान् या दोन ग्रंथांचा यथास्थित रीतीनें अभ्यास करील तर भारतीय आर्यांच्या पौराणिक कालांतील स्थितीचें प्रत्येक बाबतींत विश्वसनीय, मनोरंजक व बोधावह असें चित्र त्यास काढतां येणार आहे! पण असलें काम नीट रीतीनें होण्यास लागणारा राजाश्रय किंवा लोकाश्रय आम्हांस मिळत नसल्यामुळें यांचें जितकें मंथन व्हावयाला पाहिजे आहे तितकें अद्यापि कोणीही केलेलें नाहीं, व पुढेंही तें अशाच स्थितींत करण्यास कोणी झटेल, असें आम्हांस वाटत नाहीं. इंग्लिश लोकांनीं असलीं कामें धरल्यास, त्यांत खुद्द सरकारकडून व सरकारी अधिकाऱ्यांकडून साक्षात् किंवा परंपरेनें पुष्कळ मदत होते. इतिहासदृष्टीनें या ग्रंथांकडे पाहून त्यांच्या मदतीनें येथील जुनी स्थिति कशी असावी; राज्यपद्धति कोणत्या प्रकारची असावी, राजा आणि प्रजा यांचे अन्योन्य संबंध कसे होते; वर्णावर्णांत द्वेषभाव असे कीं संतोषवृत्ति असे; राजावर लोक प्रीति करीत किंवा त्याला नाखूष असत; कायदे कोण करी; कर कोणत्या प्रमाणानें, कशावर, व केव्हां घेत; सैन्याची व्यवस्था कशी काय ठेविली जात असे; स्वदेशी व्यापाराला उत्तेजन देऊन परकी देशाचा माल स्वदेशांत येऊं न देण्याबद्दल निर्बंध करीत असत किंवा नाहीं; व्यापारांचीं मुख्य ठिकाणें कोणतीं होतीं; कोणकोणत्या जिनसा विशेष पिकत, अथवा कोणता जिन्नस कोणत्या ठिकाणीं विशेष सुबक होत असे आणि त्याला काय किंमत पडे; लोकशिक्षणाची व स्त्रीशिक्षणाची सामान्य स्थिति कशी होती; स्त्रियांस, नोकरांस व इतर परोपजीवी लोकांस कोणते हक्क असत, व त्यांचा सांभाळ कोणत्या रीतीनें

होत असे वगैरे गोष्टींविषयीं उत्कृष्ट माहिती या दोन पुराणांत खचित सांपडेल, अशी आमची खात्री आहे. पण इतका शोधक व सुखवस्तु वाचक येथें कोठून पैदा होणार? व झाला तरी तो आम्हांस लाभणार कसा? फटदिशीं तो एखादे ठिकाणीं रावसाहेब होऊन बसावयाचा, किंवा कोठें वकिलाचें 'प्रॅक्टिस' करूं लागायचा, अथवा एखाद्या नेटिव्ह संस्थानिकाच्या पदरीं चार-दोनशें रुपयांवर पडून रहायचा! सध्यां आमच्यासंबंधानें हें बिकट काम युरोपियन लोक करीत आहेत, व तें आमच्या हातून नीट होऊं लागेतोंपर्यंत, युरोपियन लोकांच्या शोधांवर, व कांहीं अंशीं त्यांच्या कल्पनांवर, आम्हांस अवलंबून असलें पाहिजे. प्रस्तुत निबंधही सर जार्ज बर्डवूड यांनीं हिंदुस्थानच्या कलांच्या पुराणत्वाचें जें मंडन केलें आहे त्याच्या अनुरोधानें लिहिले जात आहेत.

रामायण आणि भारत हीं इतिहासाचीं पुस्तकें नाहींत हें जरी खरें आहे, तरी जो ऐतिहासिक दृष्टीनें त्यांकडे पाहील त्याला त्यांपासून तत्कालीन व त्या पूर्वीच्या समाजाच्या अंतर्बाह्य स्थितीविषयीं बरीच महिती मिळणार आहे. प्रस्तुत विषयाच्या समर्थनासाठीं सर जॉर्ज यांनीं रामायणांतून एकच उदाहरण घेतलें आहे. पण तेवढ्यावरूनमुद्धां पौराणिक कालांत आमच्या कलांची व कारागिरीची स्थिति कशी होती, हें सहज समजण्यासारखें आहे. रामायणाच्या दुसऱ्या कांडांतील एकोणिसाव्या अध्यायांत अयोध्येंतील लोक भरतासह जो रामाचा शोध लावण्यास निघाले आहेत त्याचें वर्णन आहे. रामशोधार्थ काढलेली भरताची स्वारी मोठ्या थाटानें व व्यवस्थेनें निघाली होती. हींत प्रत्येक धंद्याचे लोक असून, धंद्याच्या महत्त्वाच्या अनुरोधानें त्यांच्या रांगा लाविल्या होत्या, व त्या त्या धंद्यांतील प्रमुख इसमांना त्यांचे पुढारी किंवा नायक नेमिलें होतें. या प्रसंगीं हजर असलेल्या लोकांत अग्रस्थान जवाहिऱ्यांस दिलें होतें. जवाहिऱ्यांच्या पाठीमागून कासार चालले होते, व कासारांच्या मागून हस्तीदंती काम करणारे, गंधी, सोनार, कोष्टी, लोकर विणणारे, सुतार, पितळेचें काम करणारे, चितारी, गायनाचीं वाद्यें करणारे, शस्त्रें करणारे, लोहार, तांबट, पुतळे करणारे, स्फटिक कापणारे, कांच करणारे आणि असेच इतर कारागीर अनुक्रमानें जात होते. ही यादी पाहून रामायणकालीं हे धंदे हिंदू लोकांस माहीत नव्हते असें कोण म्हणूं

शकेल (हिंदुस्थानास मुसलमानांचा वारा सातव्या शतकापर्यंत मुळींच लागला नाहीं. रामायण व भारत यांतील राजे ख्रिस्तीशकाच्या पूर्वीचीं पांचशें आणि त्यानंतरचीं पांचशें वर्षें यांच्या दरम्यान होऊन गेले असावे, असें हिंदु लोकांच्या सुधारणेविषयीं ज्यांचें म्हणण्यासारखें अनुकूल मत नाहीं, असे पंडित देखील कबूल करतात.) तसेंच रामायणांत धंद्यांची जी यादी दिली आहे तीच कोणी झाला तरी आज करील. फार तर काय पण एखादा सेसन्स रिपोर्ट घेतला आणि त्यांतील वर्गीकरणाकडे पाहिलें, तर धंद्यांच्या कोष्टकांत म्हणण्यासारखा फरक करावा लागणार नाहीं. तेव्हां काय सिद्ध झालें कीं, रामायणकालीं या भरतभूमींत जे धंदे येथें चालत होते तेच अद्यापिही चालत आहेत व ग्रीक लोकांच्या आणि मुसलमान लोकांच्या स्वाऱ्यांनीं त्यांत म्हणण्यासारखा फरक झालेला नाहीं. आणि वास्तविक पाहिलें तर हा फरक त्या लोकांकडून होण्याचा संभवही नव्हता. ग्रीक लोक तर येथें एखाद्या साथीसारखे, वावटळीसारखे किंवा टोळधाडीसारखे आले आणि गेले! हिंदुस्थानांत त्यांनीं कायमचें ठाणें कधींहि दिलें नाहीं, व त्यामुळें त्यांच्याकडून येथील कलाकौशल्यांत म्हणण्यासारखा फेरफार झाला नाहीं. ‘म्हणण्यासारखा’ असें बुद्ध्या लिहिण्याचें कारण असें कीं, ग्रीक लोकांनीं आम्हांस जिंकून आपली सत्ता येथें कायम केली असें जरी उपलब्ध इतिहासावरून म्हणतां येणार नाहीं, तरी त्यांचें आमचें दळणवळण मुळींच होत नव्हतें असें नाहीं. कांहीं लोकांची जिज्ञासा आणि कांहींचा व्यापार यांच्या योगानें या उभय देशांत बरेंच दळणवळण होत असावें, असें मानण्यास हरकत नाहीं. पण या दळणवळणावरून हिंदुस्थानांतील कारागिरी हिंदू लोकांनीं ग्रीक लोकांपासून उचलली असावी, असें अनुमान करण्यास पुरेसा पुरावा मिळत नाहीं. उलट हिंदु व ग्रीक या उभयतांनींहि आपापल्या कारागिरीचीं मूलतत्त्वें आपल्याहून जुन्या अशा तिसऱ्याच आर्यशाखेपासून संपादिलीं असावीं, असें मानण्यास बराच आधार आहे. तसेंच हिंदुस्थानांतील कलाकौशल्याचे अनेक पदार्थ ग्रीस देशांत व इतर देशांत जात असून, त्यांची तेथें मोठी तारीफ व अनुकरण होत असे, याबद्दलहि बराच पुरावा आहे. तेव्हां कारागिरीच्या संबंधानें जर ग्रीक लोकांचें सुद्धां आम्ही कांहीं कर्ज लागत नाहीं, तर त्यांच्या पाठीमागून ज्यांनीं या देशांत बऱ्याच शतकांनीं पाय ठेवला त्या मुसल-

मानांचें लागतों, असें म्हणणें शुद्ध साहस आहे. शिवाय मुसलमान लोकांनीं आपल्या कसबानें किंवा विद्येनें आमच्या कारागिरींत किंवा विद्येंत प्रचंड क्रांति करून त्यांचा मागमूस नाहींसा करावा, असा त्यांचा अधिकारहि नव्हता. मुसलमान लोक आम्हांहून विशेष कडवे, विशेष शूर, विशेष मिजासी, व धर्माभिमानी आहेत, हें क्षणभर कबूल करतां येईल; पण इंग्रज लोकांप्रमाणें ज्ञानांत, कलाकौशल्यांत, राजकारणांत किंवा कल्पकतेंत आम्हांहून ते श्रेष्ठ होते, असें म्हणण्यास बिलकुल आधार नाहीं. त्यांनीं येथें पांचसहाशें वर्षें आपली बादशाही चालविली हें कबूल आहे; पण इंग्रजांनीं आपल्या शंभर वर्षांच्या अंमलानें आमच्या अंतर्बाह्य स्थितींत जें जमीनअस्मानाचें अंतर पाडिलें आहे, तें मुसलमानांस सहाशें वर्षांच्या एकछत्री अंमलानें पाडितां आलें नाहीं, हें निर्विवाद आहे. आणि असेंच होणें स्वाभाविक होतें. वर निर्दिष्ट केलेल्या गुणांत आम्हांहून मुसलमान लोक खरोखरीच श्रेष्ठ असते तर त्यांच्या सहाशें वर्षांच्या अंमलांत आमच्या घरच्या सुधारणेचा मागमूसहि न राहता; आपणाहून कमी सुधारलेल्या ज्या ज्या लोकांस त्यांनीं जिंकून पादाक्रांत केलें, व ज्या ठिकाणीं त्यांनीं आपलीं कायमचीं राज्यें स्थापिलीं त्या ठिकाणच्या जुन्या सुधारणेचा आतां पत्ताहि लागत नाहीं. तात्पर्य काय कीं, कोणत्याही कमी सुधारलेल्या लोकांनीं आपणांहून अधिक सुधारलेल्या राष्ट्रास जिंकून तेथें आपली गादी स्थापिली, व अनेक वर्षें त्यांचें अव्याहत राज्य केलें, तरी त्यांच्या हातून तेथल्या लोकांच्या वरिष्ठ सुधारणेचा बीमोड होऊं शकत नाहीं, हा जो इतिहासज्ञांनीं नियम काढिला आहे तोच आम्हांसही लागू होतो. याच गोष्टीचा दुसरा प्रत्यय असा आहे कीं, दक्षिण हिंदुस्थानांत म्हणजे कर्नाटक, म्हैसूर वगैरे प्रांतांत मुसलमान लोकांचा स्थायिक अंमल कधींच झाला नाहीं, व पश्चिम हिंदुस्थानांत तो फार स्वल्पकालीन होता. यामुळें पश्चिम हिंदुस्थानांतल्या कलाकौशल्यावर मुसलमानांच्या अंमलाची झांक यत्किंचित् दिसते, पण कर्नाटकांतील व म्हैसूर प्रांतांतील कारागिरीस म्लेंछस्पर्श कधींहि झाला नाहीं, असें त्या त्या प्रांतांतील कारागिरीच्या आजच्या स्थितीवरून म्हणणें भाग पडतें. उलट, अहमदाबाद, हैद्राबाद ( दक्षिण ) अशा थेट मुसलमानी शहरांत सुद्धा आमची कारागिरी मशिदीपर्यंत व जनानखान्यापर्यंत जाऊन भिडली आहे असें दिसून येईल!

एका घराचे दगड काढून दुसऱ्या घराला लावायचे असले तर किती त्रास पडतो हें सर्वांस माहित आहेच. पण हेच दगड चुन्यांत पक्के बसविलेले असले तर फारच त्रास पडतो, आणि त्यांतहि पहिली इमारत बांधल्यापासून बरींच वर्षें लोटलीं असलीं, व चुन्याचा आणि दगडांचा एकजीव होऊन गेला असला, तर एकेक दगड सोडविण्यास किती मारामार पडते, हें कोणास सांगावयास पाहिजे, असें नाहीं. तात्पर्य, कोणत्याही जड द्रव्यांचा संनिकट संयोग करून त्यांपासून एक पिंड केला असतां तो पिंड मोडून त्याच्या घटकांचा निराळा पिंड बनविणें हें अतिशय कष्टाचें काम आहे, हें प्रत्येकानें कबूल केलें पाहिजे.

सामाजिक घडामोडींचाही असाच प्रकार आहे. प्रथम व्यक्तीच्या शरीररचनेचा विचार करा. आरंभीं हें शरीर समजातीय द्रव्यांचें झालेलें असून, पुढें तें जसजसें वाढत जातें तसतसें त्यांत विषमजातित्व उत्पन्न होतें; व ज्या मानानें त्यांत विषमजातित्व उत्पन्न होतें त्या मानानें त्यांत अधिकाधिक दार्ढ्य उत्पन्न होऊन बाह्य संस्कारांस तें अधिकाधिक प्रतिबंध करूं लागतें. कोवळे वेळू, लहान झाडांच्या खांद्या, किंवा तरुण मुलांचे अवयव यांत किती लवचिकपणा असतो बरें? वाढ खुंटून प्रत्येक अवयवांत काठिण्य आल्यावर, कोणत्याही मनुष्यास चांगली कसरत शिकतां येत नाहीं, ही प्रत्येकाच्या पाहण्यांतली गोष्ट आहे. सामाजिक शरीरांतही परिणतीमुळें अशाच तऱ्हेचें काठिण्य उद्भूत होतें. कोणताही समाज एकदां वाढीस लागला, आणि श्रमविभागामुळें त्यास भिन्नावयवित्व प्राप्त झालें, व त्यांत निरनिराळे वर्ग उत्पन्न होऊन ते निरनिराळ्या क्रिया करूं लागले म्हणजे त्यांचें रूपांतर करूं पाहणाऱ्या गोष्टींस त्यांकडून मोठा प्रतिबंध होऊं लागतो. राज्य, धर्म, सैन्य, लोकाचार यांसंबंधानें ज्या रीति एकदां रूढ होऊन जातात त्यांत फिरून बदल करणें अत्यंत दुरापास्त होऊं लागतें. पूर्वापार चालत आलेल्या चालींत विचारदृष्ट्या कितीहि विसंगतता दिसली तरी त्या

सोडणें किती जिवावर येतें हें बालविवाह, केशवपन, सुतक इत्यादि प्ररूढ चालींचा विचार करतां, तेव्हांच लक्षांत येणार आहे. समाजांतील शेंकडा नव्याण्णव लोकांची स्थिति अंधपरंपरेप्रमाणें असते. मळलेल्या वाटेच्या बाहेर एक पाऊल टाकल्यानेंसुद्धां आपणांवर मोठा भयंकर प्रसंग गुदरेल, असा धाक त्यांस क्षणोक्षणीं वाटत असतो.

याचसंबंधानें आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे ती अशी— ज्याप्रमाणें व्यक्तीच्या शरीरांतील निरनिराळे अवयव आपापलीं कार्यें पृथक्-पणानें करून एकमेकांस साहाय्य करतात, त्याप्रमाणें सामाजिक शरीरांतले निरनिराळे भागही आपापलीं कार्यें स्वतंत्रपणें करून इतरांस मदत करीत असतात. पण पुढें असाही प्रकार घडून येतो कीं, समाजाच्या एका स्थितींत ज्या वर्गाची आवश्यकता असते तो वर्ग समाजाचें स्थित्यंतर झाल्या-मुळें अगदीं निरुपयोगी झाला तरी, सहसा नाहींसा होत नाहीं. उदाहरणार्थ बडोद्यासारख्या संस्थानांतिल बारगीर घ्या. यांचें आतां कांहीं एक प्रयोजन नाहीं; पूर्वीं यांच्याकडून जी कामगिरी होत असे तिची आतां गरज राहिली नाहीं; तथापि त्यांचा चरितार्थ चालविणें संस्थानांस भाग पडत आहे. या बारगिरांप्रमाणेंच आमच्या बहुतेक संस्थानिकांची, जहागीर-दारांची, त्यांच्या सैन्यांची, निरनिराळ्या ठिकाणच्या देवस्थानांची, धर्मा-धिकाऱ्यांची व त्यांच्या मठांची, कित्येक धंदेवाल्यांची, आणि अनेक आचारांची गोष्ट आहे. ज्याप्रमाणें वार्धक्यामुळें श्रम करण्यास अयोग्य ठर-लेल्या लोकांस नोकरीवरून दूर करून त्यांचे जागीं नवीन लोकांची योजना केली तरी त्यांना पेनशनदार करून ठेवावें लागतें,त्याप्रमाणें समाजाचें स्थित्यंतर होऊन त्यांतील कोणताही वर्ग निरुपयोगी ठरला तरी त्याचा बोजा बरींच वर्षें समाजास वहावा लागतो. कारण ज्याप्रमाणें कोणत्याही व्यक्तीस आपण होऊन पंचत्वास मिळणें आवडत नाहीं, त्याप्रमाणें समाजाच्या कोणत्याही अवयवास तें आवडत नाहीं. व्यक्तीप्रमाणेंच समाजाचे अवयवही आपापलें अस्तित्व दीर्घतम करण्याविषयीं झटत असतात.

येथपर्यंत सांगितलेल्या गोष्टींवरून समाजाचें रूपांतर होण्यास किती प्रत्यवाय असतात हें वाचकांच्या लक्षांत बरेंच आलें असेल. तथापि ज्यांच्या मनांत ही गोष्ट अजूनही बरोबर आली नसेल त्यांच्या समजुतीसाठीं

आणखी एकदोन गोष्टी सांगतों. समाजांतील लोकांचे नियामक आणि नियत किंवा शास्ते आणि शासित असे मुख्य दोन भाग असतात, हें मागें सांगितलेंच आहे. तर त्या या भागांपैकीं नियामक भाग समाजाच्या परिणतीबरोबर विस्तृत होत गेला तर त्या मानानें नियत भाग क्षिण होत गेला पाहिजे हें उघड आहे. ज्या देशांत सरकारी अधिकाऱ्यांची संख्या आणि सरकारनें चालविलेलीं खातीं वाढत जातात त्या देशांतील प्रजा अधिकाधिक दुर्बल व परतंत्र होत जाते. सरकारी अधिकारी कोणत्याही खात्यांतले असले तरी त्या सर्वांचा चरितार्थ प्रजेनें दिलेल्या करांवर होत असतो. त्यामुळें होईल तितकी जमाबंदी वाढविणें आणि सक्तीचा अंमल चालविणें वगैरे गोष्टींत त्या सर्वांचे विचार सामान्यपणें एकसारखे असतात. खात्याखात्याचा केवढाही विरोध असला तरी प्रजेशीं तंटा करण्याचा जेव्हां प्रसंग येतो तेव्हां तीं पटदिशीं एक होतात, आणि प्रजेशीं उद्भवलेल्या तंट्यांत यशस्वी होणें हें सर्वांसच हितकारक आहे, असें तेव्हांच लक्षांत आणून एकमेकांस साहाय्य करतात. शिवाय निरनिराळीं खातीं परस्परांस कितीही विरुद्ध असलीं तरी प्रत्येक खात्यांत खालच्या अधिकाऱ्यांचे वरच्या अधिकाऱ्यांशीं व प्रमुख सरकारशीं जे संबंध असतात ते सारे एकसारखेच असतात, व त्या सरकारचा आणि त्याबरोबर आपला अंमल उत्कृष्ट रीतीनें चालावा, असेंहि प्रत्येकास वाटत असतें; यामुळें साऱ्या प्रकारच्या सरकारी अधिकाऱ्यांच्या स्वभावांत एक प्रकारचें साम्य तेव्हांच उत्पन्न होतें, आणि 'समानशीलेव्यसनेषु सख्यं' या न्यायानें प्रजेच्या कल्याणाकडे विशेष लक्ष न देतां, आपल्या वर्गाचें हित साधण्याविषयीं ते पराकाष्ठेचे तत्पर होऊन, त्या कामीं ते एकमेकांस अंतःकरणपूर्वक मदत करतात. ज्यानें सरकारी नोकरी धरली तो पूर्वींचा कितीही सज्जन असला तरी त्याच्या वृत्तींत जो एकदम एक प्रकारचा पालट होतो त्याचें हें गुह्य आहे. स्वसंरक्षणपरायणता व स्वहितसाधनरति यांनीं प्रत्येकास घेरलें आहे आणि तसें होणें स्वाभाविक आहे. पण सरकारी अधिकाऱ्यांचा चरितार्थ व चैन प्रजेच्या श्रमाच्या फळावर अवलंबून असल्यामुळें, त्याचा होईल तितका अपहार करण्याकडे त्यांची प्रवृत्ति किती होत जाते, हें कधीं कधीं त्यांच्या ध्यानांतसुद्धां येत नाहीं!

अधिकारी आणि प्रजा यांत उत्पन्न होणाऱ्या द्वंद्वास केवळ अधिकारीच

कारण होतात, असें नाहीं. प्रजेकडूनही त्या कामांत बरीच मदत होते! मनुष्यमात्राचा असा स्वभाव आहे कीं लहानपणापासून जी स्थिति ती कितीही वाईट असली तरी तीच बरी वाटत असते. ज्यांना जन्मापासून स्वातंत्र्याचा उपभोग मिळत आहे त्यांना पारतंत्र्याचा जसा कंटाळा असतो, त्याप्रमाणें जे जन्मापासून पारतंत्र्यांत वाढलेले असतात, त्यांना स्वातंत्र्य आपणांस उचित नाहीं, असें वाटूं लागतें. आज मित्तीस आपणांपैकीं शिकलेले अनेक लोक स्त्रियांस स्वातंत्र्य देण्यास तयार आहेत, पण त्याचा उपभोग घेण्यास आमच्या स्त्रीवर्गाची कोठें तयारी आहे! आम्ही तें त्यांना जबरीनें देण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना त्यापासून सुख न होतां, उलट त्रास होतो. जे हौशी लोक आपल्या बायका नाटक पाहण्यास किंवा हवा खाण्यास बरोबर घेऊन जातात त्यांच्या डोळ्यांपुढें वरील विधानांचें यथार्थ्य आल्याशिवाय राहणार नाहीं! अशा प्रसंगीं स्त्रियांचा कावरेबावरेपणा, डोळे वर करून पाहण्याची व स्पष्टपणें बोलण्याची भीति, पुरुषांच्या मागोमाग चालण्यास वाटणारी शंका वगैरे गोष्टींमुळें त्यांची जी विलक्षण वृत्ति होते तीवरून अशा रीतीनें समाजांत येण्यापेक्षां घरांतल्या घरांतच राहणें बरें असें त्यांस वाटत असावें असें स्पष्टपणें दिसत असतें. यावरून कोणी असें समजूं नये कीं, जी गोष्ट आमच्या स्त्रियांनीं पूर्वीं कधीं न केल्यामुळें आज त्यांना अवघड वाटत आहे. ती आपण त्यांच्याकडून कधींच करवूं नये. ज्या गोष्टींविषयीं आपण अपरिचित असतों ती प्रथम करूं लागतांना किती संकटावह होते, हें दाखविण्यासाठीं मात्र वरचें उदाहरण दिलें आहे; त्याहून येथें दुसरा हेतु नाहीं. तात्पर्य, जन्मादारभ्य ज्या गोष्टींची आपणांस संवय लागलेली असते, त्या गोष्टी इतरांस कितीही वावग्या वाटत असल्या व त्यांपासून अखेरीस आपलें केवढेंही नुकसान होण्याचा संभव असला, तरी त्या आपणांस बऱ्या वाटतात आणि त्या टाकणें आपणांस सहसा रुचत नाहीं. दूर कशाला, आपल्या लोकांच्या राजकीय विचारांकडेच क्षणभर पहा. आम्ही पहिल्यापासून अनियंत्रित एकसत्तात्मक राज्यपद्धतींत वाढलेलों असल्यामुळें 'राजा कालस्य कारणम्' अशी आमची पक्की समजूत, व ज्या त्या गोष्टींत राजाच्या तोंडाकडे पाहण्याची आम्हांस खोड! लोकशिक्षण असो; व्यापारवृद्धि असो; यांत्रिक शोध असो; मादक द्रव्यसेवननिषेध असो; सामान्य

नीतिप्रसार असो—काय पाहिजे तें असो, अगदीं शुष्क गोष्टीपासून मोठ्या महत्त्वाच्या गोष्टीपर्यंत सरकारापुढें तोंड वेंगाडल्याशिवाय, व राज्यकर्त्यांची मदत मागितल्याशिवाय, आमचे हातून कांहीं एक होणार नाहीं, असा आमचा पक्का ग्रह होऊन बसला आहे. केशवपन किंवा बालविवाह कायद्यानें बंद करा असें कोणीं म्हटलें कीं एवढा अनर्थ करून सोडावयाचा कीं जशी कांहीं स्वातंत्र्यवृक्षावर आकाशांतील कुऱ्हाडच पडत आहे! म्हणजे काय कीं बायकांच्या व मुलांच्या पारतंत्र्याचा विच्छेद करणाऱ्या कायद्यास स्वातंत्र्यापहारक कुऱ्हाड म्हणावयाचें आणि ज्या गोष्टींनीं खरोखर स्वातंत्र्यापहार होत आहे त्यांस स्वातंत्र्यसंरक्षक म्हणून प्रेमानें कवटाळावयाचें—अशी आमची शोचनीय अवस्था होऊन गेली आहे! पण कांहीं अंशीं ही अपरिहार्य आहे. पारतंत्र्यांत ज्यांचीं अनेक शतकें गेलीं आहेत त्यांना स्वातंत्र्याचा बाऊ वाटावयाचा! आणि पारतंत्र्यच सुखावह वाटावयाचें! आम्हा अर्धवट सुधारलेल्या लोकांची तर कथा काय? पण फ्रान्स व जर्मनी अशा सुधारलेल्या देशांतील तत्त्ववेत्त्यासही न कळत अशा प्रकारची भूल पडते, हें आश्चर्य नव्हे काय? सामाजिक नियंत्रण बलात्कारतत्त्वावर न होतां संमतितत्त्वावर होऊं लागेल तेव्हांच सामाजिक सुखाची परमावधि होण्याचा संभव आहे, हें सिद्ध करण्यासाठीं प्रसिद्ध फ्रेंच तत्त्ववेत्ता ऑगस्ट कोंट बसला असून वाहतां वाहतां भलतीकडे जाऊं लागला! संमतितत्त्वावर फ्रेंच समाजाची स्थापना करण्याकरतां त्यानें जी राज्यपद्धत वर्णिली आहे ती फ्रान्स देशांत आजपर्यंत रूढ असलेल्या राज्यपद्धतीहून अधिक सक्तीची आहे! जर्मनींतील अलीकडल्या सामाजिक तत्त्ववेत्त्यांची विचारपद्धति अशाच प्रकारची आहे. यांनीं लोकांस पूर्ण स्वातंत्र्य देण्याच्या हेतूनें ज्या राज्यपद्धतीचें विवरण केलें आहे ती खरोखरीच अंमलांत आल्यास, व्यक्तिस्वातंत्र्य कोठें दृष्टीस पडेल किंवा नाहीं, याचीच शंका आहे! तात्पर्य, हाडामांसास खिळलेले आचार सामान्य लोकांसच बरे वाटतात असें नाहीं, तर त्यांतलि दोष विचारी विद्वानास देखील सहसा दिसत नाहींत, व दिसले तरी त्यांचा अव्हेर करणें हें त्यांच्यानेंही सहन होत नाहीं. यामुळें ज्या ठिकाणीं सरकारी अंमल मोठ्या जुलमाचा असतो त्या ठिकाणीं तो वाढत जाण्यास प्रजेचें वर्तनही बऱ्याच अंशीं कारण होतें. जों जों सरकारी अधि-

कारी अधिकाधिक सक्ती करितात तों तों प्रजेच्या अंगीं अधिकाधिक सहन-शीलता येत जाते, व जों जों ही वाढत जाते तों तों अधिकाऱ्यांस अधिकाधिक जुलूम करण्यास सवड होते. अशा रीतीनें एका बाजूनें औद्धत्य आणि दुसऱ्या बाजूनें नम्रता; एका बाजूनें चैन व दुसऱ्या बाजूनें कष्ट; एका बाजूनें स्वामित्व आणि दुसऱ्या बाजूनें गुलामगिरी यांची अधिकाधिक वाढ होत गेल्यास, उत्पादक लोकांची संख्या आणि त्यांनीं केलेलें उत्पन्न हीं दोनही संपुष्टांत येऊं लागतात. हळूं हळूं साऱ्यांसच कमीअधिक भिकारपण येऊन लोकसंख्येची वाढ खुंटते; आणि असाच प्रकार अधिकाधिक होत गेल्यास ती कमी होऊं लागून अखेरीस समूळ ऱ्हासाच्या पंथास लागते! तेव्हां लक्षांत काय गोष्ट ठेवायची कीं, समाजाची उन्नति होण्यास एका प्रकारची नियामक व्यवस्था जरी अत्यावश्यक आहे, तरी ती फाजील होतां कामा नये. नियामक व्यवस्था अस्तित्वांत आली म्हणजे समाजाच्या अंगीं एका प्रकारचें दार्ढ्य येऊं लागतें. व जों जों ती व्यवस्था वाढत जाईल तों तों तें दार्ढ्य अधिकाधिक प्रबल होत जाऊन, समाजांतील लवचिकपणा अगदीं नाहींसा होतो, व ज्या मानानें हा लवचिकपणा नाहींसा होत जातो त्या मानानें समाजाच्या पुढील सुधारणेस प्रतिबंध होतो.

ज्यांनीं कोणत्याही मोठ्या समाजास प्राप्त झालेल्या स्थित्यंतराचा इतिहास थोडासा वाचला असेल त्यांना मनुष्याच्या सामाजिक व्यवहारांस कोणती दिशा लागत चालली आहे, हें सहज समजण्यासारखें आहे. अनियंत्रित राजांचा अंमल कमी होत जाणें, व सृष्ट्यंतर्गत सामर्थ्यांचे आपण गुलाम आहों, व त्यांच्या सर्वशक्तिमत्वापुढें आमचें कांहीं एक न चालतां त्यांच्या इच्छेनुरूप आम्हांस निरंतर वागलें पाहिजे, या चुकीच्या कल्पनेचा लय होत जाऊन मनुष्य प्रयत्न करील तर सृष्ट्यंतर्गत पदार्थांचें ज्ञान त्यास प्राप्त करून घेतां येऊन कालांतरानें त्या पदार्थांसच त्यास आपले दास करून घेतां येईल, असा विश्वास वाढत जाणें—या दोनच गोष्टींचा नीट विचार केला तरी बाकीच्या गोष्टींविषयीं बरीच समजूत पडणार आहे. सचेतन व अचेतन सृष्टीचा दास मी नाहीं, तर तिला दास करण्याचा, निदान तिच्याशीं बरोबरीनें वागण्याचा हक्क किंवा अधिकार मला आहे, असा विचार मनुष्याच्या अंतःकरणांत वागूं लागला म्हणजे त्याच्या मनांत या वृत्तीचा प्रादुर्भाव झाला नाहीं तोंपर्यंत त्याच्या हातून घडत असलेल्या क्रिया किंवा त्याचें वर्तन बलात्कारानें, जबरदस्तीनें किंवा सक्तीनें होत असतें, असें म्हणण्यास हरकत नाहीं. अशा रीतीनें होत असलेलें वर्तन केवळ वाईटच असेल असा नियम नाहीं. पुष्कळदां तें चांगलेंही असण्याचा संभव आहे. पण तें परप्रेरित असल्यामुळें त्याच्या चांगुलपणाची किंवा वाईटपणाची जबाबदारी त्या वर्तन करणारावर असत नाहीं. शिवाय, असें वर्तन बळजोरीनें करविण्यांत तें करविणाऱ्याचें विशेष लक्ष स्वहिताकडे असल्यामुळें, अनेक प्रसंगीं तें करणाऱ्यांचें हित मुळींच साधत नाहीं. यामुळें जोंपर्यंत कोणत्याही राष्ट्रांतील लोकसमूहांत स्थूल मानानें स्वामी आणि किंकर असे दोनच भाग होऊन राहिलेले असतात तोंपर्यंत त्यांत सुखावस्थेची परमावधि होण्याचा संभव नाहीं. स्वातंत्र्य हें स्वभावतः सुखावह, आणि पारतंत्र्य हें स्वभावतः दुःखावह असें आहे. पण मनुष्याच्या व कांहीं इतर प्राण्यांच्या शरीरांची व मनाची घटना

विशेष प्रकारची असल्यामुळें त्यास आपलें स्वाभाविक स्वातंत्र्य मर्यादित करून घेण्यांत व समाजावस्थेंत अवश्य असणाऱ्या पारतंत्र्याचा अंगीकार करण्यांत दुःखाहून अधिक दुःख प्राप्त होतें; आणि म्हणूनच तो कितीहि त्रास सोसावा लागला तरी समाज सोडून जात नाहीं. पण यावरून असें सिद्ध होत नाहीं कीं, स्वभावतः सुखावह असें जें स्वातंत्र्य त्याचा आवश्यकतेबाहेर संकोच करून घेण्यांत कोणत्याही प्रकारचा फायदा आहे. पण चमत्कार असा आहे कीं, मनुष्य एकांतावस्था टाकून जसजसा समाजप्रिय होत जातो तसतशी त्याची स्वातंत्र्यशक्तीहि थोडीशी क्षीण होत जाते, व अखेरीस त्यास ही शुद्ध दास्यावस्थाही असह्य वाटेनाशी होते. पण ही त्याची अंत्यावस्था नव्हे. आपणांस जे स्वामी म्हणवीत असतात अशांचें दुष्ट वर्तन व त्यामुळें मनास व शरीरास वारंवार होणारी पीडा यांमुळें अत्यंत सहनशील मनुष्यास आपल्या नैसर्गिक स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याची इच्छा उत्पन्न होते. एकदां या इच्छेनें त्याच्या अंतःकरणांत बळकट मूळ धरलें कीं, त्याच्या उन्नतावस्थेस आरंभ झाला म्हणून समजावें. ज्यांना नेहमीं दुसऱ्यावर जुलूम करण्याची किंवा सत्तेचा अंमल बजावण्याची संवय असते, ते असें म्हणतात कीं, मनुष्य हा आप्पलपोटा प्राणी आहे; स्वहितासारखी त्याला दुसरी प्रिय वस्तु नाहीं; व कोणतीही गोष्ट करण्यांत स्वहितसाधनाहून त्याचा अन्य हेतु असत नाहीं. जुलमी लोकच अशा तत्त्वशास्त्राचे प्रतिपादक व प्रसारक असण्याचें कारण असें कीं, एक तर ज्या वृत्तीच्या धोरणानें त्यांचें वर्तन अहोरात्र होत असतें त्या वृत्तीशीं इतर वृत्तीपेक्षां त्याचा विशेष सहवास असल्यामुळें त्याच्या डोळ्यांपुढें सर्वत्र तीच दिसत असते व आपल्या अंतःकरणाप्रमाणें इतरांच्या अंतःकरणांतही तिचेंच साम्राज्य असेल अशी त्यांची भावना होते. दुसरें असें कीं, त्यांच्या जुलमास कंटाळलेले व त्रासलेले लोक संतापून जाऊन स्वसंरक्षणासाठीं हवें तें धाडस करण्यास प्रवृत्त होत असतात. यामुळें त्यांना आसमंतांतील सर्व सचेतन जगत् स्वार्थपरायण होऊन आपल्या नाशास उद्युक्त झालें आहे, असें वाटत असतें. व आपणच त्यांच्या संतापाचें व धाडसाचें आदिकारण आहों याचें भानही नाहीसें होतें! परंतु स्वातंत्र्याचा उपभोग प्राप्त होत असलेल्या मनुष्यांचें वर्तन ज्यांनीं थोड्या काळजीनें पाहिलें असेल त्यांना असें दिसून आलें

असेल कीं, स्वातंत्र्याचा नित्य अनुभव घेणारा मनुष्य स्वहितपरायण असत नाहीं इतकेंच नाहीं, तर बराच परोपकारी, निदान परहितचिंतक तरी असतो. आपल्या श्रमाचें सारें फल आपणासच उपभोगावयास सांपडावें, ही मनुष्याच्या अंतःकरणाची पूर्णावस्था नव्हे; त्या फलाची हवी तशी व्यवस्था लावण्याची मोकळीक आपणास असावी, ही त्याची आकांक्षा असते; व ही जसजशी परिपूर्ण होत जाते तसतशी स्वार्थबुद्धी क्षीण होत जाऊन तो पराकाष्ठेचा परहितैषी होत जातो. तात्पर्य काय कीं, बलात्कार, जबरदस्ती, बळजोरी, सक्ति इत्यादि शब्दांनीं व्यक्त होत असलेल्या अर्थाच्या व्यवहारांपासून मनुष्याच्या सुखास पूर्णावस्था येण्याचा संभव नसल्यामुळें तसले व्यवहार नाहींसे होत असून त्यांच्या जागीं समय, संमति, अनुरोध, रुकार, पसंती इत्यादि शब्दांनीं व्यक्त होत असलेल्या अर्थाच्या व्यवहारांचा प्रचार सर्वत्र पडत आहे. तेव्हां येथून पुढें राजा व प्रजा; कुलेश व कुलावयव; पति आणि पत्नी; मातापितरें व अपत्यें; स्वामी आणि सेवक; गुरु आणि शिष्य; विक्रेता आणि ग्राहक; यांतील व्यवहार आणि संबंध उत्तरोत्तर बलात्कारानें न होतां संमतिपूर्वक होत जाणार आहेत.

× × ×

मनुष्याचें स्वच्छंदी वर्तन दोन प्रकारांनीं विघातक होण्याचा संभव असतो; एक दुसऱ्याला आणि दुसरें त्याचें त्याला. जर कोणत्याहि व्यक्तीची वागणूक त्याची त्याला किंवा दुसऱ्याला अपायकारक होण्याचा संभव नसेल तर त्याला ती हवी तशी करूं देण्यास प्रत्यवाय कशासाठीं करावा हें समजत नाहीं. आतां येवढें खरें आहे कीं, हें वर्तनतत्त्व अशा भावार्थानें किंवा विविक्तत्वानें सांगितलें असतां तें कळण्यास सुलभ व आचरण्यास सुकर असें वाटतें. पण नित्य व्यवहारास तें लावूं लागलें असतां फार अडचणी येतात. कारण ज्याप्रमाणें प्राण्यांच्या शरीरांतील अवयव निराळे आहेत व त्यांना पृथक् कामें करावीं लागतात, तरी त्या सर्वांनां एकमेकांवर कमी अधिक अवलंबून असावें लागून एकमेकास सहायभूत व्हावें लागतें, त्याप्रमाणें समाजाचे अवयवही जरी निराळे आहेत, आणि ते पृथक् कामें करीत असतात, तरी त्यांचें एकमेकांवर अवलंबून असून त्यांना एकमेकास सहायभूत

व्हावें लागतें; आणि असें न होईल तर, ज्याप्रमाणें शरीरांतील चैतन्याचा लय होऊन त्याबरोबर सर्व अवयवांचा नाश होईल, त्याप्रमाणें समाजाचे अवयवहि एकमेकास साहाय्य न करतील तर समाजाची वाताहात होऊन प्रत्येकास आपापल्या चरितार्थासाठीं खुद्द स्वतःवर अवलंबून रहावें लागेल. व्यक्तीच्या शरीरांतील अवयवांत आणि समाजाच्या शरीरांतील अवयवांत एक मोठा भेद आहे तो हा कीं, ज्याप्रमाणें समाजाच्या प्रत्येक अवयवास ज्ञान, संवेदन, इच्छा इत्यादि मनोधर्म पृथक्त्वानें असल्यामुळें सुखदुःखाचा अनुभव प्रत्येकास होत असून, तें संपादण्याविषयीं किंवा टाळण्याविषयीं प्रत्ये-काचा प्रयत्न निरंतर चालू असतो, त्याप्रमाणें व्यक्तीच्या शरीरांतील प्रत्येक अवयवाची स्थिति नाहीं. त्यापैकीं प्रत्येकास मन नाहीं. त्या सर्वांचे व्यापार नीट चालणें ही गोष्ट ज्या एका व्यक्तीचे ते अवयव आहेत त्या व्यक्तीस कल्याणकारक आहे. समाज हा काल्पनिक पुरुष आहे. समाजाचें कल्याण म्हणजे या काल्पनिक पुरुषाचें कल्याण नव्हे, तर त्याच्या अवयवांचें कल्याण होय. व्यक्तीची तशी गोष्ट नाहीं. व्यक्तीच्या अवयवांस स्वतंत्र मन नसल्या-मुळें व्यक्तीचें जें कल्याण तेंच त्यांचें कल्याण होय. व्यक्तिशरीर आणि समाजशरीर यांतील या महत्त्वाच्या भेदामुळें त्याविषयीं विचार करतांना व लिहितांना ही गोष्ट नेहमीं डोळ्यांपुढें ठेवावी लागते कीं, व्यक्तीच्या अव-यवांच्या हितासाठीं जे नियम घालावयाचे ते वास्तविक पहातां ते ज्या व्यक्तीचे अवयव असतील त्या व्यक्तीच्या हितासाठीं असतात; व समाजाच्या हिता-साठीं जे नियम करावयाचे ते वास्तविक पहातां, समाजाच्या अवयवांच्या हितासाठीं असतात. तेव्हां व्यक्तींच्या हिताकडे दुर्लक्ष झालें तरी हरकत नाहीं; समाजाचें हित साधलें म्हणजे झालें, असें बोलणें म्हणजे असंबद्ध प्रलाप करण्यासारखें होय; कारण व्यक्तींच्या हिताहून निराळें असें समाजाचें हित नाहीं. तथापि अशा अर्थाचीं वाक्यें नेहमीं उच्चारण्यांत येतात व तीं चांगल्या चांगल्या लोकांच्या तोंडून येतात; तेव्हां वरील अर्थाहून त्याचा कांहीं तरी भिन्न अर्थ असला पाहिजे. सूक्ष्म विचारांतीं असें दिसून येईल कीं, जेव्हां अशा प्रकारचे लोक समाजाच्या हिताविषयीं कळकळ व व्यक्तीं-च्या हिताविषयीं उदासीनता दाखवितात, तेव्हां त्यांचा खरा भावार्थ असा असतो कीं, समाज म्हणजे त्यांतील बहुतेक किंवा निदान प्रमुख लोक. व्यक्तींच्या

फायद्याची परवा करण्याची गरज नाहीं, म्हणजे कोणत्याहि गोष्टीमुळें पुष्कळांचें कल्याण होत असून, थोड्यांस पीडा होत असेल तर ती बेधडक करण्यास हरकत नाहीं. कित्येकजण हा स्थूल अर्थ संकुचित करून, राष्ट्राच्या राजाचें किंवा त्यांतील श्रेष्ठ लोकांचें जें कल्याण तें साऱ्या राष्ट्राचें किंवा समाजाचें कल्याण असा विशिष्ट अर्थ करतात. अशा अर्थानुरोधानें ज्या समाजांत वर्तन होत असतें, त्यांत एका पक्षाकडे संपत्ति आणि सत्ता व दुसऱ्या पक्षाकडे दारिद्र्य आणि दास्य अशी वांटणी झालेली असते. अशा समाजांतील सामान्य लोकांस शुद्ध वन्यावस्थेंतील सुखाहून अधिक सुख होत असेल असें जरी मानितां आलें, तरी त्यांत त्यांचें पूर्ण समाधान होण्यासारखें तें नसलेंच पाहिजे हें उघड आहे. प्रत्येकानें वन्य पशूप्रमाणें रानोमाळ फिरत असावें, यापेक्षां ओबडधोबड समाजरचना होऊन कांहींनीं स्वामी व कांहींनीं किंकर व्हावें, ही स्थिति बरी. कारण कशा तरी रीतीनें समाज एकवार अस्तित्वांत आल्याशिवाय, त्यांतील अवयवांस त्यापासून होणाऱ्या सुखाचा लाभ होऊं लागणें अशक्य आहे. पण मनुष्यें समाज स्थापूं लागल्याबरोबर त्यांत जीं शारीरिक किंवा मानसिक सामर्थ्यानें इतरांहून श्रेष्ठ असतील त्यांच्या हातीं सत्ता व बहुतेकांच्या श्रमांचें फळ जाणें अगदीं स्वाभाविक आहे. तेव्हां समाजाच्या प्रथमावस्थेंत जे सामर्थ्यवान् असतील त्यांच्या हातीं सत्ता असणें व दुर्बलांना दास्य करावें लागणें हें ज्या दिशेकडे उतार असेल त्या दिशेस पाण्याचा ओघ जाण्यासारखें होय. (हा ओघ बंद करून सर्वांस सारखें, निदान होईल तितकें सारखें, सुख मिळण्याची व्यवस्था होत जाणें म्हणजे सुधारणा होत जाणें, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

हे सुधारक लोक अमुक गोष्ट चांगली, तमुक गोष्ट वाईट; अमक्या गोष्टीसाठीं कायदा करावा, तमकीसाठीं मंडळी स्थापावी; अशी जी एकसारखी वटवट करीत असतात ती कशासाठीं ? अमक्या अमक्या गोष्टी करण्यांत आपला व दुसऱ्याचा फायदा आहे, अशी त्यांची पक्की खात्री झाली असेल तर त्यांनीं त्या करून दाखविण्यास कां प्रवृत्त होऊं नये ? असा प्रश्न वारंवार पुष्कळ लोक करीत असतात, व बोलण्याप्रमाणें सुधारकांचें आचरण नाहीं, तेव्हां त्यांच्या बोलण्याकडे लक्ष देण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असा गर्वयुक्त प्रलाप करून, आपल्या कोत्या समजुतीनें आपलें समाधान करून घेत असतात ! या अज्ञान जातींत तीन प्रकारच्या लोकांचा समावेश होतो. एक, ज्यांना नवीन गोष्टींचें चांगलेपण कळण्याची अक्कलच नाहीं असे. असल्या लोकांच्या कानांपाशीं हवा तितका आक्रोश करा, प्रमाणें दाखवा, मारा, तोडा—काय पाहिजे तें करा, हे म्हणून कांहीं केलें तरी आपला ग्रह सोडावयाचे नाहींत ! गव्याच्या धांवेसारखी यांची धांव असते. वयांत येईपर्यंत कसले बसले जे ग्रह झाले असतील ते यांची जन्माची पुंजी ! तींत नवें जुनें कधींही व्हावयाचें नाहीं ! यांचें ज्ञान अत्यंत स्वल्प असतांही यांना सर्वज्ञतेची फारच मोठी घमेंड असते, व नवीन विचारांचा व ज्ञानाचा तिरस्कार करण्यांत हे कोणासही हार जाण्यासारखे नसतात ! सारांश, ओतीव लोखंडाप्रमाणें यांचे आचार व विचार असतात, व कोणाचाही यांच्याशीं सामना झाला असतां त्यापासून रागाच्या ठिणग्या पडण्याखेरीज दुसरा कोणताही परिणाम होत नाहीं ! दुसऱ्या प्रकारांत समंजस पण भेकड असे लोक येतात. यांना चांगलें काय व वाईट काय, त्याज्य काय व संग्रहणीय काय हें समजत असतें; पण जें योग्य वाटत असेल तें बोलण्याचें किंवा करण्याचें धैर्य यांच्या अंगीं बिलकूल नसतें. ते लोकापवादाच्या ओझ्याखालीं दडपून गेलेले असतात. डोळे बांधलेला तेल्याचा बैल ज्याप्रमाणें घाण्यासभोंवतीं एकसारखा फेऱ्या घालीत असतो, त्याप्रमाणें हे पोटांत ज्ञान

असूनही लोकलज्जेमुळें अंध होऊन पूर्वापार चालत आलेल्या रूढीचें व विचाराचें लोण पुढल्या पिढीपर्यंत पोंचवीत असतात! एकीकडे तुम्ही यांच्याशीं वाद करीत बसलां असलां, तर कदाचित् ते असें कबूल करतील कीं, तुमचें म्हणणें बरोबर आहे व तदनुसार लोकांचें वर्तन होऊं लागल्यास, त्यांत त्यांचें कल्याण होण्याचा संभव आहे; पण असलें काम करण्यास आम्ही प्रवृत्त होणार नाहीं व असल्या गोष्टींचा उघडपणें स्वीकार करण्याचें धैर्य आमच्या अंगीं नाहीं, असें ते तुम्हांस साफ सांगतील. असले लोक बहुशः दुसऱ्यांच्या आचाराविषयीं व विचारांविषयीं उदासीन असतात; पण आणी-बाणीचा प्रसंग आल्यास हे आपल्या विचारशक्तीस गुंडाळून ठेवून, पहिल्या प्रकारच्या अज्ञान, अविचारी व आग्रही लोकांचें अनुगमन करतात! या दोहों-शिवाय सुधारणानिंदकांचा आणखी एक प्रकार आहे, तो मात्र अतिशय खड-तर आहे, असें म्हणणें भाग आहे. यांतील लोक पहिल्याप्रमाणें मूढ नसतात व दुसऱ्याप्रमाणें भेकड नसतात. बरेंवाईट यांस कळत असतें व उचित दिसेल तें करण्याचें किंवा बोलण्याचें धैर्य यांचे अंगीं असत नाहीं, असें मानतां येत नाहीं. असें असतां सुधारणेस या लोकांकडून जितका अड-थळा होतो, तितका दुसऱ्या कोणाकडूनही होत नाहीं. हा होण्याचें कारण यांची अमर्याद स्वार्थपरायणता. हिला तृप्त करण्यासाठीं हे काय करतील आणि काय करणार नाहींत, हें ब्रह्मदेवाला देखील सांगवणार नाहीं! यांची स्वार्थपरायणता म्हणजे यांचा द्रव्याभिलाषच नव्हे. यांना नुसत्या पैशाचाच हव्यास असता व त्यांच्या अंगीं तेवढाच दुर्गुण असता तर त्यांचें वर्तन जितकें निंद्य होत आहे तितकें कधींच होतें ना. त्यांची स्वार्थपरायणता पराकाष्ठेची व्यापक आहे. कोणतीही गोष्ट कितीही चांगली असली तरी जर तीपासून त्यांचें कोणत्याही प्रकारचें यत्किंचित् नुकसान होण्याचा संभव असला तर ते ती हाणून पाडण्यासाठीं आकाशपाताळ एक करून सोडण्याचा प्रयत्न करतील! यांच्या वर्तनाचा बराच भाग लबाडीचा असतो. पूजाअर्चा वगैरे सारे धर्मविचार झूट आहेत, अशी यांची पक्की खातरी झाली असून, हे प्रतिदिवशीं तास दोन तास संध्या ब्रह्मयज्ञांत घालवतील; सर्वांगाला भस्म फासून घेतील; श्रावणीचे दिवशीं शेर दोन शेर पंचगव्य पितील व नख-शिखांत शेणमाती चोपडतील! चौदा वर्षांच्या पोराचे गळ्यांत आठ वर्षांच्या

पोरींचें लोढणें बांधणें म्हणजे त्याची सर्व प्रकारची पुढील गति खुंटविणें होय, हें यांस पक्कें समजत असूनहि कर्ज काढून अल्पवयस्क पोरी विकतील, व मनासारखी किंमत आल्यास आपले पोरगे विकत देतील! स्वतःच्या घेऱ्याचा किंवा मिशीचा एक केंस फाजील कापला गेला तर ते निल्याच्या न्हाव्यावर वाघासारखें चवताळून जावयास सोडावयाचे नाहींत, व मातापितरांपैकीं एखाद्याचा अंत होऊन आपल्या मुखभूषणावर स्वल्पकालीन गदा आली, तर ज्यांस मरणप्राय दुःख झाल्याशिवाय रहावयाचें नाहीं, अशा लोकांना, घरीं आलेल्या सुनेस किंवा मुलीस, जवळचें पर्व साधून जबरीनें न्हाव्याच्या ताब्यांत देण्यास काडीएवढे देखील वाईट वाटावयाचें नाहीं! चोरटेपणानें हे पाहिजे तसलीं कुकर्मे करतील. एकांतांत किंवा ठरीव कंपूंत इंग्रजी भाषेंतील ब्रँडी या शब्दांतून निघणाऱ्या ड्यंत त्र्यींपैकीं कोणतीहि वस्तू यांना कदाचित् वर्ज्य असणार नाहीं; पण समाजांत हे अपेयपानाचा, अगम्यगमनाचा व अभक्ष्यभक्षणाचा इतका तिटकारा दाखवतील कीं, तो पाहून एखाद्या भोळसटास हे शुद्धत्वाचे खंदक आहेत कीं काय, असा भास होईल! तात्पर्य, बहुजनसमाजाकडून 'शाबास' म्हणवून घेण्यासाठीं व आपल्या मिळकतीस धक्का पोंचूं न देण्यासाठीं दंभ, निष्ठुरता व अविचार यांचा हे किती अवलंब करतील, हें सांगतां येणें अशक्य आहे! असल्या लोकांनीं सुधारकांस 'तुम्हीं करून कां दाखवीत नाहीं, निराळी जात कां स्थापीत नाहीं, उदाहरण कां घालून देत नाहीं,' असे प्रश्न करण्यांत विशेष पुढारीपण घेऊन, आपण पूर्वाचाराचे भजक, तारक व प्रवर्तक आहों, अशी सामान्य लोकांस भुरळ पाडून त्यांस प्रतिदिवशीं चकवावें आणि स्वार्थसिद्धीसाठीं त्यांना हवेंतसें बुचाडून, सन्मार्गाकडे त्यांच्या अंतःकरणाची प्रवृत्ति सहसा होऊं देऊं नये, हें अत्यंत स्वाभाविक आहे!

या तीन प्रकारच्या सुधारणानिंदकांस आम्हीही 'करून कां दाखवीत नाहीं?' हाच प्रश्न घालतों. बालविवाह आणि केशवपन यांचा निषेध करण्यासाठीं कायद्याचें साहाय्य घेणें अप्रयोजक होय, असें यांचें म्हणणें आहे. सामाजिक गोष्टींत सरकारनें हात घालणें हें अपायकारक आहे, अशी यांची खातरी झाली असेल तर वेश्यागमन, मदिरापान वगैरे व्यसनें बंद करण्यास किंवा कमी करण्यास यांनीं सरकारास कां आळवावें, हें समजत

नाहीं ! विवाहित स्त्रीच्या नाकावर टिच्चून जो पण्यांगना घरांत ठेवील, किंवा प्रतिदिवशीं बुद्धिभ्रंशक आसवांचे नेमानें एकदोन ग्लास झोकील, त्यास अमुक इनाम किंवा पदवी द्यावयाची, असें सरकारनें ठरविलें आहे, असें निदान आमच्या तरी ऐकण्यांत आलेलें नाहीं ! किंवा आम्ही ज्याप्रमाणें अल्पवयस्क मुलांस व मुलींस मदनेंद्दालांत जबरीनें कोंडून घालतों, त्याप्रमाणें कुलटावाटिकांत नागरिकांस किंवा जानपदास लोटण्यासाठीं, अथवा लहान मुलांस ज्याप्रमाणें आपण पायांवर घालून त्यांच्या मर्जीविरुद्ध कांहीं औषध पाजतों, त्याप्रमाणें आमच्या नाकपुड्या मिटून व आमचीं तोंडें उघडून, त्यांत दारूचे औंस दोन औंस ओतण्यासाठीं, सरकारनें एखादें स्वतंत्र खातें ठेविलें आहे, असेंहि कोणास म्हणतां येणार नाहीं ! या व्यसनांविषयीं आम्हांस जी आसक्ती उत्पन्न झाली आहे ती आमच्याच अविचाराचें फळ आहे. असें असून तिच्या शमनार्थ आम्हीं सरकाराकडे धांव घ्यावी आणि आपला कमकुवतपणा उघडा करावा, हें योग्य आहे काय ? पण आम्हांस अक्कल कोठून असणार ? 'आपलें तें सोनें आणि दुसऱ्याचें तें कारटें' असें कोणत्या अविचारी मनुष्यास वाटत नाहीं ! याचप्रमाणें बुद्धिविकासक शिक्षण यांत्रिक शिक्षण, धंदेशिक्षण, व्यापार, आरोग्य, वगैरेंची गोष्ट होय. या कामांतहि सरकाराकडे तुम्ही कां जातां ? यासंबंधानें ज्या सुधारणा तुम्हांस हव्या असतील त्या तुमच्या तुम्ही कां करून दाखवीत नाहीं ? असा प्रश्न या तीन वर्गांतील लोकांस घालण्याचा अधिकार यांच्याच विचारशैलीप्रमाणें आम्हांस येत नाहीं काय ?

पण हेंहि असो. ज्या गोष्टींविषयीं आतां कोणत्याहि समाजांत मतभेद उरलेला नाहीं, म्हणजे ज्या अपायकारक व निंद्य आहेत, अशाविषयीं कोणासही शंका राहिलेली नाहीं, अशा गोष्टींच्या निषेधासाठीं तरी सरकारची मदत कशासाठीं मागावी ? चोरी करणें, खोटी साक्ष देणें, खोटे कागद करणें, करार मोडणें, शिवीगाळ करणें, अब्रू घेणें, दहशत घालणें, खोटें बोलणें, निरुद्योगी असणें, मारामार करणें वगैरे गोष्टी तर सर्वानुमतें वाईट ठरल्या आहेत ना ? मग अशा प्रकारची आगळिक जर कोणाकडून झाली तर त्याला दंड करण्यासाठीं सरकारकडे कशासाठीं जावें ? पण ज्या देशांत अशा अपराधांबद्दल शिक्षा देण्याचें काम सरकारकडे नाहीं, असा एकतरी

सुधारलेला देश आहे काय? किंवा अशा अपराधांची चौकशी करणें व त्यांबद्दल योग्य दंड करणें हें सरकारचें कर्तव्य नाहीं, असें प्रतिपादणारे 'थंड सुधारक' कोणत्याहि सुधारलेल्या देशांत असतील काय? असतील असें आम्हांस वाटत नाहीं. उलट आमची अशी समजूत आहे कीं, कोणत्याहि देशांत जों जों अधिकाधिक सुधारणा होत जाते तों तों त्यांतील लोकांच्या अंगीं अधिकाधिक सूक्ष्मवेदित्व किंवा शीघ्रग्राहित्व येत जातें व त्यामुळें त्यांचा एकमेकांपासून एकमेकांस जितका कमी त्रास होईल तितका होऊं देण्यासाठीं व प्रत्येकास अधिकाधिक स्वातंत्र्याचा उपभोग मिळण्यासाठीं, प्रतिदिवशीं नवीन नवीन गोष्टींत सरकारचें साहाय्य घेऊन, कायद्यांची संख्या वाढविण्याचा आणि त्याप्रमाणें न्याय देण्यासाठीं न्यायाधिशांचें काम अधिकाधिक कठिण करण्याचा क्रम एकसारखा चालू आहे अशा प्रकारच्या बाह्य बंधनांनीं मनुष्यांच्या अंतःकरणांतील दुष्प्रवृत्तींचा मोड हळूहळू होत जाऊन, त्यांचें बहुतेक वर्तन सहजगत्या नीतिसंमत किंवा न्यायानुसारी होऊं लागल्याशिवाय या क्रमास खळ पडणार नाहीं,| असें वाटतें. समाज हा स्वाभाविकपणें ज्यास अनेक पैलू आहेत अशा खड्यासारखा आहे. असला खडा खाणींतून नुकताच काढला असल्यास, विशिष्ट आकार, सफाई किंवा तेज यांपैकीं कोणतेच गुण त्यांत नसतात, पण कल्पक सुवर्णकारांकडून जसजसें त्यावर घर्षण होत जातें तसतसें त्यास मोहक स्वरूप येत जातें. देशांतील विचारी लोक हे कल्पक सुवर्णकार होत व समाज हा त्यांच्या हातीं दिलेला पैलूदार खडा होय. या खड्यावर सरकारी साहाय्य, स्वतःचा प्रयत्न वगैरे हत्यारांनीं काम करून ते त्यास मोहकपणा आणितात. ज्या कामास ज्या वेळीं जें हत्यार पाहिजे असेल तें घेतलें पाहिजे. आज मित्तीस आमच्या समाजाची अशी दीनवाणी स्थिति झाली आहे कीं, प्रत्येक गोष्टींत आमच्या मनांत असो किंवा नसो, थोडेंबहुत सरकारचें साहाय्य घेतल्याशिवाय आमच्या हातून कांहीं एक होत नाहीं. कोणी लोकशिक्षणाचा पैलू घांसून वाटोळा करण्यासाठीं सरकारची मदत मागतात! कोणी सद्गुणांच्या पैलूवरील मदिरादि व्यसनांचा मळ उडविण्यासाठीं तेंच करतात [आम्ही आमच्याकडे घेतलेल्या पैलूस इतर पैलूंप्रमाणें चांगला आकार व सफाई आणण्यासाठीं तेंच करीत आहों!] सबब आम्हीं मात्र तें काम सद्यःस्थितींत

स्वप्रयत्नाच्या हत्यारानें करावें आणि दुसऱ्यांनीं सरकारी हत्याराची हवी तितकी मदत घ्यावी, हें म्हणणें वाजवी नाहीं! सरकारी हत्यार न वापरण्याचे दिवस येतील तेव्हां ते सावकाशसच येतील! आज त्यावांचून कोणाच्या हातून कांहींच होण्यासारखें नाहीं, हें सूक्ष्म विचाराअंतीं प्रत्येक समंजस मनुष्यास समजण्यासारखें आहे. सगळे पैलू साफ झाल्याखेरीज समाजखडा कोहिनुराप्रमाणें कधींच चमकूं लागणार नाहीं, हें ज्यानें त्यानें ध्यानांत वागवून, आपापल्या पैलूवर होईल तितकी मेहनत करीत असावें, आणि मत्सर व क्षुद्र बुद्धि यांचा त्याग करून, दुसऱ्यास होईल तितका हातभार लावावा, हाच सुधारणेचा अत्यंत प्रशस्त मार्ग होय.

आतां एक महिनाभर सर्व देशभर कर्णमनोहर शंखध्वनि चालणार! हिंदुधर्माच्या नांवाखालीं मोडणारे जे अनेक लज्जास्पद आचार या देशांत रूढ आहेत त्यांत शिमग्याला पहिला नंबर दिला पाहिजे. इतका बीभत्स सण दुसऱ्या कोणत्याहि देशांत पाळला जात असेल असें आम्हांस वाटत नाहीं. माघ शुद्ध पौर्णिमेपासून फाल्गुन वद्य पंचमीपर्यंत हिंदु लोकांस पशुतुल्य वर्तन करण्याचा पास दिला आहे! दारू, अफीम, गांजा वगैरे मादक पदार्थ मोठे घातक आहेत; परंतु ते मुळींच विकूं दिले नाहींत तर त्यांपासून होणाऱ्या फायद्यांस अजीबात अंतरावें लागेल, म्हणून त्यांचे मक्ते देण्याचा व त्यांच्या विक्रीकरितां परवाने काढण्याचा प्रघात सर्व ठिकाणीं पडला आहे; व याच प्रघाताचें अनुकरण, शिमग्याचा सण स्थापणारांनीं केलें असेल कीं काय असा संशय उत्पन्न होतो! सगळे लोक वर्षांच्या वर्षें अचकट बोलल्याशिवाय, किंवा उघडपणें जनावरासारखें वागल्याशिवाय राहिले तर, त्यांना सदाचरणाची मोडशी होईल अशी भीति वाटून प्रतिवर्षीं निदान एक महिना त्यांस मनसोक्त वागूं देणें जरूर आहे, अशा हेतूनें आमच्या शास्त्रकर्त्यांनीं ही हुताशनीची पूजा अस्तित्वांत आणिली कीं काय कोण जाणे! अलीकडे मोठमोठ्या शहरांत व अर्वाचीन पद्धतीचें शिक्षण मिळालेल्या लोकांत या व्रताचें माहात्म्य थोडेंसें कमी होत चाललें आहे; तथापि याच वर्गापैकीं कित्येक इसमांस धर्मश्रद्धेची जी उकळी फुटल्यासारखी दिसत आहे, तीमुळें या निंद्य धर्माचाराचें हे इसम मोठ्या निकरानें मंडन करण्यास पुढें सरसावण्याचा संभव आहे! **सुधारकानें** किंवा सुधारकांनीं अमुक जुना आचार बेवकूफपणाचा ठरविला ना, तर मग आपणांला त्याचें वकीलपत्र घेतलेंच पाहिजे, असा या इसमांचा निश्चय झाल्यासारखा दिसतो. होवो बापडा! सकाळीं, दुपारीं, संध्याकाळीं व रात्रीं शेफारलेल्या व उनाड, टारग्या पोरांनीं रस्तोरस्तीं अनिर्वाच्य शब्द तोंडांतून काढावे आणि सभ्य स्त्रियांस व पुरुषांस लज्जेनें माना खालीं

घालून निमूटपणें जावें लागावें, येवढयानेंच या आचाराची परमावधि होती, तर याकरितां आम्ही एका आर्टिकलाची जागा आडविली नसती. पण तसें नाहीं. माघी पौर्णिमेपासून जसजसे अधिकाधिक दिवस लोटत जातात तसतसे अधिकाधिक वयाचे लोक या प्रतिसांवत्सरिक बीभत्सपणाचे भागीदार होऊं लागतात; अखेरीस फाल्गुन शुद्ध पौर्णिमेला प्रत्येक हिंदु-गृहांत हुताशनीची पूजा होऊन तिच्याभोंवतीं प्रदक्षिणा घालतांना हें अमंगल फाल्गुनवाद्य गृहाधिपतीकडून घरांतलि बायकांच्या, मुलींच्या व मुलांच्या समक्ष यथाशास्त्र वाजविलें जातें! तसेंच या तिथीला गांवांतलि मोठमोठ्या देवळांपुढें किंवा चवाठ्यांच्या जागांवर रचलेल्या सार्वजनिक होळ्यांस संध्याकाळीं गांवांतील मानकऱ्यांकडून अग्नि देववून त्यांच्या सभोंवतीं या अत्यंत शुभसूचक मुखवाद्याचा गजर करण्याची रीत आहे!

या उत्सवाचा येथेंच शेवट होता तरीदेखील फार चांगलें झालें असतें; पण आमचे हिंदु लोक धर्माला खूष राखण्याविषयीं फार उत्कंठ असल्यामुळें या राक्षसी, पैशाचिक, किंवा रानटी देवीचा ते पूर्ण पांच दिवस मोठ्या थाटाचा उत्सव करतात! तमाशांच्या छकडी, वेश्यांचीं गाणीं, रंगाची शिंपणी—यासंबंधाचा अप्रशस्तपणा असावा त्याहून वाईट आहे; पण कित्येक ठिकाणीं धुळवडीच्या दिवशीं जो समारंभ होतो त्यापुढें हा अप्रशस्तपणा सूर्यापुढें काजव्यासारखा फिक्का पडतो! लहानमोठे गृहस्थ होळीच्या राखेंत माती, शेण व त्याहूनहि घाण अशीं द्रव्यें मिसळून तयार केलेल्या खातेऱ्यांच्या पंचामृतानें आपापलीं अंगें नखशिखांत माखून घेतात व 'टेंपरवारी' ब्रह्मस्वरूप कित्येक मोठ्या हौसेनें धारण करतात. नंतर एखादें चावरें, लाथरें व नाळ लागलेलें गाढव हुडकून काढून त्यावर पिछाडीकडे तोंड करून या सोंगापैकीं एक सोंग स्वार होतें. खराटे, केरसुण्याचे बुरखंडे, फाटकीं शिपतरें व सुपें वगैरे जिनसांचीं छत्रचामरें सज्ज झाल्यावर गांवांतलीं सगळीं टारगीं पोरें व तमाशेवाल्यांचा एखादा संच बरोबर घेऊन मोठ्या प्रेमानें विचकट लावण्या म्हणत, नानाप्रकारचे उखाणे म्हणत, नवीन मनुष्य दिसला कीं, त्याच्या अंगावर खातेरें शिंपून व त्याच्या वस्त्रांवर घाणेरडे छाप ठोकून त्याला सामान्य घोळक्यांत ओढून घेत, व ठिकठिकाणीं उभें राहून जाणाऱ्या-येणाऱ्या बायकांच्या किंवा या

छबिन्यांत येऊन दाखल होण्यास कांकूं करणाऱ्या गांत्रकऱ्यांच्या नांवानें जबरदस्त पांचजन्य करीत, ही सैतानसेना एखाद्या मारुतीच्या, म्हसोबाच्या किंवा गांवांतील चावडीच्या, पटांगणांत येऊन ठेपते आणि तेथें दुपार लोटून जाईपर्यंत यथेच्छ धुळवड खेळल्यावर आंघोळीकरितां तींतील वऱ्हाडी विहिरीवर, तळ्यावर, ओढ्यावर, नदीवर किंवा आपल्या घरीं जाऊं लागतात. धुळवडीचा दिवस हा या सणाचा अत्यंत लाजिरवाणा दिवस आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. अशा प्रकारचा पशूपणा खरोखरीच कायद्यानें एकदम बंद केला पाहिजे. पण जो कोणी सरकारला अशी सूचना करील त्याच्या नांवानें अधिकच पांचजन्य होऊं लागेल यांत संशय नाहीं !

या सणाचे कित्येक भक्त असें म्हणतात कीं, एकसमयावच्छेदेंकरून सर्व देशभर होळ्या पेटविल्यानें व त्यांत दूध, तूप व पोळ्या जाळल्यानें जो सुवासिक धूमकल्होळ उत्पन्न होतो त्यामुळें मनुष्याच्या जीवितास अपायकारक असें, वातावरण व्यापून राहणारे परमाणुरूप सूक्ष्म कृमि नाशास पावून हवा शुद्ध होते, व रोगाचें बीज नाहींसें होतें; तसेंच होळीच्या भोंवतीं बोंब मारण्याची आमच्या पूर्वजांनीं जी चाल घातली आहे तीवरून असें व्यक्त होतें कीं, आग लागली असतां तिचा उपशम करण्यास बोंब मारण्यासारखा उत्कृष्ट उपाय नाहीं ! कारण या अद्वितीय भारतीय शिंगाचा किंवा टेलिफोनचा स्वर कानीं पडल्याबरोबर चार लोक चोहोंकडून धांवत येतात, आणि आग विझविण्याचा प्रयत्न करितात ! शिमग्यांत जो बेताल विचकटपणा चालतो तोहि केवळ वावगा आहे असें नाहीं. ज्याप्रमाणें ठाणावर डांबून घातलेला घोडा मस्त होतो, त्याचप्रमाणें मनुष्यस्वभावांत ज्या दोनचार दांडग्या वृत्ति आहेत, त्यांना नेहमींच कोंडून ठेवलें तर त्या फारच त्रासदायक होतात; सबब कधीं कधीं त्यांना खुल्या करणें जरूर आहे. एंजिनांत फार वाफ जमली तर ती रक्षकद्वारानें ( Safety valve ) सोडून दिली पाहिजे, नाहीं तर तिच्या अनावर सामर्थ्यामुळें समग्र एंजिनाचे तुकडे होतात. मनुष्यांच्या विकारांचीहि तशीच गोष्ट आहे. पाळीपाळीनें साऱ्यांची सोय लाविली पाहिजे. अलंकारिकांनीं नवरसांत बीभत्स रसाचाहि समावेश केला आहे, हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. दुर्भाषण करणें, खातेऱ्यांत लोळणें,

उच्चनीचत्वाचा भाव टाकून क्षणभर लहानथोरांनीं बरोबरीच्या नात्यानें एकमेकांशीं वागणें, थट्टा करणें वगैरे गोष्टी इतर गोष्टींप्रमाणेंच मनुष्यास हव्याशा व अवश्य वाटतात; ज्याप्रमाणें इतर गोष्टींनीं त्याप्रमाणें यांनींहि त्याचें मनोरंजन व सुखवृद्धि होते; तेव्हां यांचाहि अगदींच निषेध करतां कामा नये !)

ही विचारसरणी शिमग्याच्या भक्तांस केवळ निरुत्तर वाटणार आहे, व जे पूर्वपद्धतीचे लेखक आमच्या या निबंधाविरुद्ध आपली लेखणी उचलतील ते या सरणीचें आपापल्या कलाप्रमाणें वेडेंवांकडें भाषांतर करतील याविषयीं आम्हांस शंका नाहीं ! तथापि मनांतल्या मनांत आपण सैतानाचा पक्ष घेऊन भांडतों आहों, असें त्यांस वाटल्यावांचून राहणार नाहीं. वाईट कृत्यांकडे मनुष्याची सहज प्रवृत्ति आहे. त्या प्रवृत्तीच्या समाधानापासून उत्पन्न होणारें सुख त्यास प्राप्त होण्यासाठीं विशेष काल, विशेष सण, किंवा विशेष ऋतु नेमिले पाहिजेत असें नाहीं. अशा प्रकारचें शिक्षण देण्यासाठीं शाळा घालण्याची गरज नाहीं. मनुष्याच्या सांप्रत स्थितींत दुर्वृत्तींचा अंकुर त्याबरोबरच जन्मास येतो, आणि लहानपणापासून तो खुडून टाकण्याचा किंवा समूळ उपटण्याचा प्रयत्न केला नाहीं तर स्वल्प वयांत तो सारें अंतःकरण आपल्या विषारी विस्तारानें व्यापून टाकून, सद्वृत्तींची वाढ बिलकुल होऊं देत नाहीं. तेव्हां शिमग्याच्या सणासारखे सण नाहींसे करून टाकल्यास आमचें कोणत्याहि प्रकारचें नुकसान होण्याचा संभव नाहीं. शिमग्यावांचून शिमग्यांतले निंद्य प्रकार आपल्या व इतर समाजांत नित्य घडत असतात. आम्ही मात्र त्यांना धर्माच्या नांवानें फाजिल उत्तेजन देऊन आपलें अधिक नुकसान करून घेत आहों.

क्षणभर असें समजा कीं, होळीच्या किंवा धुळवडीच्या दिवशीं एखादा जिज्ञासू प्रवासी जर्मनींतून किंवा चिनांतून येथें आला, आणि रस्तोरस्तीं चाललेला दंगा व बोंबाबोंब पाहून हा काय प्रकार असावा, हें समजून घेण्याच्या इराद्यानें त्यानें कोणा एखाद्या गृहस्थापासून जागोजागीं झडत असलेल्या लावण्यांचा आणि उखाण्यांचा अर्थ समजून घेतला तर तो या आमच्या सणाविषयीं आणि सार्वजनिक नीतिमत्तेविषयीं काय कल्पना करील बरें ! ज्या गोष्टीबद्दल दुसऱ्यापुढें आपणांस अधोवदन करावें लागेल व जी

गोष्ट आपली आपल्यासच शांत वेळीं लाजिरवाणी वाटते, तिचें मिथ्या धर्माभिमानानें मंडण करणें आणि कांहीं मूर्ख लोकांनीं प्रसंगवशात् तिला धर्माधार लावून दिला असल्यामुळें तिचा त्याग करण्यास भिणें, हें खऱ्या धर्मश्रद्धेचें लक्षण नव्हे. शिमगा हा आमच्या धर्मावर फार मोठा डाग आहे. खिस्त्यांच्या हातच्या चहाहूनहि फाल्गुनांतला सार्वजनिक विचकटपणा आणि त्वंपुरा विशेष गर्हणीय आहे; तेव्हां खुद्द श्रीनें किंवा श्रीच्या प्रतिनिधींनीं चहाप्रकरणांतून आपलें लक्ष काढून घेऊन त्याचा मोर्चा या अश्लाघ्य दुराचाराकडे फिरविला तर फार चांगलें होईल असें आम्हांस वाटतें! पण सामान्य लोकांच्या धर्मकल्पनांहून त्याच्या—धर्माधि-काऱ्यांच्या—धर्मकल्पना विशेष उन्नत असतील, असें मानणें म्हणजे समाज-शास्त्राचा विशेष परिचय नाहीं, असेंच व्यक्त करणें होय!

सुधारकाविषयीं कित्येकांचा असा समज झाला आहे कीं, जेवढें जुनें व हिंदु असेल तेवढें नादान ठरविण्याचा त्यानें जणूं काय विडाच उचलला आहे! आमच्या मतें हा समज फार चुकीचा आहे. कोणताहि आचार-विचार आम्हांस चांगला वाटत नाहीं, असा या लोकांस समज कोणत्या कारणामुळें झाला असेल हें त्याचें त्यासच ठाऊक. तथापि सणांच्या संबंधानें त्यांचा आमच्याविषयीं गैरसमज न व्हावा म्हणून आम्ही स्पष्टपणें येथें हेंहि सांगून ठेवतों कीं, शिमग्याचा सण आम्हांस जितका तिरस्करणीय व त्याज्य वाटतो तितकाच दिवाळीचा सण अभिनंदनीय व रक्षणीय वाटतो. या सणांत आम्ही कसे वागतों याचा छडा कोठल्याहि चिकित्सक प्रवाशानें कितीहि काढला तरी आम्हांविषयीं त्याच्या मनांत तिरस्कार उत्पन्न होण्याची अणुमात्र भीति नाहीं. उलट अभ्यंगस्नानें, सुग्रास भक्षण, लक्ष्मीपूजन व जमाखर्चाचा आढावा, देण्याघेण्याचा निकाल, सौम्य व सुखदायक खेळ, दीपोत्सव व दारुकाम, बहिणभावंडांच्या भेटी आणि ओवाळण्या वगैरे गोष्टी कोणत्याहि प्रकारें लाजिरवाण्या नसून त्यामुळें आमच्या सांसारिक वृत्तीची व कुटुंबपद्धतीची रम्य बाजू प्रगट होते. या मंगल प्रकारांची शिमग्यांतील ओंगळ प्रकाराशीं तुलना करा, आणि या प्रस्तुत लेखास दोष देणें योग्य वाटेल तर तो खुशाल द्या.

# आयर्लंडाकडे पाहून तरी जागे व्हा 

(बांधवहो, गिझनीच्या महंमदानें सोमनाथ येथील मूर्ति फोडून जो खजिना लुटला त्यानें, तैमूरलंगानें स्वारी करून तलवार आणि विस्तव यांनीं जो प्रलय करून दिला त्यानें, अवरंगजेबानें दक्षिणेपर्यंत स्वाऱ्या करून जो कहर करून सोडिला त्यानें १७३८ त अफगाणच्या चोरानें जो धुमाकूळ मांडिला होता त्यानें, किंवा १७५९ त अबदालीनें जी कत्तल उडविली तिनें, तुमची निद्रा दूर झाली नसेल तर प्रस्तुत कालीं आयर्लंडांत जो प्रकार चालला आहे तो ऐकून तरी जागे व्हा, आणि देश सुखी कशानें होतो, याचें तत्त्व उमजा.)

जे लोक तुम्हां महाराष्ट्रीयांवर स्त्रैणत्वाचा आरोप करीत असतील, जे तुमच्या अंगीं एकी नाहीं, राजकारणकौशल्य नाहीं, ज्ञान संपादण्याची इच्छा नाहीं, मोठेपणा मिळविण्याची चाड नाहीं, आणि स्वातंत्र्याची गोडी नाहीं, असें म्हणत असतील ते तुमचे मित्र नव्हत, तर शत्रु होत, असें समजून त्यांच्या बोलण्याकडे लक्ष देऊं नका, व आपला आपणच धिक्कार करण्यास लागूं नका. पुराणपूर्व कालापासून पेशवाईचा लय होईपर्यंत ज्ञान, शौर्य, परोपकार, देशप्रीति, स्वामिभक्ति, प्रजावात्सल्य, इत्यादि गुणांबद्दल जे येथें नांव ठेवून अमर होऊन गेले आहेत, त्यांचें नित्य स्मरण करीत जाऊन, व सध्यां आपणांत जे दोष वसत आहेत, त्यांचें शांतपणें निरीक्षण करून, आपल्यापेक्षां पुढील पिढी ज्ञानानें, सद्गुणानें व सुखानें श्रेष्ठ कशी होईल या गोष्टीचें मोठ्या काळजीनें चिंतन करा, आणि मनांत धरलेला हेतु तडीस जाण्यास जे उत्तम उपाय असतील, ते शोधून काढून अमलांत आणण्याविषयीं रात्रंदिवस परिश्रम करा. जे ज्या देशांत जन्माला येतात, जे ज्या देशांतील संपत्तीचा उपभोग घेतात, व ज्याचें ज्या देशांतील सुधारणेवर प्रत्येक प्रकारचें सुख अवलंबून असतें, त्यांनीं त्या देशांतील ज्ञानाचा, संपत्तीचा, नीतीचा व स्वातंत्र्याचा विस्तार करण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली नाहीं, तर त्यांच्यांत, आणि त्याच देशांत उपजीविका

करून आयुष्य कंठणारे जे खालचे जीव त्यांत, भेद तो कोणता? मनुष्यांत आणि पशूंत जो मुख्य भेद आहे, तो हा कीं पशूंना आपलें ज्ञान, व आपलीं सुखें, हवीं तितकीं वाढवितां येत नाहींत. मनुष्याची गोष्ट तशी नाहीं. त्याच्या अंगीं वाग्विचारादि ज्या अनेक शक्ति आहेत, त्यांच्यामुळें त्यास आपलें ज्ञान आणि सुख हवें तितकें वाढवितां येणार आहे. कित्येक वेदात्यांना ज्ञानाची आणि सुखाची वृद्धि करण्यांत कांहीं हांशील वाटत नाहीं; आणि कदाचित् त्यांचें म्हणणें खरेंही असेल. पण ज्ञानवृद्धींत आणि सुखात कांहीं तात्पर्य नाहीं, हें ज्ञान होण्यास तरी अगोदर किती ज्ञान संपादावें लागतें? तसेंच, ज्ञानसंपादनाच्या पाठीमागें जे लागले आहेत, ते सारेच वेदांती झाले, असें कधींही होत नाहीं. पुनः ज्या अर्थीं वैराग्य आणि आधिभौतिक सुखोपभोग, या दोनही गोष्टी अनेक वर्षें लोकापुढें असता, बहुतेकाची प्रवृत्ति पहिल्याकडे न होतां दुसऱ्याकडे होत आहे, त्याअर्थीं मनुष्यप्रकृतीला साधारणपणें आधिभौतिक सुखोपभोग अधिक इष्ट आहे, हें निर्विवाद सिद्ध होतें. समजूं लागल्यापासून मरेतोंपर्यंत, जो तो होईल तितकें सुख संपादण्याच्या, व तें भोगण्याच्या धादलींत असलेला दृष्टीस पडतो, व तो तींत इतका निमग्न होऊन गेलेला असतो, कीं त्याला आपलें खरें सुख कशात आहे, तें कशानें प्राप्त होईल, तें पुष्कळ दिवस टिकेल कशानें, याचा विचार करण्यास, किंवा तें प्राप्त झालें असता थोडा वेळ त्याचा स्वस्थपणें उपभोग घेण्याससुद्धां वेळ सांपडत नाहीं! यामुळें होतें काय, कीं प्रत्येक मनुष्याला आपापल्या आवडीनावडीप्रमाणें, चाहील त्या सुखाचा यथेच्छ उपभोग घेतां येण्यास, ज्या सार्वजनिक गोष्टीकडे त्याच्या चित्ताचा कांहीं भाग, निदान मधून मधून तरी, वेधला पाहिजे, तो वेधेनासा होऊन, सर्वांच्या सुखाच्या पायाभूत ज्या गोष्टी, त्यांच्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळें, व्यक्तींच्या सुखाची इमारत एकदम ढांसळून जाऊन तींत वास करणाऱ्यांच्या कपाळीं पारतंत्र्य येतें व त्यांस नित्य कष्टभारी व्हावें लागतें! पृथ्वींतील ज्या ज्या राष्ट्रांकडून या सर्वसामान्य व सर्वाधाररूप गोष्टीकडे जोंपर्यंत दुर्लक्ष झालें नाहीं, तोंपर्यंत त्या त्या राष्ट्रांत ऐश्वर्य, संपत्ति, ज्ञान व शौर्य यांचा अव्याहत विस्तार होत गेला. ज्या दिवशीं या गोष्टींस ते पराङ्मुख झाले, त्या दिवशीं त्याच्या मोठेपणास उतरता पाया लागला, व अखेरीस त्याचा ऱ्हास झाला. पृथ्वी-

वरील पाहिजे त्या जुन्या किंवा नव्या राष्ट्राच्या इतिहासाकडे पहा; वर सांगितलेल्या तत्त्वाचा त्यांत तुम्हाला प्रत्यय आल्यावांचून रहाणार नाहीं.

मनुष्यें समाज करून राहूं लागलीं, म्हणजे त्यांच्यांत परस्परावलंबन स्वाभाविकपणें उत्पन्न होतें. समाजांत राहणाऱ्या मनुष्यास थोडेंबहुत पारतंत्र्य किंवा परावलंबन भोगण्यास नेहमीं तयार असलेंच पाहिजे. समाज व्यवस्थितपणें चालून, त्याचें पाऊल एकसारखें पुढें पडत जाण्यास जितक्या पारतंत्र्याची आवश्यकता आहे, तितकेंच पारतंत्र्य ज्या समाजांतील प्रत्येक व्यक्तीस भोगावें लागतें, व अधिक भोगावें लागत नाहीं, तो देश अत्यंत सुखी आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ज्या मानानें ह्या आवश्यक पारतंत्र्याचा हिस्सा असमतेनें पडूं लागतो, त्या मानानें अनवस्था, दुःख, जुलूम व असंतोष, यांचा उद्भव होतो. आईबापांना मुलावर, नवऱ्याला बायकोवर, स्वामींना सेवकावर, व राजांना प्रजेवर, जों जों अधिकाधिक हक्क मिळत जातात, तों तों एका पक्षाला अयुक्त स्वातंत्र्य मिळत जातें, व दुसऱ्याच्या वाट्याला पारतंत्र्य येतें. आपलें मन एकाकडे ठेवून दुसऱ्याच्या तब्येतीप्रमाणें वागावें लागणें, यांतच मोठें दुःख आहे. कित्येकदां असें होतें, कीं ज्याचें त्याला आपलें हित बरोबर कळत नसतें, व दुसऱ्यानें सांगितलेलें त्याला रुचत नसतें. या रीतीनें एकीकडून अज्ञान व दुसरीकडून परोपदेशतिरस्कार, यांचा घेरा पडून शेवटीं तो आपल्या कल्याणास मुकतो! असें जरी आहे, तरी ज्याचें त्याला होईल तितकें स्वातंत्र्य भोगूं देणेंच इष्ट आहे; कारण एकानें दुसऱ्याचें हित कशांत आहे हें शोधून काढण्यांत जितक्या चुका होण्याचा संभव आहे, त्यापेक्षां लक्षपटीनें कमी चुका, ज्याचें त्यानें आपलें हित कशांत आहे, हें शोधून काढण्यांत होणार आहेत. म्हणून राष्ट्राच्या राज्यरीतींत या गोष्टीकडे होईल तितकें लक्ष देणें फार जरूर आहे.

अनियंत्रित एकसत्ता मोडून तिच्या जागीं बहुसत्ताक राज्यपद्धति स्थापणें, जिंकणाऱ्या राष्ट्रांचा अंमल झुगारून देणें, स्थानिक स्वराज्याचा अधिकाधिक विस्तार करणें, गुलामांचा व्यापार बंद करणें, स्त्रीपुरुष, स्वामिसेवक, गुरुशिष्य, राजाप्रजा—यांच्यामधील संबंध होतील तितके अन्योन्यांच्या इच्छेवर आणून ठेवणें—या सगळ्यांच्या मुळांशीं वर निर्दिष्ट केलेलें तत्त्व आहे. होईल तितकें करून ज्याचें त्याला आपलें काम मनाप्रमाणें करूं द्यावयाचें.

आयर्लंडच्या इंग्लंडाशीं जो झगडा चालत आहे तो सगळा या तत्त्वासाठीं. इंग्लिश लोक सध्यां आयर्लंडाचें राज्य जितक्या व्यवस्थेनें करीत आहेत, तितक्या व्यवस्थेनें कदाचित् त्यांचें त्यांना करतां येणार नाहीं; म्हणून त्यांना स्वातंत्र्य देणें बरोबर नाहीं, हें म्हणणें न्याय्य नाहीं. आपलें काम वेडेंवाकडें का होईना, पण जेव्हां तें आपल्या हातून वठतें, तेव्हां जें समाधान होतें, त्याच्या शतांश समाधान दुसऱ्यानें तें कितीही सुबक करून दिलें तरी होत नाहीं. आणि असें कां होतें याला कारण आहे. आपलें काम आपल्यावर पडलें असलें म्हणजे तें आज नाहीं साधलें तरी उद्यां साधेल, उद्यां न साधलें तर परवां साधेल; कालांतरानें तें आपलें आपणांस उत्कृष्ट करतां येऊन त्याच्यापासून होणाऱ्या साऱ्या सुखाचा उपभोग आपणांस घेतां येईल, अशी ईर्षा निरंतर जागृत असते, व तिच्यामुळें अवर्णनीय समाधान होत असतें. पण जेव्हां दुसरा आपलें काम करीत असतो, तेव्हां या समाधानाचा अंतःकरणास स्पर्श सुद्धां होत नसतो. जो दुसरा आपल्यासाठीं आपलें काम करीत असतो, तो आपल्यापेक्षां विशेष चतुर असेल, व फारच कमी स्वार्थसाधु असेल, तर कांहीं काळपर्यंत आपणांस नुसतें बाह्यसुख थोडेंसें अधिक होण्याचा संभव आहे. पण ज्याची त्याच्या शिरावर जबाबदारी असल्यानें त्याच्या बुद्धीस जें चांचल्य येतें, उद्योगनिमग्नत्वामुळें त्याच्या वृत्तींत जी प्रफुल्लता असते, कष्टान्तीं जय आल्यास जो अनिर्वचनीय आनंद होतो, तो दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणाऱ्यास कधींही व्हावयाचा नाहीं-

कवि जें सत्य सांगतो, तें शास्त्रीय सत्याप्रमाणें गूढ नसतें. शास्त्रीय सत्यांपैकीं कांहीं सत्यें इतकीं गूढ असतात कीं, तीं समजण्यास तपांच्या अध्ययनाची आवश्यकता असते. तसेंच शास्त्रांत कधीं कधीं विशेष कारणासाठीं अगदीं क्षुल्लक सत्यें सांगितलेलीं असतात. या दोन्हीहि सत्यांचा काव्यांत उपयोग होत नाहीं. 'उष्णता, प्रकाश, व विद्युत् हीं गतीचीं निरनिराळीं रूपें होत.' हें सत्य काव्यविषय होण्यास आणखी शेंकडों वर्षें लोटलीं पाहिजेत. तसेंच, 'बाभळीला काटे असतात,' 'मासे समुद्रांत राहतात,' 'पावट्याची उसळ फार खाल्ल्यानें अपचन होऊन वायु सरतो,' असलीं सत्येंहि काव्याच्या कामाचीं नाहींत! काव्यांत जीं सत्यें गोंवायाचीं, त्यांची योग्य निवड करण्यास कवीस पराकाष्ठेचे श्रम पडतात. जीं समजण्यास मुळींच श्रम पडत नाहींत, अशीं उपयोगीं नाहींत; जीं समजण्यास फार श्रम पडतात, अशींहि उपयोगी नाहींत. तीं या दोहोंच्या दरम्यान असून, अनुकूल संवेदनोत्पादक असलीं पाहिजेत. यावर कोणी अशी शंका घेतील कीं, काव्यांत वर्णिलेलीं सत्यें नेहमीं अनुकूल संवेदनोत्पादक असलीं पाहिजेत, हें मत खरें असेल, तर काव्यांत दुःखपर्यवसायी नाटकांचा, किंवा अवर्षणादि अरिष्टांच्या वर्णनांचा समावेश कधींच करतां येणार नाहीं. कारण दुःखपर्यवसायी नाटकें पाहिल्यानें व अरिष्टांचीं वर्णनें वाचल्यानें मनास आनंद न होतां उलट दुःख होतें. कांहीं अंशीं शंका बरोबर आहे; पण थोड्या विचाराअंतीं तिचें निरसन होण्यासारखें आहे. दुष्काळांत अन्न न मिळाल्यामुळें होणाऱ्या यातनांचा प्रत्यक्ष अनुभव आणि त्या यातनांच्या वर्णनाचें वाचन किंवा श्रवण, कामीजनास होणाऱ्या क्लेशांचा प्रत्यक्ष अनुभव, आणि त्यांच्या क्लेशांच्या वर्णनाचें वाचन किंवा श्रवण, या आणि याप्रमाणें इतर सर्व गोष्टींपासून होणाऱ्या सुखदुःखांचा प्रत्यक्ष अनुभव आणि त्यांच्या वर्णनांचें वाचन किंवा श्रवण, यांत फार अंतर आहे. प्रत्यक्षानुभवाची तीव्रता वाचनांत किंवा श्रवणांत कधींहि येऊं शकणार नाहीं; आणि तसें होऊं लागलें तर प्रतिकूल संवेदनोत्पादक काव्यें कोणी हातीं

धरणार नाहीं. उतार वयांत शेंकडों नवानवसांनीं झालेलें अपत्य मरण पावलें असतां मातापितरांस जें दुःख होतें, तेंच दुःख जर त्याच्या वर्णनापासून किंवा अभिनयापासून होऊं लागलें, तर तें वर्णन कोण हातांत घेईल? किंवा तो अभिनय पहाण्यास कोण जाईल? एखाद्या दुर्गम आणि निर्भय अशा उंच ठिकाणीं बसून खालीं चाललेली लढाई पाहण्यानें मनावर ज्या प्रकारचे विकार होण्याचा संभव आहे, त्या प्रकारचे विकार दुःखपर्यवसायी कथेच्या वाचनापासून होतात. सर्व मनुष्यांच्या मनोवृत्ति एकाच तऱ्हेच्या असल्यामुळें एकास झालेलें दुःख किंवा सुख त्याच्या बाह्य चिन्हांवरून, वर्णनावरून, किंवा अभिनयावरून दुसऱ्यास समजून येतें, हें खरें आहे. पण या समजून येण्यांत आणि प्रत्यक्षानुभवांत फार अंतर आहे. तरवारी-सारख्या शस्त्रानें मर्मापर्यंत चरचर कापीत जाणें, आणि फक्त अंगाला चाटणें यांत जो फरक आहे, तो प्रत्यक्ष सुखदुःखांत आणि त्यांच्या चित्रांत आहे. कवींची सारी करामत हुबेहुब चित्र काढण्यांत आहे; मूळ उत्पन्न करण्यांत नाहीं. ते मूळ उत्पन्न करूं लागतील तर त्यांच्या दुःखो-त्पादक कृतीकडे कोणी ढुंकूनही पहाणार नाहीं.

हा सगळा वाचकांच्या किंवा प्रेक्षकांच्या सुखदुःखाविषयीं विचार झाला. दुःखपर्यवसायी काव्य लिहितांना खुद्द कवीच्या मनाची काय स्थिति होते, हा प्रश्न अजून राहिलाच आहे. कोणत्याहि प्रकारचें काव्य रचतांना किंवा त्यांतील विषयांचा विचार करतांना कवीस जे आयास होतात, ते प्रत्यक्ष आयासाहून बरेच क्षीण असतात. सुखदुःखाचा प्रत्यक्ष अनुभव, आणि सुखदुःखावर पुनः पुनः विचार करून तीं आपणांसच होत आहेत, असा भास करून घेण्याचा प्रयत्न यांत पुष्कळ अंतर आहे. धनलोभ्याचें धन एका-एकीं नाहींसें झालें असतां, त्याला ज्या यातना होतात, त्या प्रत्यक्ष यातना कवि आपणांस धनलोभी समजून व आपलें सारें वित्त एकाएकीं नष्ट झालें आहे असें समजून, द्रव्यनाशानें खऱ्या धनलोभ्याला होणाऱ्या दुःखाचें प्रतिबिंब आपल्या मनावर उठवून घेण्यासाठीं त्या दुःखाचें एकसारखें चिंतन करतो, व त्यामुळें कांहीं वेळानें त्याच्या मनाची वृत्ति धनलोभ्याच्या वृत्तीसारखी होऊन धनलोभ्याला होणाऱ्या यातनांची बरीच छाया त्याच्या मनावरही पडूं लागते. अशा प्रकारें उत्पन्न केलेल्या दुःखाच्या छायेस अप्र-

त्यक्ष असें म्हणतां येईल. ज्याला ही छाया हवी तितकी दाट पाडून घेतां येत असेल, त्याच्या अंगीं कवित्वगुणांपैकीं श्रेष्ठ गुण आहे, असें म्हणतां येईल. विचारानें प्रत्यक्ष सुखदुःखाच्या तीव्रतेचें पूर्ण प्रतिबिंब आपल्यावर उठवून घेणें याचेंच नांव तादात्म्य, तंद्री किंवा एकतानता. ज्याला सुख-दुःखाचा प्रत्यक्ष अनुभव होत आहे, त्याच्या मनाप्रमाणें कवीच्या मनाची स्थिति झाल्याशिवाय त्याच्या काव्यांत तो तो रस पूर्णपणें उतरणार नाहीं. रसाची परिपक्वता अगोदर कवीच्या मनांत आली पाहिजे. ती तशी झाली तरच त्याला ती काव्यांत आणण्याचा प्रयत्न करतां येईल; कारण, जर आडांतच पाणी नसलें, तर तें पोहऱ्यांत कोठून येणार ? कवीला ज्या विषयाशीं आपल्या मनाची तंद्री लावून घ्यावयाची असते, तो विषय अनुकूल संवेदनोत्पादक असो, कीं प्रतिकूल संवेदनोत्पादक असो, त्याला जे कष्ट पडतात, ते उभयपक्षीं सारखेच असतात. कवीचें मन फोटोग्राफ घेण्यासाठीं तयार केलेल्या भिंगाप्रमाणें असतें. ज्याप्रमाणें हवा तेवढा प्रकाश अनुकूल असला म्हणजे पाहिजे त्या पदार्थाचें हुबेहूब प्रतिबिंब त्या भिंगावर पाडतां येतें, त्याप्रमाणें ज्या कवीला आपली कल्पना हवी तितकी प्रज्वलित करतां येते, त्याला तिच्या रश्मींनीं आपल्या मनावर पाहिजे त्या विषयाची मुळाबरहुकूम छाया पाडतां येते. कल्पना प्रज्वलित होऊन कल्पनाविषयाशीं तादात्म्य होणें—यांतच कवीचा आणि काव्यवाचकांचा आनंद आहे. बीजगणितांतील किंवा भूमितींतील एखाद्या कूट प्रश्नांत बुद्धि व्यग्र होऊन गेली असतां तींत जें चांचल्य उत्पन्न होतें, तें तत्त्वशोधकांस जसें अत्यंत आनंददायक असतें, त्याप्रमाणें सुखदुःखोत्पादक विषयांचें हुबेहुब आकलन करण्यासाठीं भरधांव सोडलेल्या कल्पनेच्या चांचल्यापासून कवींना व काव्य-वाचकांना अत्यानंद होतो. असें जर नसतें, तर दुःखपर्यवसायी काव्यें कवि मुळींच न लिहिते, व वाचक तीं मुळींच न वाचते. तेव्हां सिद्ध काय झालें कीं, काव्य दुःखपर्यवसायी असो कीं सुखपर्यवसायी असो, त्यांतील रसा-पासून उत्पन्न होणारा आनंद सारखाच असतो; आणि याच कारणांमुळें कॉमिडी आफ एरर्स ( भ्रांतिकृतचमत्कार ) इतकींच 'आथेल्लो वाचण्याला, किंवा त्याचा प्रयोग पहाण्याला आमचीं मनें उत्सुक असतात. तर मग दुःखपर्यवसायी आणि सुखपर्यवसायी काव्यांच्या वाचण्यांत किंवा

प्रयोगदर्शनांत मुळींच भेद नाहीं कीं काय, असा प्रश्न सहज उत्पन्न होतो. त्यास इतकेंच उत्तर आहे कीं, भेद आहे; मुळींच नाहीं असें नाहीं; पण तो फार थोडा आहे. काव्यवाचनांत किंवा त्यांचा प्रयोग पहाण्यांत एकमेकांपासून अगदीं भिन्न असे दोन मानसिक व्यापार चाललेले असतात. एक कल्पनाशक्ति प्रज्वलित होऊन ती मनाचें काव्य-वस्तूशीं तादात्म्य करण्यासाठीं झटत असते; दुसरा, इंद्रियांपुढें प्रत्यक्ष असणाऱ्या, किंवा कल्पनेनें निर्माण केलेल्या काव्यवस्तु आपापल्या स्वभावा-प्रमाणें वाचकांच्या व प्रेक्षकांच्या अनुकूल व प्रतिकूल संवेदनांस अंशतः कारण होत असतात. यामुळें दुःखपर्यवसायी काव्य वाचीत असतां, किंवा त्याचा प्रयोग पहात असतां वृत्तीला थोडीशी खिन्नता उत्पन्न होते, आणि सुखपर्यवसायी काव्य वाचीत असतां वृत्तीला थोडासा आनंद होतो. अप्रबुद्ध लोकांना पहिल्या व्यापारापासून होणाऱ्या आनंदाची मुळींच कल्पना नसते. यामुळें दुःखपर्यवसायी नाटक पहाणें त्यांना आवडत नाहीं.

आतांपर्यंत जें सांगितलें आहे त्यावरून तत्त्वशोधकाप्रमाणें कवीचेंही, एका प्रकारच्या सत्यांचा निर्णय करणें आणि तीं सांगणें, हें काम आहे; हें काम बजावण्यासाठीं कवीस आपली कल्पना प्रज्वलित करून काव्यवस्तूशीं आपल्या मनाचें तादात्म्य करून घ्यावें लागतें; काव्यवस्तु कोणत्याही प्रकारची असो; या तादात्म्यापासून होणारा आनंद सारखाच असतो; कवींच्या यथार्थ वर्णनांनीं काव्यवस्तूशीं वाचकांच्या आणि प्रेक्षकांच्या मनांचें तादात्म्य झालें तर त्यांनाही कवीसारखाच आनंद होईल. काव्यवस्तु कोण-त्याही प्रकारची असो, तिच्या चिंतनांत व्यग्र झालेल्या कवींच्या किंवा वाचकांच्या कल्पनेस जें चांचल्य येतें, तें आनंदमय आहे; काव्य वाचीत असतां किंवा त्याचा प्रयोग पहात असतां वृत्तींत कधीं कधीं जी खिन्नता उत्पन्न होते ती, वृत्ति एकीकडे एकतानतानंदांत गढली असतां इंद्रियांपुढें प्रत्यक्ष असणाऱ्या, किंवा कल्पनेनें निर्माण केलेल्या, भयंकर काव्यवस्तु दुसरीकडून तींत प्रतिकूल संवेदना उत्पन्न करीत असतात, म्हणून होते; सारांश, काव्य दुःखपर्यवसायी असो किंवा सुखपर्यवसायी असो, तें रचण्यांत कवीला आणि तें वाचण्यांत वाचकाला आनंदच आहे; या आनंदांत, काव्य-वस्तूचें बाह्य स्वरूप रमणीय असल्यास थोडीशी भर पडते, व तें भयंकर

असल्यास त्याला किंचित् छाट बसतो—इत्यादि गोष्टी वाचकांच्या ध्यानांत येतील अशी आशा आहे.

काव्याच्या वाचनापासून राजापासून रंकास, तत्त्ववेत्त्यापासून अत्यंत अल्पशिक्षित मनुष्यास, सर्व स्थितींत आनंद होण्यास अनेक कारणें आहेत. एक तर कवींच्या वाणींतून जे बोल निघत असतात, त्यांच्या सत्यतेविषयीं प्रत्येक अंतःकरण साक्ष देत असतें. जीं सत्यें देशकालादिकांनीं मर्यादित, किंवा जीं सत्यें बहुश्रुतांस मात्र समजणार, अशीं सत्यें कवि कधींच सांगत बसत नाहीं. ज्या मनुष्याची रानटी अवस्था सुटली आहे, ज्याला मानवी स्वभावाचें किंचित् ज्ञान प्राप्त झालें आहे, ज्याच्या मनावर बाह्य सृष्टीच्या सौंदर्याचा परिणाम होऊं लागला आहे, असा मनुष्य कोणत्याही देशांत रहात असो, किंवा कोणत्याही शतकांत जन्मास आला असो, महाकवींच्या सत्यमय रसाळ उद्गारामृताचें सेवन करण्यास तो योग्य असतो. काव्यापासून आनंद होण्याचें दुसरें कारण असें आहे कीं साधारण मनुष्यास ज्या गोष्टी अव्यक्त असतात, त्या कवि त्यास व्यक्त करून देतो. जितक्या मूर्ति तितक्या प्रकृति अशी आपल्या लोकांत म्हण आहे. या म्हणीचा अर्थ इतकाच कीं प्रत्येक मनुष्याचा स्वभाव निराळा असल्यामुळें सर्वांच्या स्वभावांचें ज्ञान होणें अशक्य आहे, तथापि ज्या अर्थीं सर्व मनुष्यांस आपण ‘मनुष्य’ या एका वर्गाखालीं मोडतों, त्या अर्थीं त्या सर्वांस साधारण असे कांहीं गुण असलेच पाहिजेत; या साधारण गुणांचें अति स्वल्प ज्ञान बहुतेकांस असतें; व तें असतें म्हणून काव्यवाचनापासून त्यांस आनंद होतो. कित्येक मनुष्य पराकाष्ठेचे रागीट असतात, कित्येक शांत असतात, कित्येक मायाळू असतात, कित्येक लोभी असतात, कित्येक क्रूर असतात, कित्येक कामातुर असतात. तथापि राग, शांति, ममता, लोभ, क्रौर्य व काम इत्यादि सर्व मनोवृत्तींची प्रत्येकास थोडीबहुत ओळख असते. विशिष्ट व्यक्तींत एखादा गुण फार असला म्हणून बाकीच्या गुणांविषयीं तो अगदीं अज्ञान असतो असें नाहीं. प्रत्येक मनुष्य सर्व मनुष्यतेचें सूक्ष्म प्रतिबिंब आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. असें नसतें तर एकाचे मनोविकार दुसऱ्याला न समजते. साधारण मनुष्यांत आणि कवींत भेद इतकाच आहे कीं साधारण मनुष्यांस ज्या प्रकृतिवैचित्र्याचें आणि विकारवैचित्र्याचें ज्ञान अगदीं

मंद असतें, तें कवीस कल्पनासामर्थ्यानें स्वतःसच स्पष्ट करून घेतां येतें. इतकेंच नाहीं तर काव्यद्वारा तें दुसऱ्यासही स्पष्ट करून देतां येतें. कवि हा कामरूपधारी पटाईत बहुरूपी आहे ! तो क्षणांत राजा बनून सिंहासनस्थ पुरुषांच्या अंतःकरणांतील विचार बोलूं लागतो. राजवेष घेऊन अर्धघटिका झाली नाहीं तोंच, तो वेष टाकून देऊन तो काळा पोषाक करतो, तोंडाला काजळ फासतो, वस्त्राखालीं पाजळलेलीं शस्त्रें लपवून घेतो, मध्यरात्रींच्या निबिड काळोखांत जिकडे तिकडे सामसूम झालें असतां द्रव्यासाटीं कोणाचा तरी जीव घेण्याचा बेत करीत मारेकरी होऊन बाहेर पडतो ! या स्थितींत पांचपन्नास पळें गेलीं न गेलीं तों, तीं टाकून देऊन अभिसारिका बनतो व अभिसारिकेस योग्य असा पेहेराव चढवून मेघांच्या गडगडाटांची, विजांच्या लखलखाटांची किंवा तुफान वाऱ्यांच्या सोसाट्याची पर्वा न करितां, पावसाच्या मुसळधारेंतून एका चेटासह विहारोद्यानांतील नेमलेल्या लतामंडपांत प्रियकराची भेट घेण्यास जातो ! आतां तो पर्वताच्या शिखरावर किंवा समुद्राच्या किनाऱ्यावर असला तर क्षणभरानें धनगराच्या परशापाशीं शेकत बसलेला किंवा न्यायासनारूढ होऊन न्याय करीत असलेला दृष्टीस पडेल ! वायूप्रमाणें तो सर्वगामी आहे; मनाप्रमाणें तो चंचल आहे; हवी ती वस्तु उत्पन्न करणारा तो बस्ताद जादूगार आहे; कल्पनाशंकूच्या जिवावर कालोदधींत पाहिजे त्या दिशेस सुकाणूं लावण्यास न डगणारा तो जरठ झालेला तांडेल आहे; विश्वबीजांप्रमाणें त्याचे उद्गार अनंत व नित्य आहेत. कोणती वस्तू कितीहि दूर असो, किंवा कितीही सूक्ष्म असो, यानें तिच्यावर आपली दुर्बिण किंवा सूक्ष्मदर्शक यंत्र लाविलें कीं, त्याला ती सन्निध आणि स्थूल होऊन हवी तशी पहातां येते, व दुसऱ्यांना तिचें यथातथ्य आकलन होईल अशा तऱ्हेचें तिचें चित्र काढतां येतें. जर तुम्हांला पाताळांतील किंवा स्वर्गांतील वस्तुस्थिति पहावयाची इच्छा असेल तर मिल्टनचा किंवा कालिदासाचा हात घट्ट धरून ते नेतील तिकडे जाण्यास तयार व्हा ! अनंत प्रकृतींच्या हृदयडोहांत बुड्या मारून त्यांच्या तळाशीं काय आहे, हें जर तुम्हांला पहावयाचें असेल तर मोलिअर, शेक्सपिअर, गेटी, किंवा भवभूति अशा जगत्प्रसिद्ध पाणबुड्यांच्या कमरेला मिठी मारा ! सारांश, अंतर्बाह्य सृष्टींत अनुकूल किंवा प्रतिकूल संवेदना उत्पन्न करणारी

अशी कोणतीही चीज नाहीं कीं, जिच्या सत्यस्वरूपाचें ज्ञान आनंद होईल अशा रीतीनें कवीस तुम्हांला करून देतां येणार नाहीं. समजातीयांस हें ज्ञान करून देणें हा कवींचा व्यवसाय होय. या व्यवसायांतच त्यांचा आनंद आहे. या व्यवसायामुळेंच त्यांचें अंतःकरण अतिशय कोमल व दयार्द्र झालेलें असतें.

ज्याप्रमाणें शरीराला अन्नाची त्याप्रमाणें व्यापाराला भांडवलाची आवश्यकता आहे. ज्या देशांत भांडवल नाहीं, तेथें व्यापार कोठून चालणार? मुसलमान लोकांनीं येथें अनेक शतकें राज्य केलें. पण त्यांच्या त्या दीर्घकालीन अंमलानें आम्ही जितके डबघाईस आलों नाहीं, तितकें या शतसांवत्सरिक ब्रिटिश अंमलानें आलों आहों. याचें कारण उघड आहे. तैमूरलंग चेंगीजखान, गिझनी महंमद यांनीं या देशावर ज्या स्वाऱ्या केल्या, त्यांमुळें आमचें अतोनात नुकसान झालें हें खरें आहे. पण तें नुकसान, ब्रिटिश अंमलामुळें आमचें जें नुकसान होत आहे त्यापुढें कांहींच नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मुसलमान लढवय्यांनीं जें द्रव्य लुटून नेलें तें सांचविलेलें द्रव्य होतें. त्याचा व्यापाराशीं तादृश्य संबंध नव्हता. शेंपन्नास वर्षांनीं एखादी झुंड येऊन कोटि दोन कोटि रुपयांची लूट घेऊन गेली तर तीपासून होणारें नुकसान आणि प्रतिवर्षीं उत्पादक संपत्तीपैकीं बाहेर जात असलेल्या दहापांच कोटींपासून होत असणारें नुकसान यांचें साम्य कोठून होणार? तसेंच हेंहि ध्यानांत ठेवणें जरूर आहे कीं, मुसलमानांचा अंमल येथें कायम झाल्यापासून, येथला पैसा बहुधा बाहेर गेला नाहीं. इंग्रजांप्रमाणें मुसलमान पिशवी भरली कीं विलायतेस पळणारे नसल्यामुळें, त्यांच्या अंमलापासून द्रव्यदृष्ट्या आमचें म्हणण्यासारखें नुकसान झालें नाहीं. आतांप्रमाणें त्या वेळेस मोठमोठ्या हुद्यांच्या जागा जिंकणाऱ्यांच्या जातभाईस मिळत असत. परंतु त्यांचें नेहमींचें राहणें येथें पडल्यामुळें, त्यांचा सारा खर्च येथेंच होत असे व त्यामुळें व्यापारधंदा करणाऱ्या लोकांस किंवा कारागीर लोकांस मोठें नुकसान झाल्यासारखें वाटत नसे. मशीदीचे दगड घडविणें किंवा देवळाचे दगड घडविणें; ताजमहाल बांधणें किंवा काशीविश्वेश्वराचें देऊळ बांधणें; पेशव्यांसाठीं शालजोड्या विणणें किंवा बादशहाकरितां मोलाचे गालीचे तयार करणें, मस्तानीसाठीं निवडक जवाहीर विकणें किंवा नूरजहानच्या सांगण्यावरून सारा देश धुंडाळून पाचेचे सर्वोत्कृष्ट खडे पैदा करणें—यांत त्या त्या

कारागिरांस किंवा व्यापाऱ्यांस विशेष भेद वाटला नसेल, हें उघड आहे. पण सध्यांची स्थिति तशी नाहीं. इंग्लिश लोक ज्या वस्तू वापरतात, त्यांपैकीं बहुतेक इंग्लंडाहून येतात. इतकेंच नाहीं, तर त्यांच्या यंत्रकृत वस्तू आमच्या हस्तकृत वस्तूंहून अधिक स्वस्त व सफाईदार असल्यामुळें आमच्या उपयोगास लागणाऱ्या वस्तूंपैकीं अनेक वस्तूहि आम्ही इंग्लंडापासूनच खरेदी करतों. यामुळें येथील कारागिरांस हवें तितकें काम मिळेनासें झालें आहे. याशिवाय, ज्या खर्चाबद्दल आम्हांस एका कवडीचाहि मोबदला मिळत नाहीं, असाहि पुष्कळ खर्च होत आहे. या सर्व खर्चाचा '**होम चार्जीस्**' या नांवाखालीं समावेश करण्यास हरकत नाहीं. यांत हिंदुस्थानास असलेल्या कर्जाबद्दल व्याजाची जी रक्कम प्रतिवर्षी इंग्लंडास पाठवावी लागते ती; नोकरी आटोपून किंवा सोडून गेलेल्या नोकरांचीं पेन्शनें; सेक्रेटरी ऑफ् स्टेटच्या कौन्सिलाचा खर्च आणि यासारख्या ज्या इतर बाबी आहेत त्या येतात. या सर्वांबद्दल गेल्या वर्षी सेक्रेटरी ऑफ् स्टेट यानें आम्हांपासून **तेवीस कोट रुपये** घेतले! हिंदुस्थानच्या काळीचा एकंदर वसूल **एकोणीस कोटि रुपये** आहे. तेव्हां हिंदुस्थानच्या जमिनीचें सारें उत्पन्न जरी त्या प्रचंड अधिकाऱ्यांस अर्पण केलें तरी देखील त्यांचें पोट भरत नाहीं, हें उघड आहे. त्यांचें समाधान होण्यासाठीं आणखी **चार कोटि रुपये** कोठून तरी काढून द्यावे लागतात! म्हणजे हिंदुस्थानच्या नक्त उत्पन्नापैकीं पक्कें अर्धें उत्पन्न इंग्लंडांत जात असून, त्याबद्दल आमचा काडीचा देखील फायदा होत नाहीं; व असा क्रम कमी अधिक प्रमाणानें आज शंभर वर्षें चालला आहे! या गोष्टी ज्याला समजल्या असतील त्याला 'आम्ही इतके दरिद्री कशासाठीं' हें तेव्हांच कळून येणार आहे. इंग्लिश लोक मोठे उद्योगी, कल्पक, साहसी व बुद्धिमान् आहेत, व या गुणांमुळेंच त्यांनीं आपला देश सुवर्णमय करून टाकला आहे, हें निर्विवाद आहे. तथापि या पुराण सुवर्णभूमींतील बरेंच सुवर्णहि त्यांच्या संपत्तिमत्त्वास कारण झालें आहे, हें त्यांचें त्यांनाच कबूल करावें लागेल; पण ज्या मानानें ते आमच्या देशांतून प्रतिवर्षी उत्पादक संपत्ति तिकडे नेत आहेत, त्या मानानें आमची कंगालता अधिकाधिक दाट होत जाऊन, आमचे व्यापार बंद पडत चालले आहेत; पोटभर अन्न व अंगभर वस्त्र न मिळाल्यामुळें, नाना

तऱ्हेचे रोग वाढत चालले आहेत; रोग आणि उपासमार यांच्यामुळें आम्ही व्यथित होऊन आमच्या तोंडावर अवकळा येत चालली आहे; आणि प्रतिवर्षी रक्तपितीसारख्या महारोगग्रस्तांची व इतर जातीच्या रोग्यांची संख्या वाढत जाऊन, त्याच प्रमाणानें मृत्युसंख्याहि वाढत चालली आहे. इंग्लिश लोक या भयंकर स्थितीच्या संबंधानें येथून पुढें पूर्ववत् डोळेझांक करतील तर उभय देशांवरहि मोठ्या संकटाचा प्रसंग गुदरून त्यामुळें उभय देशांतील लोकांचेंहि अज्ञातपूर्व नुकसान होणार आहे! ज्याप्रमाणें झाडाच्या बारदोन फांद्यांवर थोडीशी टवटवीत पालवी, व दहापांच फळें दृष्टीस पडतात; पण बारकाईनें त्याकडे पाहिलें तर बुडख्यापासून शेंड्यापर्यंत तें किड्यांनीं पोखरून टाकिलें आहे, व थोड्याशा जोराच्या वाऱ्यानें एकदम मोडून पडण्यासारखें झालेलें दिसतें, त्याप्रमाणें या देशाची अवस्था झाली आहे. मुंबई, कलकत्ता किंवा मद्रास यांच्यासारख्या दहापांच टवटवीत शहरांवरून, किंवा लाख दोन लाखांत जो एखादा दुसरा खरा सुखवस्तु इसम दृष्टीस पडतो त्यावरून, चहूंकडे तशीच आबादानी असेल असें अनुमान करणें हा शुद्ध भ्रम होय. सर रिचर्ड टेंपलसारखे जे गृहस्थ जाणूनबुजून इंग्लिश पार्लमेंटास व इंग्लिश लोकांस या मिथ्या भ्रमांत पाडीत आहेत, ते इंग्लंडचें अपरिमित नुकसान करीत आहेत, व या त्यांच्या अपराधाबद्दल उभय लोकांस भारी दंड द्यावा लागणार आहे. तेव्हां हा प्रसंग टाळण्यासाठीं आम्हीं आपली खरी स्थिति इंग्लिश लोकांच्या नजरेस आणणें हें जितकें आमचें कर्तव्य आहे, तितकेंच इंग्लंडचें खरें हित चिंतणाऱ्या आंग्लतनयांचेंहि आहे.

येथील बहुतेक उत्पादक भांडवल प्रतिवर्षी इंग्लंडास जाऊन येथील उद्योगधंदा नष्ट झाल्यामुळें येथील काम करणाऱ्या लोकसंख्येची कशी स्थिति झाली आहे, हें कोणास थोडक्यांत समजून घेण्याची इच्छा असेल तर त्यांनीं पुढील आंकडे लक्ष लावून वाचावे. हिंदुस्थानांतील शंभर मनुष्यांपैकीं ८६ मनुष्यांचा संबंध शेतकीशीं आहे; इंग्लंडांत १४ चा आहे. गिरण्या वगैरे कारखान्यांत हिंदुस्थानांतील लोकसंख्येपैकीं शेंकडा १२माणसें असतात; इंग्लंडांतील लोकांपैकीं अशाच कामाकडे शेंकडा ३० असतात, आणि इतर सर्व प्रकारच्या उद्योगांमुळें इंग्लंडांत शेंकडा **पंचावन्न** इसमांस

जें काम मिळतें, तें येथें जेमतेम **दोन** इसमांस मात्र मिळतें ! अशा स्थितींत दुष्काळ आल्याबरोबर, लाखों लोकांस अन्नान्न करीत परलोकप्रयाण करावें लागतें, यांत कांहीं नवल आहे काय ? आमच्या व्यापाराची ही हृदयभेदक स्थिति समंजस इंग्लिश लोकांपुढें आणिली म्हणजे ते असा अभिप्राय देतात कीं, हिंदुस्थानची व्यापारवृद्धि झाली पाहिजे. तीवांचून दुसरा तरणोपाय नाहीं ! पण ही व्यापारवृद्धि कशी होणार, याचा मात्र विचार करण्यास कोणीं धजूं शकत नाहीं ! कारण तो करूं लागलें कीं, इंग्लंडच्या व्यापारावर थोडीबहुत गदा येईल, निदान त्याला थोडाबहुत तात्कालिक तरी धक्का पोहोंचेल, अशा साधनांचा उपयोग केल्याशिवाय, हिंदुस्थानच्या व्यापार-धंद्यास सांप्रत स्थितींत उत्तेजन देणें अशक्य आहे, हें दिसून येतें. तसें करण्याची आजमित्तीस कोणाची प्राज्ञा आहे ? परोपकाराच्या लांब लांब गप्पा मारणें फार सोपें आहे ! व्यक्तीपेक्षां राष्ट्रास ही गोष्ट विशेष तऱ्हेनें लागू पडते इंग्लंडनें आमचे व्यापार आटोपल्यामुळें, आमचें केवढें नुकसान होत आहे, हें जोंपर्यंत इंग्लंडचा माल येथें खपत आहे तोंपर्यंत इंग्लिश व्यापारी कशासाठीं मनांत आणतील ? ज्या वेळेस येथें एखादा मोठा दुष्काळ पडून, किंवा **टाइम्स ऑफ इंडिआनें** म्हटल्याप्रमाणें, दारिद्र्यानें पिळून काढलेल्या व भुकेनें गांजून गेलेल्या लोकांचें एखादें प्रचंड बंड होऊन, त्यांच्या व्यापारास एकाएकीं मोठा धक्का बसेल, व कोट्यवधि रुपयांचें नुकसान होईल, तेव्हां कोठें त्यांचे डोळे उघडणार ! तसें नसेल तर येथील व्यापाराची वृद्धि करणें काय कठिण आहे ? एकट्या कापसाच्या व्यापारास थोडेंसें उत्तेजन दिलें तरी देखील आम्हांस आलेली अन्नान्नदशा कांहीं वर्षें दूर होणार आहे. इतकेंच नाहीं, तर अफूचा व्यापार बंद झाल्यास हिंदुस्थानच्या जमाबंदीच्या तटात जें पांचसात कोटींचें अवाढव्य भगदाड पडण्याचा रंग दिसत आहे तेंहि बऱ्याच अंशीं भरून काढतां येणार आहे. अशा प्रसंगीं इंग्लंडहून येणाऱ्या कापडावर जबर जकात ठेवण्यास काय हरकत आहे ? तसें केल्यास, जमाबंदीस बरीच मदत होऊन, येथील कापसाच्या कारखान्यांसहि बरीच मदत होणार आहे. वास्तविक पाहतां कापसाची, मजुरांची व कापसाच्या कारखान्यांत लागणाऱ्या भांडवलाची आमचेपाशीं इतकी समृद्धि आहे कीं, जर उत्पन्न केलेला माल हटकून

खपेल अशी आमची खात्री होईल, तर भरतभूमीस आपली लाज झांकण्यासाठीं इंग्लंडचा धांवा करावा लागणार नाहीं इतकेंच नाहीं, तर या व इतर खंडांत ज्या भूमिका उघड्या पडल्या असतील, त्यांच्या शरीरावर ही भरतभूमि, आपलें एक अंगुष्ठ देखील उघडें पडूं न देतां, हवीं तितकीं वस्त्रें घालील ! पण लँकेस्टरच्या व्यापाऱ्यांनीं हिंदुस्थान सरकारास असें करूं देणें म्हणजे स्वार्थरूप बाभळीच्या झाडाला अघटित घटनेनें फणस किंवा आंबे येण्यासारखें होय !

. जगांत प्रस्तुत काळीं जी विपत्ति दृष्टीस पडते तिचा तीन चतुर्थांश भाग फाजील प्रजोत्पादनापासून उत्पन्न होतो असें विचारांतीं खचित दिसून येईल. घराण्यांतील लहानसहान तंट्याबखेडयांपासून तों राष्ट्राराष्ट्रांमधील मोठमोठ्या लढायांपर्यंत सर्व भांडणांचें आदिकरण संततीची अपरिमित वृद्धि होय. अन्तर्दृष्टि करून ज्यानें त्यानें आपल्यापासून विचार करण्यास आरंभ केला, व हळूहळू अधिकाधिक प्रदेशावर दृष्टि टाकली, तर त्याला असें दिसून येईल कीं, मनुष्यमात्राच्या अंगीं कामवासना जितकी उत्कट आहे तितकी नसती, तर त्यास जीं दुःखें आणि ज्या यातना भोगाव्या लागत आहेत त्यांपैकीं पुष्कळ टळल्या असत्या. पदार्थविज्ञानादि अनेक उपयुक्त शास्त्रांचा प्रसार होण्यासहि प्रजोत्पादन हेंच कारण होय, प्रजोत्पादनापासून मनुष्य जातीचें मुळींच हित झालें नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं. आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं फाजील प्रजोत्पादनानें हितापेक्षां अहित फार झालें आहे व थोड्या वर्षांत या विपदुगमाकडे पृथ्वीवरील सुधारलेल्या हरएक राष्ट्रांतील विचारशील, शास्त्रनिपुण, आणि सानुकंप पुरुषांचे डोळे न लागतील, तर उपयुक्त शास्त्रविद्यांच्या प्रसारापासून विशेष फायदा न होतां मनुष्यजातीची स्थिति उत्तरोत्तर शोचनीय होत जाईल, यांत संशय नाहीं. आर्य लोकांची फाटाफूट होऊन त्यांच्या शाखा युरोप आणि आशियाखंडांत पसरल्या, व त्यांपैकीं एक हिंदुस्थानांत येऊन आधुनिक भारतीय प्रजेचें पूर्वजत्व आपणाकडे घेती झाली, याचें कारण काय तर वाढलेल्या प्रजेचें पोट भरण्याची आवश्यकता. ग्रीक लोकांनीं इराणावर स्वाऱ्या केल्या, एशिया मायनरमध्यें वसाहती केल्या व सिंधुनदीपर्यंत आपल्या वीर्याचा आणि पराक्रमाचा दर्प आणून भिडविला याचें कारण तरी प्रजावृद्धिच होय. पुढें रोमची पादशाही प्रबल होऊन तिनें इजिप्त, ग्रीस, फ्रान्स, जर्मनी व इंग्लंड वगैरे देशांस जिंकून जिकडे तिकडे रोमन अंमल चालू केला, यालाही प्रजावृद्धीहून दुसरें कारण नाहीं. या इतलीच्या अवाढव्य वैभवास धक्का बसण्यास व अखेरीस त्याचा चुराडा

होण्यासहि सैबेरिआ, रशिआ, व उत्तर जर्मनी यांतील व्हांडाल, गाथ्स, सिथिअन्स, व हून्स ( हूण ) वगैरे हापापलेल्या रानटी लोकांची भूकच कारण झाली. फ्रेडरिक धी ग्रेटनें ज्या मोठमोठ्या लढाया मारल्या त्या सायलेशिआ प्रांताची सुपीक जमीन उपटून आपल्या प्रजेची भूक भागविण्यासाठींच होत. १८ व्या शतकाच्या अखेरीस नेपोलिअन बादशहानें युरोप खंडांत जो भयंकर मनुष्यहोम मांडिला त्याला फ्रेंच लोकांची अन्नान्नदशा कारण झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. पृथ्वीच्या सर्व भागांत इंग्लिश लोकांच्या वसाहती होण्यास, व हिंदुस्थानचें राज्य त्यांच्या हातीं जाण्यास इंग्लंडांत प्रजावृद्धि फार होऊन तिचा त्या लहान बेटांत होणाऱ्या उत्पन्नावर नीट चरितार्थ चालेना, हेंच कारण होय. फार कशाला, सध्यां ( १८८३ ) फ्रान्स व चीन या देशांत लढाई होण्याचा जो प्रसंग दिसत आहे, त्याच्या मुळाला देखील ही पोटाची खळी आहे. ज्यांना अर्वाचीन सुधारणाची घमंडी वाटत असेल त्यांना आमचा येवढाच प्रश्न आहे कीं तुमच्या या सुधारणांपासून पृथ्वीवर जितकी प्रजा आहे तितकीचा सुखानें जर चरितार्थ चालत नाहीं तर त्यांचा काय उपयोग ! आयर्लंडांत पोट भरेनासें झाल्यामुळें प्रत्येक वर्षीं लाखों ऐरिश लोकांना चरितार्थाच्या सोईसाठीं स्वदेश सोडून अमेरिकेंत किंवा पृथ्वीच्या दुसऱ्या एखाद्या ओसाड प्रदेशावर जावें लागत आहे, ही गोष्ट मनांत आली म्हणजे ज्या सुधारणांबद्दल अलीकडे इतकी वल्गना होत असते, त्यांचें कांहींच गौरव वाटत नाहीं. एकंदरींत स्थूल दृष्टीनें, सृष्टीचें अवलोकन केलें तर असें दिसून येईल कीं जीवकोटींतील हरएक प्राणिवर्गाच्या अंगीं प्रजोत्पादनाची बुद्धि स्वभावसिद्ध होऊन गेली असल्यामुळें जेथें तेथें उदरपोषणासाठीं मारामारी चालली आहे. 'अत्तुं वांछति शांभवो गणपतेराखुं क्षुधार्तः फणिः' इत्यादि जुन्या वाक्यांकडे नजर फेंकली असतां सर्व सृष्टीभर हा 'जीवनार्थ कलह' कसा वेगानें चालला आहे, हें तेव्हांच ध्यानांत येणार आहे. प्रत्येक वरचा प्राणिवर्ग खालच्या बहुतेक प्राणिवर्गास आपलें भक्ष्य करितो व सर्वांत श्रेष्ठ प्राणिवर्ग त्याच्या दाढांतून कोणताहि जीव मी सुटून जाईन म्हणेल तर घडणें नाहीं. भुकेच्या झपाट्यांत मनुष्यांनीं घोडीं पाहिलीं नाहींत, कुत्रीं पाहिलीं नाहींत, पोरें देखील नाहींत ! जठराग्नीचा दाह शमन करण्यासाठीं त्यांनीं उदरकुंडांत

इवें तें द्रव्य घालण्याला मागें पुढें पाहिलें नाहीं! आपल्या लोकांत म्हणण्याची चाल आहे कीं द्विपादांत शिडी आणि चतुष्पादांत घडवंची याशिवाय चिनी लोकांच्या आहारास कांहीं एक वर्ज्य नाहीं. या अतिशयोक्तीचा अर्थ इतकाच कीं त्या देशांत लोकसंख्या मनस्वी वाढल्यामुळें त्यांच्या उपजीविकेला दुसऱ्या लोकांना अभक्ष्य अशा पुष्कळ गोष्टी चालत. सारांश, पृथ्वीवरील नक्कदशांश कोटी लोकांना पोटासाठीं साऱ्या जन्मभर सक्तमजुरी करावी लागून अखेरीस देहांत शिक्षा भोगावी लागते! ही मनुष्यजातीची शोच्य स्थिति पाहून अत्यंत उदासीन व खिन्न झालेल्या एका आधुनिक नाट्याचार्यानें ' विश्व असे हा तुरुंग मोठा प्राणिमात्र कैदी। पदार्थधर्मांचिया शृंखला त्या न कुणी भेदी ॥ ' असे जे उद्गार काढिले आहेत ते किती सत्य आहेत याचा वाचकांनींच विचार करावा. संतति आणि संपत्ति या युगलानें सर्व वसुंधरेस बेजार करून सोडलें आहे. गेल्या दुष्काळांत साठ लक्ष लोक मृत्यूच्या जबड्यांत पडले! येवढ्या मनुष्यहानीनें युरोपांतील एखादा लहानसा देश निर्जन होऊन ठार ओसाड पडला असता! हिंदुस्थानांत ज्या स्त्रीपुरुषांकडे मातापितृत्व आलेलें असतें त्यांपैकीं तीन चतुर्थांशाला निदान एक द्वितीयांशाला तरी, तो अधिकार प्राप्त होण्यापूर्वी शिशुमुखावलोकनाची इच्छा झालेली असते असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं; निदान स्त्रियांना तरी एकमेकींकडे पाहून ही संतानचिंता अगदीं अल्पवयांत लागते हें सर्वांस माहीत आहे. तेव्हां प्रस्तुत कालीं संततीची विशेष वृद्धि झाल्यापासून ज्या पीडा होत आहेत त्यांत आम्ही स्वेच्छेनेंच जाऊन पडतों, किंवा त्या आम्हांस पीडा अशा वाटत नाहींत असें मानिलें पाहिजे. याच प्रश्नाची दुसरी एक बाजू राहिली ती ही कीं स्त्रीपुरुषाला अपत्यप्राप्तीची कांक्षा नसतां केवळ वयपरत्वें अनुभवलेल्या विषयसुखाचा स्वाभाविक धर्माप्रमाणें परिणाम घडून येऊन कांहीं संतति नको असतां अस्तित्वांत येते. तेव्हां दोनही बाजूंनीं असाच क्रम चालला तर जगाची किती दुःखमय स्थिति होईल व ती टाळण्यास काय उपाय करावे याचा विचार करून ते अमलांत आणणें यांतच मनुष्यपण आहे.

देह त्यागितां कीर्ति मागें उरावी।
मना सज्जना हेचि क्रीया धरावी॥ —श्री रामदास.

गेल्या शुक्रवारीं सकाळीं सात आठ वाजण्याच्या सुमारास होळकर आळींत एकच गर्दी झाली. शाळांतील लहान मोठीं मुलें, व त्याप्रमाणेंच गांवांतील तरुण आणि वृद्ध लोक यांचीं तोंडें म्लान होऊन त्यांवर विपरीत कळा आली. इतक्यांत चिपळोणकरांच्या वाड्यांतून स्त्रियांचा दीर्घ रुदनस्वर बाहेर आला ! त्याबरोबर घात झाला अशी खात्री होऊन सर्वजण तोंडाला पदर लावून रडूं लागले. या वेळीं शाळेंतील मुलांनीं रडून जो कल्होळ केला तो सांगतां पुरवत नाहीं. विष्णुशास्त्री एखाद्या रोगानें चार सहा महिने खितपत पडले होते असें नाहीं. पंधरा दिवसांपूर्वीं क्यांपमध्यें फोटोग्राफ घेण्यासाठीं टेबलावर उभे राहिले असतां एकाएकीं पित्तप्रकोप होऊन जी चक्कर आली त्यासरशी ते धाडकन् जमिनीवर बेशुद्ध पडले. कांहीं वेळानें शुद्धीवर आल्यावर त्यांस घरीं आणिलें. नंतर थोडासा ज्वर भरला. पण तो अशा थराला जाईल असें कोणाच्या स्वप्नांत देखील आलें नाहीं. त्या ज्वरामुळें त्यांस क्षीणता आली होती हें खरें, पण तो अशा तीव्र वेगानें उलटून, बोलतां बोलतां पुण्यांतील मोहरा रातोरात घेऊन जाईल असें कोणासही वाटलें नाहीं. परंतु दैवाची परम विचित्र गति ! शास्त्रीबोवांस कलंगड खाऊन थंड पाणी पिण्याची बुद्धि झाली; त्यासरशी कुपथ्य झाल्याचें निमित्त होऊन तात्काळ सन्निपात झाला तो त्यांना घेऊनच गेला. शास्त्रीबोवांच्या अकालिक मृत्यूनें 'केसरी'चा एक पाय लंगडा झाला यांत कांहींच नाहीं. आज महाराष्ट्रवाणीचा पति परलोकवासी झाल्यानें ती गतभर्तृका झाली व महाराष्ट्रीयांनीं अद्वितीय रत्न गमाविलें, अशी आमची समजूत आहे. 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम्' अशी कविकुलगुरूक्ति आहे ती आम्हांस अक्षरशः मान्य आहे. परंतु हा अबाधित सृष्टिनियम शास्त्रीबोवा वयातीत

झाल्यावर त्यांस लागू पडता म्हणजे आम्हांस इतका खेद करण्यास जागा उरती ना. परन्तु ज्याप्रमाणें एखादा प्रचंड वृक्ष फळास येतो आहे नाहीं तों विद्युत्पात होऊन तो जमीनदोस्त व्हावा, त्याप्रमाणें आतां आतां कोठें शास्त्रीबोवांच्या बुद्धीचीं परिपक्व फळें हवीं तशीं लोकांस मिळूं लागलीं होतीं तों त्यांस करुणाविमुख मृत्यूनें हरून नेलें हा केवढा दुःखाचा प्रसंग! गेल्या वर्षीच आम्हीं एकत्र होऊन एकदिलानें प्रस्तुत उद्योग आरंभिला तेव्हांची वीरश्री कोणीकडे आणि केसरीराजाच्या नैसर्गिक उद्धत वृत्तीला अननुरूप अशी सांप्रतची खिन्नावस्था कोणीकडे? असो, धैर्य धरून आला दिवस कसा तरी घालविलाच पाहिजे.

विष्णुशास्त्री हे प्रसिद्ध कृष्णशास्त्री यांचे चिरंजीव. यांचें जन्म १८५० त झालें. यांना लहानपणापासून वाचण्याचा जबरदस्त नाद असे. ज्याप्रमाणें डॉक्टर जान्सन बापाच्या दुकानावर बसून फावल्यावेळीं अनेक विषयांवरील व्हॉल्मेंच्या व्हाल्में फडशा करी, त्याप्रमाणें 'दक्षिणाप्रैज कमिटी' किंवा 'नेटिव प्रेसचे रिपोर्टर' या नात्यानें कृष्णशास्त्र्यांकडे जीं पुस्तकें येत तीं हे भावी शास्त्री वाचून टाकीत. या रीतीनें मॅट्रिक्युलेशन होण्यापूर्वीच विष्णुपंतांच्या नजरेखालून अनेक ग्रंथ जाऊन मराठी भाषेवर त्यांचें प्रेम जडलें, व तें उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेलें. १८६५ त विष्णुशास्त्री यांची पहिली परीक्षा होऊन ते कॉलेजांत गेले. त्यांना गणिताचा मोठा कंटाळा असे. मेकालेप्रमाणें ते आपला सारा वेळ ऐतिहासिक ग्रंथ वाचण्यांत घालवीत. १८७२ त त्यांची बी. ए. ची परीक्षा पास झाली. १८७३ त कांहीं महिने बाबा गोखले यांच्या शाळेंत शिक्षकाचें काम केल्यानंतर येथिल सरकारी हायस्कुलांत त्यांना नव्वदांची जागा मिळाली, व पुढें नव्वदांचे शंभर झाले. निबंधमालेचा पहिला अंक १८७४ त बाहेर आला. निबंधमाला जों जों मोठी होऊं लागली तों तों शास्त्रीबोवांचीं मतें बाहेर पडून स्वातंत्र्यशत्रु आणि स्तुतिप्रिय अशा अधिकाऱ्यांशीं त्यांचें तेढें पडूं लागलें. आपल्या कर्तव्यांत निरंतर तत्पर असल्यामुळें शास्त्रीबोवा कधीं कोणाची पर्वा ठेवीत नसत. याचा परिणाम असा झाला कीं, जात्या परप्रतिष्ठाअसहिष्णु असे आमचे डायरेक्टर चाटफील्ड साहेब यांच्या तापट प्रकृतीवर कित्येक निंदकांनीं तैलवृष्टि केल्यामुळें तिनें जो पेट घेतला त्यासरशी त्यांनीं शास्त्री-

बोवांची 'परशुराम क्षेत्रास' गठडी वळली. कोंकणवास विष्णुशास्त्र्यांना पराकाष्ठेचा दुःसह होऊन राजसेवाशृंखलांतून आपला पाय काढून घेण्याविषयीं त्यांचा निश्चय झाला. १८७८ त कृष्णशास्त्री वारले. १८७९ च्या एप्रिलांत विष्णुशास्त्री चाकरी सोडण्याच्या बेतानें आपलें चंबूगवाळें आटोपून पुण्यास आले. चारपांच महिने काय करावें, कोणता धंदा काढावा अशा विचारांत गेले. या सुमारास डेक्कन कॉलेजांतील दोनतीन गृहस्थांचा सरकारी नोकरी न करितां स्वतंत्रपणें लोकोपयोगी एखादें काम करण्याचा निश्चय झाला. नोकरी सोडून गांवांत शास्त्रीबोवा येऊन बसले आहेत असें कळल्याबरोबर सदर्हू मंडळी त्यांस जाऊन भेटली, व उभयतांच्या विचारें एक शाळा काढण्याचा विचार झाला; त्याप्रमाणें १८८० च्या जानेवारी महिन्यांत 'न्यू इंग्लिश स्कूल' या नांवानें मोरोबादादा फडणीस यांच्या वाड्यांत शाळा घातली; ती आतां कोणत्या स्थितींत आहे हें सांगायला पाहिजे असें नाहीं. शाळेस पुरें वर्ष झालें न झालें तों तिला आणखी एक दोन गृहस्थ येऊन मिळाले. पांचसहा मंडळी एका हेतूनें व एका मतानें वागत असल्यामुळें शाळेचें काम आटोपून आणखीही कांहीं करितां येईल असें वाटल्यावरून शुद्ध इंग्रजी आणि शुद्ध मराठी अशीं दोन वर्तमानपत्रें काढण्याचा विचार झाला, व त्याप्रमाणें ८१ च्या जानेवारींत मराठा व केसरी हे बाहेर आले. या दोघांनीं मिळून एका वर्षांत महाराष्ट्र देशांत केवढी चळवळ करून सोडिली आहे, याचा वाचकांनींच विचार करावा. याखेरीज शास्त्रीबोवांचे खासगी धंदे जोरानें चालले होते. निबंधमाला, किताबखाना, चित्रशाळा वगैरे गोष्टी नेटानें चालल्याच होत्या. येणेंप्रमाणें शास्त्रीबोवा ज्या उद्योगांत व्यग्र असत त्यांची थोडीशी हकीकत झाली. शास्त्रीबोवांचे बहुतेक विचार त्यांच्या मालेंतून आणि केसरींतून प्रसिद्ध आहेत, तेव्हां त्यांसंबंधानें विशेष लिहावयाचें आहे असें नाहीं. पण ज्या गोष्टी अतिशय भिडस्त स्वभावामुळें शास्त्रीबोवा जिवलग मित्रांबरोबर कधींही काढीत नसत, त्यांसंबंधानें येथें दोन शब्द लिहिण्याचा हेतु आहे.

आपल्या देशाचें पारतंत्र्य आणि दारिद्र्य हीं शास्त्रीबोवांच्या अंतःकरणाला जशीं खात तसें दुसरें कांहीं खात नसे. आपल्या लोकांची दैन्यावस्था पाहून त्यांचा जीव तिळतिळ तुटे. पारतंत्र्याला ज्ञान आणि दारिद्र्याला उद्योग

हींच वस्ताद औषधें असें ते नेहमीं म्हणत. लोकांना खरें ऐहिक सुख होण्याला त्यांची राज्यव्यवस्था कशी पाहिजे याचा विचार त्यांच्या मनांत नेहमीं घोळत असे. लोकांत विद्याप्रसार होऊन त्यांना राजकारणांतील तत्त्वें कळावीं व तदनुसार त्यांनीं वर्तन ठेवून या हतभाग्य भरतखंडास त्यांनीं एकदां तरी सुदिन आणावा ही त्यांची बळकट इच्छा असे. परकीय लोक राज्य करीत असल्यामुळें आमचे लोक सत्त्वहीन होत जाऊन अप्पलपोटे, भेकड, हांजीहांजीखोर, मठ्ठ, निर्लज्ज, अभिमानशून्य असे झालेले पाहून त्यांच्या अंगाचा तिळपापड होई. परकीय या नात्यानें इंग्रजांचा त्यांना अत्यंत कंटाळा असे, पण त्यांची करामत, दृढता, कौशल्य आणि उद्योग हीं पाहून त्यांस त्याचें पराकाष्ठेचें आश्चर्य वाटत असे. हिंदुलोकांचा, हिंदुधर्माचा, हिंदुरिवाजांचा, सारांश ज्याला ज्याला म्हणून ‘ हिंदु ’ हें विशेषण लावितां येईल त्याचा त्यांना मोठा अभिमान असे. सर्वांपेक्षां मराठी भाषेवर त्यांचें जें प्रेम असे तें कांहीं पुसूंच नये. एकसारखीं सात वर्षें तिची उपासना करून त्यांनीं तिला अगदीं भारून टाकल्यासारखें केलें होतें. ज्याप्रमाणें प्रख्यात फ्रेंच ग्रंथकर्ता व्होल्टेर यानें एकदां कोरडा उचलला म्हणजे स्टाकहोम व रोम, आणि पीतर्सबर्ग व लिस्बन यांच्या दरम्यान चटसारी मंडळी चळचळ कांपत असे, त्याप्रमाणें शास्त्रीबोवांनीं लेखणी उचलली कीं रावसाहेब, रावबहादुरें, रेवरंडे, सरस्वती—यांची पांचावर धारण बसे. आपल्या मागें आपलें नांव चालविण्यास त्यांनीं एक सतसंवत्सरा निबंधमाला कन्येखेरीज दुसरें कांहीं ठेविलें नाहीं. त्यांच्या त्या गद्य कृतीला “ स्फुरत्कलालापविलासकोमला ” हें बाण कवीचें वर्णन हुबेहुब लागतें. कोणी एकदां शास्त्रीबोवांना असा प्रश्न केला होता कीं असे कडक लेख लिहिण्यास तुम्ही कसे धजतां ? त्यावर त्यांनीं असें उत्तर केलें कीं अगोदर तुरुंगांत एक पाय ठेवून मग आम्ही देशोन्नतीसाठीं आपली लेखणी हातीं घेतली. एखाद्या वेळेस त्यांचा कल्पनाविहंग पूर्ण पंख पसरून भराऱ्या मारूं लागला म्हणजे त्याला हिंदुस्थान देश स्वतंत्र होऊन प्रजासत्ताक राज्याखालीं सुखानें नांदत आहे असें दिसे. पुनर्विवाह, बालविवाह, स्त्रीशिक्षण, स्त्रीस्वातंत्र्य, धर्मसंस्थापना, जातिभेद यासंबंधानें त्यांचे विचार जुन्या मताचे दिसत, परंतु ते वास्तविक रीतीनें अगदीं पुढें सरसावलेल्या

सुधारकांप्रमाणें होते. फार कशाला, गेल्या केसरींतील 'देशोन्नति' या सदराखालचा निबंध जो कोणी लक्ष लावून वाचील त्याला शास्त्रीबोवांचे जातिभेदासंबंधानें काय विचार होते हें सहज लक्षांत येईल. इतकें खरें आहे कीं ते या विषयासंबंधानें फारसें कधीं लिहीत नसत; पण लिहूं लागल्यास वृद्ध पिढीचा रोष होईल म्हणून आपलीं खरीं मतें पुढें करण्यास ते कधींही भीत नसत. सारांश, हिंदुस्थानचें पारतंत्र्य नष्ट होऊन तो स्वराज्याखालीं सुखी होण्याचें कोणतेंही साधन असल्यास त्याला ते अडथळा घेणारे नव्हते.

बरवेप्रकरण चालू असतां त्यांचा एकाएकीं अंत झाला हें पाहून कोणीं अधमांनीं अशी कंडी उठविली कीं कारभाऱ्याला भिऊन जाऊन त्यांनीं आत्महत्या केली. असले नीच नरपुंगव कोण असतील ते असोत. शास्त्रीबोवांना तर आपल्या लेखणीच्या सामर्थ्याविषयीं अशी धमक होती कीं प्रसंग पडल्यास तुरुंगांतल्या तुरुंगांत 'असल्या शेंपन्नास राजशत्रूंना सर्व महाराष्ट्राकडून मी 'छी थू' करून सोडीन.' असें ते म्हणत असत.

शास्त्रीबोवांचीं ठळकठळक राजकीय व सामाजिक मतें सांगण्यांत आलीं. हिंदुस्थानच्या दारिद्र्याच्या संबंधानें त्यांची अशी खात्री झाली होती कीं येथें व्यापारवृद्धि झाल्याविना आमच्या देशाचें डोकें वर निघणार नाहीं. याच उद्देशानें त्यांनीं सरकारी दास्याची रुपेरी बिडी तोडून घेऊन पुणें येथें स्वतंत्रपणानें वास्तव्य करण्याचा विचार केला व एकीकडे अध्ययन, अध्यापन आणि ग्रंथरचना यांत आपला कालक्रम करण्याचा निश्चय करून दुसरीकडे आपल्या नजरेखालीं छापखाना, चित्रशाळा, किताबखाना वगैरे कारखाने काढिले. लवकरच कांहीं खटपट करून कागदाचें एक यंत्रही आणविण्याचा त्यांचा विचार होता. हे धंदे त्यांनीं द्रव्यसंपादनेच्छेनें काढिले असें नाहीं. कारण द्रव्यसंबंधानें शास्त्रीबोवा जितके निरपेक्ष होते तितका दुसरा पुरुष सांपडणें कठिण. त्यांचा हेतु असा असे कीं देशांत कारखाने निघून लोकांस काम मिळावें व त्यांस भाकरीची वाण पडूं नये. शास्त्रीबोवांनीं वर जे कारखाने काढिले त्यांत तरी त्यांचा येवढाच हेतु होता. त्यांपासून स्वतःचा फायदा करून घेण्याची इच्छा त्यांनीं कधीं धरली नाहीं. त्यांचें असें म्हणणें असे कीं बुद्धिवान् आणि चतुर लोकांनीं मोठमोठे धंदे अंगा-

वर चालू करावे आणि मग ते साधारण लोकांच्या हातांत देऊन आपण त्यापासून अलग रहावें. आम्हांस तर असें वाटतें कीं शास्त्रीबोवांसारखा हिम्मतवान, प्रशांत, गंभीर आणि निरपेक्ष मनुष्य अत्यंत विरळा असेल. कोणी हितचिंतक मित्र विनोदानें आमच्या गट्टीस ग्राज्वेट पंचायतन, ग्राज्वेट पांडव असें म्हणत. निष्ठुर मृत्यूनें आम्हांपैकीं आमचा भ्राता धर्मराज आज यमसदनास पाठविला, व आमच्या बंधाचा ग्रंथमणि हिराविला ही गोष्ट खरी तथापि आमची अशी उमेद आहे कीं एकवार मनाचा निश्चय करून देशोन्नतीसाठीं झटण्याचा केलेला संकल्प होतां होईल तों ढळूं देणार नाहीं. प्रथम आम्हांविषयीं अशी भीति होती कीं, द्रव्यसंबंधानें आमच्यांत आपआपसांत कलागती लागून आमची जूट फुटेल. पुढें बर्वेप्रकरण येऊन धडकलें तेव्हां तर कित्येकांना असें वाटलें कीं, या ग्राजुएटांची फजफजीति होते! आणि आतां तर आम्हांपैकीं एकानें परलोकास प्रयाण केलें! तेव्हां आम्हांविषयीं लोकांच्या मनांत नानातऱ्हेचे तरंग येऊं लागले यांत नवल नाहीं. पण सर्वांनीं एक गोष्ट लक्षांत धरावी ती ही कीं, आम्ही जो उद्योग आरंभिला तो लोकांनीं घोड्यावर बसविलेल्या रुडत रावाची मनोवृत्ति धारण करून आरंभिला नाहीं. हें काम आम्हीं आपल्या आपखुषीनें आणि आपसमजुतीनें आमचें आम्हीं आपल्या अंगावर घेतलें; तें तडीला लावण्यासाठीं आमच्याकडून होईल तितका प्रयत्न करण्यास आम्ही कधींही सोडणार नाहीं. देवाच्या किंवा दैवाच्या इच्छेपुढें इलाज नाहीं, अशा रीतीनें मनाची खोटी समजूत घालून अशा लोकहिताच्या कामांत प्रतिपक्षाची क्षमा मागण्याचें काम आमच्या हातून होणार नाहीं. अधिकार, धन, वजन यांपुढें टिकाव धरणें दुस्तर आहे हें आम्ही कबूल करितों. परंतु सत्याचा कैवार घेऊन शुद्ध अंतःकरणानें लोकहितासाठीं भांडणारांना कोणत्याही प्रकारची धास्ती बाळगण्याचें कारण आहे असें आम्हांस वाटत नाहीं. आणि असें असूनहि प्रसंग येऊन बेतलाच तर तो साहण्यास आम्ही कचरूं अशी कोणीहि शंका घेऊं नये. आमचें धैर्य आणि कार्यनिष्ठा हीं कसास लागण्याची संधि आली आहे असें आम्ही समजतों. शास्त्रीबोवांचीच कथा काय, पण आम्हांपैकीं एक जरी तळावर असला तरी तो आम्हीं सर्वांनीं आरंभिलेले उद्योग अविच्छिन्न चालविण्यास होईल तितकी खटपट करील,

देशोन्नति, देशकल्याण वगैरे गोष्टी थोडीबहुत अंगास झीज लावून घेतल्याखेरीज फुकाच्या पोकळ गप्पा मारून होत नाहींत हें आम्ही पक्कें समजत आहों. ती लावून घेण्यास आम्ही तयार आहों. प्रयत्न करणें आमचें काम आहे; यश येणें न येणें बाह्योपाधींवर अवलंबून आहे. त्याचा आम्ही विचार करीत नाहीं. येवढें सांगून व त्या महात्म्याला परलोकीं सर्वोत्कृष्ट शांति आणि कल्याण चिंतून हा लेख आटोपतों.

(राष्ट्राचें ऐक्य होण्यास लागणारा एक तरी गुण आम्हांत भरपूर आहे काय ? धैर्य नाहीं; उत्साह नाहीं; बल नाहीं; ज्ञान नाहीं; तर्क नाहीं; उद्योग नाहीं; कला नाहीं; खरा देशाभिमान नाहीं; खरी धर्मश्रद्धा नाहीं; खरें बोलण्याची किंवा खरें आचरण करण्याची संवय नाहीं; सारांश, चांगलें असें कांहीं नाहीं. ज्याची त्याची अहोरात्र वर्तमान क्षुद्र स्वार्थावर दृष्टि लागली असल्यामुळें आपल्या विचाराचा व आचाराचा भावी संततीवर काय परिणाम होणार याचा कोणीहि फारसा विचार करीत नाहीं.) उदाहरणार्थ, अलीकडील राष्ट्रसभेची चळवळ घ्या. ही चळवळ आम्हांस सर्वथैव कल्याणकारक व्हावी अशी तिची योजना केली आहे. कोणालाहि उघडपणें या चळवळींत जाऊन मिळण्यास हरकत नाहीं. असें असून तीविषयीं केवढी हेळसांड ती पहा ! अगदीं खालच्या प्रतीच्या लोकांनीं अजून तिचें नांवही ऐकलें नसेल. तेव्हां त्याच्याकडून तिला द्रव्यद्वारां मदत होण्याची अपेक्षा करणें म्हणजे दुधाच्या आशेनें पारड्या गाईचे आंचळ ओढीत बसण्यासारखें होय ! जे मध्यम प्रतीचे लोक आहेत, व ज्यांना या संस्थेचें महत्त्व समजत आहे, ते देखील हिला हवी तेवढी मदत करीत नाहींत हें आश्चर्य नव्हे काय ? ह्यांच्या कांसा शुष्क नाहींत; पण राष्ट्रसभा हें आपलें वासरूं आहे, असें यांस वाटत नसल्यामुळें हे आपल्या कांसेला त्यांस बिलकूल तोंड लावूं देत नाहींत ! पण याहीपेक्षां विशेष चमत्कार व विस्मय वाटण्यासारखी गोष्ट ही कीं, ज्या ह्यूमसाहेबानें ही राष्ट्रसभा अस्तित्वांत आणिली, आणि आपलें सामर्थ्यसर्वस्व खर्च करून तिचें हरएक प्रकारें आज सात वर्षें संरक्षण केलें, त्यावर त्याच्या जातभाईनीं राजद्रोहाचा बडगा उचलतांच आमच्यांतले शहाणेसुर्ते म्हणविणारे कांहीं लोकही त्यावर तुटून पडूं लागले ! खासा न्याय ! खासें धैर्य ! खाशी देशभक्ति ! हिंदुस्तानच्या काळींचें उत्पन्न सुमारें वीस कोटी रुपये आहे, व तेवढाच लष्करी खात्याचा खर्च आहे. हिंदुस्थानच्या सैन्याइतकें महागडें सैन्य दुसऱ्या कोणत्याही

देशांत नाहीं, व या सैन्यावर होणाऱ्या धिप्पाड खर्चाचा बराच भाग हिंदु लोकांच्या खिशांत पडत नाहीं. जवळ जवळ याचप्रमाणें इतर खात्यांचीही व्यवस्था आहे- त्यामुळें हिंदुस्थानच्या पाऊणशें किंवा ऐशीं कोटी उत्पन्नांपैकीं सुमारें दोन तृतीयांश उत्पन्नापासून आम्हांस द्रव्यद्वारां कवडीचाहि मोबदला मिळत नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं.) असा प्रकार एक वर्ष नाहीं, दोन वर्षं नाहीं, सुमारें शंभर वर्षें चालला आहे. या शंभर वर्षांत हिंदुस्थानचें उत्पन्न सरासरीनें चाळीस कोटी पडलें असें धरिलें, आणि त्याचा फक्त अर्धा भाग प्रतिवर्षी इंग्लिश लोकांच्या खिशांत अचानक पडला असें मानिलें, तरी एका शतकांत दोन निखर्व रुपये या देशांतून परदेशांत गेले, असा हिशेब होतो. ज्या देशाच्या द्रव्याला असा पाझर लागला आहे त्या देशांतील लोकांना अन्नान्नदशा प्राप्त होणें हें किती स्वाभाविक आहे ? इंग्रजी राज्यापासून या देशावर घडणाऱ्या या भयंकर परिणामाची पुरी कल्पना ज्यांच्या मनात पक्की बिंबली असेल त्यांना आणखी पांच पंचवीस वर्षें असाच क्रम चालू राहील तर हिंदुस्थानांतील लोक एकमेकांस खाऊं लागतील. किंवा भुकेच्या दुःसह यातनांमुळें बेफाम होऊन जाऊन ते आपल्या राज्यकर्त्यांचें जूं झुगारून देण्यास प्रवृत्त होतील, असें डोळ्यांपुढें ढळढळीत दिसून आल्यावांचून राहील काय ? व ज्यांच्या अंतःकरणांत खऱ्या देशाभिमानाचा व खऱ्या मनुष्यपणाचा कांहीं अंश आहे, त्याला ही गोष्ट उघडपणें बोलल्यावांचून रहावेल काय ? ह्यूमसाहेबांनीं आपल्या पत्रांत याहून अधिक काय म्हटलें आहे ? हिंदुस्थानच्या भयप्रद दारिद्र्याचें त्यांत जें भयंकर चित्र काढिलें आहे तें खोटें आहे असें म्हणण्याची कोणाची छाती आहे ? दादाभाई नौरोजी, सर एव्हेलिन बेअरिंग, डॉक्टर हन्टर, सर चार्लस डिल्क वगैरे बहुश्रुत गृहस्थ तर राजद्रोही नाहींत ना ? पण त्यांनीं प्रसिद्ध केलेल्या हिशेबांवरूनही असें उघड होतें कीं, ब्रिटिश अंमलांतील मनुष्याचें वार्षिक उत्पन्न सरासरीनें तीन रुपयांपेक्षां अधिक नाहीं; तसेंच हिंदुस्थानांतील निम्मे किंवा दोनतृतीयांश लोक अर्ध्या पोटीं सारा जन्म काढतात ! राजनिष्ठ लोकांनीं अशी जबानी दिली असून अँग्लो-इंडियन पत्राबरोबर आमच्या लोकांनीं ह्यूमसाहेब अतिशयोक्ति करतात, ह्यूमसाहेब पराचा कावळा करतात, वार्धक्यामुळें ह्यूमसाहेबांना वेड लागल्या-

सारखें झालें आहे, असें बरळणें हा केवढा प्रमाद व कृतघ्नपणा होय ! चार साहेब लोकांकडून बरें म्हणवून घेण्यासाठीं हिंदुस्थानच्या व इंग्लंडच्या खऱ्या हितचिंतकांवर अशा रीतीनें उलटून पडणें हें आम्हां भेकड, लोभी, अविचारी, व स्वार्थी हिंदु लोकांशिवाय दुसऱ्या कोणाच्यानेंही होण्यासारखें काम नाहीं. ज्यांनीं ह्यूमसाहेबांस भ्रमिष्ट ठरविलें आहे त्यांनाच तसें ठरविणें विशेष उचित होणार आहे ! ह्यूमसाहेबांसारखी आमची आम्हांस कळकळ असती तर राजद्रोहाचा किंवा दुसरा कसलाही आरोप आपणावर आणून घेण्यास व त्याचे परिणाम साहण्यास आम्ही तयार झालों असतों. ह्यूम-साहेबांस बेवकूफ ठरविणाऱ्या या वृद्ध शहाण्यांना येवढें तरी समजावयाला पाहिजे होतें कीं, ह्यूमसाहेबांस अगोदर फांशी चढविल्याशिवाय फांसाचे पदर आपल्या गळयाभोंवतीं बसण्याचा संभव नाहीं. पण इतकें धैर्य आमच्या अंगीं असतें तर आमची सांप्रत दास्यावस्था आम्हांस कोठून आली असती? कोणताही नवीन प्रघात रूढ होण्यापूर्वीं त्याला तीन पहाऱ्यांतून जावें लागतें. पहिला पहारा मनाचा, दुसरा वाणीचा, आणि तिसरा आचरणाचा. यांपैकीं प्रत्येक पहाऱ्यांतून जात असतां त्याला 'मज्जाव' झाल्याखेरीज राहत नाहीं ! लोकोत्तर पुरुषाची गोष्ट एकीकडे राहूं द्या; शेंकडा नव्याण्णव लोकांस नवीन कल्पना सुचत नाहीं, व सुचली तरी तिला डोक्यांत थारा द्यावा, असें त्यांस वाटत नाहीं. सामान्य मनुष्याचें डोकें पूर्वापार चालत आलेल्या व लहानपणापासून अनेक द्वारांनीं संपादिलेल्या साधारण कल्पनांनीं ठिकी सारखें गच्च भरून गेलेलें असतें. त्यांत एखादी नवीन कल्पना शिरूं देण्यास त्याला अतिशय प्रयास पडतात खचून भरलेल्या व सुतळीनें तोंड शिवलेल्या पोत्यांचे दोन तीन टांके तोडून त्यांतील पायली दोन पायली धान्य बाहेर काढल्याशिवाय ज्याप्रमाणें त्यांत नवीन धान्य सांठविणें शक्य नसतें, त्याप्रमाणें वेड्यावांकड्या विचारांनीं ज्याच्या मनांतील तिळन्तिळ जागा व्यापून टाकली आहे, त्याच्या मनांतील वतनदार होऊन बसलेल्या कांहीं विचारांस हुसकून लाविल्याशिवाय तेथें नवीन विचारांची डाळ मुळींच शिजत नाहीं ! कोणतीही गोष्ट आचारांत आणण्यापूर्वीं किंवा तिजविषयीं लोकांत चर्चा सुरू करण्यापूर्वीं ती चांगली आहे, अशी ज्याच्या त्याच्या मनांत पक्की खातरी झाली पाहिजे. मनुष्य एकांतांत बसला आहे, स्वच्छ

उदकाप्रमाणें किंवा आरशाप्रमाणें मनाचें दर्पण पुढें मांडिलें आहे, आणि त्यांत प्रतिबिंबित झालेल्या विचारांचें व कल्पनांचें हुबेहुब स्वरूप अवलोकन करीत आहे; अशा स्थितींत एखाद्या आगंतुक विचाराचें प्रतिबिंब त्या दर्पणांत पडूं देऊन त्याच्या रूपाची व आकाराची इतरांच्या रूपाशीं व आकाराशीं तुलना करण्यास त्याला भीति कशासाठीं वाटावी ! अभ्यासाच्या खोलीचें दार लावून घेऊन मनाच्या कपाटाचीं दारें खुलीं टाकण्यास व त्यांतून पाहिजे त्या विचारांस बाहेर पडूं देण्यास व पाहिजे त्यांस आंत शिरूं देण्यास ज्याची छाती होत नाहीं, तो मनुष्य कुचक्या कसपटापेक्षांही नादान होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण असलेच मनुष्य जगाच्या सांप्रत स्थितींत जेथें तेथें फार आढळतात; निदान हिंदुस्थानांत तरी ते असावे त्यापेक्षां फार फाजील आहेत; आणि हा फाजीलपणाच आमच्या चिरकालीन दैन्यावस्थेस आद्य कारण झाला आहे. स्वतंत्रपणें विचार करतां करतां तो बोलून दाखविण्याचें धैर्य येतें, व बोलतां बोलतां क्रिया करण्याचीही इच्छा उत्पन्न होते. मनाच्या देवडींतून जी कल्पना जोरानें निसटते ती वाचेच्या किंवा कायेच्या देवडीवरील रखवालदारांस फारशी डगणारी नसते ! मनोंतल्या मनांत पाहिजे त्या विषयाविषयीं हवा तसला विचार करण्यास कशाचीही भीति नसतां, पुष्कळांचीं मनें तसें करण्यास कां कचरतात कोण जाणे. बहुधा त्यांना अशी दहशत वाटत असेल कीं जे विचार लोकमतानें अश्लाघ्य किंवा त्याज्य मानले आहेत त्यांना आपण आपल्या मनांत आश्रय दिला तर कदाचित् आपल्या मनांतील चांगल्या विचारांस ते हुसकून लावून त्यांची जागा बळकावतील; आणि या आगंतुकांचें एकदां का वर्चस्व झालें म्हणजे आपल्या तोंडावाटे ते बाहेर पडूं लागतील, आणि न जाणों आपल्या आचरणावरही त्यांचा परिणाम होऊं लागून त्याबद्दल लोक आपणांस दूषण देऊं लागतील. नवीन विचाराविषयीं, मनुष्यांच्या मनांत जी दुर्मुखता दृष्टीस पडते तिचें खरें कारण हेंच असेल, व त्यामुळें इतके लोक विचाराच्या कामीं गतानुगतिक होत असतील तर आज आम्हांस जी स्थिति प्राप्त झाली आहे, ती अगदीं स्वाभाविकपणें प्राप्त झाली आहे, असें म्हटल्यावांचून गत्यंतर नाहीं; कारण या देशांत अशाच लोकांचा भरणा फार आहे; व ह्या भरण्याचें प्रमाण असेंच राहणार असेल तर या देशाचें डोकें वर निघण्याची

आशा करणें शुद्ध वेडेपण होय. पृथ्वीवर आजपर्यंत जे स्वतंत्र व सुखी देश होऊन गेले आणि आजमित्तीस ज्या देशांत तीं सुखें नांदत आहेत, त्या देशांत मधून मधून स्वतंत्रपणें विचार करणारे अनेक पुरुष होऊन गेले व होत आहेत, हें स्पष्टपणें दाखवितां येणार आहे. अशा पुरुषांकडून वेळोवेळीं बऱ्यावाइटाची चर्चा झाल्याखेरीज कोणत्याही देशाची प्रगति होण्याचा संभव नाहीं. अपसर्गकारी कारणांचा लय आणि उत्सर्ग कारणांची उत्पत्ति व अभिवृद्धि झाल्याशिवाय जिला आपण सुधारणा म्हणतों ती कशी होणार ? ज्या गोष्टीपासून त्रास किंवा अडचण होते त्या दूर करणें, आणि ज्यापासून सोय व सौख्य होतें त्या जवळ आणणें यांचेंच नांव सुधारणा. तेव्हां चांगल्या गोष्टी कोणत्या व वाईट कोणत्या, याचा विचार करण्यास जर कोणी तयार नसेल व यदाकदाचित् तसें करण्यास कोणी प्रवृत्त झाला असतां त्याची विटंबना होईल, तर चांगल्या वाइटाचें परीक्षण होणार कसें, आणि जें चांगलें असेल तें लोकापुढें येऊन तें त्यांच्या अंगीकारास पात्र होणार कसें ? कोणतीहि गोष्ट अमलांत आणण्यापूर्वीं तिचा हवा तितका खल करण्यास आमची बिलकूल हरकत नाहीं इतकेंच नाहीं, तर तसें झाल्याखेरीज सामान्य लोकांनीं कोणत्याहि नवीन गोष्टीचा स्विकार करूं नये असें आमचें मत आहे. पण जेवढें जुनें तेवढें निर्दोष व चांगलें असा आग्रह धरून बसून जर कोणी नवीन गोष्टींचें चिंतन व चर्चा करणार नाहीं, तर रूढ विचारांतले व आचारांतले प्रमाद दूर होणार कसे, व नवीन विचारांचें व आचारांचें चांगुलपण प्रस्थापित होऊन तें रूढ होणार कसें ? आपल्या देशांतील लोकास नवीन विचारांची जशी भीति वाटते तशी दुसरी कोणत्याहि देशांतलि लोकांस वाटत नसेल. उदाहरणार्थ, देव आहे किंवा नाहीं हा प्रश्न आपला आपणांस विचारण्याची कितीकांची छाती होणार आहे ? तसेंच, वेद पौरुष आहेत कीं अपौरुष आहेत; जातिभेद अस्तित्वांत कशामुळें आले, व ते चटसारे मोडून टाकले असतां काय परिणाम होतील; मुंज, लग्न वगैरे संस्कार, केव्हां, कोणी व कशासाठीं स्थापिले, आणि ते मुळींच नाहींसे केले तर काय होईल; पुरुषांप्रमाणें स्त्रियांनीं अविवाहित रहाण्यास, किंवा वाटेल तेव्हां हवें त्याशीं लग्न करण्यास काय हरकत आहे; पुरुषांप्रमाणें स्त्रियांस सारे राजकीय हक्क कां देऊं नये; एका बायकोनें पांचचार नवरे करण्यास,

अथवा दहापांच लोकांनीं पांचचार बायका ठेवण्यास किंवा करण्यास प्रत्यवाय कां असावा; जेवढीं रोगी व कुरूप मुलें अस्तित्वांत येतील तेवढीं एकदम मारून टाकण्याबद्दल कायदा कां नसावा; ज्या रोग्यांचे रोग वैद्यांच्या मतानें असाध्य ठरतील, व ज्या रोग्यांचें जीवित रोगांच्या असह्य यातनांमुळें अत्यंत कष्टमय झालें आहे, अशांस विष किंवा गोळी घालून यातनामुक्त कां करूं नये; रक्तपितीच्या रोग्यासारखे रोगी मोठ्या नदींत किंवा समुद्रांत बुडवून त्या रोगाचा बींमोड करण्यास काय हरकत आहे; पाहिजे त्याला पाहिजे त्या स्त्रीशीं समागम करण्याची परवानगी दिल्यास काय परिणाम घडतील; व्यक्तीचा अथवा कुटुंबाचा संपत्तीवरील हक्क नाहींसा करून देशांतील साऱ्या संपत्तीचे सारे लोक समाईक मालक कां न मानावे; आळीपाळीनें साऱ्यांस साऱ्या तऱ्हेचीं कामें करण्यास लावून उच्चनीचत्वाचा भाव मोडून टाकण्याचा प्रयत्न कां करूं नये; लोकसत्ताक राज्यपद्धतीशिवाय इतर प्रकारच्या राज्यपद्धति नाहींशा करण्यास काय हरकत आहे; वगैरे प्रश्नांचा आपापल्या मनाशीं शांतपणानें विचार करण्याची गोष्ट तर राहूंच द्या, पण असले प्रश्न कानावर पडल्याबरोबर ज्याचें धाबें गडबडणार नाहीं, व हें ऐकल्यानें आपल्या हातून मोठें पाप घडलें असें ज्यांस वाटणार नाहीं, असे किती लोक सांपडणार आहेत ? तथापि एका कालीं वैभवाच्या शिखरास चढलेल्या युरोपांतील कित्येक देशांतल्या तत्त्ववेत्त्यांनीं, मनुष्यानें आपल्या आईशीं किंवा सख्या बहिणीशीं लग्न करण्यास काय हरकत आहे किंवा ज्याला त्याला लग्न करण्याची व संतति वाढविण्याची सदर परवानगी असण्यापेक्षां ज्याप्रमाणें जातिवंत घोडे उत्पन्न करण्यास आपण विशेष प्रकारची व्यवस्था करतों, त्याप्रमाणें सुदृढ व सुरूप मनुष्य उत्पन्न करण्यासाठीं मनुष्यपोळ संस्थानच्या खर्चानें कां ठेवूं नयेत, अशाहि प्रश्नांचा यथास्थितपणें विचार केला आहे इतकेंच नाहीं, तर त्या प्रश्नांस त्या तत्त्ववेत्त्यांनीं जीं उत्तरें दिलीं आहेत त्यांच्या अनुरोधानें त्या देशांतील राज्यकर्त्यांनीं अनेक विलक्षण संस्था स्थापून त्या देशाच्या विचारावर, नीतीवर, वर्तनावर व इतिहासावर आश्चर्यकारक परिणाम घडवून आणिला. युरोप खंडांतील जुन्या ग्रीक लोकांसारखे लोक या पृथ्वीतलावर पुनः अवतरतील किंवा नाहीं याची बरीच शंका आहे. या अद्भुत लोकांनीं आपल्या विचारविहंगमांस पाहिजे तेवढ्या

उंचीच्या भराऱ्या हव्या त्या दिशेनें मारूं दिल्यामुळें, ते पराकाष्ठेचे काल्पनिक लोक ठरले आहेत इतकेंच नाहीं, तर त्यांनीं आपल्या शौर्यानें जे पराक्रम केले व बुद्धिसामर्थ्यानें ज्या अनेक शास्त्रांचे पाये घातले, ते आज अडीच तीन हजार वर्षांनंतर शोधक विचारी लोकांच्या प्रशंसेस पात्र होत आहेत! तसेंच, राजकीय विषयांत रोमन लोकांनीं जी कीर्ति संपादिली, ती मनुष्यजातीच्या अन्तापर्यंत टिकेल असें खात्रीनें म्हणतां येणार आहे. युरोपांतील अर्वाचीन राष्ट्रें आज हजारपांचशें वर्षे प्लेटो, अरिस्टॉटल, जस्टिनिअन वगैरेंच्या ग्रंथांचें प्रेमपुरस्सर चालन व अध्ययन करीत आहेत, पण अजून त्यांची तृप्तीच झाली नाहीं, तेव्हां त्यांचा त्यांस कंटाळा येण्याचें नांव कशाला पाहिजे? बरें, पण अलीकडील युरोपिअन लोकांना ग्रीक व रोमन लोकांविषयीं येवढी पूज्यबुद्धि आहे, म्हणून ते त्यांचें दोषाविष्करण करण्यास मागेंपुढें पहातात, असें मात्र कोणी समजतां कामा नये. त्यांच्या करामतीबद्दल ते त्यांची अतिशय प्रशंसा करतात हें जरी खरें आहे, तरी त्यांचीं प्रमादस्थलें ते कधींहि छपवीत नाहींत. असा प्रकार कोणाकडून झालाच तर तो थोडा बहुत तिकडील धर्माभिमान्यांकडून होतो! आमची गोष्ट याहून अगदीं निराळी आहे. जें जें म्हणून जुनें आहे तें सारें आम्हांस निर्दोष, पूज्य व संरक्षणीय वाटतें. आमच्या मनाच्या या खोडीमुळें जमिनींत खोल पुरलेल्या खांबाप्रमाणें आमची स्थिति झाली आहे! जुन्या वेदान्तापलीकडे वेदान्त नाहीं जुन्या गणितांपुढें गणित नाहीं; जुन्या अलंकाराहून अलंकार नाहींत; जुन्या व्याकरणापुढें गति नाहीं; जुन्या न्यायापेक्षां दुसऱ्या न्यायांत अर्थ नाहीं! असल्या भ्रमामुळें आमचे डोळे बांधल्यासारखे होऊन आज कित्येक शतकें तेल्याच्या बैलाप्रमाणें आम्ही जुन्या शास्त्रांच्या आणि पुराणांच्या घाण्याभोंवतीं घिरट्या घालीत आहों! हें आमचें परिभ्रमण केव्हां संपेल तें संपो; पण यांतून सुटका झाल्याखेरीज कोणत्याही शास्त्रांत किंवा कलेंत आमचें पाऊल पुढें पडण्याचा संभव नाहीं! सायणाचार्य, पाणिनी, मंमट, दंडी, चरक, सुश्रुत, भास्कराचार्य वगैरे फार मोठे पुरुष होऊन गेले असें रोज सकाळीं उठून म्हणा आणि त्यांस व त्यांच्या ग्रंथांस पाहिजे तर साष्टांग नमस्कार घाला. पण यापलीकडे त्यांच्या नांवाचे पवाडे गात बसण्यांत किंवा त्यांच्या ग्रंथांना पुनःपुनः प्रेमानें कवटाळण्यांत काय

अर्थ आहे ? त्यांत जेवढा ग्राह्यांश असेल तेवढा अलबत घ्या, व त्यांचें काळजीपूर्वक रक्षण करा. ) पण त्यांच्या कृतींत जीं दोषस्थलें असतील तीं काढून टाकून तींत नवीन भर टाकण्याचा प्रयत्न केल्याशिवाय तुमचा निभाव कसा लागेल ? पुढील उपमेबद्दल कदाचित् कोणास वाईट वाटेल, पण सारासार विचार करतां एखाद्या पराक्रमी पुरुषाच्या बहुभाष विधवे-प्रमाणें आम्हां भारतीयांची स्थिति झाली आहे, असें आम्हांस वाटतें ! पति-निधनामुळें नवीन संतानाची आशा खुंटलेली ती गतभर्तृका ज्याप्रमाणें अस-लेल्या अपत्यांचें दृढालिंगन करून 'आमचे पुरुष असे होते, आमच्या पुरुषांनीं तसें केलें ' अशा प्रकारचे गुणानुवाद गाण्यांतच आपलें समाधान मानून घेते, व आपल्या जीविताची कृतार्थता समजते त्याप्रमाणें जुन्या थोर पुरुषांचे गुण गाण्यांतच आमच्या पुरुषार्थांची परमावधि होऊन बसली आहे !

आमच्या राज्यकर्त्यांस आमच्याच फायद्याकडे लक्ष द्यावयाचें असतें तर गोष्ट निराळी होती. पुष्कळदां आमच्या फायद्यापेक्षां त्यांना आपल्या देशाच्या व देशबांधवांच्या फायद्याकडे विशेष नजर पुरविणें भाग पडतें! त्यांनीं असें करावें हें अत्यंत स्वाभाविक आहे. पण व्यापारदृष्टीनें पाहतां इंग्लिश लोकांचा जो फायदा तो आमचाही फायदा असणें स्वाभाविक नाहीं. जें काम आमचें आम्हांस करतां येण्यासारखें आहे तें आमचें आम्हीं न करतां स्वस्थ बसलों आणि तें दुसऱ्याकडून करून घेतलें, तर त्याबद्दल दुसऱ्यास जें वेतन, रोजमुरा किंवा किंमत द्यावी लागेल तिच्या मानानें आमचें नुकसान होणार आहे. या किंमतीबद्दल आम्हांस विश्रांति मिळेल ही गोष्ट खरी. पण पोट भरलेलें असलें तरच विश्रांति सुखावह होते. लहान मुलांस भूक लागली असतां तीं रडत उठतात हें सर्वांस ठाऊक आहेच; व या गोष्टींत लहान मुलांप्रमाणेंच थोरांचीही स्थिति आहे. पोटांत कावळे कोरूं लागले असतां स्वस्थ बसण्यापासून सुख कसें होणार? भुकेच्या यातनेपेक्षां कामाचे श्रम सहज साहण्यासारखे आहेत. इंग्लिश लोकांनीं आमचा व्यापारधंदा आटोपल्यामुळें निरुद्योगापासून होणारे हाल आम्हांस सोसावे लागत आहेत. यावर कोणी असा प्रश्न विचारतील कीं, इंग्लिश लोकांस तुम्हीं आपले धंदे नाहींसे करूं का दिलेत? याचें उत्तर एवढेंच आहे कीं, ज्या कारणांमुळें आम्हीं आपलें राज्य त्यांना घेऊं दिलें त्याच कारणामुळें आम्हीं आपले धंदेही आटोपूं दिले! आणि राज्य परत मिळविण्यासाठीं ज्या प्रकारच्या खटपटींचा उपक्रम आम्हीं केला आहे त्याच प्रकारच्या खटपटी व्यापारधंदा फिरून हातीं येण्यासाठींही चालविल्या आहेत. एक दुसऱ्याशीं संलग्न आहे; तेव्हां साध्य होणार असतील तर दोन्ही एकाच क्रमानें साध्य होत जातील! भेद इतकाच आहे कीं, व्यापारधंद्याच्या संबंधानें आम्हांस आमच्या सरकारशीं विशेष राजरोसपणानें भांडतां येतें. (तथापि हें भांडण घालीत असतां ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, आधिभौतिकदृष्ट्या इंग्रज लोकांस हिंदु-

स्थानच्या राज्यापेक्षां हिंदुस्थानशीं व हिंदुस्थान हातीं असल्यामुळें सर्व आशिया खंडाशीं, करतां येत असलेल्या व्यापारापासून अधिक फायदा होत आहे. तेव्हां जर आम्हीं आपल्या व्यापाराचें पुनरुज्जीवन मनापासून करूं लागलों, तर त्यांना उघडपणें जरी त्याला प्रत्यवाय करतां येणार नाहीं तरी आमचा सगळा व्यापार आमच्या हातीं फिरून पडूं देण्यापेक्षां आमचें राज्य ते आम्हांस अधिक आनंदानें परत देतील! आम्हां हिंदु लोकांस युरोपिअन किंवा अमेरिकन लोकांप्रमाणें नाना तऱ्हेच्या अनेक वस्तूंचा उपभोग घेण्याची हौस लागलेली नाहीं, व त्या मानानें त्या वस्तू उत्पन्न करण्यास लागणारी चलाखी आमच्या येथें दृष्टीस पडण्याचा संभव नाहीं हें जरी खरें आहे, तरी ज्या थोड्या वस्तू आम्हांस लागतात, व ज्यांचा खप आम्हांमध्यें अधिकाधिक होत आहे, त्या सर्व सरकारनें कांहीं वर्षें मदत दिल्यास येथल्या येथें कमी खर्चानें करतां येण्यासारख्या आहेत हें त्यांना ठाऊक नाहीं किंवा समजत नाहीं असें नाहीं. पण **व्यापाराच्या कामांत सरकारनें हात घालूं नये** हा सामान्य औपपत्तिक नियम—त्याचें मिष करून ते आमच्या व्यापाराकडे ढुंकून देखील पाहत नाहींत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. तथापि दिवसेंदिवस अधिकाधिक कंगाल होत जाणाऱ्या पंचवीस कोटी प्रजेचें बिनबोभाट राज्य करणेंही कांहीं सोपें काम नाहीं. विहिरींत पाणी नसेल तर तें पोहऱ्यांत येण्याचा संभव नाहीं, हें आमच्याप्रमाणें त्यांसही चांगलें समजतें. तेव्हां प्रजेची हलाखी दृष्टीस पडूं लागली म्हणजे तिच्या चौकशीसाठीं एखादें कमिशन नेमावें, शेतकऱ्यांस कांहीं सूट किंवा तगाई द्यावी, करांत एखादा फेरफार करावा, शेतकीची सुधारणा करण्याचें अवडंबर घालून कोठें एखादा कालवा काढ, कोठें तळें बांध, कोठें विहीर खण, कोठें कापसाचें किंवा गव्हाचें बीं वाट, कोठें शेतकीचे प्रयोग करण्यासाठीं एखादें फार्म ( शेत ) तयार कर, कोठें झाडें लाव, कोठें तोफा सोडून पाऊस पाडण्याचा प्रयत्न कर, कोठें गुरांचें इस्पितळ घाल, कोठें खताचे प्रयोग करून दाखीव, कोठें सावकाराला ओरबाडून शेतकऱ्याला वांचविण्याचा प्रयत्न कर, कोठें शेतकीची व्यवस्था पाहणारें खातें काढून त्यावर हुशार पण भारी पगाराचे अधिकारी नेम, कोठें रस्ते कर, कोठें झाडाचे छाट तोडूं दे व जंगलांतील गवत मोफत किंवा हलक्या किंमतीनें नेऊं दे, कोठें शेतीस व

जनावरांस लागणाऱ्या मिठासारख्या वस्तूंवरील कर थोडाबहुत कमी कर, याप्रमाणें निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या प्रसंगीं क्षुद्र सुधारणा करण्यांत येतात. पण अशानें कोठें अन्नास मोताद झालेलीं व उपाशीं मरूं लागलेलीं कोट्यवधि माणसें खाऊनपिऊन सुखी होणें शक्य आहे काय? काळजापर्यंत जाऊन ठेपलेली जखम नुसत्या मलमपट्टीनें कशी भरेल? प्रसंगविशेषीं कांहीं कांहीं विशिष्ट कारणामुळें अशी जखम एकाएकीं वाहूं लागली तर कदाचित् असल्या पट्ट्यांनीं तिचें तोंड कांहीं वेळ दाबून धरवेल. पण पुनः कांहीं कारण झालें कीं, ती फिरून वाहूं लागणारच. यासंबंधानें आमची प्रकृति बरीच दुरुस्त होण्यास आम्हांस चारदोन चांगलींच **टॉनिकें** (रक्तवर्धक व शक्तिवर्धक औषधें) मिळालीं पाहिजेत. कापूस, धान्य, लोखंड, तांबें, जस्त, पितळ वगैरे अत्यंत उपयोगी धातू, शेतकीस व इतर साध्या धंद्यांस लागणारीं यंत्रें—वगैरे पांचचार स्थूल वस्तूंचे व्यापार पूर्णपणें आमच्या हातीं आल्याशिवाय आम्ही आपली कात टाकून ताजेतवाने होऊं शकणार नाहीं. असले व्यापारच आमचीं रक्तवर्धक औषधें होत. पण हीं आम्हांस आमच्या राज्यकर्त्यांपासून मिळण्याचा फारसा संभव दिसत नाहीं. फ्रान्स, युनायटेड स्टेट्स, जर्मनी, इटली, रशिया, जपान, स्वित्झरलंड—फार काय पण खुद्द इंग्लंड वगैरे देशांनीं आपल्या व्यापाराच्या बाल्यावस्थेंत त्याच्या वाढीकरितां सरकारच्या मार्फत काय काय प्रयत्न केले व अजूनही त्या त्या देशांतील तारुण्याप्रत पावलेल्या व्यापारास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष केवढी मदत मिळत आहे, हें पाहिलें तर इंग्लंडच्या व्यापारास धक्का बसेल या भीतीनें आमच्या व्यापारास मिल्लसारख्या अर्थशास्त्र्यांनीं ज्या प्रकारच्या उत्तेजनाची आवश्यकता व सयुक्तिकता आपापल्या ग्रंथांत प्रतिपादिली आहे व ज्या प्रकारचें उत्तेजन अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांच्या किंवा जपानच्या सरकारी अधिकाऱ्यांनीं आपल्या व्यापारांस देऊन त्याची भरभराट करून सोडली आहे, त्या प्रकारचें उत्तेजन आमच्या व्यापारास देण्याबद्दल येथल्या किंवा इंग्लंडांतल्या प्रमुख अधिकाऱ्यांपुढें तुम्हीं केव्हांही गोष्ट काढिली तर ते आपल्या दोनही कानांवर घट्ट हात ठेवून, दांभिकपणानें '**शांतं पापम्**' या मंत्राचा जप करीत सुटतील!! जणूं काय, लोकांच्या पैशानें लोक 'करा म्हणून प्रार्थना करीत असलेली' गोष्ट करण्यास प्रवृत्त होणें हें महापातक

आहे ! आमच्या व्यापारास व शेतकीस अर्थशास्त्रांचें उल्लंघन न करतां कोणत्या रीतीनें मदत करतां येईल याची चिकित्सा मि. जस्टिस तेलंग, रा. ब. रानडे, दादाभाई नवरोजी वगैरे अनेक अनुभविक शास्त्रज्ञ विचारी गृहस्थांनीं केली आहे. तिचा काय उपयोग ? निजलेल्यास जागें करणें शक्य आहे; जाग्यास जागें कोण करूं शकेल ? इंग्लिश लोकांच्या मनोधर्मात एकाएकीं प्रचंड क्रांति झाल्याशिवाय त्यांच्या अंतःकरणांत जपान किंवा युनायटेड स्टेट्स येथील सरकारप्रमाणें आमच्या व्यापारवृद्धीविषयीं कळकळ उत्पन्न होईल अशी आशा करणें व्यर्थ आहे.

धर्मसुधारणा, आचारसुधारणा, राजकीय सुधारणा वगैरे सर्व केवळ व्यवस्थेकरितां केलेले आहेत. त्यांपैकीं अमुकास पहिला नंबर, अमुकास दुसरा नंबर, अमुकास तिसरा नंबर, असें कांहीं ठरवितां येणार नाहीं. ते सर्व मनुष्यांच्या वेगळाल्या व्यवहाराचे व्यंजक होत व त्या सर्वांची एकसमथावच्छेदेंकरून सुधारणा होत जाणें, म्हणजेच मनुष्यांची किंवा त्यांनीं वसविलेल्या राष्ट्रांची सुधारणा झाली, असें म्हणतां येईल, हें आम्हीं वेळोवेळीं दाखविलेंच आहे. परंतु तें सर्वांस संमत नाहीं, असें भोंवतालच्या स्थितीवरून दिसतें. कित्येकांस वाटतें कीं, राजकीय सुधारणा सोपी आहे. सामाजिक सुधारणेविषयीं जशीं रणें पडतात, तशी या राजकीय सुधारणेची गोष्ट नाहीं. त्याविषयीं सर्व लोकांचें एकमत आहे. याकरितां सामाजिक सुधारणेविषयीं व्यर्थ खटपट करून, लोकांच्या शिव्याशापास पात्र होण्यापेक्षां, व आपसांत कलह माजवीत बसण्यापेक्षां, सर्वांनीं एकदिलानें राजकीय सुधारणेच्या मागें लागावें, हा उत्तम पक्ष होय. वरील उपदेश योग्य आहे, अशी आमची खात्री असूनहि, लोकसमुदायास न रुचणाऱ्या गोष्टी आम्ही आग्रहानें पुढें आणीत असतों, तर त्यांत आमचाच दोष झाला असता. परंतु वरील उपदेश करणारांनीं नुसती वर वर नजर दिली आहे; त्यांनीं शांतपणानें विचार केला असतां, त्यांचें मत खचित आमच्याप्रमाणें झाल्यावांचून राहाणार नाहीं, व तें होईपर्यंत, ज्या राजकीय सुधारणेपासून आपले सर्व पुरुषार्थ आपणांस प्राप्त होतील अशी कित्येकांची समजूत आहे, ती राजकीय सुधारणाही होणें शक्य नाहीं, हें आम्ही दाखवणार आहों.

राजकीय सुधारणा आम्हांस पाहिजे, असें आम्ही कां म्हणतों? तर त्यापासून नफा होईल असें आम्हांस वाटतें म्हणून. सामाजिक सुधारणा आम्हांस कां नको? त्यापासून आमचें नुकसान होईल असें आम्हांस वाटतें म्हणून. तात्पर्य कोणती गोष्ट इष्ट आहे, आणि कोणती गोष्ट इष्ट नाहीं, हें आपण केवळ नफातोट्याच्या तारतम्यावरूनच ठरवितों व

येथेंच चूक होते. हें आमचें म्हणणें सकृत्दर्शनीं चमत्कारिकसें भासेल, व तें तसें भासावें यांतहि नवल नाहीं. कारण कीं आजपर्यंतचे जगाचे सर्व व्यवहार नफातोट्यावर दृष्टि देऊनच झाले आहेत, हल्लींही होत आहेत, व पुढेंही होत राहतील, याविषयीं आम्हांसही शंका नाहीं. मग असें असून, येथेंच चूक होते, असें आम्ही कसें म्हणतों, अशी पृच्छा सहज होणारी आहे, व त्याचें उत्तर देण्याच्या ऐवजीं आम्हीहि वाचकांस उलट कांहीं प्रश्न करतों, व त्याचें जें उत्तर तेंच वरील प्रश्नाचें उत्तर होय. धर्म या सदराखालीं ज्या शेंकडों बऱ्यावाईट गोष्टी आपण करतों, त्यांपैकीं बहुतेक फायद्याच्या दृष्टीनेंच आपण करतों. अमुक झाल्यास अमुक करीन, तमुक करीन अशा अटीवरच शेंकडा नव्याण्णव धर्माचार होत असतात हें आपणा सर्वांस माहीत आहेच. बायकांचें वपन कां करावें ? तर त्यांच्या कबरीबंधानें नवऱ्यास बांधलें जाऊं नये म्हणून. ऋतुप्राप्तीपूर्वींच कन्येचा विवाह कां केला पाहिजे ? तर आपल्या ४२ कुळया नरकांत जाऊं नयेत म्हणून. सती कां जावें ? तर तसें केल्यानें अनंत कालपर्यंत स्वर्गसुख मिळेल म्हणून. तात्पर्य, कांहीं ना कांहीं फायदा होईल अशी खरी किंवा खोटी समजूत झाल्यावांचून तो तो मनुष्य तें तें धर्माचरण करीत नाहीं. परंतु असें असूनही निष्काम भक्तीचा महिमा अधिक कां वर्णिला जावा ? या प्रश्नाचें उत्तर ज्यास देतां येईल, त्यास आमच्याही म्हणण्याचा अर्थ समजेल. अमुक गोष्ट कां केली पाहिजे, तर तें माझें कर्तव्य आहे म्हणून, व अमुक गोष्ट कां केली पाहिजे, तर त्यापासून मला फायदा होतो म्हणून. या दोन गोष्टींत फारच मोठा भेद आहे. आपलें कर्तव्य समजून एखादी गोष्ट करणारा मनुष्य जसा नेटानें व निश्चयानें ती करतो, तसा फायद्यावरच नजर देणारा मनुष्य करूं शकणार नाहीं.

वरील गोष्टी आतां आपण लोकांस प्रिय असणाऱ्या राजकीय सुधारणेसच लावून पाहूं. कायदेकौन्सिलांत लोकनियुक्त सभासद असले पाहिजेत असें राष्ट्रीय सभेचे चालकही म्हणतात, व इतर सर्व लोकही म्हणतात. परंतु या दोघांची दृष्टि अगदीं वेगळी आहे. ज्या कायद्यांचा अम्मल अमुक एक लोकसमुदायावर होत असेल, ते कायदे करणें हा केवळ त्याच लोकसमुदायाचा हक्क आहे; ते करण्याचा दुसऱ्या कोणासही अधिकार नाहीं,

हें प्रमेय पुढें ठेवून वर्तन करणें, व ज्याचे त्यानें कायदे केल्यास त्यापासून अधिक सुख होतें हा सिद्धांत पुढें ठेवून वागणें यांत जमीन-अस्मानाचें अंतर आहे. पुराणांतरीं वर्णन केलेल्या रामचंद्रापेक्षांही अधिक न्यायी, अधिक प्रजाहितैषी असा राजा असून, त्यानें केलेल्या कायद्यापासून, प्रजेस कितीही सुख होत असलें तथापि ते करण्याचा त्यास अधिकार पोंचत नाहीं, या तत्त्वावर नजर देऊन फायद्याकडे दृष्टि न देतां आपले गेलेले हक्क योग्य उपायांनीं मिळविण्याकरितां जे लोक, हें आपलें कर्तव्य समजून निश्चयानें यत्न करीत आहेत, ते सामाजिक सुधारणा नको व राजकीय सुधारणा पाहिजे, असा आग्रहही धरीत नाहींत.

इंग्रज गुन्हेगाराचा न्याय इंग्रज न्यायाधीशानेंच करावा, व नेटिव्ह गुन्हेगाराचा न्याय तेवढा वाटेल त्या न्यायाधीशानें करावा, असा पक्षपात कां? गुन्हेगाराचा न्याय तोडणें हें कांहीं त्याच्या रंगावर अवलंबून नाहीं. काळ्या रंगाच्या मनुष्यानें एखादा गुन्हा केल्यास त्याचा न्याय करण्याची ज्यास योग्यता आहे, तोच न्यायाधीश, तोच गुन्हा करणाराचा रंग गोरा असला कीं, त्याचा न्याय करण्यास अपात्र कसा होतो? हे प्रश्न सर्वांस सुचणें अवघड नाहीं. परंतु त्याचा योग्य निकाल होण्यास नुसतें त्या प्रश्नांचें शाब्दिक ज्ञान उपयोगी नाहीं. प्रश्न करणारांचें अंतःकरण व ओंठ यांच्यांत विसंगतता असेल तर त्यानें कितीही आक्रोश केला तथापि व्यर्थ होय. परंतु त्या दोहोंमध्यें संगति असेल तर, विशेष आक्रोश करण्याचीही जरूर पडत नाहीं. अंतःकरण व ओंठ यांच्यांत तारायंत्र सुरू असेल तर हळू उच्चारलेल्या शब्दांसही विलक्षण जोर येतो व त्यापुढें सर्वांस मान डोलवावी लागते. खऱ्या साध्वीच्या ईषत् वक्रदृष्टीनें मोठमोठ्या बलाढ्य कामांधांची गाळण उडून जाते. आपण स्वतां अन्यायाचें वर्तन करणारास दुसऱ्याच्या अन्यायाबद्दल बोलण्याचा अधिकार पोंचत नाहीं, तर उलट त्याची जीभ कचरूं लागते, त्याचा शब्द तोंडांतल्या तोंडांत घोंटाळूं लागतो, व असें झालें म्हणजे सिंहाचें कातडें पांघरणाऱ्या गर्दभाच्या बाहेर डोकावूं पाहणाऱ्या लंबकर्णावरून, त्याची परीक्षा होते, व त्यास दुसरे भीत नाहींत. इतकेंच नाहीं तर स्वतांची फजिती उडण्याची मात्र उलट पाळी येते.

महाराची सावली पडली असतांही विटाळ मानणारे लोक

जिभा करून आमचा रंग काळा असला व तुमचा रंग गोरा असला म्हणून काय झालें ? रंगावर कांहीं मनुष्याची पात्रापात्रता ठरत नाहीं, वगैरे गोष्टी प्रतिपादूं लागले तथापि त्यांच्या शब्दास जोर येण्याचा संभव नाहीं, व त्याचा परिणामही होणें नाहीं. त्या शब्दांस जोर येऊन, इतरांनीं ते ऐकलेच पाहिजेत अशी खरोखर इच्छा असल्यास, ‘ ब्राह्मणोस्यमुखमासीत् ’ हें पक्षपाती शास्त्र झुगारून देऊन, आपल्या मांडीला मांडी भिडवून शाळांतून बसण्यास महारांस मोकळीक दिली पाहिजे. पुरुषाची बायको मेल्यास त्यास जशी पुनर्विवाह करण्यास मोकळीक आहे, त्याप्रमाणें विधवांसही दुसरा नवरा करण्याची परवानगी पाहिजे. बायकांच्या केसांचा जर मेलेल्या नवऱ्याच्या गळयास फांस बसतो, तर पुरुषांच्या शेंडीचाही मेलेल्या स्त्रीस कां फांस बसूं नये ? व एकास जर कोणी संन्याशी करीत नाहीं तर दुसरीला मात्र न्हाव्यापुढें कां बसवावी ? पुरुषाला बायको आवडत नाहीं, येवढयाच शुष्क कारणावरून वस्तुतः काडी मोडून देण्याचा त्यास जर अधिकार आहे, व तसें करून तो जर धर्मबाह्य होत नाहीं, तर एखाद्या स्त्रीला नवरा आवडत नसल्यास, तिनेंही त्याला काडी मोडून दिली तर तिच्या नांवानें मात्र खडे कां फोडावेत ? अटकाव करणें असेल तर दोघांसही करा, नसेल तर दोघांसही मोकळीक द्या. महार आणि ब्राह्मण, विधवा आणि विधुर व स्त्री आणि पुरुष यांच्यामधलि अन्यायमूलक व्यवहार बंद करणें आपल्या स्वतःच्या हातीं असून तें करण्याची ज्यांना नुसती वासनाही झाली नाहीं, अशा लोकांनीं जिंकणारे व जिंकलेले यांच्यांतील भेद मोडून टाकण्याचा विचार मनांत तरी कशास आणावा ? व आणला तरी तो सिद्धीस कसा जावा ?

तात्पर्य, लोकांनीं आपल्याशीं जसें वागावें असें आपणांस वाटतें, तसेंच आपणही दुसऱ्याशीं वागण्यास तयार व्हावयाचें, त्यापासून हित असो वा अहित असो, त्याविषयीं विचार करीत बसावयाचें नाहीं. खरें बोलल्यापासून नफा होवो, नुकसान होवो, परंतु तसें करणें हें आपलें कर्तव्य होय, म्हणून जसें खरें बोलावयाचें किंवा नीतीनें वागलें असतां तोटा होईल अशी भीति असूनही जसें नित्याचरण सोडावयाचें नाहीं, तसेंच कोणतीही गोष्ट असो, त्यापासून न्याय होत आहे, किंवा ती करणें आपलें कर्तव्य आहे, एवढया विचारावरच तिच्या मागें लागावयाचें, त्यापासून होणाऱ्या सुखदुःखाची

भवति न भवति करीत बसावयाचें नाहीं असा पूर्ण निश्चय करून जर लोक सुधारणेची कास धरतील तर ही सुधारणा पाहिजे व ती नको हा तंटा मिटणार आहे व सर्वच सुधारणा एकसमयावच्छेदेंकरून होऊं लागतील.

लॉर्ड वुइलियम बेंटिंक याचे कारकीर्दींत कॅप्टन ऑगस्टस वुइलर्ड म्हणून एक उत्तर हिंदुस्थानांत लष्करी अधिकारी होता. याच्या ग्रंथावरून त्याला गाण्याचा शोक फार असावा असें दिसतें. यानें आमच्या गायनशास्त्राविषयीं जो अभिप्राय दिला आहे त्यावरून त्याची शोधकबुद्धि व्यक्त होते इतकेंच नाहीं, तर त्याला आपल्या गाण्याचें मर्महि बरेंच समजलें होतें असें दिसतें. यानें आमच्या गायकांविषयीं, वाद्यांविषयीं व संगीतकलेविषयीं जें लिहिलें आहे तें वाचून त्याविषयीं आपल्या अंतःकरणांत कृतज्ञता उत्पन्न झाल्या-खेरीज राहणार नाहीं. पण तो येवढेंच करून स्वस्थ बसला नाहीं, हें फार वाईट झालें. '**हिंदुस्थानचें संगीत**' या नांवाच्या ग्रंथांत त्याला आमच्या गाण्याविषयीं जें लिहावेंसें वाटलें तें लिहून गेल्यावर, अनेक संगीतांच्या भाषांतरापासून आमच्या जुन्या चालीरीती कशा प्रकारच्या असाव्या, याचें अनुमान करण्याचा प्रयत्न त्यानें केला आहे व त्यांत तो अगदीं फसला आहे. कोणत्याहि देशांतील लोकांच्या काव्यावरून किंवा तालसुरांत बसविलेल्या पद्यांवरून त्या लोकांच्या नीतीविषयीं, विशेषतः लिंगविषयक नीतिविषयीं, अभिप्राय देणें मोठें साहस होय, असें आम्हांस वाटतें. कारण 'शृंगार' हा काव्याचा प्रधान विषय असल्यामुळें, आणि अतिशयोक्ति हा काव्यरसात्मा होऊन बसल्यामुळें; काव्यांतर्गत स्त्री-पुरुषांच्या उद्गारांवरून कोणत्याही लोकांच्या नीतिमत्तेविषयीं अटकळ करूं गेल्यास तींत प्रमाद होण्याचा फार संभव असतो. '**मिस्टरीज ऑफ धी कोर्ट ऑफ लंडन**' या रेनॉल्डकृत ग्रंथमालिकेवरून इंग्लिश लोकांच्या नीतीविषयीं मत देणें न्याय्य होईल काय ? संभावित इंग्लिश लोक उघडपणें ही कादंबरी वाचीत नाहींत, व लोकांच्या दृष्टीस पडतील अशा ठिकाणीं तिचीं 'व्हाल्में' ठेवीत नाहींत; कारण बिभत्स शृंगार त्यांत ओतप्रोत भरला आहे, असें सांगतात! तेव्हां ज्याप्रमाणें **मिस्तरीचीं** पुस्तकें आंग्ल नीतीवर निबंध लिहिण्यास बसलें असतां आधारभूत मानितां येणार नाहींत, त्याप्रमाणेंच उत्तर हिंदुस्थानांतील

हिंदु व मुसलमान गवय्ये आणि नायकिणी ज्या चिजा गातात किंवा वाजवितात त्यांवरून हिंदू नीतीचें प्रमाण बांधितां येणार नाहीं. पण असें करण्याचें धाडस आमच्या आजच्या निबंधाच्या नायकानें केलें आहे. अनेक चिजांच्या अर्थांचें मंथन केल्यावर आमच्या संगीतांत बहुधा ज्या गोष्टींचा अंतर्भाव केलेला असतो असें त्याच्या नजरेस आलें, त्या ह्या होत—

१ अनुकूल होण्याविषयीं वल्लभाची प्रार्थना.

२ वल्लभाच्या विरहामुळें कामिनीस होणारा शोक.

३ प्रतिस्पर्धिनी कामिनीविषयीं द्वेषोद्गार.

४ सासू, नणंदा किंवा जावा यांचा डोळा चुकवून प्राणेशाची मुलाखत घेण्याची पंचाईत, व मेखलांतील क्षुद्रघंटांच्या आवाजामुळें कोणास समजूं न देतां घरांतून बाहेर पडण्याची, किंवा रस्त्यांतून जाण्यायेण्याची अडचण.

५ दयितावर ठेवलेल्या प्रेमास सासू व नणंदा यांकडून होणाऱ्या प्रत्यूहाच्या संबंधानें कामिनीचे दुःखोद्गार.

६ सखीपाशीं हितगुजाच्या गोष्टींचें कथन, आणि इष्ट मनोरथ पूर्ण करण्याच्या कामीं तिनें साहाय्य करावें यासाठीं तिची विनवणी.

७ संकेत चुकूं न देण्याविषयीं व प्रेमबंध शिथिल न होऊं देण्याविषयीं सख्यांचा उपदेश.

याप्रमाणें हिंदुस्थानांतलि नायकिणींच्या तोंडीं असलेल्या चिजांच्या अर्थावरून आमच्या बायकांस कामातुर ठरविल्यावर त्या इतक्या कामातुर कशामुळें होतात, याचा छडा काढण्याकडे **वुईलर्ड** साहेब वळले, व त्या कामित्वाचीं त्यांनीं जीं तीन कारणें शोधून काढलीं तीं हीं—१ हिंदुस्थानांतील पूर्वींची अनवस्था; २ अनेक बायका करण्याची चाल; व ३ हिंदु स्त्रियांचें अज्ञान या तीन कारणांमुळें पूर्वीं हिंदू स्त्रिया कामातुर होऊन व्यभिचार करण्यास प्रवृत्त होत, असें **वुईलर्ड** साहेबांचें म्हणणें आहे !

हिंदुस्थानांत प्राचीन काळीं प्रवास करण्यासाठीं घर सोडून गेलेल्या तरुणांच्या तरुण पत्न्या चिंतेनें व विहरव्यथेनें व्याकुळ होत्सात्या मोठ्या कष्टानें आपले दिवस कंठीत. त्यांच्या नणंदा व जावा सकाळीं उठून वेणीफणी करीत आहेत, दागदागिने घालीत आहेत, व एकमेकींना विनोद करीत आहेत

हें पाहून या विरहव्यथेनें पीडलेल्या तरुणींना फार खेद होत असे, तथापि त्या बऱ्यावाईटानें आपला दिवसाचा वेळ कसा तरी काढीत. पण रात्र येऊन जिकडे तिकडे सामसूम झालें व त्या आपल्या आंथरुणावर पडल्या म्हणजे पतिचिंतेंत त्या इतक्या व्यग्र होऊन जात कीं, उभ्या रात्रींत त्यांचा डोळा लागत नसे. अशा स्थितींत उन्हाळा गेल्यावर पावसाळ्याच्या आरंभास तरी आपले पति परत येतील, आणि आपली त्यांची गांठ पडून आपणांस आनंदाचा दिवस दिसेल, अशा आशेवर त्या वसंत व ग्रीष्म ऋतूंतील अत्यंत प्रखर दिवस व रमणीय रात्री मोठ्या कष्टानें लोटीत असत. हे ऋतु निघून जाऊन पावसाळ्याच्या आरंभास त्यांचे पति परत आले तर सारें ठीकच असे. पण दुर्दैवानें जर तसें घडलें नाहीं, तर मात्र त्यांच्या दुःखास व चिंतेस पारावार नसे. याप्रमाणें अनेक वर्षें वाट पाहिल्यावर, पति परत येत नाहींत, असें पाहून कामाग्नीनें करपून गेलेल्या या तरुणींची काय अवस्था होत असेल याची वाचकांनींच कल्पना करावी. अशा संकटांत सांपडलेल्या तरुण कन्यका अखेरीस निराश होऊन वांकडें पाऊल टाकण्यास तयार होत आणि सखीच्या साह्यानें संकेतस्थानीं पाहिजे तसलें धाडस करून वल्लभांच्या गांठी घेत आणि अप्रशस्त रीतीनें आपले मनोरथ पूर्ण करीत, व अशी स्थिति अनेक कुटुंबांत दृष्टिगोचर होत असल्यामुळें तिचें प्रतिबिंब तत्कालीन काव्यांत व संगीतांत पडलें आहे, असें **बुइलर्ड** साहेबांचें म्हणणें आहे.

याशिवाय आम्हांत रूढ असलेलें बहुपत्नीकत्व हें आमच्या स्त्रिया व्यभिचारी असण्याचें दुसरें कारण आहे, असें या गृहस्थाचें मत आहे, व तें कांहीं खोटें नाहीं. **एका पुरुषा दोघी नारी। पाप वसे त्याचे घरीं॥** ही तुकारामोक्ति जर आमच्या लोकांस मान्य असेल तर एकाच पुरुषानें तीन किंवा चार बायका करण्याची चाल ज्या वेळीं रूढ असेल त्या वेळेस प्रत्येक स्त्री आपल्या पतीचें सारें प्रेम आपणांवर असावें म्हणून खटपट करीत असल्यामुळें, सापत्नमत्सर विकोपास जाऊन कुटुंबांतील शांततेचा नाश होत असेल इतकेंच नाहीं, तर ज्या दुर्दैवी तरुणी आपल्या पतींच्या नजरेंतून उतरल्या जात असतील त्यांचें मन त्यांच्या संसाराकडे न लागतां बाह्यसुखाकडे जाऊं पाहात असेल, असें मानण्यास काय हरकत आहे ?

व्यभिचाराचें तिसरें कारण आमच्या स्त्रियांचें अज्ञान होय. असें हे साहेब म्हणतात, पण त्याविषयीं आम्हांस थोडी शंका आहे. ज्ञान आणि सद्गुण यांचा अन्योन्य संबंध कितपत आहे हें अद्यापि चांगलेंसें ठरलेलें नाहीं. ज्ञानाचा प्रसार झाल्यानें खून, दरवडे, मारामाऱ्या वगैरे मोठमोठ्या गुन्ह्यांची संख्या कमी होते, असें पुष्कळ विचारी लोक कबूल करतात. पण खोटें बोलणें, बनावट कागद करणें, खोट्या साक्षी देणें, चतुराईनें दुसऱ्यास फसविणें, लांच खाणें, व्यभिचार करणें, खोट्या शपथा घेणें वगैरे कमी दुष्टपणाचे गुन्हे वाढतात किंवा कमी होतात याविषयीं जितका संशय ॲरिस्टॉटल यास होता तितकाच हर्बर्ट स्पेन्सर यासही आहे. तेव्हां अज्ञानामुळें आमच्या स्त्रिया विशेष व्यभिचारी होत्या, व आतां त्यांस थोडेंबहुत लिहितां वाचतां येऊं लागलें आहे, म्हणून आमच्यांतील व्यभिचार कमी होऊं लागला असला पाहिजे, असें जर कोणी इंग्रज आम्हांस सांगूं लागले तर त्याचें आम्हांस हंसूं आल्यावांचून राहणार नाहीं! कोणत्याही देशांतील लोकांनीं दुसऱ्या देशांतील लोकांस व्यभिचारी ठरविण्याचें धाडस करूं नये; म्हणून आम्ही इंग्लिश लोकांच्या व्यभिचाराविषयीं कांहीं एक म्हणत नाहीं; तथापि जर ते आपण होऊन तो दोष आमच्या स्त्रियांवर अविचारानें आणूं लागतील, तर तुमच्या मडमांनीं आमच्या स्त्रियांचें तीर्थ घेऊन त्या पापापासून मुक्त व्हावें इतक्या त्या पवित्र आहेत, असें म्हणण्यास आम्ही कधींही सोडणार नाहीं! हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या पातिव्रत्याइतकें शुद्ध पातिव्रत्य बहुधा दुसऱ्या कोणत्याही देशांत सांपडणार नाहीं.

## १. सुधारक सत्याग्रही असतो.

ब्राम्हणेतरांच्या हातचा चहा पिण्यास आम्हांस दोष वाटत नाहीं; तर आमच्या नीच मानलेल्या महारांची स्थिति सुधारून त्यांची व वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणांची एक पंगत झालेली जर आम्हांस पाहतां येती, तर आम्ही मोठें कृतार्थ मानलें असतें, ही गोष्ट आमच्या देशबांधवांपासून आम्ही चोरून ठेवीत नाहीं. परंतु आमच्यांतील जातिभेद नाहींसा व्हावा अशी जरी आमची मनापासून इच्छा असली तथापि ख्रिस्ती लोकांशीं कारणावांचून आम्हीं कां संसर्ग ठेवावा हें आम्हांस कळत नाहीं. म्हणून यापुढें तरी अशा अनावश्यक गोष्टी आमच्या सुशिक्षित लोकांच्या हातून घडणार नाहींत अशी आम्ही आशा करतों. सरतेशेवटीं आमच्या धर्माभिमान्यांच्या कानांत एक गोष्ट सांगून या चहाप्रकरणाची आम्ही समाप्ति करतों. सुधारकांस जातींतून हुसकून टाकावें म्हणजे त्यांची पीडा टळेल, असा जर हीं ग्रामण्यें काढण्यांत तुमचा हेतु असेल तर तो सफळ होणार नाहीं, ही तुम्ही खूण बांधून ठेवा. सुधारकांचे प्रयत्न केवळ त्यांच्या सुखापुरते असते तर तुम्हांपासून वेगळें होण्यास तुमच्या ग्रामण्याची त्यांनीं वाटच पाहिली नसती. परंतु समाजसुधारणा ही त्यांस स्वतःच्या सोईहून अधिक महत्त्वाची वाटत असल्यामुळें तुम्हांस सोडल्यावर त्यांनीं सुधारणा करावी तरी कोणाची ? तेव्हां होतां होईल तों तुमच्या शिव्या, शाप व जुलूम यांस न भितां तुमच्या डोक्यांत प्रकाश पाडण्याचा ते प्रयत्न करतील. परंतु तुम्ही हट्ट धरून त्यांस जातींतून काढूं लागल्यास ते वाटेल तें करतील पण तुमचा पिच्छा सोडणार नाहींत. तुम्ही त्यांचा कितीहि द्वेष करा, त्यांस कितीहि झिटकारा, पण फिरून ते येऊन तुम्हांस चिकटलेले आहेत असें तुमच्या दृष्टीस पडेल. त्यांची मगरमिठी ज्यास उकलतां येईल असें कोणतेंहि ग्रामण्य तुमच्याच्यानें बसवितां येणार नाहीं. त्यांच्या तुम्हांवरील भक्तीस पाहिजे तर विरोधभक्ति म्हणा. पण तिचें तुमच्यानें सत्त्वहरण

होणार नाहीं; व सरतेशेवटीं आपल्या प्रभावानें 'मन सुधारकीं रंगलें, अवघे जन सुधारक झाले' असें करून टाकल्याशिवाय ती राहणार नाहीं!

× × ×

## २. मलमपट्यांनीं रोग बरे होत नाहींत.

जगाची जी खरी स्थायिक सुधारणा होते, ती विपत्तीच्या दर्शनानें उत्पन्न होणाऱ्या आकस्मिक हृत्क्षोभानें किंवा त्या विपत्तीच्या निरसनार्थ आवेशाच्या भरांत कांहीं तरी सुचविलेल्या उपायानें होत नसते. विपत्तीचें निर्मूलन करण्याची प्रवृत्ति होण्यास ती पाहून खेद झाला पाहिजे, व त्या खेदाबरोबर ती घालविण्याचा कांहीं तरी उपाय करावा, असें वाटलें पाहिजे. या दोन गोष्टी प्रथम झाल्याखेरीज मनुष्याच्या हातून कोणत्याही प्रचंड विपत्तीचें निर्मूलन होणार नाहीं हें खरें आहे. पण एवढ्या दोन गोष्टी झाल्या म्हणजे तें निर्मूलन होईलच असेंही खात्रीनें सांगतां येत नाहीं. आपण ज्या जगांत राहत आहों तें अनेक प्रकारच्या दारुण विपत्तींनीं ओतप्रोत भरलें आहे, हें खरें आहे, आणि त्या विपत्तींची संख्या थोडी कमी झाल्याखेरीज आमची येथील वस्ती सुखावह होण्याचा संभव नाहीं, हेंहि खरें आहे. पण येवढ्यावरून विपत्ति दृष्टीस पडली कीं, ती नाहींशी करण्यासाठीं प्रथमदर्शनीं जो उपाय सुचेल तो करीत सुटावें, असें सिद्ध होत नाहीं. कधीं कधीं अशा प्रकारच्या उपायांनीं नफा न होतां, उलट नुकसान होतें. सगळ्या झाडाला कीड लागून जाऊन तें अगदीं वठून गेलें असलें व त्याचीं फळें आळ्यांनीं भरून जात असलीं तर त्याच्या वरच्या सालीवर किंवा फळावर औषधोपचार करून काय फायदा होणार आहे? क्षारोदकादि ज्या उपायांची योजना करावयाची असेल त्यांचा परिणाम त्यांच्या अंतर्सालीवर किंवा मुळावर झाला तरच त्यापासून कांहीं फायदा होण्याचा संभव आहे. ज्याप्रमाणें हाडापर्यंत जाऊन भिडलेला व्रण त्याच्या तोंडावर चोपडलेल्या तेलांनीं किंवा मलमाच्या पट्यांनीं बरा होण्याची आशा नाहीं; त्याप्रमाणें समाजाच्या हाडापर्यंत जाऊन खिळलेल्या व शेंकडों वर्षें वाहत असलेल्या अमंगलाचाररूप व्रणांचें निराकरण भलत्याच प्रकारच्या कायद्यांनीं होण्याचा संभव नाहीं.

## ३. केल्यानें होत आहे रे

विचारानें चांगली गोष्ट कोणती व वाईट गोष्ट कोणती याचा पूर्ण निश्चय करून वाईट टाकण्याचा व चांगली स्थापण्याचा प्रयत्न एका बाबींत केला असतां जें धैर्य अंगीं येतें तेंच पुढें तसली दुसरी गोष्ट करण्यास प्रवृत्त करतें आणि ही दुसरी गोष्ट करतांना धैर्याचें भांडवल पहिल्यापासूनच अधिक असल्यामुळें, पहिल्या प्रसंगाहून विशेष सुलभ रीतीनें यशःप्राप्ति होते. याप्रमाणें एका गोष्टींत यश आलें, दुसरींत आलें, तिसरींत आलें असें होतां होतां नवीन नवीन गोष्टी करण्याचें धैर्य दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत जाऊन त्याचा पाहिजे त्या कामीं उपयोग करण्यास उल्हास वाटूं लागतो. उन्हाळ्याच्या प्रत्येक दिवसास भूमितिश्रेढीनें वाढत जाणाऱ्या उष्णतेप्रमाणें मानसिक धैर्याची गोष्ट आहे; तें प्रत्येक दिवशीं अधिकाधिक होत जातें. उलट तें कमी होऊं लागलें म्हणजेही भूमितिश्रेढीनेंच कमी होतें! ज्याप्रमाणें आकाशांत फेंकलेला दगड खालीं येऊं लागला म्हणजे प्रत्येक क्षणास मागल्या क्षणापेक्षां अधिक फूट उतरतो त्याप्रमाणें कोणत्याही कारणानें राष्ट्राच्या किंवा त्यांतील एखाद्या व्यक्तीच्या मनास भयानें घेरलें म्हणजे तें क्षणोक्षणीं त्यास अधिकाधिकच ग्रासीत जातें!

× × ×

## ४. आजची सामाजिक असमता

विचार करणें, सुखदुःखाचा अनुभव घेणें व क्रिया करणें या तीन गोष्टींपैकीं पहिलींत, दुसरींत, किंवा तिसरींत प्रत्येक मनुष्य चूर होऊन गेलेला असतो. मोठमोठ्या ग्रंथांचीं पारायणें करावीं; रात्रीच्या रात्री चिंतनांत घालवाव्या, विचार व्यवस्थित झाला कीं, तो पुस्तकद्वारानें किंवा दुसऱ्या कोणत्या तरी साधनानें लोकांपुढें आणावा. अशा रीतीनें कित्येक लोक आपलीं आयुष्यें कंठीत असतात. अशांस बाह्य सुखांचा फार उपयोग सांपडत नाहीं, व बाह्य क्रिया करतां येत नाहीं. वाचनापासून होणारा जो आनंद तोच यांचें स्थाईक व आवडतें सुख आणि विचार करण्यास व लिहिण्यास लागणारी जी शारीरिक हालचाल तीच यांची ग्राह्य क्रिया. दुसरा वर्ग सुखाभिलाषी लोकांचा. यास मानसिक सुखापेक्षां शरीरसुखाची चाड

विशेष असते. वारुळांत जशी एक खुशालचेंडू राणी मुंगी असते म्हणून सांगतात, तीसारखे सुखपरायण हे लोक होत. सुखोपभोगासाठीं सर्व प्राणिमात्र धडपडत असतो, व ज्यास जो प्राप्त होईल त्यानें त्यापासून आनंद करून घ्यावा, हें योग्य आहे; पण ज्या सुखोपभोगामुळें निरंतर तो घेता येण्याची शक्यता नाहींशी होते; बुद्धीस मांद्य येतें; गात्रें निःशक्त होतात; उत्साह नाहींसा होतो; आणि कुटुंबास व राष्ट्रास कोणत्याही प्रकारचा फायदा न होतां, उलट नुकसान किंवा त्रास सोसावा लागतो, अशा सुखोपभोगात निमग्न असण्यात काय फायदा आहे बरें ? पण असे लोक कोणत्याही देशांत थोडेथोडके नसतात. ज्या ठिकाणीं अविद्या आणि वित्त याचा संयोग दृष्टीस पडतो, त्या ठिकाणीं व्यसनासक्ति दृष्टीस पडत नाहीं असें सहसा होत नाहीं. सुदैवानें ज्याना सुखोपभोग करून घेता येत असेल त्यांनीं सुखाची निवड करताना तीं आपणांस व इतरास शेवटपर्यंत हितावह होतील किंवा नाहीं, येवढें पहात जावें म्हणजे झालें. या सुखपरायण वर्गाशिवाय लोकांचा आणखी एक तिसरा वर्ग असतो. या वर्गांतील लोकांची क्रियाप्रवृत्ति फार जबरदस्त असते, व एका दृष्टीनें यास समाजाचे आधारस्तंभ म्हणतां येईल. यांनीं काबाडकष्ट करून आवश्यकतेचे आणि चैनीचे पदार्थ उत्पन्न करावे, आणि त्यांचा उपभोग वरील दोन वर्गांतील किंवा मधल्या वर्गांतील लोकांनीं घ्यावा, असें आजपर्यंत बऱ्याच अंशीं होत आलें आहे व पुढेंही अल्प काळांत या स्थितींत विशेष फेरबदल करता येईल असें वाटत नाहीं. तथापि निरपेक्ष बुद्धीनें व आस्थापूर्वक परिश्रम केले असतां, ही असमता थोड्या वर्षांत बरीच दूर करतां येण्यासारखी आहे. ज्या देशांत ही असमता वाढत जाऊं लागली असेल, त्या देशाच्या ऱ्हासास आरंभ झाला आहे, असें समजावें. जेव्हां त्या असमतेची परमावधि होते, तेव्हा घनघोर राज्यक्रांति होऊन समाजचे समाज लयास जातात, धुळीस मिळतात, किंवा त्यांत अपूर्व स्थित्यंतरें होतात.

विचार करणारे, उपभोग घेणारे व काम करणारे असे जे सांप्रतकालीं प्रत्येक देशांत तीन ठळक वर्ग दृष्टीस पडतात ते कायमचे नव्हत. हळू हळू प्रत्येक व्यक्तीस विचार, उपभोग आणि काम हीं समप्रमाणानें करावीं लागून, साऱ्याच्या सुखानुभवाची इयत्ता सारखी होत जाणार आहे; व जों

जों ती तशी होत जाईल तों तों खरी उन्नति होऊं लागली असें म्हणतां येऊं लागेल. येवढें खरें आहे कीं, कांहीं झालें तरी सर्वांच्या बुद्धि सारख्या तीव्र होतील व पाहिजे त्या कामांत पाहिजे त्याला पडतां येऊन तें उत्तम रीतीनें वठवितां येईल, असें पूर्णपणें होण्याचा संभव फार थोडा आहे. तथापि प्रस्तुतकालीं निरनिराळ्या वर्गांतील लोकांत व स्त्रीपुरुषांत जें विलक्षण अंतर दृष्टीस पडत आहे तें पुष्कळच संकुचित करतां येणार आहे; आणि ज्या देशांत तें तसें करण्याचा प्रयत्न झपाट्यानें चालत राहील तेच देश अखेरीस तगतील. बाकीचे सर्वत्र जो जीवनार्थ कलह मोठ्या निकरानें चालला आहे त्यात भांडतां भांडतां नाहींसे होतील. यासाठीं ज्यांना हें अस्तित्वतत्त्व स्पष्टपणें कळून आलें असेल व ज्यांच्या मनांत कर्तव्यबुद्धि व परोपकारबुद्धि पूर्णपणें जागृत झाली असेल त्यांनीं आपापल्या देशाचा जीवनार्थ कलहात टिकाव लागण्यासाठीं, रात्रंदिवस निरपेक्ष बुद्धीनें झटलें पाहिजे. अशा प्रकारचे विचार समजले असून जे स्तब्ध राहतील त्यांच्या माथ्यावर देशास विपद्दशा आणिल्याची, आणि त्याचा नाश अपरिहार्य केल्याची भयंकर जबाबदारी येणार आहे; म्हणून सुशिक्षित देशबांधव हो, जर तुम्हांस इतर देशांकडून व पुढील संततीकडून बरें म्हणून घ्यावयाचें असेल व तुमची आज जी स्थिति आहे, तीहून तुमच्या मुलांची व नातवंडाची स्थिति अधिक वाईट होऊं नये अशी तुम्हांस वास्तविक इच्छा असेल, तर ज्या दुर्मतांनीं, दुराग्रहांनीं व दुराचारांनीं महारोगांप्रमाणें या देशाच्या बुद्धीचा, नीतीचा व शरीरसामर्थ्याचा हजारों वर्षें फडशा चालविला आहे, त्यांचें यथाशक्ति निर्मूलन करण्याचा तुम्हीं प्रयत्न करणें अत्यंत उचित होय.

× × ×

## ५. जसा समाज तसा राजा

राज्याचार व धर्माचार सामाजिक आचारांपासून उत्पन्न होत असल्यामुळें समाजाच्या प्रथमावस्थेंतील धर्म आणि राज्य यांचें स्वरूपहि वर निर्दिष्ट केलेल्या रानटी सामाजिक आचारांच्या स्वरूपासारखेंच असतें. सध्यां आपणास गुलाम, गुन्हेगार आणि शत्रु यांतील भेद नीट समजतो, व एकाच्या

जागीं दुसरा समजणें अशक्य वाटतें. पण रानटी लोकांस अशा प्रकारचें वस्त्वंतर समजत नाहीं. ज्याच्याकडून त्यांना कांहीं अप्रिय घडेल अशी भीति असते त्यास ते शत्रु किंवा गुन्हेगार समजून त्याचा पराभव करण्यास व त्याला गुलाम करण्यास उद्युक्त असतात. साक्षात् पोटच्या पोरांपासून त्यांस त्रास होऊं लागला तर त्याना मारून टाकण्याची त्यांस शंका वाटत नाहीं, मग इतरांची कथा काय? अशा स्थितींतील राजेहि सामान्य मनुष्याप्रमाणें क्रूर असतात व ज्याप्रमाणें सामान्य व्यक्ति आपल्या सामर्थ्याचा दुसऱ्यास त्वचक राहण्यासाठीं वर सांगितल्यासारखें निर्दयपणाचें वर्तन करण्यास प्रवृत्त होते त्याप्रमाणें राजेही आपल्या प्रजेस व आपल्या शत्रूस आपली दहशत पडण्यासाठीं अशाच प्रकारचें क्रूर वर्तन करतात. लढाईत जिंकलेल्या लोकांचीं डोकीं उडविणें, हातपाय तोडणें, त्याना मिरच्याच्या धुऱ्या देणें, लिदींत पुरणें, तापल्या तोफांवर बांधणें, कडेलोट करणें, हत्तीच्या पायाखालीं देणें, त्याचीं नाकें व कान कापणें, आणि त्याच्या घशांत शिसें तापवून ओतणें हे निर्दयपणाचे प्रकार लढाईंत कैद केलेल्या शत्रूकडील लोकांचा छळ करण्याकरतां जसे योजण्यात येतात, त्याप्रमाणें प्रजेपैकींहि कोणी मनुष्यानें अपमान केला, हुकूम तोडला, किंवा बंडाचा घाट घातला तर त्याला शिक्षा करण्यांतहि योजण्यात येतात. राजापराधाकरितां सुळावर चढविणें, जेथें खून केला असेल तेथें सर्व लोकांसमक्ष फांशीं देणें, भर चवाठ्यावर फटके मारणें, हे सर्व सध्याहि कित्येक ठिकाणीं अंमलांत असलेल्या शिक्षेचे प्रकार सरकारच्या सामर्थ्याची दहशत लोकांस असावी, येवढ्यासाठींच आहेत. राजा सिंहासनारूढ होतो, म्हणजे तो मनुष्यांचा स्वामी होतो येवढेंच नाहीं, तर सिंहासारख्या बलवान् हिंस्र पशूसहि जिंकून त्याच्या पाठीवर बसतो, असा या शब्दांत गर्भितार्थ आहे. सारांश काय कीं, अर्धवट सुधारलेल्या स्थितींत सामाजिक आचार जितके क्रूर असतात तितकेच राज्याचारहि क्रूर असतात, असें सहज सिद्ध करून देतां येतें. कारण दुसरे पहिल्यांपासूनच निघालेले असतात. ज्यांना हे विचार आपल्या समाजाच्या संबंधानें किती खरे आहेत हें पाहावयाचें असेल त्यांनीं महाभारतांतील कांहीं गोष्टी वाचून त्याचें आपल्या मनाशीं शांतपणें चिंतन करावें. दुःशासनाच्या नरडीचा घोट घेऊन त्याच्या विदारलेल्या वक्षःस्थलापासून निघणाऱ्या रुधिरांत भिजविलेल्या

हातानें द्रौपदीची वेणी घालण्याचा भीमानें केलेला पण आमच्या वाचकांच्या ध्यानांत असेलच !

## ६. हिंदुधर्माला लहानेंशी नोटीस

हे भीषण, बीभत्स, अमंगल हिंदुधर्मा, तुझ्या आज्ञेनें आज शैकडों वर्षे स्मशानभूमींत आम्हीं जीं क्षौरें केलीं, डोळ्यांतून पाणी गळत असतां कणकीचे गोळे करून जे प्रेताच्या अनेक भागांवर ठेविले; क्रव्यादाग्नीच्या भयाण ज्वालांभोंवतीं मातीच्या गळत्या घागरी डोक्यावर घेऊन ज्या प्रदक्षिणा घातल्या व उत्तरीनें गळ्यांत दगड बांधून घेऊन व तोंडाला हात लावून तुझ्या नांवानें काढूं नये तसले जे ध्वनि काढले, त्या सर्वांबद्दल तूं आम्हांस काय दिलें आहेस ? निर्दय वंचका ! गाईचें दूध पिणें, नानाप्रकारचे जिन्नस यथेच्छ खाणें, पालखींत किंवा घोड्यावर बसणें, जोडा घालून सहल करणें, शवाबरोबर जाळलेल्या प्रियपत्नीच्या केंसाच्या धुराच्या वासावरूनच जी आपणास प्राप्त झाली आहे अशी कल्पना करून तिच्यासमवेत शय्येवर विहार करणें किंवा विश्रांति घेणें, मृत्युलोक सोडून वायुरूपानें पातालाकडे किंवा स्वर्गाकडे संचार करीत असतां कोणी शत्रु भेटला तर तलवारीनें किंवा सोडग्यानें त्याचा समाचार घेणें, व अनेक प्रकारच्या दुर्गंधी द्रव्यांच्या समुद्रांतून प्रवास करण्याचा प्रसंग आला असतां दर्भाच्या होडग्यांत बसणें, अथवा तहान लागली असतां मडक्यांत घालून दिलेल्या पाण्यानें ती भागविणें—असल्या गोष्टी मेलेल्या मनुष्याच्या आत्म्याकडून किंवा जिवाकडून घडण्याचा संभव तरी आहे काय ? मुळींच नाहीं. पण जबरदस्त पंचाक्षऱ्याप्रमाणें आम्हा साऱ्या अज्ञ लोकांस त्वां भारून टाकून केवळ गुलाम केलें असल्यामुळें, आज कित्येक युगें अगदीं अशक्य गोष्टी आम्ही शक्य मानीत आहों, व अत्यंत निंद्य कृत्यें वंद्य मानून तुझ्या संतोषाकरतां तीं बेलाशक करीत आहों ! पण ध्यानांत ठेव; या तुझ्या अश्लाघ्य व निर्घृण वर्चस्वाचा अंत होण्याचा काल अगदीं समीप येऊन ठेपला आहे ! आजपर्यंत त्वां आम्हांस ज्या असह्य यातना भोगण्यास लाविलें आहेस, व जीं अनन्वित कर्में आम्हांकडून करविलीं आहेस त्या सर्वांबद्दल तुझीं पाळेंमुळें खणून काढून

विचारकुंडांत पेटलेल्या प्रचंड अग्नीच्या कल्होळांत तुझी आहुति देणाऱ्या नवीन ऋत्विग्वर्गाचा अवतार नुकताच झाला आहे! तेव्हां जर तुला आपल्या अस्तित्वाची आकांक्षा असेल तर वेळेवर शुद्धीवर ये आणि आमच्या सर्व शरीरभर कांचत असलेले तुझे पाश काढून घे; नाहीं तर भरतखंडांत तुझें नांव देखील राहणार नाहीं!

× × ×

## ७. भागुबाईची वीरश्री

ब्रिटिश सरकारला आपल्या धर्मात हात घालूं देणें बरोबर नाहीं, या विधानांत किती जीव आहे हें पाहूं. धर्मांत हात घालणें म्हणजे त्यांत फेरफार करणें. लोकांच्या अन्य विचारांत फेरफार होत गेले म्हणजे त्यांच्या धर्मविचारांतही फेरफार होत जातात, हें कोणत्याही धर्माच्या इतिहासावरून सिद्ध करून देतां येणार आहे. पाश्चिमात्य शिक्षणामुळें व इतर कारणांमुळें आम्हांसही आमच्या धर्मात थोडाबहुत फेरफार करावा, असें वाटूं लागलें आहे. तेव्हां हा आतां करायचा कोणीं? सारे शंकराचार्य निःसत्त्व होऊन बसले आहेत; सरकार परधर्मांचें आहे; लोकांस आपण होऊन चळवळ करून नव्या स्मृति घालण्याचें सामर्थ्य नाहीं! तेव्हां सध्यांच्या स्थितीस अनुकूल असे फेरफार कोण करणार? प्रतिपक्षी म्हणतात कीं, ते लोकांनीं करावे; आम्ही म्हणतों कीं, मोठेमोठे फेरफार सरकारच्या साहाय्यावांचून व्हावयाचेच नाहींत; निदान आम्हीं जसल्या स्थितींत आहों, तसल्या स्थितींत तरी व्हावयाचे नाहींत. धर्मसंबंधीं फेरफारांचा दुसऱ्या एक दृष्टीनें विचार केला असतां असें दिसून येईल कीं, त्यांपैकीं कांहीं लोकांच्या इच्छेविरुद्ध व कांहीं सहजगत्या होत असतात. 'गाई माराव्या किंवा न माराव्या', 'कलालांचीं दुकानें घालावीं किंवा न घालावीं,' 'यात्रांवर किंवा देवस्थानांवर कर बसवावे किंवा नाहीं,'—या व अशा प्रकारच्या इतर गोष्टींविषयीं सरकारनें आमचें मत विचारलें नाहीं, व आम्हीं कधीं दिलें नाहीं. घरांतल्या घरांत थोडीबहुत टुरटुर केली असेल, पण उघडपणें असल्या गोष्टींत सरकारास विरोध करण्याचें धैर्य आम्हीं कधींहि दाखविलें नाहीं. या गोष्टी सरकारच्या फायद्याच्या होत्या, आणि त्यानें त्यांविषयीं आमचें

काय म्हणणें आहे, हें पहात न बसतां, त्या बेलाशक करून टाकल्या! यावरून असें दिसतें कीं, आमच्या तोंडांत मारणारा जबरदस्त इसम आम्हांला भेटला कीं, आम्हीं आपला गाल निमूटपणें त्याच्यापुढें करतों! पण जर तोच इसम केवळ आमच्या कल्याणाकरितां अमुक गोष्ट करूं कीं नको, असें आम्हांस विचारील तर आम्हीं आपल्या अधिकाराचा तोरा मिरविल्याशिवाय कधींही रहावयाचे नाहीं! भेकड व प्रतिष्ठाखोर हिंदु लोकांनो, ज्या वेळेस पोर्तुगीज लोकांनीं ख्रिस्ती धर्मस्थापनेसाठीं कोंकणपट्टींत तुमचे अनन्वित हाल केले, त्या वेळेस तुमचा धर्माभिमान कोठें गेला होता? विषयलंपट निःशक्त वाचाळ बाबूंनो, जेव्हां महंमदीयांनीं हिंदुस्थानच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत साऱ्या हिंदु लोकांस आपल्या धर्मवेडानें जर्जर करून सोडलें व तुम्हां हिंदूंच्या मानांवर असिधारा ठेवून, तुम्हांकडून तुमच्या शेंड्या काढविल्या आणि तुम्हांस गोमांस चारिलें, तेव्हां तुमच्या धर्मरक्षणासाठीं आतांप्रमाणें तुम्हीं नुसता आरडा तरी करावयाचा होता! त्या मुसलमानांच्या भीतीनें अजून तुम्हीं आपल्या बायका कुलपांत घालून ठेवल्या आहेत, हें तुम्हांस कळत नाहीं काय? आणि आतां दयावंत ब्रिटिश सरकार केवळ परोपकारबुद्धीनें आपल्या लहान पोरींवर जुलूम करूं नका, येवढें अदबीनें सांगत असतां त्यावर तुम्हीं आपलें धर्मास्त्र सोडतां, आणि कामाच्या झपाट्यांत निराश्रित कुमारिकांचीं अंगें विदारण्याचा हक्क आमच्या धर्मानें आम्हांस दिला आहे व सरकार तो काढून घेण्याचा प्रयत्न करील तर त्याला आमच्या असंतोषाचें फळ भोगावें लागणार, अशी धमकी घालतां! धिक्कार असो तुम्हांला, तुमच्या धर्माला, आणि तुमच्या हक्काला!!!

× × ×

## ८. म्हणे जात कां करीत नाहीं?

'जात कां करीत नाहीं?' असा प्रश्न करणारे आपण काय बरळतों याचा क्षणभर तरी विचार करतात काय? जात करणें म्हणजे कां चिखलाचें पार्थिव करून दोन घटकांनीं फेंकून देणें, कीं नदीला गढूळ पाणी आलें असतां, तिच्या कांठावर वाळूंत झरा उकरणें, का उन्हाळ्यासाठीं घरापुढलें अंगण खणून सारवून स्वच्छ करणें, का चार दिवसांच्या उत्सवासाठीं

लव्हाळ्यानें आच्छादिलेला मंडप घालणें—कीं आहे तरी काय? म्हणे 'जात करा'! आजपर्यंत काय थोड्या जाती झाल्या आहेत? परब्रह्म आणि माया या पहिल्या दोन जाती! पुढें हिंदुस्थान वसविण्यासाठीं ब्रह्मदेवाच्या मुखांतून, बाहूंतून, ऊरूंतून व पायांतून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार जाती अवतरल्या! या देवकृत चार जाती आम्हांस पुरेशा न होऊन आम्ही केवढा जातिपसारा करून ठेवला आहे हें या प्रश्नकारांस ठाऊक नाहीं काय? जातींच्या अनेकपणापासून होणाऱ्या दुष्परिणामांचीं फळें आम्हीं प्रतिदिवशीं भोगीत असतां, हे अविचारी, स्वार्थसाधु किंवा भेकड लोक आम्हांस नवीन जात करावयास सांगतात, तेव्हां यांच्या शहाणपणाला काय म्हणावें? अथवा तें यांच्या अंगीं आहे किंवा नाहीं याचाच संशय आहे! जातिमुळें आपला देशाभिमान किती संकुचित झाला आहे; जातींमुळें ज्ञान, कला, शास्त्रें वगैरे जेथल्या तेथें कशीं कोंडल्यासारखीं झालीं आहेत; जातींमुळें धर्मविचारांत व आचारांत किती मतभेद उत्पन्न होऊन तो परस्पर वैरास, छळास व मत्सरास कारण झाला आहे; जातींमुळें अन्नव्यवहार, विवाह वगैरेंच्या संबंधानें किती गैरसोय झाली आहे; जातीमुळें देशांतल्या देशांत किंवा परदेशीं प्रवास करणें किती कठिण झालें आहे; जातींमुळें परद्वीपस्थ व परधर्मीय लोकांपासून अलग राहावें लागत असल्यामुळें केवढें नुकसान होत आहे; जातींमुळें आमची भूतदया, आमचें बंधुप्रेम, आमची उदारता, आमची धर्मबुद्धि, आमची परोपकाररति, आमचे विचार यांचें क्षेत्र किती मर्यादित झालें आहे, याची या 'धीर' सुधारकांच्या मनांत खरी कल्पना कधींच येत नाहीं काय? किंवा ती येत असूनही ते आम्हांस आणखी एक नवीन जात काढण्यास सांगतात काय? कदाचित् एके काळीं या इतक्या जाती कांहीं विशेष कारणामुळें अस्तित्वांत येणें अपरिहार्य होतें. पण येथून पुढें जो या देशांत नवीन जात काढण्याचा प्रयत्न करील तो त्याचा हितचिंतक न समजतां दुष्ट शत्रूच समजला पाहिजे. आज ज्या आम्ही अनेक विपत्ति भोगीत आहों त्यांपैकीं ज्यांचें जनन आमच्या जातिभेदापासून झालें नाहीं, असें म्हणतां येणार आहे, अशा फारच थोड्या असतील! धर्मविषयक किंवा राज्यविषयक गोष्टींच्या संबंधानें मतभेद होऊन निरनिराळे पंथ किंवा पक्ष उपस्थित होणें हा प्रकार आमच्यांतील जाती-

भेदाहून फार निराळा आहे. तसेंच, अध्ययन व व्यवसाय यांच्या भेदाप्रमाणें तत्त्ववेत्ते, कवि, राजकारस्थानी, शिल्पी, वैद्य, वकील, सावकार, शेतकरी, ऋणको, धनको असे लोकसंख्येचे अनेक वर्ग होणें यांतही कोणत्याही प्रकारचा अस्वाभाविकपणा नाहीं. पण येथें ज्या प्रकारचा जातिभेद रूढ आहे त्या प्रकारचा जातिभेद वृद्धिंगत न होतां जितका क्षीण होत जाईल तितका बरा, असें कोणीही समंजस मनुष्य कबूल करील. असें असतां, जो मतभेद दहापांच वर्षांत, चर्चेची टकळी चालली असतां, रसातळास जाणार व ज्या सुधारणा पाश्चिमात्य शिक्षणाचा सपाटा आणि ब्रिटिश अंमल यांमुळें शंपन्नास वर्षांत सहज घडून येणार, त्यासाठीं नवीन जात करण्यास सल्ला देणारांचें सौजन्य किंवा दूरदर्शित्व यांचें काय वर्णन करावें ?

× × ×

## ९. पायावांचून कळस उभारणारे शहाणे

जे लोक राजकीय प्रकरणांत स्वतंत्र असतात, ते सामाजिक व धार्मिक प्रकरणांत स्वतंत्र असतातच असा नियम नाहीं. किंबहुना राजकीय स्वातंत्र्य असूनहि सामाजिक व धार्मिक गोष्टींत अत्यंत तीव्र दास्यपाशानें सर्व प्रकारें जखडलेले असे अनेक लोक असतात. कांहीं अंशीं नष्ट झालेलें राजकीय स्वातंत्र्य फिरून संपादणें सवघड आहे. कारण, तें हिरावणारा शत्रू परका असतो, व त्याचा मोड केला म्हणजे तें फिरून प्राप्त होण्यासारखें असतें. सामाजिक व धार्मिक गुलामगिरीची तशी गोष्ट नाहीं. अगोदर फार वर्षांच्या सवईमुळें अशा प्रकारची गुलामगिरी, गुलामगिरी आहे असें पुष्कळांस वाटेनासें झालेलें असतें. ज्याप्रमाणें शरीरांत अनेक वर्षें ठाणें करून राहिलेल्या व्याधीपासून फारसा त्रास होईनासा होतो, त्याप्रमाणें जे कष्टावह सामाजिक व धार्मिक आचार—ते आपणांपाठीमागें केव्हां लागले, ते परिहार्य आहेत किंवा अपरिहार्य आहेत, त्यांचा अंमल आपणांवर कोणाकडून होत आहे, तो अंमल करण्याचा त्यास काय अधिकार आहे वगैरे गोष्टींविषयीं आपणास गूढ अज्ञान असतें—ते आचार त्रयस्थास कितीहि पिडाकर वाटले तरी खुद्द आपणास ते तसे वाटत नाहींत. तथापि त्यांपासून आपल्या शरीरावर व मनावर जे दुष्परिणाम होण्यासारखे असतात, ते होतच असतात.

मादक द्रव्यांचें सेवन नित्य करणाऱ्या मनुष्याच्या ज्ञानतंतूंस येणारी क्षीणता त्याची त्याला किंवा त्यासारख्या इतर व्यसनी लोकांना नीट समजली नाहीं, म्हणून ती येत नाहीं, असें म्हणणें ज्याप्रमाणें बरोबर होणार नाहीं, त्याप्रमाणें मूर्खपणाच्या सामाजिक व धार्मिक आचारापासून राष्ट्रस्थितीवर होणारे दुष्परिणाम त्या राष्ट्रांतील लोकांच्या लक्षांत आले नाहींत, म्हणून ते होत नाहींत, असें म्हणणेंहि बरोबर होणार नाहीं. जोंपर्यंत अशा रीतीनें क्षीण झालेल्या लोकांस त्याहून श्रेष्ठ अशा लोकांशीं झगडण्याचा प्रसंग आलेला नसतो, तोंपर्यंत त्यांची आयुष्ययात्रा केवळ कष्टमय असते, असें म्हणतां येत नाहीं. पण, जेव्हां त्याचा वरिष्ठाशीं प्रसंग येऊन ठेपतो, तेव्हां त्यास आपल्या क्षीणतेचें भान होऊं लागतें, व एकाएकीं जागृदवस्था त्यास प्राप्त झाल्यासारखें होऊन, आपली अशी दशा कां झाली असावी, असे विचार त्याचे मनांत येऊं लागतात. हा उद्‌बोध योग्य वेळीं होणें ही दैवाधीन गोष्ट आहे. शरीरांतील व मनांतील सारा जोम नाहींसा झाल्यावर जर हा उद्‌बोध झाला तर त्यापासून कांहीं एक फायदा होत नाहीं. नाड्या ठार बंद पडल्यावर संजीवनीचें तरी काय चालणार? रुधिराभिसरण थोडेंबहुत सुरू असलें; छातींत, हातांत व पायांत तें चालू आहे असें यत्किंचित् जर व्यक्त होत असलें, तरच मात्रांचे वेढे उगाळण्यांत आणि ते जिभेला लावण्यांत कांहीं अर्थ आहे.

पुष्कळांचा असा समज आहे कीं, सुधारणेचा आरंभ होणें तो राजकीय सुधारणेविषयीं फारसा मतभेद असत नाहीं; त्यामुळें ती घडवून आणण्यासाठीं एकमेकांस मदत करण्याच्या कामीं एकाचा दुसऱ्याशीं म्हणण्यासारखा विरोध येऊं शकत नाहीं. स्वातंत्र्य हें सर्वांस प्रिय आहे. आमची राजकीय सुधारणा म्हणजे आमच्या नष्ट झालेल्या स्वातंत्र्याच्या पुनःप्राप्तीविषयीं प्रयत्न करणें होय. ही गोष्ट जितकी आम्हां महाराष्ट्रीयांस तितकीच वंगवास्यांस, गुर्जरस्थांस, तेलंगणस्थांस, कर्नाटकीयांस, पारसीकांस, महंमदीयांस व इतरांस इष्ट असणें स्वाभाविक आहे, व म्हणून त्यांचें एकीकरण होणें शक्य आहे, व तें होऊं लागलें आहे. सामाजिक व धार्मिक सुधारणांची तशी गोष्ट नाहीं. यासंबंधानें आमची कांहीं प्रिय वस्तु कोणीं नेली आहे, आणि आम्हांस फिरून ती संपादावयाची आहे; असें नाहीं. उलट आमची

आहे ती स्थितीच उत्तम आहे, व तींत फेरफार करण्याचा प्रयत्न करणें हाच प्रमाद होय, असें आम्हांपैकीं पुष्कळांस वाटत असल्यामुळें जे थोडे वेडेपीर सामाजिक व धार्मिक सुधारणेच्या छंदास लागले आहेत, ते समाजांत निष्कारण असंतोष व कलह उत्पन्न करून, स्वतःस कांहीं फायदा नसतां अप्रिय करून घेत आहेत ! हे असें न करतील तर सर्वांस इष्ट अशा ज्या राजकीय, व्यापारीय, शिक्षणीय व इतर सामान्य सुधारणा, त्या एकमतानें करण्यास पुष्कळांची प्रवृत्ति होणार आहे. सामाजिक व धार्मिक गोष्टींविषयीं तंटे उपस्थित केल्यामुळें, राजकीय गोष्टींत एकदिलानें वागणें दुरापास्त झालें आहे !

अशा प्रकारच्या आक्षेपकांस आम्ही असा प्रश्न करतों कीं, इंग्रज लोकांनीं तुम्हांस जिंकिलें त्यावेळेस तुम्हांत कोणत्याही प्रकारचे सामाजिक किंवा धार्मिक तंटे नव्हते. त्या वेळेस राजकीय सत्ता तुमच्या हातीं असून सामाजिक व धार्मिक प्रकरणांत तुमचें पूर्ण ऐकमत्य असें असून परशत्रूस तुम्ही हार कां गेलां? सैन्यबल, द्रव्यबल, संख्याबल इत्यादि यशाचीं बाह्योपकरणें तुमच्या हातीं असून, व धार्मिक आणि सामाजिक गोष्टींत तुम्हांत द्वैत माजलेलें नसून, तुमची अशी दाणादाण कां झाली व पंचवीसचाळीस वर्षांच्या आंत तुम्ही इतके वीर्यहीन कसे झालांत ? आम्हांस असें वाटतें कीं, पेशवाईचा जो मोड झाला तो आमची सामाजिक धार्मिक स्थिति जशी पाहिजे होती तशी नव्हती म्हणून झाला. आणि येथून पुढेंहि आम्हांस सुदशा प्राप्त होण्यास व ती कायम राहाण्यास, आम्हीं आपली गृहस्थिति व धर्माचार सुधारण्याचा प्रयत्न प्रथम केला पाहिजे व तो करण्यास अत्यंत अनुकूल काल सांप्रत आला आहे. चांगली राजकीय स्थिति ही चांगल्या गृहस्थितीचें व धर्मपद्धतीचें फळ आहे. सबब या दोहोंच्या सुधारणेस प्रथम लागलें पाहिजे.

× × ×

## १०. फुंकरांनीं भडकणारी ज्वाला

ज्याप्रमाणें कालाचा क्रम थांबविणें अशक्य आहे, त्याप्रमाणेंच मनुष्याच्या स्थित्यंतरास खळ पाडणें अशक्य आहे. तथापि हें सत्य अज्ञ लोकांच्या

लक्षांत नीट न येत असल्यामुळें व आपण ज्या स्थितींत आहों तीच स्थिति अत्युत्तम असें अप्रबुद्ध जनावरांप्रमाणें त्यांस वाटत असल्यामुळें, कोणत्याही रीतीनें त्या स्थितींत बदल करूं पाहणारांचा ते द्वेष करतात, आणि त्यांचे श्रम निष्फळ होण्याचा आपल्याकडून होईल तेवढा प्रयत्न करतात. अशा नित्य कलहामुळें समाजांतील अवयवांचे प्रथम दोन स्थूल विभाग होतात; एक पुराणप्रियांचा व दुसरा सुधारकांचा. पुढें दुसऱ्याचे दोन पोटभेद होतात; एक बोलक्या सुधारकांचा व दुसरा वागत्या सुधारकांचा. ज्या वेळेस कांहीं केलें तरी समाजांतील बहुतेक लोक चांगल्या गोष्टीचा विचार करावयाचे नाहींत—इतकेंच नाहीं, तर जो ती करण्यास प्रवृत्त होईल त्याचा ते छळ करण्यासही सोडीत नाहींत, अशी स्थिति असते, त्यावेळेस बहुधा अनेक प्रकारचे हाल व जाचणुकी सोसून व गरज पडल्यास निराळी जात करून घेण्यास किंवा मरण्यासही तयार होऊन, आपल्या विचाराप्रमाणें आचरण करण्यास प्रवृत्त होणारे मताभिमानी सुधारक फार निघतात. आजपर्यंत नवीन धर्मपंथाचे जे स्थापक झाले आहेत, त्यांचा इतिहास बहुधा अशा प्रकारचा आहे. साक्रेतीस, बुद्ध, महंमद, ख्रिस्त, ल्यूथर, राममोहन किंवा दयानंद यांपैकीं लहानमोठ्या प्राचीन किंवा अर्वाचीन पाहिजे त्या महापुरुषाचें चरित्र घ्या, त्यावरून असें दिसून येईल कीं, ज्या सुधारणा झाल्याच पाहिजेत असा त्यांच्या मनाचा दृढ ग्रह झाला होता, त्या सुधारणांस तत्कालीन बहुजनसमाज अत्यंत प्रतिकूल असल्यामुळें, एक तर आपला हेका आपण सोडावा, किंवा लोक जेवढा त्रास देतील तेवढा सहन करण्यास तयार होऊन आपला हेका आपण चालवावा—याशिवाय त्यांना दुसरा मार्गच नव्हता. अशा स्थितींत लोकांच्या निष्ठुर दुराग्रहामुळें सुधारकांच्या अंतःकरणांत पेटलेली ज्वाला लोकांच्या उपरोधक फुंकरांनीं न विझतां अधिक जोरानें भडकूं लागते, आणि ती त्या सुधारकांस मनाप्रमाणें आचरण करूं लागल्याशिवाय चैन पडूं देत नाहीं. मनाची अशी अवस्था झाली असतां, विचाराप्रमाणें न वागण्यापेक्षां लोकांनीं केलेला छळ सोसणें, हेंच त्यांना अधिक सह्य व सुखावह वाटतें.

## ११. बोलके सुधारक कांहीं नवीन नाहींत.

सुधारणानिंदकांचा एक असा भ्रम आहे कीं, **बोलके सुधारक** काय ते अलीकडेच दृष्टीस पडूं लागले आहेत. पण खरी गोष्ट तशी नाहीं. सुधारकांची ही जात पूर्वीपासून आहे ! उदाहरणार्थ, आपले पुराणिक, हरिदास भिक्षुक, कर्मठ शास्त्री, जोशी किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या कोणत्याही वर्गांतील लोक घ्या. लोकांस धर्मोपदेश करावा, त्यांस नीति पढवावी, व स्वतःच्या पवित्र व शुद्ध आचरणानें लोकांस उदाहरण घालून द्यावें, हें या पूर्वपद्धतीच्या सुधारकांचें कर्तव्य होय. पण हें कर्तव्य नीट बजावणारे असले किती सुधारक निघतील बरें ? स्त्रियांस मंत्रोपदेश करण्याच्या निमित्तानें त्यांस व्यभिचारपंकांत गूढ गोंवून टाकणारे, पोथीपुढें ठेवलेल्या तांदुळाचें गाठोडें बाजारी अंगवस्त्राच्या घरीं नेऊन सोडणारे, लोकांस निर्लोभाच्या गोष्टी सांगून घरांतल्या घरांत किंवा परक्याच्या घरीं हवा तसला अनाचार करणारे किंवा पैशासाठीं प्राण सोडणारे, अथवा भस्माचे लांबलचक पट्टे, मुद्रांचे छाप, दर्भांच्या मुष्टी, शालजोड्यांचे लपेट, रेशिमकांठी धोतरांच्या नऱ्या, रुद्राक्षाच्या व स्फटिकांच्या माळा, टाळ व करताल इत्यादी वाद्यें, नाना प्रकारचीं भजनें व नाच गीत, व जीवात्मा आणि परमात्मा यांतील भेदाभेदाविषयीं कधीं कधीं न समजणारी व कधीं समजणारी चर्चा इत्यादि धार्मिकपणाच्या दिखाऊ साधनांनीं बायाबापड्यांस व अज्ञ पुरुषांस बुचाडणारे पहिल्या चालीचे दुर्वृत्त दांभिक सुधारक काय थोडे आहेत ! पण त्यांना शेणमार करण्याची, अपंक्त करण्याची किंवा अलीकडील, बोलक्या सुधारकांवर जी वाक्यशरांची वृष्टि होत असते तशा प्रकारची वृष्टि त्यांवर करण्याची इच्छा कधीं कोणास झाली आहे काय ! कधीं नाहीं. कारण चांगली गोष्ट हातून प्रत्यक्षपणें न घडली तरी ती सांगत फिरणें हा कांहीं दोष नाहीं, असा मनुष्यांचा पक्का समज होऊन गेला आहे, असें त्यांच्या अशा प्रकारच्या आचरणावरून उघड होतें. तेव्हां सुधारणानिंदकांनीं सध्यांच्याच बोलक्या सुधारकांवर इतकें तुटून पडणें शुद्ध वेडेपण होय. वाद करतां करतां ज्या चांगल्या गोष्टी ठरतील त्यांचा अंगीकार त्याच्याकडूनचसा काय, खुद्द सुधारणानिंदकांकडूनही हळूं हळूं होत जाईल, अशी आमची खात्री आहे !

## १२. कैद्याविषयींचें समाजाचें कर्तव्य

तुरुंगांत येणारे सर्वच कैदी चोरी, खून, खोटे कागद, विश्वासघात यांसारखे वाईट गुन्हे करून आलेले असतात असें नाहीं. एकादे वेळेस निरपराधी मनुष्याला शुष्क कारणावरून किंवा गुन्ह्याच्या संशयावरून तुरुंगांत जावें लागतें. वास्तविक पाहिलें तर शेंकडा तीस कैदी मात्र खरोखर गुन्हेगार सांपडतील, बाकीच्या दोन तृतियांशांत विलक्षण प्रकारची भेसळ असते. कित्येकांना बाहेर पोटाला मिळत नाहीं म्हणून ते कोणाची कांहीं तरी कुरापत काढून, शिवीगाळ किंवा मारामारी करितात, आणि तुरुंगांत येऊन पडतात. कांहीं जण अज्ञानामुळें किंवा मूर्खपणामुळें कायद्याच्या तावडींत सांपडतात, व नसत्या अपराधाबद्दल त्यांच्यावर टकोरीं झोडण्याचा प्रसंग येतो. कित्येक दुसऱ्याच्या नादीं लागून फसून येतात. कित्येक शुद्ध वेडे असतात, व शहाणे सरकारी अधिकारी नीट चौकशी न करितां त्यांना उचल कीं दे तुरुंगांत टाकून असें करितात. तुरुंग म्हणजे लोकांस असें वाटतें कीं एकत्र केलेल्या दुष्ट लोकांचें वसतिस्थान होय. त्याच्या भिंताडावरून आलेला वारा लागला तरी अपाय होण्याची भीति असते. पण ही भीति अगदीं निराधार आहे. लोकांनीं तुरुंगाचा विनाकारण एवढा बागुलबोवा करून ठेविला आहे. शिवाय लोक समजतात त्याप्रमाणें त्यांत मनुष्यजातीचा अत्यंत निंद्य भाग असतो असें मानिलें तरी त्याचा तिरस्कार करणें आपणांस योग्य नाहीं. लोक अपराध करितात याचें कारण त्यांना शिक्षण मिळत नाहीं हें होय. श्रीमंत व सुशिक्षित घराण्यांतील लोकांकडून फारसा गुन्हा होत नाहीं, हें निरनिराळ्या देशांतल्या तुरुंगांच्या रिपोर्टांवरून सिद्ध होतें. कोणत्याही देशांतील एकंदर तुरुंगांची आणि त्यांतील लोकांची संख्या कमी होत जाणें हें त्या देशाच्या वाढत्या सुधारणेचें चिन्ह होय. लोकांनीं सुशिक्षित व सदाचरणी होऊन स्वतःचीं व सार्वजनिक कामें नेकीनें करावीं, आणि संसारवृक्षाच्या स्वादु फलांचा उपभोग घ्यावा हाच ऐहिक सुधारणेचा मुख्य उद्देश होय. उच्च कुलांत जन्मास येणें हें कोणाच्या स्वाधीन नाहीं. अभिजनत्व ही बाह्योपाधीवर अवलंबून राहणारी साहजिक गोष्ट होय. ती ज्यास परिश्रमाशिवाय प्राप्त झाली त्यांना फुशारकी मारण्याचें कांहीं कारण नाहीं. मनुष्यतेला कलंक आणणारे अपराध ज्या देशांत घडून येत असतात, त्या

देशांतील सुधारणा कितीहि प्रबल झाली असली तरी तींत कांहीं हाशील नाहीं. सबब सर्व सदय, देशाभिमानी सुशिक्षित, आणि श्रीमंत लोकांनीं अपराधी मनुष्यतेचा कंटाळा न करितां ती सद्‌गुणी करण्यासाठीं रात्रंदिवस झटलें पाहिजे

## १३. मातृभाषा हेंच शिक्षणाचें खरें माध्यम !

देशांतील शिक्षणक्रम देशी भाषांत चालणें किती उचित आहे, हें ध्यानांत आणून तसें होण्याची खटपट करीत असणें हें तर एकीकडेच राहिलें; पण बाकीच्या विषयांप्रमाणें देशी भाषांस युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमाचा एक विषयहि आम्हांस करतां येत नाहीं, यावरून आमची आस्था, धमक, निश्चित विचार, देशकल्याणाची खरी कल्पना आणि कोणत्याही गोष्टींत यश येईं-पर्यंत तिचा पाठलाग न सोडण्याचा निर्धार हीं व्यक्त होतात ! युनिव्हर्सिटी आपल्या अभ्यासक्रमांत देशी भाषांस घालीत नाहीं ! युनिव्हर्सिटी अमकें करीत नाहीं ! युनिव्हर्सिटी तमकें करीत नाहीं ! असें रडगाणें आतां आम्ही किती दिवस गात बसणार ? युनिव्हर्सिटी, सिंडिकेट, सेनेट, अभ्यासक्रम, शिक्षणालयें हीं सारीं निश्चयानें परिश्रम केल्यास आपल्या हातीं येणार आहेत, व आपणांस त्यांना पाहिजे तें वळण लाविता येणार आहे, हें तुम्हांस केव्हां कळूं लागणार ? अगोदर देशी भाषांचा अभ्यास होऊं लागण्यांत व पुढें त्या भाषांतच अभ्यास होऊं लागण्यांत या देशाचें खरें हित आहे अशी तुमची पक्की खात्री झाली असेल तर युनिव्हर्सिटीचें नाक धरून तिच्याकडून या अप्रिय औषधाचा स्वीकार करविणें अशक्य आहे काय ? ती मोठी सामर्थ्यवती आहे हें आम्ही कबूल करतों. पण अशीला जेरीस आणण्याचा खरा उपाय तिच्यापुढें पदर पसरून ‘ यांत आम्हांस भिक्षा घाल ’ अशी तिची दीनस्वरानें प्रार्थना करीत बसणें हा नव्हे. असें करूं लागलांत कीं, तिला अधिकच ताठा भरला म्हणून समजा. अभिमानाचा काटा अभिमानानेंच काढला पाहिजे. युनिव्हर्सिटीचीं सूत्रें सध्यां ज्यांचे हातीं आहेत त्यांना देशी भाषांचा किंवा देशी भाषांत वरिष्ठ प्रतीचा अभ्यास होऊं लागल्यानें पाश्चिमात्य ज्ञानभांडारावर हल्ला करणें, व त्या हल्ल्यांत

सांपडलेल्या लुटीपासून आपलें हित करून घेणें या गोष्टीस किती साहाय्य होणार आहे, हें अद्यापि नीट दिसूं लागलें नाहीं, कितीहि समजावून सांगितलें तरी समजत नाहीं, व कानाशीं कितीहि ओरडलें तरी ऐकूं येत नाहीं! असल्या लोकांस समजविण्यास, पाहविण्यास व ऐकविण्यास, लेचेपेचे प्रयत्न उपयोगी नाहींत. देशाच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत चळवळ करून तिच्या दंग्यानें यांचीं डोकीं भणाणून सोडलीं पाहिजेत.

× × ×

## १४. ऐसें कैसें रे सोंवळें

ज्यांना आपल्या सोंवळ्याओंवळ्याची हास्यास्पदता पहावयाची असेल त्यांनीं पुढील विशिष्ट उदाहरणांकडे किंचित् नजर फेंकावी. हरणाच्या कातड्यास पवित्र समजून आम्ही त्याचे तुकडे जानव्यांत घालतों. वृद्ध संन्यासी त्यांचे जोडे करतात, व ते घालून ओंवळे न होतां पुढीस जातात! पूजाब्रह्मयज्ञादि धर्मकर्म करण्यास या कातड्यांसारखीं पवित्र आसनें नाहींत! यासंबंधानें आमचा असा प्रश्न आहे कीं, हरणाच्या किंवा वाघाच्या कातड्यासच इतकी शुचिर्भूतता कोठून आली? ज्या गाईच्या मूत्रप्राशनानें आणि मललेपनानें आम्ही आपणांस श्रावणमासीं पुनीत करून घेतों त्या गाईच्या कातड्यात हरणाच्या कातड्याइतकी पवित्रता कां नसावी? तसेंच यज्ञांत ज्याचें मांस-भक्षण करून आम्हांस अनंत पिढ्यांचा उद्धार करतां येतो, व कदाचित् जन्ममरणाच्या क्लेशापासून सोडवणूक करून घेतां येते; त्या आजच्या उबदार व कमावलेल्या कातड्यास हरणाच्या कातड्याइतकें पवित्र मानून संध्यादि कर्मं करतांना त्याचीं आसनें कां वापरूं नयेत? आतां तंतुपटाच्या सोंवळ्याओंवळ्याची थोडीशी चिकित्सा करूं. सध्यां यासंबंधानें सोंवळ्याच्या ज्या कल्पना रूढ आहेत, त्यांप्रमाणें नव्या धोतरास विटाळ नाहीं; कुणब्याच्या स्पर्शानें धोतरें विटाळत नाहींत; क्षौर करवून अंगरखा व पागोटें घालण्यास प्रत्यवाय नाहीं! याप्रमाणें वनस्पतीपासून उत्पन्न होणाऱ्या तंतूंची हालहवाल आहे. या सदरांत कागद, बोटवाती, सूतपुतळ्या वगैरे कापसाच्या चिल्हर वस्तूंचा समावेश करण्यास हरकत नाहीं. शाईचा ठिपका पडला कीं, कोरा कागद सोंवळा झाला! जणूं काय या कृष्णकलंकांतच शुचिर्भूतत्व आहे.

कुंकुमार्चनानें सूतपुतळ्या विधावांनीं सुद्धां सोंवळ्यांत वापरण्यासारख्या होतात. परटाकडील भाताची खळ लाविलेलीं चिरगुटें एका शिंतोडयानें शुद्ध होतात, हा एक सोंवळयाचा चमत्कारिक प्रकार ध्यानांत ठेवण्यासारखा आहे! वास्तविक पाहतां कृमिज तंतूंस किंवा जनावरांच्या लोंकरीपासून केलेल्या तंतूंस विशेष ओंवळेंपण चिकटलेलें असावें; पण त्यास कापसाच्या चिरगुटा-पेक्षां अधिक किंमत पडत असल्यामुळें त्यांचीं वस्त्रें कापसाच्या वस्त्रांहूनहि शुद्ध होऊन बसलीं आहेत! पीतांबराचें शुद्धत्व कशानेंच बिघडत नाहीं! घाबळी तर सोंवळयाची खाण होऊन बसली आहे! हलक्या किंमतीच्या नित्य वापरण्याच्या मुकटयांत व पीतांबरांत म्हणण्यासारखा फरक नसतो, एक दुसऱ्यापेक्षां अधिक शुद्ध! अलीकडे वनस्पतिज तागी मुकटाही कृमिज मुकटयाशीं प्रतिस्पर्धा करूं लागला आहे. ही वापरण्याच्या चिजांची स्थिति झाली. खाण्याच्या पिण्याच्या वस्तूंची दशाही यापेक्षां विशेष बरी आहे असें नाहीं. एका दृष्टीनें पाहतां या खात्यांत जितका गोंधळ व जितकी असं-बद्धता आहे तितकी दुसरीकडे सहसा सांपडणार नाहीं! हरभऱ्याची डाळ भिजवून वाटली, आणि तिची चटणी केली तर ती निर्लेप होऊन फरा-ळास चालते! पण तीच डाळ अगोदर भिजवून पाटयावर न चिरडतां, अगोदर जात्यांत चिरडून मग तिच्या पिठांत पाणी घातलें कीं तें खरकटें झालें! त्याचें पिठलें मुकटा लावून घेतल्याशिवाय तोंडांत घालण्याची सोय नाहीं! भडबुंजाकडच्या पोह्याकुरमुऱ्यांसारख्या भाताच्या जाती राजरोसपणें खाण्यास काहीं हरकत नाहीं! पण बाजाराच्या भाजीभाताकडे किंवा पावबिस-कुटांकडे ब्राह्मणानें पाहाण्याची सोय नाहीं! दवाखान्यांत कोणत्याहि माणसानें कसलेंहि औषध दिलें तरी तें चालतें, पण ट्रेचरच्या दुकानचें लेमोनेड किंवा सोडावॉटर उघडपणें पिणें म्हणजे ब्राह्मण्याला हरताळ लावण्यासारखें होय! आग-गाडीनें किंवा साध्या गाडीनें प्रवास करतांना डब्यांतील दशम्यांस किंवा त्यांहून अधिक मोलाच्या फराळास कशाचाही स्पर्श झाला तरी चालतो, पण आपत्कालींहि कुणबिणीनें केलेल्या भाकरीस स्पर्श करतां कामा नये! अशा प्रकारचीं खेंकटीं किती म्हणून सांगावीं? याप्रमाणेंच मडकीं, चुली, मेणबत्त्या, साबणाच्या वडया वगैरे दुसऱ्या प्रकारच्या वस्तूंचीहि विलक्षण स्थिति आहे. यापैकीं कित्येकांत चरबी असते हें ठाऊक असून त्या

वापरण्याचा प्रघात पडत चालला आहे. व तसें कोणासहि वावगें दिसत नाहीं. अलीकडे व्हाइट मिक्स्चर, शापोटोचा बालकुक्कुटार्क व इतर मांसनिर्मित औषधें गुपचिपपणें घेण्याचा परिपाठ पडत आहे! असें असून ब्राह्मण्य जसेंच्या तसें कायम ठेवूं पहाणारांच्या धर्माभिमानास किंवा अविचारास काय म्हणावें, हें आम्हांस समजत नाहीं. कसेंहि झालें तरी थोड्या वर्षांत अशा प्रकारच्या सोंवळ्याओंवळ्याच्या संबंधानें बराच फेरफार होणार आहे व झाला पाहिजे, यांत शंका नाहीं. पण हा फेरफार बुद्धिपुरःसर प्रयत्न केल्याशिवाय हवा तसा व लौकर होण्याचा संभव नाहीं.

× × ×

## १५. धिक् तुमची विद्या

मनुष्यांच्या उद्योगाचे किंवा प्रवृत्तिप्रणीत मानसिक व शारीरिक चलनावस्थेचे दोन भेद आहेत. एक नियामक व दुसरा उत्पादक उद्योग. नियामक उद्योग म्हणजे ज्या उद्योगामुळें मनुष्यास आपल्या समाजांत व्यवस्था ठेवतां येते. राजे, मंत्री, लष्करी शिपाई, न्यायाधीश, पोलिस, सामान्य नीतिशिक्षक वगैरे लोकांचा उद्योग पहिल्या प्रकारचा आहे; म्हणजे हे समाजयंत्राचे फक्त चालक किंवा व्यवस्थापक आहेत. शेतकरी, कोष्टी, सुतार, गवंडी वगैरे सर्व प्रकारचे कारागिर व धंदेवाले लोक दुसऱ्या वर्गांत येतात, म्हणजे त्यांचा उद्योग उत्पादक आहे. सुधारलेल्या राष्ट्रांतील कांहीं लोक पहिल्या प्रकारचा, कांहीं दुसऱ्या प्रकारचा, व कांहीं दोन्ही प्रकारचे उद्योग करीत असतात. देशाच्या विशिष्ट स्थितीप्रमाणें या निरनिराळ्या वर्गांतील लोकांचें प्रमाण कमी अधिक होत असतें. केवळ नियामक उद्योग करणारांची संख्या अगदीं स्वल्प असून, थोडासा नियामक व पुष्कळ उत्पादक उद्योग करणारांची मोठी संख्या ज्या देशांत असते तो विशेष सुखी असतो. अमेरिकेंत सध्यां अशी स्थिति आहे. त्यामुळें तेथील लोक इतर देशांतील लोकांपेक्षां प्रत्येक बाबतींत फार पुढें सरसावले आहेत, अमेरिकन लोकांस उत्पादक उद्योग करण्याचें जणुं काय वेड लागून गेलें आहे व त्यामुळें **संयुक्त संस्थानें** इंद्रलोकतुल्य होऊन गेलीं आहेत. या संस्थानांच्या खालोखाल इंग्लंड व फ्रान्स हे देश आहेत. सगळ्याच देशांतील लोकांस

सारखा उद्योग करण्याचीं स्वाभाविक व कृत्रिम साधनें असतील व साऱ्यांस सारखें वैभव प्राप्त करून घेतां घेईल, असें आमचें म्हणणें नाहीं. तथापि एक गोष्ट आम्हांस पक्की ठाऊक आहे कीं, कोणत्याही देशांतील लोकांस प्राप्त होण्यासारखें जें सुख असेल तें त्यांना वर सांगितलेल्या पद्धतीनें उद्योग केल्याशिवाय कधींहि प्राप्त होणार नाहीं. ज्या लोकांस उत्पादक उद्योगाचा कंटाळा, व काहीं हौस असली तर नियामक उद्योगाची असे लोक मोठेपणास कधींही चढणार नाहींत. पण सध्यां तर आमची तशी स्थिति होऊन गेली आहे. ज्याला त्याला अंमलदार व्हावयाला पाहिजे. सगळ्यांनींच अंमलदार होऊन चैन करण्याची इच्छा धरल्यावर चैनीचे पदार्थ तरी उत्पन्न करणार कोण? उत्पादक उद्योग करण्याची हौस सार्वत्रिक होऊन संपत्ति व व्यापार वाढल्याशिवाय सर्वांस चैन तरी कोठून करतां येणार? अंमलदार मुळींच नकोत असें आमचें म्हणणें नाहीं. पण शेरभर मसाला आणि मूठभर तांदूळ अशी स्थिति काय कामाची? १७८९ सालीं फ्रान्स देशात जी मोठी राज्यक्रांति झाली तिच्या अनेक कारणांपैकीं फाजिल अंमलदार हें एक मुख्य कारण होतें. जिकडे तिकडे अंमलदारांचा सुळसुळाट होऊन गेल्यामुळें देशातील वार्षिक संपत्तीचें उत्पन्न अगदीं संपुष्टात आलें होतें इतकेंच नाहीं, तर जे थोडे उत्पादक लोक काबाडकष्ट करून थोडी बहुत संपत्ति उत्पन्न करीत, त्यांवर पराकाष्ठेचा जुलूम होऊं लागला होता. अंमलदार वाजवीपेक्षां अधिक झाल्यानें उत्पादक रयतेचें दोन प्रकारांनीं नुकसान होतें. एक, त्यांच्या पगारासाठीं तिला आपल्या प्राप्तीचा बराच वाटा द्यावा लागतो. दुसरें, त्यांच्या जुलमामुळें केलेलें उत्पन्न आपल्या हातीं लागेल किंवा नाहीं, अशाविषयीं तिला संशय येऊं लागतो. या दोन कारणांमुळें उत्पन्न करण्याची इच्छा मंदावते, आणि तसें झालें म्हणजे सर्वांचेंच नुकसान होतें. हाच परिणाम सरकारी अंमलदारांशिवाय इतर प्रकारचे अनुत्पादक लोक वाढल्यानेंही होतो. फाजील धर्माधिकारी, फाजील नीतिप्रसारक, फाजिल शिक्षक, फाजील अडते, फाजील लेखक ( पत्रकर्ते, पुस्तककर्ते, वगैरे ), फाजील वकील, फाजील राजकारस्थानी या सर्वांच्या फाजीलपणांत, म्हणजे त्यांची वाजवीपेक्षां जास्त संख्या होण्यांत, कष्टाळू रयतेचा फार तोटा आहे. अशा

प्रकारचे लोक मुळींच नसावेत, असें आमचें म्हणणें नाहीं. तसें झाल्यास समाज मुळींच सुरळीत चालावयाचा नाहीं. पण त्यांचें कमीपण त्याला जितकें विघातक आहे तितकें त्यांचें अधिकपणही विघातक आहे. आमच्या इकडील अलीकडल्या सुशिक्षित लोकांनीं सरकारी नोकरीवर सगळा जीव ठेविल्यामुळें आपली किंमत किती कमी करून घेतली आहे बरें? हाडांचीं काडें करून, व शेंकडों रुपये खर्च करून, बी. ए. पर्यंत अभ्यास करावा, आणि पुढें फळ काय? तर रेव्हिन्यू खात्यांत, किंवा शाळाखात्यांत, ३०।३५ रुपये दरमहाची नोकरी! चांगला सुतार सुद्धां तुमच्या शाळेचा उंबरठा न चढतां २५।३० रुपये सहज मिळवितो, हें या ग्राजुएटांस समजूं नये काय? तसेंच कोठें १०।१२ रुपयांची जागा रिकामी झाली कीं, तीबद्दल शेंपन्नास मॅट्रिक्युलेशन पास झालेल्या उमेदवारांचे अर्ज! धिक् तुमची विद्या आणि तुमचें कर्तृत्व! कष्टानें संपादिलेल्या विद्येचा असा सवंग विक्रय करावयाचा काय? विद्यार्जनानें विकसित झालेलीं मनें स्वतंत्र धंदे स्थापण्याकडे लावाल, तर तुम्हांस अन्नाची किंवा मानाची काय वाण पडणार आहे? पण खांदा देऊन काम करण्याची व दुसऱ्याचे गुलाम न होतां स्वतःच्या करामतीवर चरितार्थ संपादण्याची धमक आतां कोठें राहिली आहे?

× × ×

## १६. आमची अन्नान्न दशा

काय ही आमची दशा! पृथ्वींतलि साऱ्या लोकसंख्येचा सहावा भाग या देशांत राहतो; येथील जमीन सुपीक; येथें सर्व प्रकारच्या हवा; व्यापाऱ्यांचीं जहाजें चालण्याजोग्या येथें मोठमोठ्या नद्या; येथील रानांत व डोंगरांत सांपडणार नाहीं अशा एका एका झाडाचें नांव घेण्याची मुष्कील; बहुतेक धातूंचा हवा तेवढा पुरवठा; तीन हजार वर्षांची आमची पुरातन सुधारणा; युरोपांतलि राष्ट्रें अज्ञानतिमिरांत घोरत पडलीं असतां, नानाप्रकारच्या विद्यांत व कलांत आमच्या आम्हीं संपादिलेल्या प्रावीण्यामुळें सर्व पृथ्वीवर अद्यापि गाजत असणारा आमचा लौकिक—अशा प्रकारचे आम्ही हिंदू लोक असून, आज आम्हांस दुपारची नड कशी भागवावी, अशी प्रतिदिवशीं पंचाईत पडावी काय? पंचवीस मनुष्यजंतूंपैकीं प्रत्येकास एक दिवस नाहीं,

दोन दिवस नाहीं, वर्षांच्या वर्षं अर्धपोटीं, दुसऱ्या दिवसाची चिंता करीत व झोंपेची प्रार्थना करीत, रात्रीच्या प्रहरीं जमिनीवर अंग टाकण्याचा प्रसंग यावा, आणि शरीरांत व मनांत उत्साहाचें पुनरुज्जीवन न होतां, आंथरूण सोडून हातपाय ओढीत रोज सकाळीं फिरून उद्योगास लागणें भाग पडावें, हें किती शोचनीय आहे बरें ? रात्रंदिवस दुष्काळाची धास्ती; अनेक प्रकारच्या रोगांनीं, विशेषतः अपुरत्या अन्नामुळें, वस्त्रामुळें व राहण्याच्या घाण जागेमुळें, उत्पन्न होणाऱ्या तापानें ज्याच्या त्याच्या घरांत दृष्टीस पडणारी विपत्ति; गाल बसलेले, डोळे खोल गेलेले, साऱ्या अंगास वळया पडलेल्या. सारांश, भुकेनें सर्व प्रकारें गांजून आयुष्यास कंटाळलेल्या लोकांचे गांवोगांवीं व शहरोशहरीं दिसणारे थवे—हें पाहून आमच्या नीतिमान्, ज्ञानवान् व दयावान् राज्यकर्त्यांविषयीं स्वाभाविकपणें जितकी पूज्यबुद्धि उत्पन्न व्हावी तितकी होणें शक्य आहे काय ?

## १७. खरा सुधारक

लोकांच्या कल्याणाचा जो हेतु मनांत धरला असेल तो कोणत्या उपायानें लौकर तडीस जाईल व कोणत्या साधनानें एकंदरींत आपल्याला किंवा दुसऱ्याला कमींत कमी त्रास होईल याचा शांतपणानें निश्चय ठरवून तदनुसार वर्तन करावें, हेंच सत्पुरुषांस योग्य आहे. हा निश्चय करतांना खरी सुधारणा कशांत आहे हें फारच काळजीनें ठरविलें पाहिजे. कारण वारंवार होतें काय कीं, विशिष्ट वासनाधीन किंवा मताधीन झालेल्या मनुष्यास वास्तविक सुधारणा कशांत आहे हें नीट न समजून, जेवढें जुनें असेल तेवढें फेंकून देण्यांत व कसल्या तरी नवीन गोष्टींचा अंगीकार करण्यांत आपण सुधारणा करीत आहों असा भ्रम होतो ! असल्या लोकांस सुधारक म्हणण्यापेक्षां दुर्धारक म्हणणें हेंच बरें ! उदाहरणार्थ, हिंदु धर्मांत बरींच व्यंगें आहेत म्हणून यहुदी, महंमदी, खिस्ती किंवा अशाच प्रकारच्या दुसऱ्या एखाद्या धर्माचा अंगीकार करणाऱ्या मनुष्यास विचारी ही संज्ञा सहसा देतां येणार नाहीं. तसेंच, आमचे कांहीं रीतरिवाज मूर्खपणाचे आहेत म्हणून प्रत्येक गोष्टींत परकीयांचें अनुकरण करणें हेंहि कोण-

त्याही दृष्टीनें ज्याचें त्याला किंवा इतरांना परिणामीं विशेष सुखावह होण्याचा संभव नाहीं, असें आम्हांस वाटतें. उदाहरणार्थ, कित्येक प्रसंगीं धोतरें नेसणें सोईस्कर नाहीं म्हणून युरोपिअन लोकांप्रमाणें दिवसभर पाटलोन घालून बसणें, किंवा ते लोक विशेष कामाकडे कागदांचा उपयोग करतात म्हणून आपणही तसें करणें हें केवढें मूर्खपण आहे बरें ? ज्या देशांत आपले शेंकडों पूर्वज जन्मास आले, वाढले व मरण पावले; ज्या देशांतील हजारों पिढ्यांनीं अनेक गोष्टींत मोठ्या कष्टानें केलेल्या अनेक सुधारणांचें फळ आपणांस ऐतेंच प्राप्त झालें—अशा देशांतील धर्माचा, रीतरिवाजांचा व लोकांचा सर्वैथैव त्याग करणाऱ्या मनुष्यास खऱ्या सुधारकाची पदवी कधींहि शोभणार नाहीं. स्वभूमींत, स्वलोकांत, स्वधर्मांत, आणि स्वाचारांत राहून अविचारी व अज्ञान देशबांधवांच्या निंदेस किंवा छलास न भितां, त्यांच्याशीं कधीं भांडून, कधीं युक्तिवाद करून, कधीं लाडीगोडी लावून, अथवा सामर्थ्य असल्यास कधीं त्यांना दटावून त्यांची सुधारणा करणें यांतच खरी देशप्रीति, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरें शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे. याच्या उलट जे वर्तन करतात ते सुधारणा करीत नाहींत तर फक्त शृंखलांतर करतात ! अशांच्या कपाळीं लिहिलेली खरी गुलामगिरी कधींहि सुटावयाची नाहीं. भरतखंडांत अशा प्रकारचे नवीन गुलाम उत्पन्न होण्यापेक्षां तें आहे त्या प्रकारचें **गुलामांचें राष्ट्र** राहिलें तरी हरकत नाहीं !

× × ×

## १८. महाराष्ट्रीयांस अनावृत्त पत्र

प्रिय देशबांधवहो, संमतीच्या बिलाच्या संबंधानें **सुधारकांत** अलीकडे आलेल्या कांहीं निबंधांतील भाषेची तीव्रता पाहून, तुम्हांपैकीं कित्येकांचीं मनें त्यांवर रुष्ट झालीं असतील यांत संशय नाहीं. (न्यू इंग्लिश स्कूल, डेक्कन एज्युकेशन सोसायटी व फर्ग्युसन कॉलेज वगैरे लोकोपयोगी संस्थांची स्थापना व उत्कर्ष, त्याचप्रमाणें मराठा किंवा केसरी पत्रांचा अवतार, प्रसार, आणि करवीरप्रकरण वगैरे गोष्टींशीं या पत्राच्या नम्र लेखकाचा व रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांचा असलेला संबंध ज्यांना ठाऊक आहे, व हे दोघे इसम बरींच वर्षें एकमेकांशीं कसे वागत होते हें ज्यांनीं पाहिलें आहे, त्यांना

**सुधारका**सारख्या नवीन पत्राचें जनन, रा.टिळक व पाटणकर यांचा पहिल्या तीन संस्थांशीं नुकताच घडून आलेला विश्लेष व प्रस्तुत वादांत **सुधारक** व **केसरी** पत्रांच्या चालकांनीं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें एकमेकांवर चालविलेला भडिमार पाहून या उभयतांच्या बेबनावास व फुटाफुटीस झालेलीं कारणें त्यांस ठाऊक नसल्यामुळें विषाद वाटणें हें फार स्वाभाविक आहे. पण रा. टिळकांस तीं कारणें अवगत असतां, ज्या पत्राचें आधिपत्य त्यांचेकडे आहे त्याच्या गेल्या अंकांत ‘ ज्यांना वादांत स्वपक्षाची उणीव झांकण्यासाठीं परपक्षावर, आणि विशेषतः त्यांतलि एकदोन व्यक्तींवर, अपशब्दरूपी गोळीबार करणें हीनपणाचें वाटत नाहीं त्यांची कानउघाडणी करण्याच्या नादास लागणेंही व्यर्थ होय. सार्वजनिक विषयावर वादविवाद करण्याच्या मिषानें खाजगी द्वेषाचें उट्टें काढण्याची अमूल्य संधि क्वचितच मिळते.’ अशीं दोन वाक्यें आहेत. हीं वाक्यें जेव्हां आमच्या नजरेस पडलीं तेव्हां मात्र आम्हांस मोठा विस्मय वाटला! टिळक आणि आगरकर यांचा **खाजगी द्वेष**! आणि तो कशासाठीं? टिळक आगरकरांचें किंवा आगरकर टिळकांचें कांहीं एक लागत नाहींत, आणि म्हणून एकाला दुसऱ्याचा ‘ खाजगी द्वेष ’ करण्याचें कारण आजपर्यंत झालेलें नाहीं इतकेंच नाहीं तर त्यांपैकीं निदान एकाच्या मतानें तरी तें केव्हांच होण्याचा संभव नाहीं. त्या दोघांचा बेबनाव व फुटाफूट होण्यास ज्या समाईक संस्थांचे ते दोन सेवक होते, त्या संस्था चालविण्याच्या पद्धतीविषयीं व त्यांच्या उत्कर्षाच्या साधनांविषयीं कोणत्याही रीतीनें एकवाक्यता न होणारा त्यांचा मतभेद कारण झाला व याच मतभेदामुळें, प्रस्तुत वादांत ते एकमेकांची मुर्वत न ठेवतां, आपापल्या मतांचा आणि पक्षांचा विजय होण्यासाठीं अन्योन्यांवर तुटून पडत आहेत; दुसरें कांहीं नाहीं! अशा रीतीनें आपापल्या देशविषयक विचारांचें प्राबल्य स्थापण्यासाठीं अंतःकरणपूर्वक झुंझणाऱ्या लढवय्यांचें संग्रामचातुर्य पाहत राहून व कौतुक करावयाचें विसरून जाऊन, अशा युद्धप्रसंगीं केवळ कर्णकटु टणत्कारांच्या श्रवणावरूनच प्रेक्षकांनीं ‘ एकाला दुसऱ्याचा मत्सर उत्पन्न झाला आहे, ’ किंवा कोणी कोणाचें ‘ खाजगी द्वेषाचें उट्टें काढून घेत आहे, ’ असा कुतर्क करणें अत्यंत अनुदार होय! एका जननीच्या उदरांतून अवतरलेल्या सहोदरांत देखील जर भांडण किंवा

मतभेद झाल्याशिवाय राहत नाहीं, तर ज्यांचा एकमेकांशीं कोणत्याही प्रकारचा कुलसंबंध नाहीं, व ज्यांनीं राजसेवेचा सामान्य मार्ग सोडून देऊन आपापल्या मनास प्रशस्त वाटेल त्या रीतीनें आपल्या हयातींत आपल्या हातून होईल तेवढें देशकार्य करण्याचा निश्चय केला आहे, त्यांचे विचार सर्वांशीं न जुळले व ज्याला त्याला प्रसंगविशेषीं आपापल्या विचारांचा पराकाष्ठेचा अभिमान उत्पन्न होऊन, एकदां उभयतांनीं आरंभिलेल्या सामान्य गोष्टीस आमरण चिकटून राहणें स्वतःस किंवा इतरांस सुखास्पद व कल्याणप्रद होणारें नाहीं, अशी खात्री झाल्यामुळें ज्याच्या मनास जी दिशा अत्यंत आक्रमणीय वाटेल त्यानें ती धरणें, यांत नवल वाटण्यासारखें काय आहे, हें आम्हास समजत नाहीं ! बांधवहो, विचारकलहाला तुम्ही इतके कशासाठीं भितां? दुष्ट आचाराचें निर्मूलन, सदाचाराचा प्रसार, ज्ञानवृद्धि, सत्यसंशोधन व भूतदयेचा विचार इत्यादि मनुष्यांच्या सुखाची वृद्धि करणाऱ्या गोष्टी विचारकलहाखेरीज होत नाहींत. आजपर्यंत या देशांत हा कलह माजावा तितका कधींच न माजल्यामुळें, व बहुधा आमचे लोक 'गतानुगतिक' च असल्यामुळें हें भरतखंड इतकीं शतकें अनेक प्रकारच्या विपत्तींत खितपत पडलें आहे ! हा विचारकलह दुष्ट विकोपास जाऊं न देण्याविषयीं मात्र खबरदारी ठेविली पाहिजे. नाहीं तर त्यापासून पुढें खऱ्या लढाया आणि रक्तस्राव होण्याचा संभव असतो. सुधारक आणि दुर्धारक, चपल सुधारक आणि मंद सुधारक, थंडे सुधारक आणि गरम सुधारक अथवा नाना प्रकारच्या मतांचे नवे आणि जुने लोक यांमध्यें सांप्रतकाळीं जी दुही माजून राहिली आहे, ती पाहून घाबरून जाण्याचें बिलकूल कारण नाहीं ! पाश्चिमात्य शिक्षणामुळें ज्या दिवशीं या वादास आरंभ झाला तो दिवस हिंदुस्थानच्या भावी इतिहासांत महोत्सव करण्यासारखा होईल. त्या दिवशीं अनेक शतकें गाढ निद्रेंत घोरत पडलेला हिंदुस्थान देश किंचित् जागा होऊन चाळवूं लागला, किंवा प्रेतावस्थ झालेल्या त्याच्या विस्तीर्ण देहांत ईशकृपेनें पुनः एकवार चैतन्यावतार झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या दिवशीं त्याचें स्थाणुत्व नाहींसें होऊन त्याला जी यत्किंचित् गति मिळाली ती प्रतिवर्षीं अगदीं यव प्रमाणांत का होईना, पण सारखी वाढत आहे, व जों जों हा विचारकलह निकराचा होऊं लागेल तों तों झपाट्यानें होऊं

लागणार आहे. आतां किती झालें तरी कलह तो कलह! तो कशाही प्रकारचा आणि कितीहि सौम्य असला तरी त्यांत अप्रिय असें कांहींच नाहीं, असें कोठून होणार? ज्या दोन मनुष्यांचा परस्परांशीं संबंध आहे, त्यांपैकीं एक दुसऱ्याच्या विरुद्ध जाऊं लागला म्हणजे कधीं त्या दोघांस एकमेकांशीं वर्दळीस यावें लागेल; कधीं एकमेकांवर शब्दप्रहार करावे लागतील; कधीं उभयतांनीं आरंभिलेल्या कामांतून अंग काढून घेऊन विलग व्हावें लागेल; कधीं पदराला बराच खार लावून घ्यावा लागेल किंवा जिवाकडे न पाहतां अहोरात्र मानसिक शारीरिक कष्ट करावे लागतील. पण जोंपर्यंत आपण आपल्या विचाराच्या विजयासाठीं व प्रसारासाठीं भांडत आहों, असें प्रत्येकाच्या मनांत वागत राहील तोंपर्यंत न्यायसभेंत पक्षकाराचें भांडण भांडणाऱ्या वकिलांच्या दिखाऊ वैराच्या फार पलीकडे अशा दोन व्यक्तींचें वैर जाईल असें आम्हांस वाटत नाहीं. आगरकर आणि टिळक यांच्या वैराचें स्वरूप याहून भयंकर नाहीं असें निदान त्यांपैकीं एकाला तरी वाटत आहे. तसेंच या वैरामुळें या दोघांच्या व्यासंगांत जें अंतर पडलें आहे तें कमी न होतां कदाचित् अधिक होत जाण्याचा जरी संभव आहे तरी जेव्हां खुद्द आगरकरांच्या किंवा आगरकरांच्या निकट आप्तांच्या डोळ्यांस पाणी येण्यासारखी कांहीं अनिष्ट गोष्ट घडेल तेव्हां इतरांपेक्षां टिळकांस व जेव्हां टिळकांचे घरीं तसा अनिष्ट प्रकार घडेल, तेव्हां आगरकरांस विशेष वाईट वाटून डोळ्यास पाणी येईल, व मतभेदांमुळें उत्पन्न झालेल्या वैराचा एका क्षणात विसर पडून एक दुसऱ्याला मदत करण्यास सहज प्रवृत्त होईल!

धर्म, राज्य व समाज यासंबंधानें अलीकडे जे औपपत्तिक सिद्धांत सर्वमान्य होऊन बसले आहेत त्यांविषयीं आम्हां उभयतांत म्हणण्यासारखा मतभेद नाहीं. मनुष्याच्या बुद्धीचे व्यापार इंद्रियाधीन असल्यामुळें या बुद्धीचें, ब्रह्मांडाच्या आदिकारणांचें किंवा परमेश्वराचें यथार्थ ज्ञान होण्याचा संभव नाहीं, हें धर्मतत्त्व मनांत बाळगून धर्मकल्पनांत किंवा धर्माचारांत जे फेरफार करावयाचे ते करीत गेलें पाहिजे; राजकीय स्वातंत्र्य असल्याशिवाय कोणत्याही देशांत ऐहिक सुखाची परमावधि व्हावयाची नाहीं; पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार आणि इंग्लिश लोकांचें साहाय्य असल्याशिवाय आमचें डोकें वर निघण्याचा संभव नाहीं, याकरितां राजनिष्ठा यत्किंचित् ढळूं न देतां राज-

कीय हक्क संपादण्यासाठीं जें करणें असेल तें आम्हीं केलें पाहिजे; नीति-प्रसार, संपत्त्युत्पादन, आरोग्यरक्षण वगैरे अनेक महत्त्वाच्या गोष्टी ज्ञानाधीन असल्यामुळें लोकशिक्षणाचें काम जितक्या झपाट्यानें चालवेल तितक्या झपाट्यानें चालविलें पाहिजे; जातिभेद नाहींसा झाला पाहिजे, स्त्रीपुरुषांच्या ज्ञानांत व स्वातंत्र्यात जेवढें अंतर राहूं देणें अपरिहार्य असेल तेवढ्याहून अधिक राहिल्यास पूर्ण संसारसुख प्राप्त होण्याचा संभव नाहीं, म्हणून स्त्रियांची उन्नति करण्याबद्दल रात्रंदिवस झटलें पाहिजे; वगैरे धार्मिक, राजकीय व सामाजिक विषयांसंबंधानें स्थूल औपपत्तिक सिद्धांत जसे एकाला तसे दुसऱ्यालाही संमत आहेत. दोघांत जो मतभेद पडतो तो आज तारखेस हे सिद्धान्त अमलांत आणण्यासाठीं काय करतां येईल व तें कोणत्या साधनानें करतां येईल, यासंबंधानें पडतो. या घटकेस साध्य असलेल्या सुधारणेची इयत्ता आणि तिचीं साधनें यांविषयीं टिळकांचे बहुतेक विचार सामान्य लोकांस मान्य होण्यासारखे असल्यामुळें, किंवा त्यांस मान्य असलेल्या विचारांबाहेर जाण्यास टिळक तयार नसल्यामुळें, त्यांचें वर्तन भवभूतीनें रामचंद्राकडून वदविलेल्या–

स्नेहं दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि
आराधनाय लोकानां मुंचतो नास्ति मे व्यथा ॥

( स्नेह, दया, सौख्य, फार तर काय लोकांच्या संतोषासाठीं मला जानकीचा देखील त्याग करावा लागला तरी त्याबद्दल खेद वाटणार नाहीं ! ) या श्लोकार्थाप्रमाणें होत आहे, व या क्षणीं ते अत्यंत लोकप्रिय झाले असून, प्रत्येकाच्या तोंडांतून त्यांचें नांव निघत आहे. पण लोकांना आज ज्या गोष्टी प्रिय आहेत त्या या हतभाग्य लेखकास पसंत नसल्यामुळें, लोकछंदानुवर्तन त्याला अशक्य झालें आहे इतकेंच नाहीं, तर लोकांस अप्रिय परंतु पथ्यकारक असे विचार त्यांच्या मर्जीविरुद्ध पुनःपुन्हां त्यांचेपुढें आणणें हेंच आपलें कर्तव्य व जीविताचें सार्थक अशी त्याची दृढ कल्पना झाली असल्यामुळें, धार्मिक व सामाजिक गोष्टींत आपलें ज्ञान विकटोपर्यंत जाऊन पोहोंचलें आहे, व तत्संबंधक आचारांत सुधारणा करण्यास म्हणण्यासारखी जागा राहिलेली नाहीं, निदान त्या कामांत सरकाराचें किंवा कायद्याचें

साहाय्य घेतलें असतां सर्वथैव नुकसान होणार आहे असें समजणाऱ्या. श्रद्धाळू पंडितमन्य, व देशाभिमानी म्हणवून घेणाऱ्या जनसमूहाच्या उपहासाचें आणि रोषाचें स्थान त्यानें आपणांस करून घेतलें आहे. तथापि त्याला असा भरंवसा आहे कीं, म्हणण्यासारखी द्रव्यानुकूलता नसतां, श्री. शिवाजीराव महाराज होळकरांनीं देऊं केलेली दरमहा पांचशें रुपयांची नोकरी ज्यानें 'मला नको' म्हणून सांगितलें; विशेष बुद्धिसामर्थ्य किंवा शरीरसामर्थ्य नसतां, आज दहा अकरा वर्षें जो उत्साहपूर्वक शिक्षकाचा आणि लेखकाचा धंदा करीत आहे; कवडीची किफायत नसतां, ज्यानें सात आठ वर्षें सर्वत्र प्रसिद्ध केसरीपत्राचे बऱ्या वाईट रीतीनें 'रकाने' भरून काढले, इतकेंच नाहीं तर एका दुर्दैवी संस्थानिकास सुदशा यावी, येवढ्याच बुद्धीनें लिहिलेले लेख न्यायाधिशास अप्रशस्त वाटल्यामुळें त्यांनीं दिलेली शिक्षा त्यानें आनंदानें साहिली; हातीं असलेल्या पत्राचे मालक शुद्ध वाटेल तें लिहूं देत नाहींत असें दिसून आल्याबरोबर त्यांच्या धमकावण्यांकडे बिलकुल लक्ष न देतां समानशीलाच्या व विचारांच्या मित्राचें प्रोत्साहन व साहाय्य मिळतांच, सर्वतोमुखीं निंदा होत असलेल्या सुधारणेचा आणि सुधारकांचा पक्ष लोकांस वाटत असल्याप्रमाणें दुर्बल नाहीं, इतकेंच नाहीं तर त्याचेंच अखेरीस सर्वत्र साम्राज्य होणार आहे असें युक्तिवादानें सिद्ध करून देण्यासाठीं कोणत्याही गोष्टीची अनुकूलता नसतां, व लोकमत धडधडीत विरुद्ध असतां नवीन पत्राच्या नमत्या उठाठेवींत जो जाणूनबुजून पडला; रूढ धर्माचारांतील आणि लोकाचारांतील व्यंगांचें निर्भयपणें आविष्करण करण्याचें भयंकर पाप हातून घडत असल्यामुळें, देशाभिमानी व धर्माभिमानी म्हणविणाऱ्या पत्रांकडून होत असलेला शिव्यांचा व शापांचा प्रचंड भडिमार ज्याला व ज्याच्या निरपराधी स्त्रीला एकसारखा सोसावा लागत आहे; स्वमताचें मंडन व तदनुसार होईल तेवढें वर्तन करण्यासाठीं, आपल्या फार दिवसांच्या मित्रांचाचसा काय, तर रात्रंदिवस काळजी वाहून आणि कडेवर खांद्यावर खेळवून, ज्यांनीं लहानाचें थोर केलें अशा अत्यंत ममताळू व पूज्य आप्तांचाही दीर्घ रोष ज्यानें आपणांवर करून घेतला आहे —अशा मनुष्याच्या लेखांत कितीही प्रमाद होत असले व केवढीही कटुता असली तरी ते समंजस मनुष्याच्या स्वल्प आदरास, निदान थोड्याशा अनु-

कंपेस तरी पात्र झाले पाहिजेत. ‘हा वेडापीर इतके हाल, संकटें, व लोकापवाद सोसून ज्या अर्थी इतकी धडपड करीत आहे त्या अर्थी ती लोकांस अंतीं हितावह होईल अशी निदान याच्या मनाची तरी खात्री झाली असावी,’ असा विचार त्यांच्या मनांत येऊन, त्यांनीं त्याच्या दोषांबद्दल त्यास क्षमा केली पाहिजे. त्यांनीं तसें केलें तर ठीकच आहे; पण नाहीं केलें तरी त्यास विशेषसें वाईट वाटण्याचा संभव नाहीं; कारण, सारें जग त्यावर उलटलें तरी पुढील कविवाक्याचें स्मरण करून त्याला आपलें समाधान करून घेतां येतें.

ये नाम केचिदिह नः प्रथयंत्यवज्ञाम् ।
जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः ॥
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समानधर्मा
कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ॥

अर्थः—खरोखरीच जे या गोष्टींत आमची निर्भर्त्सना करतात, त्यांना काहींच समजत नाहीं, व त्यांच्या कारतां हा आमचा प्रयत्नही नाहीं. माझ्या शीलाचा एखादा इसम कोठें तरी असेल किंवा निपजेल; पृथ्वी अफाट आहे व काळ अनंत आहे!

# देशमुख आणि कंपनीचीं आगामीं प्रकाशनें

### वि. स. खांडेकर

१ अश्रु
२ बुद्ध आणि हिटलर
३ तिसरी भूक
४ वर्षाकाल
५ छाया भाग १–२
६ चार भिंती
७ चक्रवर्ती
८ बडी मां
९ विसावें शतक
१० कल्पलता
११ वालुका
१२ मराठीचा नाट्यसंसार
१३ चल ये राणी
१४ माझ्या कादंबऱ्या
१५ वटपत्रें.
१६ साहित्यसाधना.

### ग. त्र्यं. माडखोलकर

१ तीन दिवस
२ ऋणभार
३ माझे आवडते कवि
४ चक्रवर्ति उदयन
५ उर्वशी
६ उमरखय्याम
७ विलापिका
८ दोन तपें
९ हें युद्ध

### द. र. कवठेकर

१ आपुलकीची झळ
२ ढगाआड
३ आग आणि पाणी

### ना. धों. ताम्हनकर

१ गुजाताई
२ शेजारी
३ संतु

### प्र. के. अत्रे

१ ' मी कसा झालों
२ ! [ लघुकथा ]

### कृष्णाबाई मोटे

१ अनामिकेची पूजा
२ कलाक्षेत्रांत
३ मवाली
४ गुणाची पोर

### काकासाहेब कालेलकर

१ स्मरण–यात्रा

### अनंत काणेकर

१ काळे आणि पांढरे

### चिं. वि. जोशी

१ गुंड्याभाऊ
२ दरबारकथा
३ लंकावैभव
४ वायफळाचा मळ

### दत्तु बांदेकर

१ हिरवी माडी
२ कबुलीजबाब
३ गडी फू

### गोपीनाथ तळवलकर

१ मंगल धाम

### साने गुरुजी

१ संध्या
२ निळा पक्षी